सप्टेंबर – ऑक्टोबर २०२२/पाने ९२/किंमत ₹१०

# लोकराज्य





**श्री. नरेंद्र मोदी**
मा. प्रधानमंत्री

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# दीपोत्सव





पर्व दीपोत्सवाचे
सौख्य समृद्धीचे
महाराष्ट्राच्या
नव तेजाचे...

## दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!



**श्री. देवेंद्र फडणवीस**
मा. उपमुख्यमंत्री

**श्री. एकनाथ शिंदे**
मा. मुख्यमंत्री

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

## ६ विकासाची घोडदौड

गेल्या तीन महिन्यांच्या कालावधीत आम्ही सामान्य माणसाला केंद्रबिंदू मानून गतिमान निर्णय घेतले. त्यामुळे विकासाची घोडदौड कायम राहील. राज्याच्या विकासासाठी आम्ही काम करतोय. सोबतीला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मंत्रिमंडळातील सहकारी आहेत. आम्ही विकासाला गती देण्याचे काम करतोय. समाजातील शेवटच्या घटकाला न्याय देण्याचे आमचे ध्येय आहे.



## १० लोककल्याणकारी निर्णय

गेल्या तीन महिन्यांत लोककल्याणकारी निर्णय घेतानाच राज्याची आर्थिक घडी नीट बसावी, याकडे लक्ष देण्यात येत आहे. सर्वसामान्यांच्या कल्याणासाठी कुलूपबंद तिजोरी पुन्हा एकदा खुली झाली आहे. एकाच ठिकाणी थांबलेले पाऊल आता पुढे पडायला सुरुवात झाली आहे. राज्याचा कारभार पारदर्शी करतानाच भ्रष्टाचाराबाबत 'झिरो टॉलरन्स'चे तत्त्व हा या सरकारचा केंद्रबिंदू आहे. सामान्य माणसापासून ते पायाभूत सुविधेच्या प्रकल्पांपर्यंत सर्वत्र विकासाचे चक्र पुन्हा गतिमान झाले आहे.

## ७९ आपली सेवा आमचे कर्तव्य

आपल्या राज्यातील नागरिकांना राज्य शासन व अधीनस्थ सर्व कार्यालये यांच्यामार्फत दिल्या जाणाऱ्या सेवा पारदर्शक, गतिमान व कालबद्ध पद्धतीने देण्याकरिता 'महाराष्ट्र लोक सेवा हक्क अधिनियम २०१५' पारित करण्यात आला. नागरिकांना अधिकार देणारा आणि प्रशासनाला जबाबदार व उत्तरदायी करणारा हा क्रांतिकारी कायदा आहे. या कायद्याचे उद्दिष्ट नागरिकांना पारदर्शकपणे, तत्परतेने, सहज व सुलभपणे सेवा देण्यात यावी असे आहे.

## ८३ प्रेरणादायी व दिशादर्शक

महात्मा फुले नविनीकरणीय ऊर्जा व पायाभूत प्रौद्योगिकी मर्यादित (महाप्रित) ही कंपनी इतर शासकीय महामंडळांसाठी प्रेरणादायी व दिशादर्शक ठरणारी आहे. महाप्रित ही महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाची सहयोगी कंपनी असून या कंपनी अंतर्गत अनेक प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत. एप्रिल २०२१ मध्ये महात्मा फुले नविनीकरणीय ऊर्जा व पायाभूत प्रौद्यौगिकी मर्यादित अर्थात महाप्रित ही वेगळी उपकंपनी स्थापन करण्यात आली आहे.

## ८५ ठाणे खाडीला 'रामसर' दर्जा

नुकतेच रामसर स्थळ म्हणून घोषित झालेली ठाणे खाडी जरी महाराष्ट्रात तिसऱ्या क्रमांकावर असली, तरी भारतामधील पहिले असे रामसर स्थळ आहे जे तीन शहरांच्या (ठाणे, मुंबई, नवी मुंबई) मधोमध आहे. ठाणे खाडी फ्लेमिंगो अभयारण्य क्षेत्र व पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील भाग म्हणजे ६५२२ हेक्टर, असे एकत्रित क्षेत्र रामसर स्थळ म्हणून घोषित करण्यात आले आहे. रामसर स्थळ घोषित होण्यासाठी ९ निकषांपैकी ६ निकषांची पूर्तता ठाणे खाडीने केली आहे. ठाणे खाडीमध्ये अनेक वनस्पती, प्राणी, पक्षी यांचा अधिवास आहे.


| | | | |
|---|---|---|---|
| विकासाची घोडदौड | ६ | कृषीचे सर्वंकष धोरण | ४० |
| लोककल्याणकारी निर्णय | १० | सर्वसमावेशक शिक्षण | ४२ |
| सुलभ, गतिमान प्रशासन | १४ | सहकारातून समृद्धी | ४४ |
| पारदर्शकता व विश्वासार्हता | १६ | महसूल संवर्धनावर भर | ४६ |
| विद्यार्थी गुणवत्तेला प्राधान्य | १८ | पर्यटनातून रोजगार | ४८ |
| सर्वांगीण विकासाचा संकल्प | २० | दहा विधेयकांना मंजुरी | ५० |
| शेवटच्या घटकांचा विकास | २२ | २२ सूचनांवर चर्चा... | ५३ |
| पाणीपुरवठ्याचे उद्दिष्ट | २४ | महाराष्ट्र नव्याने घडवू या.. | ५५ |
| बंदर विकासाला गती | २६ | पाऊल पडते पुढे | ५६-६९ |
| निर्भेळ आणि सकस आहार | २८ | मंत्रिमंडळात ठरले ! | ७०-७६ |
| कामगारांची सुरक्षा | ३० | सेवा पंधरवडा | ७७ |
| रोजगाराला प्राधान्य | ३२ | आपली सेवा आमचे कर्तव्य | ७९ |
| उद्योगस्नेही धोरण | ३४ | प्रेरणादायी व दिशादर्शक | ८३ |
| आरोग्यसेवा अधिक सक्षम | ३६ | ठाणे खाडीला 'रामसर' दर्जा | ८५ |
| रस्ते विकासाला चालना | ३८ | माळरानाचा राजा 'माळढोक' | ८८ |

वर्ष ७४ वे | अंक १ | सप्टेंबर – ऑक्टोबर २०२२

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

लोकराज्य

- मुख्य संपादक — जयश्री भोज
- प्रबंध संपादक — गणेश रामदासी, दयानंद कांबळे
- संपादक — अनिल आलूरकर
- उपसंपादक — अतुल पांडे, गजानन पाटील
- मुखपृष्ठ — सीमा रनाळकर, सुशिम कांबळे
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रितशोधन — उमा नाबर
- मुद्रण — मे. प्रिंट प्लस प्रा.लि., पिंपळास, ता. भिवंडी, जि. ठाणे

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई–४०० ०३२.
E-mail : lokrajya2011@gmail.com


ई – लोकराज्य http://dgipr.maharashtra.gov.in

या अंकात प्रकाशित लेखातील मतांशी
शासन सहमत असेलच असे नाही.

## शासकीय योजनांच्या माहितीसाठी फायदेशीर

शासनाच्या 'लोकराज्य' मासिकातून सर्वच विभागांची विभागवार माहिती प्रसिद्ध होत असते. या मासिकाच्या माध्यमातून शासनाच्या विविध विभागातील महत्त्वपूर्ण माहिती मिळते. या माहितीतून शासनाची भूमिका विशद होते.

**- प्रवीण पाटील, नंदेश्वर, ता. मंगळवेढा**




## स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त

लोकराज्य या मासिकमुळे अनेक योजना व बऱ्याच मंत्रालयीन निर्णयांची माहिती ही थेट लोकांपर्यंत पोहोचते. ही माहिती इतर साधनांपेक्षा जलदगतीने व योग्यरीतीने पोहोचते. राज्यातील घडामोडींचा धावता आढावा या मासिकाद्वारे घेतला जातो. यासोबतच स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त माहिती या मासिकाद्वारे पोहोचवली जाते.

**-प्रियांका पाटील, कराड, जि. सातारा**

## विशेषांक आवडला

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त लोकराज्य मासिकाचा विशेषांक प्रकाशित करण्यात आला. ही बाब समयसूचक, कौतुकास्पद व अभिनंदनीय आहे. या विशेषांकात महाराष्ट्र राज्यातील स्वातंत्र्यसैनिकांच्या ऐतिहासिक कार्याचा गौरव व स्वातंत्र्यलढ्यातील सहभाग यांचा आढावा घेण्यात आला.

लोकराज्य मासिकाचा भारतीय स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव विशेषांक हा ऐतिहासिक दस्तऐवज आहे. या अंकाचा विद्यार्थ्यांना वाचनासाठी व देशप्रेमाची प्रेरणा देण्यासाठी उपयोग होईल.

**- अनिल कदम, मु.पो. गिरवी**
**ता. फलटण, जि सातारा**




## शासकीय योजनांची विस्तृत माहिती

मी लोकराज्य मासिकाचा नियमित वाचक आहे. लोकराज्य मासिकाच्या माध्यमातून अनेक शासकीय योजनांची विस्तृत व अधिकृत माहिती मिळते. स्वातंत्र्याची ७५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त प्रकाशित करण्यात आलेला लोकराज्य अंक आवडला. यासाठी लोकराज्य टीमचे मनःपूर्वक आभार.

**- धीरज गोणेवार, यवतमाळ**

## 'लोकराज्य' वाचकांच्या प्रतिक्रियांचे स्वागत

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत प्रकाशित होत असलेल्या 'लोकराज्य' या महाराष्ट्र शासनाच्या मुखपत्राला तब्बल सात दशकांची गौरवशाली परंपरा लाभली आहे. राज्याच्या जडणघडणीचा बोलका साक्षीदार ठरलेल्या या मासिकाची गुणवत्ता आणि संदर्भमूल्य अधिक वाढवण्यासाठी वाचकांच्या प्रतिक्रिया अत्यंत मोलाच्या आहेत. वाचकांच्या विधायक सूचना, लेखांवरील अभिप्राय इत्यादींचे lokrajya2011@gmail.com या ई-मेलवर किंवा खालील पत्त्यावर पाठवण्यात यावेत. निवडक प्रतिक्रियांना अंकात योग्य ती प्रसिद्धी देण्यात येईल.

**पत्ता :** उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, नवीन प्रशासन भवन, १७ वा मजला, मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई - ४०००३२.

# आश्वासक वाटचाल

भारतीय स्वातंत्र्याचे अमृतमहोत्सवी वर्ष साजरे होत आहे. देशाच्या प्रगतीमध्ये सर्व राज्यांबरोबर महाराष्ट्र राज्याचा खारीचा वाट आहे. राज्याला ऐतिहासिक परंपरेबरोबरच समृद्ध असा प्राचीन वारसा तसेच उज्ज्वल भविष्य घडवण्याचे सामर्थ्यही लाभले आहे. राज्याने सर्वच क्षेत्रांत लक्षणीय प्रगती साध्य केली आहे. जागतिक दर्जाच्या पायाभूत सोयी सुविधा निर्माण करण्यावर राज्याने भर दिला आहे. सर्वसमावेशक वाढ आणि सर्वांच्या समृद्धीसाठी सातत्याने प्रयत्नशील राहून शाश्वत विकास साधून एक आदर्श निर्माण केला आहे.

राज्याने विविध क्षेत्रात केलेली प्रगती विस्मयकारक आहे. सार्वजनिक बांधकाम, जलसंपदा, गृहनिर्माण, उद्योग अशा पायाभूत सुविधा निर्मिती क्षेत्रात असो किंवा माहिती तंत्रज्ञान, जैवतंत्रज्ञान, अभियांत्रिकी क्षेत्रातील नवे प्रयोग असोत, महाराष्ट्राने या प्रत्येक क्षेत्रावर आपली स्वतंत्र मुद्रा उमटवली आहे. यामुळेच महाराष्ट्र सर्व क्षेत्रात सातत्याने पहिल्या क्रमांकावर राहिला आहे. देशाच्या अनेक लोककल्याणकारी योजनांची सुरुवात महाराष्ट्रातून झालेली आहे. यामुळे देशाच्याही नियोजनाला निश्चित अशी दिशा मिळाली आहे. राज्याची अशीच वाटचाल कायम राखण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मंत्रिमंडळातील सर्व सदस्य प्रयत्नशील आहेत.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात स्थापन झालेल्या सरकारला ऑक्टोबरमध्ये शंभर दिवस पूर्ण झाले. राज्य शासनाच्या सर्व विभागाचा आढावा, विभागाच्या माध्यमातून सुरू करण्यात येत असलेले प्रकल्प, भविष्यात राबवण्यात येणाऱ्या योजना, उपक्रम यांची माहिती सर्व मंत्रिमंडळातील सदस्यांनी आपल्या लेखांतून दिली आहे. राज्याचा कारभार पारदर्शी करतानाच भ्रष्टाचाराबाबत 'झिरो टॉलरन्स'चे तत्त्व हा या सरकारचा केंद्रबिंदू आहे. एक लोकाभिमुख, कार्यक्षम आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांच्या सोडवणुकीबाबत कायम सकारात्मक निर्णय घेणारे शासन म्हणून एक आश्वासक वाटचाल सुरू आहे.



राज्यातील शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांच्या मर्यादेत प्रोत्साहनपर लाभ, अतिवृष्टिग्रस्तांना एनडीआरएफच्या मदतीपेक्षा दुप्पट आणि तीन हेक्टरपर्यंत मदत, शेतकऱ्यांना ३६०० कोटींची मदत थेट खात्यात, ६५ मि.मी.च्या निकषात न बसणाऱ्या शेतकऱ्यांना आणखी ७५० कोटींची मदत असे कितीतरी महत्त्वपूर्ण निर्णय गेल्या तीन महिन्यांत घेतले गेले. अशा अनेक निर्णयांची माहिती या अंकात समाविष्ट केली आहे.

या अंकात राज्य शासनाच्या वाटचालीचा मागोवा घेण्यात आला आहे. तसेच नुकत्याच झालेल्या पावसाळी अधिवेशनातील विधानसभा व विधानपरिषदेच्या कामकाजाचा समग्र आढावा घेण्यात आला आहे. १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२२ हा कालावधी 'राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता सेवा पंधरवडा' म्हणून साजरा करण्यात आला. या सेवा पंधरवड्यास राज्यात मोठा प्रतिसाद लाभला. या सेवा पंधरवड्याबरोबरच सेवा हमी कायद्याची माहितीही देण्यात आली आहे.

नुकताच ठाणे खाडीला रामसर स्थळाचा दर्जा मिळाला आहे. ही खाडी महाराष्ट्रात तिसऱ्या क्रमांकावर आहे. सोलापूर जिल्ह्यात माळढोक पक्षाचे दर्शन याविषयी माहिती देणारा लेख तसेच 'महत्त्वाच्या घडामोडी' आणि 'मंत्रिमंडळात ठरले', या नेहमीच्या सदरांचाही अंकात समावेश आहे.

कोरोना महामारीमुळे गेली दोन वर्षे कोणतेही सण साजरा करता आले नाहीत. पण सध्या शासनाने घालून दिलेल्या अटी व नियमांचे पालन करून आपण सर्वांनी गणेशोत्सव, दहीहंडी आणि दसरा सण उत्साहात साजरे केले. याच पद्धतीने दीपावली सणही सुरक्षितपणे साजरा करून आपण आपल्या जीवनात तेजोमय प्रकाश तेवत राहील याची दक्षता घेऊ या. हा अंक आपणास आवडेल, अशी आशा बाळगते. लोकराज्यच्या सर्व वाचकांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!

**जयश्री भोज**
(मुख्य संपादक)

# विकासाची घौडदौड



**एकनाथ शिंदे**
मुख्यमंत्री

**गेल्या तीन महिन्यांच्या कालावधीत आम्ही सामान्य माणसाला केंद्रबिंदू मानून गतिमान निर्णय घेतले. त्यामुळे विकासाची घोडदौड कायम राहिली. राज्याच्या विकासासाठी आम्ही काम करतोय. यापूर्वी राज्याचा एक मंत्री म्हणून काम करताना एका विभागापुरती जबाबदारी असायची. आता मात्र संपूर्ण राज्याचे पालकत्त्व आहे. सोबतीला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मंत्रिमंडळातील सहकारी आहेत. आम्ही विकासाला गती देण्याचे काम करतोय. समाजातील शेवटच्या घटकाला न्याय देण्याचे आमचे ध्येय आहे.**

देशाच्या स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षांत महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्रिपदी मला काम करण्याची संधी मिळाली. या संधीचे सोने करतानाच राज्यातील सर्वसामान्य जनतेला केंद्रस्थानी ठेऊन गतिमान निर्णय घेतले जात आहेत. कृषी, आरोग्य, शिक्षण, उद्योग, रोजगार, दुर्बल घटकांना न्याय आदी क्षेत्रांवर विशेष लक्ष केंद्रित करताना जनतेला सुशासनाचा अनुभव यावा, यासाठी प्रयत्न करतोय.

## प्रकाशपर्वाच्या शुभेच्छा !

आमच्या सरकारच्या गेल्या तीन महिन्यांच्या कालावधीत अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. गेल्या दोन वर्षांपासून कोरोनाच्या संकटामुळे राज्यात निर्बंधामुळे नागरिकांना सण, उत्सव निर्बंधात साजरे करावे लागले. कोरोनाचे संकट कमी झाल्याने या वर्षी गणेशोत्सव, नवरात्र, दसरा असे सण आणि उत्सव राज्यभर जल्लोषात आणि उत्साहात तसेच निर्बंधनमुक्त वातावरणात साजरे करता आले. आता सर्वांना दिवाळीचे वेध लागले आहेत. मी राज्यातील जनतेला प्रकाशपर्वाच्या शुभेच्छा देतो.

एखाद्या सरकारच्या कामगिरीचे मुल्यमापनासाठी तीन महिन्यांचा कालावधी तसा लहानच आहे. पण मला हे सांगताना आनंद होतोय की, आम्ही इतक्या कमी कालावधीतदेखील लोकांचे हित डोळ्यासमोर ठेवून घेतलेल्या निर्णयांवर लोक समाधानी आहेत.

## केंद्राच्या योजनांना गती

शेतीची भरभराट, उत्तम आणि दर्जेदार आरोग्य सेवा, सर्व सामान्यांना परवडणारी घरे, पायाभूत सुविधांचा विकास, राज्यातील मुलांना आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण याचबरोबर रोजगारासाठी कौशल्य विकास, कायद्याचे रक्षक पोलिसांचे कल्याण अशा अनेक महत्त्वाच्या विषयांवर आम्ही चांगली आणि भक्कम पावले टाकण्यास सुरुवात



वरळी-शिवडी उन्नत मार्ग प्रकल्पामध्ये बाधित होणाऱ्या प्रभादेवी परिसरातील भागाची पाहणी करताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे.

केली आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि सर्वच केंद्रीय मंत्री राज्याच्या विकासासाठी ठामपणे आमच्या पाठीशी आहेत. राज्यात केंद्राच्या योजनांनादेखील गती देण्यात आली आहे. येणाऱ्या काही महिन्यांत याचा लाभ मोठ्या प्रमाणावर सर्वांना होत असलेला दिसेल.

## मोफत प्रवास योजना



राज्य शासनाने घेतलेल्या निर्णयाचा सामान्य नागरिकांना कशाप्रकारे लाभ होतो त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे अमृतमहोत्सवानिमित्त राज्यातील ७५ वर्षे पूर्ण झालेल्या ज्येष्ठ नागरिकांना मोफत एसटी प्रवास योजनेचे. ऑगस्टमध्ये झालेल्या विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनादरम्यान या योजनेला प्रारंभ झाला. गेल्या सुमारे दोन महिन्यांत १ कोटी ज्येष्ठ नागरिकांनी या योजनेचा लाभ घेतला. तीर्थयात्रा असो की, जिल्ह्याच्या किंवा मुंबई, पुणे सारख्या महानगरांमध्ये वैद्यकीय उपचार सुविधा असो अशा अतिशय महत्त्वाच्या कारणांसाठी ज्येष्ठ नागरिकांना बसमधून मोफत प्रवास करता आला.

## परवडणाऱ्या घरांना चालना

राज्यात नागरिकरण मोठ्या प्रमाणावर होत आहे. त्यात सर्वांत जास्त आघाडीवर आहे तो मुंबई महानगर प्रदेश (एमएमआर) परिसर त्याचबरोबर पुणे महानगर, नागपूर, नाशिक, नागपूर, औरंगाबाद या शहरांचे झपाट्याने विस्तारीकरण होत आहे. या वाढत्या शहरीकरणाला आवश्यक त्या मूलभूत सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याचा आमचा प्रयत्न आहे. चांगले रस्ते, पाणी, दळणवळणाच्या सुविधा निर्माण करतानाच मोठ्या संख्येने येणाऱ्या लोकांना



महानगरांमध्ये परवडणारी घरे उपलब्ध व्हावीत, यासाठी देखील आमचे प्रयत्न आहेत. मी नुकतेच बांधकाम क्षेत्रातील महत्त्वाच्या अशा दोन संस्थांच्या प्रॉपर्टी एक्स्पोला भेट दिली. त्या वेळी विकासकांना आवाहन करताना सामान्यांना परवडणारी घरे निर्माण करण्यावर भर देण्याचे सांगितले.

केंद्र आणि राज्य शासन त्यांच्या परिने परवडणाऱ्या घरांसाठी योजना राबवत आहे. मात्र खासगी क्षेत्रातील बांधकाम व्यावसायिकांनी त्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे. सामान्य माणसाचे घराचे स्वप्न सत्यात यावे, यासाठी घरांच्या किमती या परवडणाऱ्या असाव्यात याकरिता बांधकाम क्षेत्राने वेगाने पावले उचलली पाहिजेत. समाजासाठी आपण देणे लागतो, या भावनेतून घरांच्या किमती परवडणाऱ्या असाव्यात, याकडे लक्ष देण्याची गरज असल्याचे विकासकांना आवाहन केले आहे.

## स्वच्छता अभियान

स्वच्छता अभियानात महाराष्ट्र नेहमीच अग्रेसर आहे. आता स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० सुरू झाले आहे. त्याअंतर्गत स्वच्छ, सुंदर आणि कचरामुक्त शहरे ही लोकचळवळ व्हावी, यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत. प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांच्या समन्वयानेच गाव आणि शहरांचा विकास होतो हे आपण पाहिले आहे. महात्मा गांधीजींनी स्वच्छतेचा मूलमंत्र दिला. गावागावांत स्वच्छतेचे महत्त्वाचे काम करणारे स्वच्छतादूत हेच महाराष्ट्राचे खरे ब्रँड ॲम्बेसेडर आहेत. देशात स्वच्छतेची चळवळ आता रुजली आहे. या चळवळीत लोकसहभाग महत्त्वाचा ठरत आहे.

## बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना

ग्रामीण भागातील आरोग्य सेवा अधिक सक्षम होण्यासाठी आरोग्य विभागाच्या निधीत दुप्पट वाढ करणार आहोत. त्या माध्यमातून प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र आणि सामान्य रुग्णालयांचे श्रेणीवर्धन करून गुणवत्तापूर्ण आरोग्य सुविधा स्थानिक पातळीवरच उपलब्ध व्हावी, असा आमचा प्रयत्न आहे. प्रत्येक जिल्ह्यात वैद्यकीय महाविद्यालय उभारतानाच राज्यात ७०० 'बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना' सुरू करणार आहोत. मुंबईत २२५ दवाखाने सुरू करण्यात येणार असून, त्यातील ५० दवाखाने कार्यान्वित झाले आहेत.

## लोकाभिमुख प्रशासन

जनतेला प्रशासनाकडून सुशासनाच्या अनुभवासाठी सुशासन मार्गदर्शिक तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. नागरिकांची शासनस्तरावरील कामे स्थानिक पातळीवरच निकाली निघावेत यासाठी क्षेत्रीय अधिकाऱ्यांना निर्देश देण्यात आले आहेत. सर्वसामान्यांना आपल्या कामासाठी मंत्रालयापर्यंत यावे लागू नये, यासाठी विभागीय पातळीवर सुरू करण्यात आलेल्या क्षेत्रीय मुख्यमंत्री सचिवालयाच्या कामाला गती देण्याच्या सूचना विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांना दिल्या आहेत. शासकीय रिक्त पदांच्या भरतीला देखील वेग देण्यात आला आहे. २० हजार पोलीस शिपायांची पदे भरण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली असून शासनातील सुमारे ७० हजार रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरू आहे.

नागरिकांच्या शासनस्तरावर प्रलंबित तक्रारींचा निपटारा होण्यासाठी 'राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता सेवा पंधरवडा' १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत राबवला. त्याद्वारे सुमारे १५ लाखांपेक्षा जास्त नागरिकांच्या अर्जांचा निपटारा करण्यात आला. आता हा पंधरवडा ५ नोव्हेंबरपर्यंत वाढवण्यात आला आहे. यासर्व कार्यवाहीच्या माध्यमातून सामान्यांना लोकाभिमुख आणि पारदर्शी प्रशासनाचा अनुभव यावा, यासाठी

## महत्त्वाचे निर्णय

- देशाच्या अमृतमहोत्सवानिमित्त राज्यातील ७५ वर्षे पूर्ण झालेल्या ज्येष्ठ नागरिकांना एसटीचा प्रवास मोफत. सुमारे एक कोटी नागरिकांनी याचा लाभ घेतला आहे.
- शिधापत्रिकाधारकांना शिधा वस्तूंचे दिवाळी पॅकेज केवळ १०० रुपयात. ७ कोटी लोकांना लाभ.
- अतिवृष्टी आणि पूरग्रस्तांना एनडीआरएफच्या मदतीच्या दुप्पट आणि दोनऐवजी तीन हेक्टर मर्यादेत नुकसान भरपाई. सुमारे ३० लाख नुकसानग्रस्तांना ४ हजार कोटींची मदत.
- निकषांमध्ये न बसणाऱ्या बाधित शेतकऱ्यांना मोठा दिलासा. ७५५ कोटी रुपयांची मदत करणार.
- २० हजार पोलीस शिपायांची पदे भरण्याची प्रक्रिया सुरू.
- शासनातील सुमारे ७० हजार रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करणार.
- शासकीय रिक्त पदे वेगाने भरण्यासाठी कार्यवाही.
- विविध जलसंपदा प्रकल्पांच्या कामांना गती. ८० हजार हेक्टर जमीन सिंचनाखाली आणणार.
- प्रत्येक जिल्ह्यात वैद्यकीय महाविद्यालय उभारणार. आरोग्यासाठी दुप्पट निधी देणार. राज्यात ७०० 'बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना' सुरू करणार.
- हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गाप्रमाणे विदर्भ-मराठवाडा-पश्चिम महाराष्ट्र ते गोवा असा नवा 'इकॉनॉमिकल कॉरिडॉर' विकसित करणार.
- मुंबईतील एमएमआरडीएच्या प्रकल्पांना गती. ६० हजार कोटींपर्यंतचे कर्ज उभारण्यास मान्यता. मुंबई, नागपूर, पुणे मेट्रोची कामे वेगाने.

प्रोत्साहन दिले जात आहे. रासायनिक औषधे आणि खतांचा वापर कमी व्हावा, यासाठी विज्ञानाधारित सेंद्रिय शेतीसाठी राज्यात प्रयत्न सुरू आहेत. डिजिटल शेतीसाठी प्रयत्न करण्यात येत असून राज्यातील २ कोटी २० लाख ४५ हजार ९०१ शेतकऱ्यांचे भूमी अभिलेख माहितीचे डिजिटलायझेशन पूर्ण झाले आहे. ई-पीक पाहणी उपक्रमातून एक कोटी हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रावरील पिकांची माहिती मिळाली आहे.

### पायाभूत प्रकल्पांना वेग

मुंबईसह राज्यात सुरू असलेले विविध पायाभूत प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यासाठी त्याचा सातत्याने आढावा घेतला जात आहे. या प्रकल्पांना वेग देण्यासाठी मंत्रालयातील मुख्यमंत्री वॉर रूममधून संनियंत्रण केले जात आहे.

मुंबई महानगर क्षेत्रासाठी महत्त्वाचा असलेला एमटीएचएल प्रकल्प सुमारे ८५ टक्के पूर्ण झाला आहे. देशातील सर्वांत लांबीचा हा सागरी सेतू पुढच्या वर्षीच्या अखेरीस कार्यान्वित होईल. त्याचबरोबर मुंबई कोस्टल रोडचे कामदेखील वेगाने सुरू असून हे दोन्ही प्रकल्प या भागासाठी गेमचेंजर ठरणार आहेत.

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गाप्रमाणे विदर्भ-मराठवाडा-पश्चिम महाराष्ट्र ते गोवा असा नवा 'इकॉनॉमिकल कॉरिडॉर' विकसित करणार आहोत. मुंबईतील एमएमआरडीएच्या प्रकल्पांना गती देतानाच ६० हजार कोटींपर्यंतचे कर्ज उभारण्यास मान्यता देण्यात आली आहे. मुंबई, नागपूर, पुणे मेट्रोची कामे वेगाने सुरू आहेत.

राज्यात रस्त्यांवर वारंवार होणाऱ्या अपघातांमुळे घोषित करण्यात आलेले ब्लॅक स्पॉट तातडीने दूर करण्यात येणार आहेत. रस्ते अपघातांमध्ये जीवितहानीचे प्रमाण जास्त आहे. त्यात युवावर्गाचे वाढते प्रमाण चिंताजनक आहे. मानवी चुका टाळून अपघातांवर नियंत्रण मिळवण्यासाठी उपाययोजना करण्यासाठी नुकतीच एक आढावा बैठक घेतली आहे. राज्यात २३ ठिकाणी आधुनिक वाहन चाचणी केंद्र तसेच वाहन परवान्यासाठी स्वयंचलित वाहन चलन चाचणी पथक स्थापन करण्यात येणार आहेत.




मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या वतीने कुलाबा-वांद्रे-सिप्झ कॉरिडोर (एक्वा लाईन) मुंबई मेट्रो-३ च्या पहिल्या भूमिगत ट्रेन चाचणीचा शुभारंभ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आला.

## महत्त्वाचे निर्णय

- भारतरत्न लता दीनानाथ मंगेशकर आंतरराष्ट्रीय संगीत महाविद्यालय सुरू.
- राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता सेवा पंधरवड्यात सुमारे १५ लाखांपेक्षा जास्त नागरिकांच्या अर्जांचा निपटारा.
- औरंगाबादचे नामकरण छत्रपती संभाजीनगर, उस्मानाबादचे नामकरण धाराशिव करणारा ठराव.
- पायाभूत सुविधांच्या महत्त्वाच्या प्रकल्पांना वेग देण्यासाठी मुख्यमंत्री वॉर रूममधून संनियंत्रण
- वनांच्या विकासासाठी १८ नवीन आणि ७ प्रस्तावित संवर्धन राखीव क्षेत्र घोषित
- मराठा आरक्षणाबाबत मंत्रिमंडळ उपसमिती.
- इतर मागास वर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती तसेच विशेष मागास प्रवर्गातील गुणवंत विद्यार्थ्यांसाठी परदेशातील उच्च शिक्षणाच्या शिष्यवृत्तींची संख्या १० वरून ५०.
- पशूंमधील लम्पी चर्मरोगावर नियोजनबद्ध रीतीने नियंत्रण. आजमितीस ९० टक्के लसीकरण पूर्ण.
- १५ हजार विद्यार्थ्यांना रोजगार संधी देणार. टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेससोबत सामंजस्य करार.
- महाराष्ट्रात ९ लॉजिस्टिक्स पार्क उभारणार.
- नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव देण्यास मान्यता.
- राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये यशस्वी खेळाडूंच्या बक्षिसांच्या रकमेत वाढ.
- पर्यटनविषयक नावीन्यपूर्ण उपक्रम. 'पर्यटन- नवा विचार, नवी दिशा.

### दुर्बल घटकांना दिलासा

राज्य शासनाच्या विविध निवड प्राधिकरणांनी निवड आणि शिफारस केलेल्या मराठा समाजासह अन्य प्रवर्गातील सुमारे १ हजार ६४ उमेदवारांना अधिसंख्य पदांवरील नियुक्तीचे पत्र देण्याची कार्यवाही सुरू आहे. ऑगस्ट २०२२ मध्ये झालेल्या विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात महाराष्ट्र अधिसंख्य पदांची निर्मिती व निवड केलेल्या उमेदवारांची नियुक्तीबाबत कायदा संमत करण्यात आला. त्याबाबत राजपत्र आणि शासन निर्णयदेखील जाहीर करण्यात आले असून त्याची अंमलबजावणी सुरू आहे. इतर मागास वर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती तसेच विशेष मागास प्रवर्गातील गुणवंत विद्यार्थ्यांसाठी परदेशातील उच्च शिक्षणाच्या शिष्यवृत्तींची संख्या पाचपटीने वाढवण्यात आली आहे. ही शिष्यवृत्तींची संख्या १० वरून ५० एवढी करण्यात आली आहे. त्यामुळे होतकरू विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणापासून वंचित राहावे लागणार नाही. मराठा आरक्षणाबाबत मंत्रिमंडळ उपसमिती नेमण्याचा तसेच भारतरत्न लता दीनानाथ मंगेशकर आंतरराष्ट्रीय संगीत महाविद्यालय सुरू करणे, वनांच्या विकासासाठी १८ नवीन आणि ७ प्रस्तावित संवर्धन राखीव क्षेत्र घोषित करण्याचा, औरंगाबादचे नामकरण छत्रपती संभाजीनगर, उस्मानाबादचे नामकरण धाराशिव, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि.बा.पाटील यांचे नाव, महाराष्ट्रात ९ लॉजिस्टिक्स पार्क उभारण्याचा, टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेससोबत सामंजस्य करार करून १५ हजार विद्यार्थ्यांना रोजगाराची संधी देण्याचा निर्णय, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये यशस्वी खेळाडूंच्या बक्षिसांच्या रकमेत वाढ करण्याचा असे विविध निर्णय आम्ही घेतले आहेत.

आमचे सरकार लोकांत मिसळणारे, त्यांना भेटणारे सर्वसामान्यांचे सरकार आहे. लोकांना भेटल्याशिवाय त्यांच्या अडचणी खऱ्या अर्थाने समजून घेता येत नाहीत आणि म्हणूनच आम्ही आमच्या मंत्रिमंडळातील सहकाऱ्यांनासुद्धा लोकांना भेटण्यास आणि त्यांच्याशी संवाद साधण्यास सांगितले आहे. प्रशासनातील अधिकाऱ्यांनासुद्धा तशा सूचना दिल्या आहेत. गतिमान निर्णयांमुळे लोकांचा विश्वास जिंकून आपली घोडदौड कायम राहील आणि महाराष्ट्राचे नाव देशात उंचावेल, याची मला खात्री आहे.



मराठा समाजासह अन्य प्रवर्गातील उमेदवारांना अधिसंख्य पदांवरील नियुक्तीचे पत्र देताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आदी मान्यवर.

**शब्दांकन : अजय जाधव,**
मा. मुख्यमंत्री महोदयांचे जनसंपर्क अधिकारी

# लोककल्याणकारी निर्णय



**देवेंद्र फडणवीस**
उपमुख्यमंत्री

**गेल्या तीन महिन्यांत लोककल्याणकारी निर्णय घेतानाच राज्याची आर्थिक घडी नीट बसावी, याकडे लक्ष देण्यात येत आहे. सर्वसामान्यांच्या कल्याणासाठी कुलूपबंद तिजोरी पुन्हा एकदा खुली झाली आहे. एकाच ठिकाणी थांबलेले पाऊल आता पुढे पडायला सुरुवात झाली आहे. राज्याचा कारभार पारदर्शी करतानाच भ्रष्टाचाराबाबत 'झिरो टॉलरन्स'चे तत्त्व हा या सरकारचा केंद्रबिंदू आहे. सामान्य माणसापासून ते पायाभूत सुविधेच्या प्रकल्पांपर्यंत सर्वत्र विकासाचे चक्र पुन्हा गतिमान झाले आहे.**

तीन प्रश्नांचे एकच उत्तर असलेली कथा प्रसिद्ध आहे. ते तीन प्रश्न असे - १. भाकरी का करपली? २. पान का सडले? ३. घोडा का अडला? या तिन्ही प्रश्नांचे उत्तर एकच-न फिरविल्यामुळे. भाकरी उलटावी लागते. खाण्याचे पान रोज फिरवावे लागते आणि घोडा अडला असता त्याला उलटा फिरवावे लागते. हे काम न केल्यास भाकरी करपते, पान सडते आणि घोडा आहे त्याच ठिकाणी उभा राहतो. यात आता आणखी एक जोडले पाहिजे ते म्हणजे शासन-प्रशासन फिरवले नाही तर थांबते, अडते. याचा अनुभव घेतलेल्या महाराष्ट्रातील जनतेला लोकाभिमुख, कार्यक्षम शासनाचा आता अनुभव येतो आहे. राज्याच्या विकासाला २०१४-२०१९ या कालावधीत एक दिशा देण्यात आली. मात्र गेल्या अडीच वर्षांत या गतीला खीळ बसली होती. अशातच ३० जून २०२२ रोजी राज्यात सर्वसामान्य जनतेच्या मनातले 'आपले सरकार' अस्तित्वात आले.

गेल्या तीन महिन्यांत लोककल्याणकारी निर्णय घेतानाच राज्याची आर्थिक घडी नीट बसावी, याकडे विशेषत्त्वाने लक्ष देण्यात येत आहे. त्याचवेळी सर्वसामान्यांच्या कल्याणासाठी कुलूपबंद तिजोरी पुन्हा एकदा खुली झाली आहे. एकाच ठिकाणी थांबलेले पाऊल आता पुढे पडायला सुरुवात झाली आहे. राज्याचा कारभार पारदर्शी करतानाच भ्रष्टाचाराबाबत 'झिरो टॉलरन्स'चे तत्त्व हा या सरकारचा केंद्रबिंदू आहे. कायदा-सुव्यवस्थेलाही प्राधान्य देताना मोकळेपणा आणि निर्भयतेचा अनुभव राज्यातील जनता घेते आहे. एक लोकाभिमुख, कार्यक्षम आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांच्या सोडवणुकीबाबत कायम सकारात्मक निर्णय घेणारे आश्वासक आपले सरकार राज्यात आता कार्यरत आहे.

## कायदा-सुव्यवस्थेला प्राधान्य

राज्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आणि पोलीस दलाच्या बळकटीकरणासाठीचे सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येत आहेत. अपराध सिद्धतेचा दर वाढवण्यासाठी पोलीस दलाचे सक्षमीकरण आणि आधुनिकीकरण करण्यावर भर देण्यात येणार आहे. लोकसंख्या व तंत्रज्ञानावर आधारित पोलीस स्टेशन निर्मिती केली जाणार आहेत. मुंबईमध्ये सीसीटीव्ही बसवण्याचा टप्पा-१ पूर्ण झाला असून टप्पा-२ची कार्यवाही सुरू आहे. तसेच राज्यातील सर्व पोलीस



पोलिसांसाठीच्या आरोग्य शिबिरादरम्यान पोलिसांसोबत संवाद साधताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस.



राज्य शासनाने गेल्या तीन महिन्यांत समाजाच्या विविध स्तरातील लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी घेतलेल्या निर्णयाबद्दल वारकरी संप्रदायाचे बंडातात्या कऱ्हाडकर यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विठ्ठल-रखुमाईची मूर्ती भेट देऊन सत्कार केला.

ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही बसवण्याचे काम सुरू आहे. राज्यामध्ये आता २० हजार पोलीस शिपायांची पदे भरली जाणार आहेत. पोलीस शिपाई ते पोलीस निरीक्षक यांच्या नैमित्तिक रजा १२ वरून २० इतक्या वाढवण्यात आल्या.

## ट्रिलियन डॉलर्स अर्थव्यवस्था

राज्याने नेहमीच नावीन्यपूर्ण, लोकाभिमुख संकल्पनांचा अंगीकार करून संपूर्ण देशासाठी एक आदर्श वस्तुपाठ ठेवला आहे. गतिमान ई-प्रशासनासाठी विकसित करण्यात आलेल्या ई-बिल आणि व्हाऊचर प्रोजेक्ट्स प्रणालीचे लोकार्पण करण्यात आले आहे.

अधिक डिजिटल पद्धतीने कोषागारांचे कामकाज होण्याच्या दृष्टीने ही प्रणाली अतिशय उपयुक्त ठरणार आहे. देशातील पहिल्या ई-बिल आणि व्हाऊचर सुविधेचा व्यापक प्रमाणावर वापर करणारे महाराष्ट्र हे देशातील अग्रेसर राज्य असेल. या प्रणालीमुळे पेपरलेस बिलिंग आणि अकाऊंटिंग शक्य होणार असून हे कामकाज विश्वासार्ह व वेळ वाचवणारेही असेल.

विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र या तिन्ही विकास मंडळांच्या पुनर्गठनासाठी केंद्र सरकारला विनंती करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्याचबरोबर पेट्रोलच्या दरात पाच रुपये प्रतिलिटर आणि डिझेलच्या करात तीन रुपयांची प्रतिलिटर कपात करण्याचा निर्णय 'आपले सरकार'ने घेतला आणि सर्वसामान्यांना दिलासा दिला.

राज्याची अर्थव्यवस्था प्रगतिपथावर असून यापुढे कृषी क्षेत्राबरोबरच उत्पादन क्षेत्रावरही विशेष भर देऊन सेवाक्षेत्राला अधिक गती देण्यात येत आहे. देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या ध्येय धोरणातील पाच ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेत वन ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे योगदान देणारे महाराष्ट्र पहिले राज्य असेल. हे उद्दिष्ट गाठण्यासाठी विविध क्षेत्रातील विकास प्रकल्प आणि विशेष क्षेत्र निवडून त्यामधील गुंतवणूक वाढीवर तसेच उत्पादन क्षेत्रावर भर देऊन ट्रिलियन डॉलर इकॉनॉमीकडे वाटचाल करण्यात येत आहे. त्याचबरोबर कृषी क्षेत्राच्या विकासासाठी आणि ग्रामीण रस्त्यांसाठी नाबार्डच्या योजनांची मदत घेण्यात येईल. जनसामान्यांच्या आणि सर्वच क्षेत्रांच्या आशा-आकांक्षा पूर्ण करण्याच्या दृष्टीने भरीव तरतुदी करण्यात येणार आहेत.

## उद्योगस्नेही महाराष्ट्र

महाराष्ट्र हे उत्पादन, तंत्रज्ञान आणि स्टार्टअप क्षेत्रात अग्रगण्य आहे. देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नात राज्याचा मोठा हिस्सा असल्याने महाराष्ट्र भारताचे पॉवर हाऊस आहे.

मनुष्यबळ हे आपले बलस्थान आहे. त्यामुळे राज्यात परदेशी गुंतवणुकीसाठी संधी असून ती वाढवण्यासाठी उद्योगांना पूरक वातावरण, पायाभूत सुविधा व पुरेसे कौशल्ययुक्त मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने सर्व सकारात्मक निर्णय घेतले जात आहेत. रोजगार निर्मितीसाठी मोठ्या गुंतवणूकदारांनी राज्यात गुंतवणूक करावी, यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे.

महाराष्ट्रात नऊ लॉजिस्टिक्स पार्क उभारण्याचा निर्णय घेण्यात आला असून यानुसार नाशिक, जळगाव, सांगली, अकोला, हिंगोली, रत्नागिरी, रायगड, भिवंडी, पुणे येथे लॉजिस्टिक्स पार्क उभारण्यात येतील. जालना येथे 'मल्टिमॉडल लॉजिस्टिक पार्क' उभारण्यासाठी नॅशनल हायवेज लॉजिस्टिक मॅनेजमेंट लिमिटेड आणि जवाहरलाल नेहरू पोर्ट ॲथॉरिटी यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्यात आला आहे. जेएसडब्ल्यु कोकणामध्ये सुमारे ४२०० कोटींची गुंतवणूक करणार असून त्यातून मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होईल.

देशात सुमारे ८० हजार स्टार्टअप्स आणि १०० युनिकॉर्न असून त्यापैकी १४,१४० स्टार्टअप्स आणि २५ युनिकॉर्न हे




**रशियातील मॉस्को येथे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या पुतळ्याचे लोकार्पण करताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस. सोबत विधानसभेचे अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर.**

एकट्या महाराष्ट्रात आहेत. मुंबई ही फिनटेक स्टार्टअप्स कॅपिटल बनली आहे. राज्यात स्टार्टअप्स वाढीसाठी प्रोत्साहन देण्यात येत असून त्यासाठी आवश्यक इकोसिस्टिमवर भर देण्यात येणार आहे.

रशियातील मॉस्को येथे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या पुतळ्याचे लोकार्पण, तैलचित्राचे अनावरण करण्याची अलौकिक संधी मला मिळाली. या दौऱ्यादरम्यान रशियातील भारतीय नागरिक व रशियन उद्योग जगतातील मान्यवरांसोबत संवाद साधला. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वात भारत उत्तम प्रगती करतो आहे. जगातील तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था होण्याची झेप घेतो आहे आणि त्यात महाराष्ट्राचे योगदान मोठे असणार आहे.

## पथदर्शी प्रकल्पांना चालना

प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना आणि दुष्काळी भागासाठी असलेल्या बळीराजा जलसंजीवनी या केंद्र अर्थसाहाय्यित योजनांबरोबर राज्यातील रखडलेल्या सिंचन प्रकल्पांना गती दिली जात आहे. राज्यातील रखडलेल्या सिंचन प्रकल्पांचा पाटबंधारे विकास महामंडळांकडून कृती आरखडा मागवण्यात आला असून ज्या प्रकल्पांना सुधारित मान्यता मिळाली आहे, अशा प्रकल्पांची निविदा प्रक्रिया सुरू करण्यात येत असून रखडलेल्या प्रकल्पांना मान्यता देताना प्रादेशिक समतोल राखला जाईल, याची काळजी घेतली जात आहे. या सिंचन प्रकल्पांना निधीची कमतरता पडू दिली जाणार नाही.

सौरऊर्जा निर्मिती प्रकल्प उभारण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आग्रही भूमिका घेतली. कर्नाटकच्या धर्तीवर राज्यातील उपसा सिंचन योजनांवर सौरऊर्जा प्रकल्प राबवण्याचा निर्णय मागील काळात घेण्यात आला होता, अशा पथदर्शी प्रकल्पांना चालना देण्यात येणार असून पहिल्या टप्प्यात ज्या उपसा सिंचन योजनांच्या ठिकाणी जागा उपलब्ध आहे, अशा योजनांवर सौरऊर्जा प्रकल्प राबवण्यात येणार आहे.

## सौरऊर्जा निर्मितीवर भर

वीज कृषी व औद्योगिक क्षेत्रासोबतच राज्याच्या सर्वांगीण विकासात महत्त्वाचा घटक आहे. मुबलक विजेसाठी सौरऊर्जा प्रकल्पांना गती देण्यात येत आहे. राज्यात २ लाख सौर कृषिपंपाचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. केंद्र सरकारच्या कुसुम योजनेंतर्गत 'मेडा'तर्फे १ लाख, तर महावितरणच्या माध्यमातून १ लाख सौर कृषिपंपाचे वाटप केले जाणार आहे. त्याचप्रमाणे मार्च २०२२ पर्यंतचे संपूर्ण पेडपेंडिंग पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. कृषिफिडरला सौर ऊर्जेवर आणण्याची योजना आपण यापूर्वी सुरू केली होती, त्याला आता गती देण्यात येत आहे. त्यात ४००० मे.वॅ.चे फिडर सौर ऊर्जेवर आणण्यात येतील. यामुळे शेतकऱ्यांना दिवसादेखील वीज मिळेल. शिवाय, सबसिडीचा भारसुद्धा कमी होणार आहे. यासाठी जी जागा लागेल, त्यासाठीचे भाडे शेतकऱ्यांना देण्यात येईल. त्यामुळे त्याला शाश्वत उत्पन्न मिळेल. त्याचबरोबर ऊर्जा समृद्ध राज्यासाठी ऊर्जेची मागणी, विद्युत संच, विविध थकबाकी, कोळसा, मनुष्यबळ, भविष्यात राबवण्यात येणारे प्रकल्प, आधुनिकीकरण आदी विषय प्राधान्यक्रमावर ठेवण्यात आले आहेत.



विद्युत वितरण प्रणालीत मोठ्या प्रमाणावर सुधारणा करून वितरण कंपन्या आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. महावितरण कंपनीच्या ३९,६०२ कोटी व बेस्टच्या ३४६१ कोटी रकमेच्या सविस्तर प्रकल्प अहवालास मान्यता देण्यात आली आहे. महापारेषणच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात पायाभूत सुविधा निर्मिती करण्यात येत आहे. महानिर्मिती कंपनीत वीजनिर्मितीचा खर्च कमी करण्याचा प्रयत्न येत्या काळात करण्यात येणार आहे. सुपरक्रिटिकल प्रकल्प नव्याने तयार करून २०३४ पर्यंतचे नियोजन करण्यावर भर देण्यात आला आहे.

## राहणीमान उंचावणार

धारावी प्रकल्प हा शहरी भागातील सर्वांत मोठा प्रकल्प असून या प्रकल्पामुळे संपूर्ण मुंबईचा चेहरामोहरा बदलणार आहे. आता पुढील तीन ते चार महिन्यांत धारावीच्या पुनर्विकासास सुरुवात केली जाईल. या संदर्भात सर्व मंजुरी आणि निविदांची कामे लवकरच मार्गी लागेल. मुंबईतील म्हाडा आणि एसआरएच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात गृहनिर्माणाचे प्रकल्प हाती घेण्यात येत आहेत. मुंबई हे आय-लॅण्ड शहर असून एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत जाण्यासाठी कमीत कमी वेळ लागावा, यासाठी मेट्रो, ट्रॉन्स हार्बर लिंक, कोस्टल रोड यांसारखे प्रकल्प हाती घेण्यात आले असून ते आता पुढील काळात पूर्णत्वाकडे जाणार आहेत. सुमारे ३०० कि.मी. लांबीचे मेट्रोचे जाळे तयार होत असून मेट्रो आणि कोस्टल रोडमुळे दळणवळण अधिक गतीने होईल. सध्या सुमारे ९० लाख प्रवासी लोकलमधून प्रवास करतात, तर मेट्रोमधून ८० लाख लोक प्रवास करू शकणार आहेत. यामुळे प्रवास करणे सुलभ होऊन वेळेची बचत होणार आहे. ट्रान्स हार्बर हा २२ कि.मी.चा सर्वात लांब समुद्री मार्ग तयार होत आहे. यामुळे मुंबई जवळ नैना हे पूरक क्षेत्र तयार होत आहे. नवी मुंबईतील विमानतळाजवळील हा नैना प्रकल्प तिसरी मुंबई म्हणून ओळखला जाणार आहे. बांधकाम क्षेत्रात काम करणाऱ्या विकासक, गुंतवणुकदारांना शासनाकडून काही सवलती देण्यासंदर्भात आवश्यक ती पावले उचलण्यात येत असून या क्षेत्राचा जलदगतीने विकास करण्यावर भर दिला जात आहे.

## नैसर्गिक शेतीला चालना

रासायनिक शेतीमुळे अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. रासायनिक खते व औषधांच्या वापरामुळे उत्पादन वाढले, मात्र जमिनीचा कस कमी झाला, जमिनीची धूप झाली आणि आरोग्यावर होणारे दुष्परिणाम तर सर्वश्रुत आहेतच. त्यामुळे राज्यात नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन दिले जाणार आहे. डॉ. पंजाबराव देशमुख जैविक शेती अभियानाच्या दुसऱ्या टप्प्यात २०२५ पर्यंत राज्यातील २५ लाख हेक्टर जमीन नैसर्गिक शेतीखाली आणली जाईल. २०१६-१७ मध्ये नैसर्गिक शेतीचे अभियान सुरू केल्यानंतर ९.५ लाख हेक्टर शेती नैसर्गिक पद्धतीने होत आहे. दुसऱ्या टप्प्यात हे क्षेत्र वाढवण्यासाठी कृषी व फलोत्पादन विभागाने आखलेल्या कार्यक्रमाला आवश्यक निधी देण्यात येईल.

देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नैसर्गिक शेतीसाठी २०१५-१६ मध्ये केंद्र स्तरावर मिशन सुरू केले. राज्यात शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यात २०१६-१७ मध्ये सुरू केलेले डॉ.पंजाबराव देशमुख जैविक शेती मिशन यशस्वी ठरले. या माध्यमातून शेतकऱ्यांचे गट तयार झाले. हे मिशन येणाऱ्या काळात आणखी गतीने राबवण्यात येईल. यात अजून काही जिल्हे समाविष्ट करण्यात येतील आणि नैसर्गिक शेतीला चालना दिली जाईल.

## 'स्मार्ट' प्रकल्पाला गती

मागील काळात आपले सरकार असताना नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना सुरू केली. या मिशनला गती देण्याचे काम राज्य शासन करणार आहे. 'स्मार्ट' प्रकल्पाचे राज्यातील १० हजार गावांमध्ये नियोजन करण्यात आले आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून साठवणूक व्यवस्था, विविध श्रृंखला तयार करणे, मार्गदर्शन, बाजाराशी लिंकेज याद्वारे शेतकऱ्यांचे सक्षमीकरण करून त्यांना निधी उपलब्ध करून देण्याचे काम करण्यात येत आहे.

सर्वसामान्य नागरिक व राज्याच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने जे काही निर्णय घ्यावे लागतील ते 'आपले सरकार' घेईल. पायाभूत सुविधा प्रकल्पांना मग ती मेट्रो असो, बुलेट ट्रेन असो की, समृद्धी महामार्ग सर्व प्रकल्पांना गती मिळाली आहे. सामान्य माणसापासून ते पायाभूत सुविधेच्या प्रकल्पांपर्यंत सर्वत्र विकासाचे चक्र पुन्हा गतिमान झाले आहे. हा क्रम असाच सुरू राहील. खऱ्या अर्थाने सर्वसामान्यांचे सरकार म्हणूनच या सरकारकडे पाहिले जाईल आणि आरोग्यपूर्ण, समृद्ध आणि सुरक्षित महाराष्ट्राचे आमचे प्रयत्न आपल्या सर्वांच्या साथीने निश्चितपणे पूर्णत्वास जातील, असा मला विश्वास आहे.

**शब्दांकन : कीर्ती पांडे,**
मा. उपमुख्यमंत्री महोदयांचे जनसंपर्क अधिकारी

## जलस्वयंपूर्ण गावे

राज्यात मागील काळात जलयुक्त शिवार योजनेच्या माध्यमातून रब्बीचे पीक जास्त घेता आले पाहिजे, यासाठी आपण प्रयत्न केले होते. यामुळे ३९ लाख हेक्टर जमीन रब्बी पिकाखाली आली. २७ टीएमसी पाणी आपण थांबवू शकलो, याचा शेतकऱ्यांना मोठा फायदा झाला. हे फायदे लक्षात घेऊन नव्या स्वरूपात ही योजना आणली जात आहे. या योजनेचा पुढील टप्पा राबवला जाणार असून त्यातून प्रत्येक गाव जलस्वयंपूर्ण होईल. पर्यायाने यातून नैसर्गिक शेतीला चालना मिळेल.



# सुलभ, गतिमान प्रशासन



**राधाकृष्ण विखे-पाटील**
मंत्री, महसूल, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास

**महसूल विभाग हा राज्याच्या विकास प्रक्रियेतील सर्वात महत्त्वाचा घटक आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळापासून राज्याच्या विकास प्रक्रियेत महसूल विभागाचे योगदान सर्वाधिक आहे. महसूल विभाग हा सर्वसामान्य माणसाच्या अत्यंत जिव्हाळ्याचा विभाग आहे. मनुष्याच्या जन्माच्या नोंदीपासून ते मृत्यूनंतरच्या वारस दाखल्यापर्यंतच्या दैनंदिन आयुष्यातील प्रत्येक टप्प्यांवर या विभागाशी त्यांचा संबंध येत असतो. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील मंत्रिमंडळामध्ये सर्वाधिक जनतेशी संबंधित महसूल, पशुसंवर्धन आणि दुग्धविकास विभागाचा मंत्री म्हणून काम करण्याची मला संधी मिळाली आहे.**

राज्याच्या समाजकारणात आणि राजकारणात १९९५ पासून कार्यरत असताना कृषी, शालेय शिक्षण, विधी व न्याय, परिवहन, गृहनिर्माण अशा विविध विभागाचा मंत्री म्हणून अनेक समाजोपयोगी, लोकोपयोगी निर्णय घेतले. गेली अडीच दशके समाजाच्या सर्वांगीण विकासाची ध्येयधोरणे निश्चित करून त्यांची प्रभावी अंमलबजावणी करण्यावर विशेष भर दिल्याचे समाधान आहे.

महसूल विभागातील कामाची व्याप्ती तसेच जमीन या घटकाला प्राप्त झालेले अनन्यसाधारण महत्त्व, भूसंपादन, वाळू लिलाव, सर्व प्रकारचे दाखले, नैसर्गिक आपत्तीचे पंचनामे यांसारख्या अत्यंत संवेदनक्षम विभागाचे कामकाज हाताळताना अधिक सजगपणे लोकाभिमुख निर्णय घेण्याची खूणगाठ सुत्रे हाती घेताना मनाशी बांधली आहे.

## लोकाभिमुख आणि गुणवत्तापूर्ण काम

जनतेच्या सेवेसाठी महसूल विभाग अविरतपणे कार्यरत असतो. हा विभाग शासन व प्रशासनाचा आणि राज्याच्या विकासाचा प्रमुख आधारस्तंभ असल्यामुळे महसूल विभाग अधिकाधिक लोकाभिमुख आणि गुणवत्तापूर्ण करण्याचा माझा मानस आहे. कुठलीही विकासाची चळवळ असो किंवा अन्य कुठलीही उत्कृष्ट कामगिरी असो, त्यामध्ये महसूल विभागाचा सहभाग असतो. त्यामुळे राज्याचा नावलौकिक सदैव वाढत असतो. येणाऱ्या काळातही हा विभाग सर्वसामान्यांसाठी विविध योजना राबवण्यात पुढे राहील, असा विश्वास आहे.

## आधुनिकीकरण व संगणकीकरण

वाढती लोकसंख्या, नागरिकीकरण, औद्योगिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर महसूल विभागातील कामकाजामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. आगामी काळात प्रगत तंत्रज्ञानाचा कामकाजात मोठ्या प्रमाणावर वापर करून सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सोडवण्यावर सर्वाधिक भर देण्यात येणार आहे. महसूल विभागातील इतर सर्व कार्यालये, तहसील, दुय्यम निबंधक, भूमी अभिलेख कार्यालयांचे आधुनिकीकरण व संगणकीकरण करण्यासाठी विशेष उपाययोजना करण्यात येणार आहेत. या अनुषंगाने सर्व संबंधित विभागांना सूचना केल्या आहेत.

## डिजिटल सातबारा

सातबारा हा सर्वसामान्य नागरिकांचा विशेषतः शेतकऱ्यांचा अत्यंत जिव्हाळ्याचा विषय आहे. शेतकऱ्यांना सातबारासाठी तहसील कार्यालयाच्या चकरा माराव्या लागू नये, यासाठी डिजिटल सातबारा उपलब्ध करून दिला जात आहे. या सुविधेला शेतकऱ्यांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. त्याचप्रमाणे आता डिजिटल '८-अ' लासुद्धा असाच प्रतिसाद मिळेल, अशी मला आशा आहे. याचप्रमाणे ई-चावडी प्रणाली, ई-फेरफार, ई-पीक पाहणी, ई-हक्क प्रणाली, अद्वितीय भूभाग ओळखपत्र क्रमांक हे लोकोपयोगी प्रकल्प प्रगतिपथावर आहेत. सातबारा व फेरफार ऑनलाईन उपलब्ध करण्यासाठी विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. लोकांच्या दैनंदिन गरजेच्या कामासाठी ई- हक्क प्रणालीमध्ये नागरिकांना वारस नोंद, बँकेचा बोजा निर्माण करणे, बँकेचा बोजा रद्द करणे, ई-करार नोंदी, अधिकार अभिलेखावरून मृतकांची नावे रद्द करणे (वगळणे) याप्रमाणेच वारस नोंदणीमध्ये देखील सुसूत्रता आणण्यात येणार आहे. नागरिकांनी अर्ज केल्यानंतर फेरफार पूर्ततेच्या संदेशासाठी एसएमएस सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच ई-फेरफार प्रणालीमध्ये जिल्हाधिकारी यांना एमआयएसद्वारे जिल्ह्यांमध्ये प्राप्त नोंदणीकृत दस्तांपैकी किती फेरफार तयार करण्यात आले, फेरफार नोंदींपैकी किती फेरफार नोटीस तयार करण्यात आल्या, किती फेरफाराच्या नोटीस बजावणी करण्यात आल्या, किती फेरफार प्रमाणित करण्यावर शिल्लक आहेत, याबाबत तपासणी करता येणार आहे. जेणेकरून फेरफार प्रक्रियेचे योग्य संनियंत्रण होईल व लोकांना जमिनीच्या खरेदी-विक्रीच्या

नोंदीबाबत तत्काळ माहिती मिळेल.

### आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर

सातबाराप्रमाणेच जमीन मोजणी हा देखील एक महत्त्वाचा घटक आहे. क्षेत्रीय स्तरावर जमीन मोजणीची वेगवेगळ्या टप्प्यावर प्रकरणे प्रलंबित आहेत. नुकत्याच घेतलेल्या आढावा बैठकांमध्ये मोजणीची ही सर्व कार्यवाही विहित मुदतीत पूर्ण करण्यासाठी सुधारित कार्यप्रणाली विकसित करून त्याप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना सूचित करण्यात आले आहे. यामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून ही प्रक्रिया सुटसुटीत आणि जलद करण्यात येणार आहे. यासाठी विभागीय आयुक्त, जमाबंदी आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमून तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

शासनाच्या मालकीच्या मोकळ्या जागेवर अतिक्रमण होऊ नये. तसेच त्याबाबतच्या संरक्षणाच्या दृष्टीने सॅटेलाईट इमेजसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करण्याचे नियोजन आहे. पुणे-मुंबई शहरातील महत्त्वाच्या मोक्याच्या जागांचे संरक्षण करण्याच्या सूचना देण्यात आल्या असून यासाठी विशेष मोहीम राबवण्यात येईल. याबरोबरच सहकारी सोसायटींचा भोगवटा वर्ग-२ धारणा प्रकाराने प्रदान केलेल्या जमिनीचा धारणाधिकार वर्ग-१ करून पुनर्विकासासाठी ना-हरकत परवाना उपलब्ध करून देण्यासाठी प्रक्रिया सुलभ करण्यात येत आहे. याबाबत संबंधित सर्व यंत्रणांशी सविस्तर चर्चा करून धोरण ठरवणार आहे.

### रिक्त पदे भरण्यासाठी पाठपुरावा

महाराष्ट्र राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्र आणि राज्य सरकार अनेक प्रकल्प, उपक्रम, संस्था, रस्ते यांची निर्मिती करण्याचे प्रस्तावित करीत असते. या सर्व उपक्रमांसाठी शासकीय जागा अथवा जमिनीचे अधिग्रहण करणे आवश्यक असते. जमिनीचे निर्धारित वेळेत हस्तांतरण पूर्ण करण्यासाठी एक कार्यप्रणाली निश्चित करण्याचा प्रयत्न आहे. तसेच यासाठी कालमर्यादादेखील निश्चित करण्यात येईल. जमिनीअभावी राज्य विकासाचा कुठलाही प्रकल्प रखडणार नाही याची प्राधान्याने दक्षता घेण्यात येणार आहे.

सर्वसामान्य माणसाचे जीवन अधिक सुखकारक आणि आरामदायी करण्यासाठी त्यांना विहित मुदतीत सर्व सेवा उपलब्ध करून देण्यासाठी रिक्त असलेली सर्व पदे भरण्यास शासन स्तरावर विशेष पाठपुरावा करण्यात येईल. अवैध गौण खनिज उत्खनन रोखण्यासाठी महसूल, पोलीस, परिवहन, विधी व न्याय तसेच सर्व संबंधित विभागाच्या संयुक्त विद्यमाने एक ठोस कृती कार्यक्रम निश्चित करण्याचा प्रयत्न आहे.

### दूध उत्पादन वाढीसाठी प्रयत्न

महसूल प्रशासन लोकाभिमुख व गतिमान करण्यासाठी सर्वांचे सहकार्य अपेक्षित आहे. राज्यातील शेतकरी बांधवांना सक्षम करण्यासाठी शेतीशी संबंधित असलेले पशुसंवर्धन व दुग्धविकास ही क्षेत्रे महत्त्वाची आहेत. ज्यांच्यात भरपूर क्षमता आहे आणि त्याचा फायदा घेऊन त्यांचा विकास होऊ शकतो. यासाठी पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसायाकडे विशेष लक्ष दिले जाणार आहे. यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न तर वाढेलच, शिवाय नागरिकांना पोषण आहारही मिळणार आहे.



आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला, तर उत्पादनात वाढ होणार आहे. शिवाय कामही सुखकर होणार आहे. हे लक्षात घेऊन दूध उत्पादन वाढवण्यासाठी संशोधनाला चालना देण्यात येणार आहे. देशी गायींची संख्या, उत्पादकता आणि दूध उत्पादन वाढवण्याचे सरकारचे उद्दिष्ट असणार आहे.

### मोफत लसीकरणाची व्यवस्था

सध्या आलेल्या लम्पी चर्मरोगाच्या प्रादुर्भावामुळे पशुधनाच्या आरोग्यासाठीही यंत्रणा उभारण्याचे एक नवे आव्हान समोर आले आहे. याबाबत पशुसंवर्धन विभागातील अधिकारी, कर्मचारी क्षेत्रीय स्तरावर धडाडीने कार्य करत आहेत. पशुधन आरोग्य आणि उपाययोजना यासाठी विशेष निधीची तरतूद करण्याचा विचार आहे. राज्यातील पशुधन वाचवणे, मोफत लसीकरणाची व्यवस्था करणे आणि तंत्रज्ञानाच्या माध्यमातून जनावरांमधील आजाराचे निदान करण्याची क्षमता विकसित करणे यांसारखे प्रयत्न केंद्र सरकारच्या मदतीने केले जात आहेत.

राज्यातील लम्पी चर्मरोग नियंत्रण उपाययोजनांकरिता आवश्यक खर्च तसेच पशुसंवर्धन विभागाच्या नियंत्रणाखालील राज्यस्तरीय आणि जिल्हा परिषद स्तरावरील रिक्त पदे बाह्यस्रोतांद्वारे भरण्यास मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये मान्यता देण्यात आली असून कार्यवाही सुरू आहे. माझ्या विभागामध्ये संशोधनाच्या माध्यमातून आमूलाग्र बदल घडवून आणण्यासाठी विद्यापीठातील शास्त्रज्ञ, तज्ज्ञ, प्राचार्य, प्राध्यापक तसेच विद्यार्थी आणि संशोधक यांचे सहकार्य घेण्यात येणार आहे.

### ग्रामीण अर्थव्यवस्थेचे बळकटीकरण

शेती क्षेत्राला पूरक व्यवसाय म्हणून दुग्धव्यवसाय ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात विस्तारत आहे. यामध्ये महिला आता मोठ्या प्रमाणात कार्यरत आहेत. सरकारी दूधसंस्थामध्ये पुरुषांप्रमाणेच महिलांची भागीदारी खूप मोठी आहे. ग्रामीण अर्थव्यवस्थेला पाठबळ देणाऱ्या दूध व्यवसायाला संरक्षण देण्याकरिता आणखी उपाययोजना काय करता येईल, याचा विचार शासनस्तरावर करावा लागेल. त्या दृष्टीने प्रयत्न सुरू झाले असून या व्यवसायाला संरक्षण देण्याची जबाबदारी शासन निश्चित घेईल. या विभागाच्या माध्यमातून ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट करण्यासाठी रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध करून देणाऱ्या नवीन योजना तयार करण्याचे नियोजन सुरू आहे. माझा विभाग अधिक सक्षम करण्यासाठी नवीन धोरण लवकरच निश्चित करण्यात येईल. राज्यातील सर्व घटकांना समान न्याय आणि विकासाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध आहे.

**शब्दांकन : मनीषा पिंगळे,**
विभागीय संपर्क अधिकारी

# पारदर्शकता व विश्वासार्हता



सुधीर मुनगंटीवार
मंत्री, वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्यव्यवसाय

**माझ्याकडे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय या विभागांची जबाबदारी देण्यात आली आहे. भारतीय स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा होत असताना राज्याच्या सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारशाचे जतन, संरक्षण आणि संवर्धन करणे, वेगवेगळ्या क्षेत्रात आपली कला सादर करून सर्वांचे मनोरंजन करणाऱ्या कलाकारांचे प्रश्न सोडवणे, कोळी बांधवांचे जीवनमान उंचावण्याबरोबरच मत्स्यव्यवसाय विभागात आमूलाग्र बदल करण्याचे नियोजन केले आहे.**

स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा होत असताना आपण आणि आपल्या येणाऱ्या नवीन पिढीने आपला भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाचा इतिहास वाचणे खूप आवश्यक आहे आणि त्यामुळेच दर्शनिकासह सर्व साहित्य ॲपवर उपलब्ध करून देण्याबरोबरच मातृभाषेतून सर्व साहित्य उपलबध करून देण्याला प्राधान्य असणार आहे.

## ‘हॅलो’ ऐवजी ‘वंदे मातरम्’

सांस्कृतिक कार्य मंत्री म्हणून पहिला निर्णय घेतला तो म्हणजे ‘वंदे मातरम्’ म्हणण्याचा. स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करताना आपल्या सगळ्यांमध्ये देशप्रेम निर्माण व्हावे, आपल्याला एक चांगली सवय लागावी, यासाठी शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी एकमेकांशी संवाद साधताना बोलण्याची सुरुवात ‘वंदे मातरम्’ने करावी असा निर्णय घेतला. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंती दिनानिमित्त झालेल्या कार्यक्रमात ‘हॅलो’ ऐवजी ‘वंदे मातरम्’ अभियानाचा शुभारंभ करण्यात आला.

## नाट्यगृहांचे सुशोभीकरण

कलाकार मंडळी श्रेष्ठ आहेत. कलाकारांमुळे सांस्कृतिक वारसा पुढे नेण्याचे काम होत आहे. गेल्या काही दिवसात मी विविध कलाकारांना, नाट्य आणि सिनेमा संस्थांचे प्रतिनिधी यांना भेटून समस्या जाणून घेण्याचे काम करत आहे. ज्येष्ठ कलाकारांना देण्यात येणारे मानधन वेळेत देण्यात यावे, याबाबत सूचना दिली असून कलाकारांची यादी अद्ययावत करण्यात येणार आहे. महाराष्ट्रात नाट्य संस्कृतीची एक परंपरा आहे आणि त्यामुळे येणाऱ्या काळात ५२ नाट्यगृहांच्या सुशोभीकरणावर भर देण्यात



येणार आहे. आजही ग्रामीण भागात राहणारे अनेक जण कीर्तन, प्रवचनाला आर्वजून जात असतात आणि त्यामुळेच येणाऱ्या काळात पंढरपूर येथे राज्यस्तरीय कीर्तनकार, प्रवचनकार संमेलन घेण्यात येणार आहे. याशिवाय राज्यात असलेल्या विविध भजनी मंडळाची नोंदणी करण्यासाठी एक स्वतंत्र ॲप विकसित करण्यात येणार आहे.

थोर संत आणि राष्ट्रपुरुष यांनी केलेले कार्य समाजाला समजावे, यासाठी त्यांच्यावर सिनेमा काढण्याचे नियोजन आहे. राज्यातील गडकिल्ल्यांच्या संवर्धनात सुशोभीकरण हा एक महत्त्वाचा मुद्दा असून याबाबत ज.जी कला महाविद्यालयाची मदत घेण्याचा शासन विचार करत आहे.

## सेवा पंधरवडा

राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता सेवा पंधरवड्याचा समारोप वर्धा येथे झाला. राज्यातील ७५ नद्यांचे पुनरुज्जीवन करताना जलबिरादरी यांच्या विशेष नैपुण्याची मदत घेतली जाणार आहे. देशविदेशात जलतज्ज्ञ म्हणून परिचित असलेले डॉ. राजेंद्र सिंह यांची मदत यासाठी घेतली जाणार असून राज्य शासनाचे जलसंपदा, जलसंधारण, वन इत्यादी विभाग यामध्ये जोडले जाणार आहेत. नदी संरक्षण आणि संवर्धनसाठी सांस्कृतिक कार्य विभाग काम करणार असून सांस्कृतिक कार्य विभागामार्फत महाराष्ट्रातील ७५ नद्यांसाठी प्रत्येक जिल्ह्यासाठी एक नोडल अधिकारी नियुक्त केला जाणार आहे. ‘चला जाणूया नदीला’ या अभियानाचे नियोजन करण्यात आले आहे. ७५ नदी खोऱ्यांतून नदी संवाद यात्रेच्या माध्यमातून नद्यांचे आयुष्य चांगले कसे राहील, नदी ही अमृतवाहिनी कशी आहे, छोट्या नद्या पुनरुज्जीवित केल्या, तर त्याचा कसा फायदा होईल, या सर्वांची माहिती नदी संवाद यात्रेत देण्यात येईल.

## वनांचे संरक्षण आणि संवर्धन

भारतीय स्वातंत्र्याचे अमृतमहोत्सवी वर्ष साजरे करण्यात येत आहे. याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्र कांदळवन आणि सागरी जैवविविधता

संवर्धन प्रतिष्ठानमार्फत जैवविविधता विषयात संशोधन करणाऱ्या ७५ मुलांना जगभरातील सर्वोत्कृष्ट विद्यापीठात जाऊन संशोधन करण्यासाठी येत्या तीन वर्षात शिष्यवृत्ती देण्यात येईल. याशिवाय कांदळवन क्षेत्रात ७ हजार ५०० नवीन रोजगार निर्माण करण्यात येणार आहेत. या ७५ विद्यार्थ्यांनी आपल्या संशोधनाचा उपयोग महाराष्ट्रासाठी करणे गरजेचे असेल. प्रत्येक वर्षी साधारण २५ विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती देण्यात येणार असून तीन वर्षे हा उपक्रम राबवण्यात येईल. यासाठी प्रत्येक वर्षी १० कोटी रुपयांची तरतूद करण्यात येणार आहे.

## टायगर व बिबट सफारी



ताडोबात टायगर व बिबट सफारी सुरू करण्याचे नियोजन आहे. ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प हे उत्तम पर्यटन स्थळ म्हणून जगाच्या नकाशावर यावे, यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. टायगर व बिबट सफारीच्या माध्यमातून येथे येणाऱ्या पर्यटकांना वन्यजीव दर्शनाची विशेष सोय उपलब्ध होणार आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र हा रोजगार निर्मितीच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण प्रकल्प आहे. या प्रकल्पाच्या ठिकाणी बांबू कामावर फायर रिटारडंट पॉलिश करणे, आग प्रतिबंधक योजनेनुसार कार्यशाळा इमारत व स्वयंपाकगृह इमारतीचे बांधकाम करणे तसेच विद्युतविषयक कामांना गती देण्यात येत आहे. चंद्रपूर येथील वनअकादमीचे वनविद्यापीठात रूपांतर करण्याच्या दृष्टीने समिती नेमून त्या दृष्टीने जलदगतीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत.

## वन कर्मचाऱ्यांना लाभ

आपला जीव धोक्यात घालून वनांचे संरक्षण करणाऱ्या वन कर्मचाऱ्यांना आता पोलीस कर्मचाऱ्यांप्रमाणेच लाभ देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. नागरी संपत्तीचे आणि मनुष्यांचे संरक्षण करताना जीव धोक्यात घालणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांना राज्य शासनातर्फे विविध लाभ देण्यात येतात. वनांचे संरक्षण करताना जीव धोक्यात घालणाऱ्या वन कर्मचाऱ्यांनादेखील संरक्षण देण्यात येणार आहे.

## बोटॅनिकल गार्डन

चंद्रपूर-बल्लारपूर मार्गावरील विसापूर येथील बोटॅनिकल गार्डनचे लोकार्पण डिसेंबर माहिन्यात करण्याचा प्रयत्न आहे. याशिवाय विसापूर येथे नव्याने उभ्या राहणाऱ्या वनस्पती उद्यानासही स्वर्गीय भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांचे नाव देण्यात येणार आहे. ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पामुळे चंद्रपूर जिल्ह्याला पर्यटनाच्या दृष्टीने विशेष महत्त्व आहे.

## कांदळवन संरक्षण

कांदळवन संरक्षणासाठी देशभरातील सर्वोत्तम पद्धतीचा अभ्यास करण्यात येणार आहे. आपली जैवविविधता आणि कांदळवनाचे महत्त्व शाळेपासूनच विद्यार्थ्यांना होणे गरजेचे असल्याने या दृष्टीने प्रयत्न होणे आवश्यक आहे. कांदळवन क्षेत्रांत सीसीटीव्हीद्वारे नजर ठेवण्यात येणार आहे. भिवंडी परिक्षेत्र, पश्चिम व मध्य मुंबई, नवी मुंबई व ठाणे खाडी, फ्लेमिंगो अभयारण्य परिक्षेत्र येथे सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित करण्यात येणार आहे. साधारणपणे १०६ ठिकाणी सीसीटीव्ही बसवण्यात येणार आहेत. महाराष्ट्राच्या किनारपट्टीवरील स्थलांतरित पक्ष्यांच्या स्थलांतरित मार्गाचा अभ्यास करणे, ठाणे खाडी येथे फ्लेमिंगो अभयारण्य उभारणे, ऐरोली येथे गस्तीसाठी सौरऊर्जावर चालणारी इलेक्ट्रिक बोट, कांदळवन संरक्षण आणि संवर्धन यासाठी सुरक्षारक्षक यांची नेमणूक, आवश्यक तेथे कांदळवन यांची जपणूक करण्यासाठी भिंत घालणे असे विषय प्राधान्याने मार्गी लावण्यात येणार आहेत.

## इको पार्कची संकल्पना

जैवविविधता विषयावर कायमस्वरूपी प्रशिक्षण केंद्र चंद्रपूर येथे सुरू करण्यात येणार आहे. या केंद्रामध्ये वर्षांतील ३६५ दिवस जैवविविधता जपण्यावर प्रशिक्षण देण्यात येईल.

किनारपट्टीवरील समुद्री सस्तन प्राण्यांचा अभ्यास येत्या १८ महिन्यांमध्ये पूर्ण करण्यात येणार आहे. मुंबई महानगर प्रदेशाच्या किनारपट्टीवरील समुद्री सस्तन प्राण्यांचा अधिवास, त्यांचा विस्तार आणि गणना यांचा अभ्यास येत्या १८ महिन्यांत करण्यात येणार आहे. जागतिक दर्जाचे इको पार्क उभारण्याबरोबरच निसर्ग पर्यटनाला चालना देण्यात येणार आहे. राज्यात विपुल वनसंपदा असून या माध्यमातून काही नवीनतम लोकोपयोगी प्रयोग करता येतील का, असा सतत विचार मनात येतो, त्यातूनच ही इको पार्कची संकल्पना असून वन कायदा, अधिकार आणि इतर सर्व नियमांची शहानिशा करून, आवश्यक ती पूर्तता करून जागतिक दर्जाचा इको पार्क महाराष्ट्रात व्हावा, यासाठी प्रयत्न करणार आहोत.

काही वर्षांपूर्वी संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात सर्वांनाच मोहित करणारी 'वनराणी' ट्रेन कार्यान्वित होती. कालांतराने ही ट्रेन बंद पडली. भारतीय स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करत असताना देशातील सर्वोत्तम ट्रेन या उद्यानात आणली जाणार आहे. ज्याप्रमाणे शहरांच्या विकासासाठी विकास आराखडा असतो त्याचप्रमाणे वन विभागामार्फत वन संरक्षण व संवर्धनासाठी आराखडा तयार करण्यात येणार आहे.

## मच्छीमार संस्थांना प्राधान्य

सहकार क्षेत्राचे बळकटीकरण करण्याच्या दृष्टीने महामंडळाकडे हस्तांतरित करण्यात आलेल्या जलाशयावरील स्थानिक मच्छीमार सहकारी संस्थांना प्राधान्य देण्याच्या उद्देशाने ई-निविदा प्रक्रिया करताना 'राईट ऑफ फर्स्ट रिफुजल' या तत्त्वाचा समावेश करण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यातील विविध मच्छिमार सहकारी संस्थांकडून ई-निविदा प्रक्रियेमध्ये प्राधान्य मिळावे, अशी मागणी करण्यात आली होती. त्याअनुषंगाने हा निर्णय घेण्यात आला असून या निर्णयामुळे सहकार क्षेत्राचे बळकटीकरण होण्यास मोठी मदत होणार आहे.

**शब्दांकन : वर्षा फडके–आंधळे,**
विभागीय संपर्क अधिकारी

# विद्यार्थी गुणवत्तेला प्राधान्य



**चंद्रकांत पाटील**
मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण,
वस्त्रोद्योग, संसदीय कार्ये

**जगात भारताची अर्थव्यवस्था पाचव्या क्रमांकावर आहे. ही अर्थव्यवस्था अधिक सक्षम करण्याचे ध्येय असून ज्ञानावर आधारित अर्थव्यवस्थेला अधिक महत्त्व आहे. माहिती तंत्रज्ञान हे ज्ञानावर आधारित अर्थव्यवस्थेचे उत्तम उदाहरण आहे. भारताच्या प्रगतीला गती देताना शैक्षणिक आणि व्यावसायिक प्रगतीबरोबर आपल्याला नैतिक मूल्य, संस्कृती व ज्ञान याचा योग्य समन्वय करून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला प्राधान्य देणे हे आमच्या शासनाचे ध्येय आहे.**

देशाच्या विकासात उच्च शिक्षणाचे सर्वाधिक महत्त्व आहे यात महाराष्ट्राचा मोठा वाटा आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० तयार केले आहे. २१व्या शतकातील पहिले शैक्षणिक धोरण असून भारताला जागतिक ज्ञान महासत्ता बनवणे हे नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे उद्दिष्ट आहे. या धोरणानुसार बौद्धिक विकास व अध्ययनाच्या तत्त्वांवर आधारित अभ्यासक्रम व अध्ययन, शाखांची रचना, संधी, समानता, समावेशकता आणि दर्जा ही उद्दिष्टे ठेवून भारतीय शिक्षण पद्धतीत अनेक बदल घडवून आणण्याच्या उद्देशाने धोरण तयार करण्यात आले आहे.

## कार्यगट स्थापन

राज्यात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी नेमलेल्या कार्यबल गटाच्या अहवालातील शिफारशींनुसार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्र्यांचा कार्यगट स्थापन करण्यात आला आहे. कार्यगटाच्या सदस्यपदी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह सहा मंत्र्यांचा समावेश आहे. राज्यातील शैक्षणिक क्षेत्रात स्वायत्तता आणि उत्कृष्टता सक्षम करणे, शाळांपासून कौशल्य विकास तसेच उच्च आणि तांत्रिक शिक्षणापर्यंतच्या सर्व शैक्षणिक बाबींवर लक्ष केंद्रित करणाऱ्यासाठी हा कार्यगट स्थापन करण्यात आला आहे.

राज्यस्तरावरील सर्व शिक्षण संस्था आणि विभागांना, पूर्व-प्राथमिक शिक्षणापासून ते उच्च शिक्षण संस्थांपर्यंत यशस्वी होण्यासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मधील दृष्टिकोनानुसार, गुंतवणूक आणि संसाधने यांचा समनव्य तसेच राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची यशस्वी अंमलबजावणी व संनियंत्रणासाठी कार्यगट असून उच्च शिक्षणात करावयाचे बदल याविषयी धोरणात्मक निर्णय घेणे हे या कार्यगटाच्या कक्षेत येते.

## संयुक्त उच्च शिक्षण परिषद

भारताने अमेरिकेप्रमाणेच ज्ञानावर आधारित अर्थव्यवस्थेत लक्षणीय प्रगती केली आहे. भारत आणि अमेरिकेतील विद्यापीठांमध्ये उच्च शैक्षणिक सहकार्याच्या दृष्टीने विचार मंथन व्हावे, यासाठी राज्यपाल भगत सिंह कोश्यारी यांच्या पुढाकाराने राजभवन मुंबई येथे उच्च शिक्षण परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेमध्ये अमेरिका आणि भारत यांच्यात अध्ययन आणि अध्यापन प्रक्रिया, संशोधन यावर चर्चा झाली. महाराष्ट्र आणि अमेरिकेतील विद्यापीठे एकत्र आल्यास २१व्या शतकातील शैक्षणिक उद्दिष्टे पूर्ण करण्यास मदत होणार आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातसुद्धा आंतरराष्ट्रीय शैक्षणिक सहकार्याला अधिक महत्त्व दिले आहे.

## संगीत महाविद्यालयांतील अभ्यासक्रम

भारतरत्न लता दीनानाथ मंगेशकर आंतरराष्ट्रीय संगीत महाविद्यालयासाठी मुंबई विद्यापीठाच्या कालिना संकुल येथे जागा निश्चित करण्यात आली असून सध्या तात्पुरत्या स्वरूपात पु.ल.देशपांडे कला अकादमीची जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे. भारतरत्न लता दीनानाथ



मंगेशकर आंतरराष्ट्रीय संगीत महाविद्यालयांतील पहिले सहा प्रमाणपत्र अभ्यासक्रम पु.ल. देशपांडे अकादमीमध्ये तात्पुरते सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामध्ये एकूण एक वर्ष कालावधीचे सहा अभ्यासक्रम सुरू करण्यात येत आहेत.

### मानधनात वाढ

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जागतिक दर्जाचे लेखन आणि भाषणे संकलित, संपादित करून प्रकाशित करण्याचे अतिशय महत्त्वाचे आणि ऐतिहासिक काम डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती करत आहे. या समितीत कार्यरत असलेल्या सदस्य सचिव व सदस्यांना काम करताना त्यांच्या पदाला अनुसरून मानधन व सोयीसुविधा दिल्या पाहिजेत. म्हणून त्यांच्या मानधनात वाढ करून सदस्य सचिवांना १० हजार रुपयांवरून २५ हजार रुपये मानधन आणि समितीला सोयी सुविधासह समितीचे संशोधन व प्रकाशनाचे काम जलदगतीने होण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला.

### केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करिता विविध अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे विद्यार्थ्यांना प्रवेशित होताना ईडब्ल्यूएस/एनसीएल/सीव्हीसी/टीव्हीसी असे विविध प्रमाणपत्रे सादर करावी लागतात. विद्यार्थ्यांना असे प्रमाणपत्र वेळीच प्राप्त करून घेताना विविध अडचणींना सामोरे जावे लागते. त्यामुळे तत्काळ जातवैधता प्रमाणपत्र मिळवून विहित वेळेत केंद्रीय प्रवेश नियामक प्राधिकरणास सादर करणे विद्यार्थ्यांना शक्य होत नसल्याचे निदर्शनास आले. विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेऊन विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२२-२३च्या प्रवेश प्रक्रियेच्या अंतिम दिनांकापर्यंत मूळ प्रमाणपत्रे केंद्रीय प्रवेश नियामक प्राधिकरणास सादर करण्याची मुभा देण्यात आली आहे.

### राष्ट्रीय सेवा योजना

महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना समाजसेवेची आवड निर्माण व्हावी, सामजिक प्रश्नांची जाणीव होऊन राष्ट्रीय सेवा योजनेत विद्यार्थ्यांचा अधिक सहभाग वाढावा, यासाठी या योजनेच्या विद्यार्थ्यांची संख्या आता ५ लाख करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या विद्यार्थ्यांची संख्या ३ लाख ७० हजारावरून आता ५ लाख करण्यात येणार आहे. ही संख्या जवळपास दीडपट वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. वाढीव विद्यार्थ्यांचा खर्च राज्य शासन करणार आहे.

### ग्रंथ विक्रीसाठी अधिकार

राज्यातील तालुका पातळीवर ग्रंथ विक्रीची पुरेशा प्रमाणात व्यवस्था नसल्याने ग्रंथालयात वाचकांची गैरसोय होत होती. यासाठी संबंधित ग्रंथालय व्यवस्थापनाने ग्रंथ प्रकाशक/ग्रंथ विक्रेता यांना नवीन ग्रंथ विक्रीस परवानगी देऊन व्यवस्था करण्यासाठी जिल्हा तालुका पातळीवरील 'अ' दर्जा वर्ग शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयात प्रकाशक ग्रंथ विक्रेता यांना नवीन ग्रंथ विक्रीस ग्रंथालय व्यवस्थापनाला अधिकार देण्यात आले आहेत. तसेच सार्वजनिक ग्रंथालयांची दर्जावाढ करताना आवश्यक तेवढेच पॅरामिटर्स ठेवून दर्जावाढ देण्यात येत आहे. तसेच वाचकांना सहज ग्रंथसंपदा उपलब्ध व्हावी, यासाठी फिरत्या वाचनालयांची संख्या वाढवण्यात येणार आहे. ग्रंथालय विभाग ऑटोमाव्हिंग करून पुस्तक देवघेव, अनुदान वितरण ऑनलाईन करण्याचा प्रयत्न आहे.

### महाविद्यालयाच्या मूल्यांकनास गती

राज्यशासन आणि विद्यापीठ अनुदान आयोगाने अकृषी विद्यापीठे सलंग्न महाविद्यालयांना नॅक मूल्यांकन करून घेण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत. तसेच दर पाच वर्षांनी नॅक पुनर्मूल्यांकन करून घेणे बंधनकारक आहे. राज्यातील अद्यापही नॅक मूल्यांकन पूर्ण न केलेल्या महाविद्यालयाची लवकरच नॅक मूल्यांकनाची प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे.

यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ हे 'लोक विद्यापीठ' झाले पाहिजे. समाजातील ज्यांच्यापर्यंत शिक्षण पोहोचले नाही. त्यांच्यापर्यंत शिक्षण पोहोचून प्रमाणपत्र ते पदव्युत्तर असे गरजेनुसार शिक्षण विद्यार्थ्यांना उपलब्ध होण्यासाठी विद्यापीठाकडून विशेष प्रयत्न करून शिक्षणाचे प्रमाण अधिकाधिक वाढवण्याचा प्रयत्न आहे. महाराष्ट्रातून दरवर्षी एक लाख विद्यार्थी परदेशात विविध विद्यापीठांमध्ये पाठवण्याचे उद्दिष्ट आहे. तसेच प्राध्यापक भरती, पदोन्नती, प्राचार्य पदभरती हे प्रलंबित प्रश्नही लवकरच सोडवले जातील.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ सुधारणा विधेयक क्र. ३५ (तिसरी सुधारणा) २०२१ मागे घेण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच अभिमत विद्यापीठांतील प्रवेश, शुल्क यांचे विनियमन विधेयक मागे घेतले आहे. यामुळे महाराष्ट्र विनाअनुदानित खासगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम सुधारणाचे विधेयक मागे घेण्यात येईल व दुरुस्तीसह पुन्हा लागू करण्यात येईल.

### सूतगिरण्यांना वीज सवलती

राज्यातील सहकारी सूतगिरण्यांच्या आर्थिक अडचणी लक्षात घेऊन सहकारी सूतगिरण्यांना नवसंजीवनी देण्यासाठी सहकारी सूतगिरण्यांना प्रतियुनिट तीन रुपयांप्रमाणे तीन वर्षांकरिता वीज अनुदान व खासगी सूतगिरण्यांना प्रतियुनिट दोन रुपयांप्रमाणे वीज अनुदान देण्याचा शासनाने यापूर्वी धोरणात्मक निर्णय घेतला होता. कापूस ते कापड उद्योग विकसित करण्याचा आमचा प्रयत्न आहे.

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी विखुरलेल्या उच्च व तंत्रशिक्षण संस्थापासून बहुशाखीय विद्यापीठांची रचना ही काळाची गरज आहे. नवीन शैक्षणिक बदल स्वीकारून विद्यार्थ्यांना अत्याधुनिक सुविधा देऊन प्रगत अभ्यासक्रमाच्या साहाय्याने प्रशिक्षण, संशोधन आणि समुदायाप्रति प्रतिबद्धता हे शिक्षण संस्थांचे स्वरूप असले पाहिजे, तर त्यातून राष्ट्रविकास आणि विद्यार्थिहित नक्कीच जोपासले जाईल.

**शब्दांकन : काशीबाई थोरात,**
विभागीय संपर्क अधिकारी

# सर्वांगीण विकासाचा संकल्प



**डॉ. विजयकुमार गावित**
मंत्री, आदिवासी विकास

**आदिवासींचे सामाजिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिकदृष्ट्या वेगळे वैशिष्ट्य आहे. नंदूरबार, पालघर, गडचिरोली, धुळे, ठाणे, यवतमाळ, नागपूर, गोंदिया, चंद्रपूर, भंडारा, नाशिक आणि जळगाव आदी जिल्ह्यांमध्ये आदिवासी समाज आढळून येतो. आदिवासी समाजाचा शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक विकास व्हावा यासाठी केंद्र शासन व राज्य शासन विविध योजना प्रभावीपणे राबवते. आदिवासी बांधवांचा विकास करण्यासाठी अनेक उपाययोजना हाती घेतल्या आहेत. आदिवासींना त्यांच्या पायावर भक्कमपणे उभे करून स्वावलंबी करण्याचा आमचा मानस आहे. आदिवासी समाजाच्या विकासाला चालना देऊन सर्वांगीण विकास करण्याचा संकल्प केला आहे.**

कातकरी, माडिया, गोंड समाजाला शासनाच्या विविध योजनातून रोजगार व व्यवसायाच्या संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. त्यांच्या मुलांना शासकीय आश्रमशाळेत प्रवेश देऊन शिक्षणाच्या प्रवाहात आणले जाणार आहे. या समाजाच्या गरजा लक्षात घेऊन तसेच स्थलांतर थांबवून त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी ठोस पावले उचलली जाणार आहेत.

आदिवासी भागातील रस्ते विकासासह पूल दुरुस्तीच्या कामांना प्राधान्य देण्यात येणार असून गावपाड्यातील रस्ते मुख्य रस्त्याशी जोडले जाणार आहेत. आदिवासी भागातील गाव, वाडे-वस्त्यांवर आरोग्य, पाणी, वीज यांसारख्या मूलभूत सुविधा पुरवण्यासाठी सूक्ष्म नियोजन करून कामे जलद गतीने पूर्ण करण्यावर भर देण्यात येणार आहे.

## विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी

शासकीय आश्रमशाळेत विद्यार्थ्यांचे प्रवेश घेताना सर्व विद्यार्थ्यांची १०० टक्के वैद्यकीय तपासणी पूर्ण करण्यात आल्यानंतर त्या विद्यार्थ्यांचा तपासणी अहवाल तयार करण्यात येणार आहे. त्यामुळे अशा विद्यार्थ्यांना तातडीचे आजारपण व औषधोपचारासाठी उपयोग होऊ शकेल. तपासणीसाठी कंत्राटी पद्धतीने मुलींसाठी महिला डॉक्टरांची तर मुलांसाठी पुरुष डॉक्टरांची नेमणूक करण्यात येणार आहे.

## आदिवासींच्या समस्यांबाबत सर्वेक्षण

आदिवासी समुदायांच्या लोकांचे प्रश्न, कौटुंबिक पार्श्वभूमी, त्यांच्यासाठी लागू असलेल्या योजना, मिळालेले लाभ, लाभापासून वंचित राहिल्याची कारणे, होणारे स्थलांतर, त्याची कारणे यासाठीचे सर्वेक्षण



प्रत्येक वाड्यापाड्यात करण्यात येणार आहे. त्यात आधार, बँक खाते, जात प्रमाणपत्र, मतदार ओळखपत्र, जमीन आणि शिक्षण यासारख्या बाबींचेही सर्वेक्षण करण्यात येणार आहे. आदिवासी भागात कुपोषणासारखी समस्या कायमच भेडसावत असते, अशा वेळी ज्या योजना आहेत त्यांच्या अंमलबजावणीतील त्रुटी शोधून त्यावर उपाययोजना करण्यात येणार आहेत.

## आश्रमशाळांचे गुणात्मक बळकटीकरण

आदिवासी आश्रम शाळांमधील शिक्षणाचा व सुविधांचा दर्जा अधिक सक्षम करण्यासाठी तेथील विद्यार्थी क्षमता वाढवून विद्यार्थ्यांच्या १०० टक्के उपस्थितीवर भर देण्यात येणार आहे. आदिवासी भागातील विखुरलेल्या वाड्यावस्त्यांचे भौगोलिक स्वरूप लक्षात घेऊन प्रत्येक तालुकास्तरावर एक अथवा दोन सेंट्रल किचनची संकल्पना राबवल्यास अधिक सोयीचे ठरेल.

## सीबीएसई अभ्यासक्रम

आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी आदिवासी विकास विभागांर्तगत शासकीय आश्रमशाळा कार्यरत आहेत. आदिवासी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासामध्ये या आश्रमशाळांची महत्त्वाची भूमिका असून आश्रमशाळांचे योगदानही उल्लेखनीय आहे. बदलत्या आव्हानांचा सामना करण्यासाठी या शाळांमध्ये आमूलाग्र बदल केले जात आहेत. पुढील वर्षापासून आश्रमशाळेत पहिलीपासून सीबीएसई अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहे.

## स्पर्धा परीक्षेचे प्रशिक्षण

प्रशासकीय सेवांमध्ये आदिवासी तरुणांची टक्केवारी वाढावी, यासाठी आश्रमशाळांमध्ये स्पर्धा परीक्षेचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. इयत्ता सहावीपासून विद्यार्थ्यांना जेईई, नीट, विविध विभागामार्फत घेण्यात येणाऱ्या परीक्षेचे व्हर्च्युअल व प्रत्यक्षात प्रशिक्षण तज्ज्ञ मार्गदर्शकांमार्फत देण्यात येणार आहे.

आदिवासी विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे, प्रशासनात नोकरीची संधी मिळावी, यासाठी विभागामार्फत विविध उपक्रम राबवण्यात येणार आहेत.

## आदिवासींच्या विकासासाठी कार्यक्रम

आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी कालबद्ध कार्यक्रम राबवण्यात येणार आहे. यासाठी कृतिआराखडा तयार करण्याचे काम सुरू असून त्याची १०० टक्के अंमलबजावणी करण्यात येणार आहे. नवसंजीवनी अंतर्गत शासनाच्या विविध विभागातील योजनांचा लाभ शेवटच्या आदिवासी बांधवाला मिळाला पाहिजे, हा आमचा प्रयत्न आहे.

## कौशल्यातून रोजगार

आदिवासी युवक-युवतींना मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी कौशल्य विषयक प्रशिक्षण देण्यात येणार आहे. यामुळे आदिवासी समाजातील मुले समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी मदत होणार आहे. यामध्ये बारावी नापास झालेले विद्यार्थी, बारावी पास ते पदवी नापास झालेले विद्यार्थी व पदवी परीक्षा उत्तीर्ण झालेले विद्यार्थी असे तीन संवर्ग करण्यात येणार आहेत.

## उद्योगांना चालना

आदिवासी समाज वन प्रदेशात वास्तव्य करत असून त्यांचे उदरनिर्वाहाचे मुख्य साधन शेती व वनउपज आहे. मोठ्या संख्येने आदिवासी शेतमजुरीवर अवलंबून आहेत. आदिवासी शेतकरी अल्पभूधारक व भूमिहीन असल्याने त्यांच्या रोजगाराची मोठी समस्या आहे. आदिवासी समाजाचा सर्वांगीण विकास होऊन त्यांना पूर्णवेळ रोजगार मिळण्यासाठी स्थानिक उपलब्ध साधनसंपत्तीला अनुसरून रोजगाराची साधने तयार करणे आवश्यक आहे.

## प्रधानमंत्री आदि आदर्श ग्रामविकास योजना

आदिवासी गावांच्या विकासाबरोबरच आदिवासी माणसाची प्रगती व्हावी, यासाठी देशभरात प्रधानमंत्री आदि आदर्श ग्रामविकास योजना राबवण्यात येत आहे.

## क्रीडा विकास

आदिवासी विद्यार्थ्यांमधील अंगभूत क्षमता काही खेळाकरिता उपयोगी ठरू शकतात. यासाठी विद्यार्थ्यांना क्रीडाविषयक सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. वैयक्तिक खेळासाठी जिल्हास्तरावर प्रशिक्षक देण्यात येणार आहेत. जिल्हास्तरावरील क्रीडांगण आदिवासी विद्यार्थ्यांना उपलब्ध होण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. आदिवासी शाळांमध्ये क्रीडा शिक्षक तसेच आदिवासी विद्यार्थ्यांना खेळानिहाय उत्तम प्रशिक्षक उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

आदिवासी समाजाची जास्त लोकसंख्या असलेल्या गावांचा आदर्श गाव संकल्पनेवर आधारित एकात्मिक, सामाजिक आणि आर्थिक विकास करण्यासाठी केंद्र सरकारने प्रधानमंत्री आदि आदर्श ग्रामविकास योजना राबवण्याचा निर्णय घेतला आहे.

## उद्योगास बचतगटाचा सहयोग

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत असणाऱ्या बचतगटांसमवेत आदिवासी भागातील लहान व्यवसायांना मदत करण्यात येणार आहे. आदिवासी बांधवांचे पारंपरिक व्यवसाय, शेती यांना चालना दिली, तर दुर्गम भागात राहणारा हा समाज प्रगती करेल. आदिवासी समाजामध्ये उद्योग करणारा वर्ग तयार करण्याची आवश्यकता आहे. बचतगटाच्या माध्यमातून आर्थिक उन्नतीने देशभर महिलांच्या सशक्तीकरणामध्ये मोठे योगदान दिले आहे.

## आदिवासींना हक्काचे घर

आदिवासी समाज हा अतिदुर्गम भागात झोपड्यांमध्ये किंवा तात्पुरत्या तयार केलेल्या घरात राहतो. त्यांना हक्कांचे व कायमस्वरूपी पक्के घर मिळावे, यासाठी निवाऱ्याचा प्रश्न सोडवण्याला आम्ही प्राधान्य देणार आहोत. आदिवासी समुदयातील पक्के घर नसणाऱ्या आदिवासींना तीन वर्षात घरकूल देण्याचा मानस आहेस. आश्रमशाळा व वसतिगृह भाड्याच्या जागेत आहेत. आश्रमशाळांसाठी शासकीय जमीन उपलब्ध करून १०० टक्के आश्रमशाळा स्वत:च्या शासकीय मालकीच्या जमिनीवर उभारण्यासाठी विभागामार्फत प्रस्ताव सादर करण्यात येणार आहे. जिल्हा व तालुकास्तरावर मुले व मुलींसाठी स्वतंत्र वसतिगृह बांधण्यात येणार आहे.

## वनहक्क दावे

वनहक्क प्रदान करण्यासंदर्भात पाठपुरावा करून वनहक्क दावे आदिवासी बांधवांना देण्यात येणार आहेत. वनहक्क दावे आदिवासी बांधवांना उपलब्ध करून देण्यासाठी याबाबत वनविभागाला कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या आहेत. वनहक्क अंतर्गत आदिवासी बांधवांना मिळालेल्या जमिनींना शेतीसाठी लागणाऱ्या मूलभूत गरजा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. सामूहिक वनहक्क दाव्यांच्या जमिनीवर त्यांच्या विकासासाठी गरजेनुसार मदत करण्यात येणार आहे.

## आदिवासी संस्कृतीचे जतन

आदिवासी समाजाचा बहुविध वारसा आहे. लोककला, नृत्य आणि पारंपरिक संस्कृतीचे जतन व संवर्धन करण्यात येणार आहे. आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना आदिवासी समाजाचे पारंपरिक वाद्य शिकवण्यासाठी प्रशिक्षण देण्यात येईल.

## विद्यार्थ्यांच्या हितासाठी

आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविणे, तसेच हुशार विद्यार्थ्यांना संधी कशी मिळेल यासाठी ॲकॅडमी स्थापन करण्याचे नियोजन करण्यात येत आहे. २१ वर्षावरील युवक-युवतींना शिक्षण व व्यवसाय प्रशिक्षणासाठी पोर्टल तयार करण्याचे नियोजित आहे. नोकरी व शिक्षणासाठी आवश्यक असणारी प्रलंबित जातपडताळणी प्रकरणे प्राधान्याने निकाली काढणार आहेत.

कुपोषणाचे निर्मूलन हे विभागाचे प्रमुख उद्दिष्ट असून जिल्ह्यातील कुपोषित बालकांचा सामान्य बालकांप्रमाणे विकास व्हावा, हे उद्दिष्ट समोर ठेवून गावपातळीवर पोषण अभियानाला गती देण्यात येत आहे.

**शब्दांकन : शैलजा पाटील,**
विभागीय संपर्क अधिकारी

# शेवटच्या घटकांचा विकास



**गिरीश महाजन**
मंत्री, ग्रामविकास, पंचायत राज,
वैद्यकीय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण

**माझ्याकडे ग्रामविकास व पंचायत राज, वैद्यकीय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण या तीन विभागांची जबाबदारी सोपवली. खरे पाहता माझ्याकडे सोपवण्यात आलेले तिन्ही विभाग अतिशय महत्त्वाचे असून गाव, आरोग्य आणि युवक या तिन्ही घटकांचा सर्वांगीण विकास साधण्याची जबाबदारी माझ्यावर आहे. गावाच्या विकासाकरिता रस्त्यांचे मजबूत जाळे, महिलांच्या विकासाकरिता बचतगट, बेघरांसाठी घरे, सर्वांसाठी आरोग्य आणि सदृढ भारतासाठी युवकांचा सहभाग या बाबींचा सखोल अभ्यास करून गावातील शेवटच्या घटकांचा विकास करण्यावर माझा भर असणार आहे.**

घटना दुरुस्तीमुळे पंचायतराज संस्थांना संवैधानिक अधिकार प्राप्त होण्याबरोबरच सत्तेचे विकेंद्रीकरण झालेले आहे. महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ५० टक्के प्रतिनिधित्व देण्यात आपले राज्य देशात अग्रणी ठरलेले आहे. त्यामुळे ग्रामपंचायत स्तरावर सर्व स्तरातील समाज घटकांचा आणि स्त्री-पुरुषांचा सहभाग वाढल्याने पंचायतींच्या कारभारात पारदर्शकता आणि लोकसहभाग दिवसेंदिवस वाढत असल्याने त्रि-स्तरीय संस्थांमध्ये निर्णय प्रक्रिया समावेशक होत असल्याचा माझा अनुभव आहे.

## नऊ संकल्पना

भारत सरकारच्या पंचायतीराज मंत्रालयाने सुधारित राष्ट्रीय ग्रामस्वराज अभियानाच्या माध्यमातून पंचायतींमध्ये शाश्वत विकास संकल्पनांचे स्थानिकीकरणाचा दृष्टिकोन स्वीकारलेला असल्याने आपल्या राज्यातही पंचायतींमध्ये विकासाचे नियोजन या शाश्वत विकासाच्या नऊ संकल्पनांवर आधारितच करायचे आहे. या नऊ संकल्पना म्हणजे गरिबीमुक्त गाव, आरोग्यदायी गाव, बालस्नेही गाव, जलसमृद्ध गाव, स्वच्छ आणि हरित गाव, पायाभूत सुविधांनीयुक्त गाव, सामाजिक न्याय आणि सामाजिकदृष्ट्या सुरक्षित गाव, सुशासन युक्त गाव, लिंग समभावयुक्त/महिलास्नेही गाव याप्रमाणे आहेत.

पंचायतराज दिनी व्हायब्रंट ग्रामसभा पोर्टलवर अपलोड केलेली विकासकामांचे अवलोकन केले असता आपल्या ग्रामपंचायतींनी बालस्नेही गाव, पायाभूत सुविधांनी स्वयंपूर्ण गाव, सामाजिक न्याय आणि सामाजिकदृष्ट्या सुरक्षित गाव, सुशासनयुक्त गाव, महिलास्नेही गाव या संकल्पनांवरही काम करण्यासाठी पुढाकार घेणे आवश्यक असल्याचे निदर्शनास आले. गावाचा समतोल आणि शाश्वत विकास घडवून आणण्यासाठी ग्रामपंचायतींनी सर्व नऊ संकल्पनांवर काम करणे गरजेचे आहे असे मला वाटते.

## उमेद

ग्रामीण महिलांच्या सक्षमीकरणासाठी बचतगटांचे उमेद अभियानही राज्यात प्रभावीपणे राबवण्यात येत आहे. यामधून अनेक महिला यशस्वी उद्योजिका म्हणून पुढे येत आहेत. महिला राजकारणासोबत उद्योग उभारणीत आघाडीवर राहतील, यासाठी माझा विशेष प्रयत्न असणार आहे. या उमेद अभियानाचा मुख्य उद्देश ग्रामीण महिलांचे गरिबी निर्मूलन हाच आहे. याद्वारे आपण स्वयंसहायता समूहांची स्थापना करून समुहातील महिलांना आर्थिक साक्षर करणे. त्यांना कौशल्य प्रशिक्षण देणे व त्यातून त्यांना रोजगार मिळावा यासाठी प्रयत्न केले जात आहेत. आपण राज्यात लाखो स्वयंसहायता समूह स्थापन केले आहेत. गावातील सर्व समुहांचा कारभार नीट चालावा म्हणून ग्रामसंघाची स्थापना केली आहे. ही व्यवस्था निरंतर चालावी यासाठी जिल्हास्तरावर प्रभाग संघ स्थापन केले. या गटांना उमेद अभियानाकडून समूदाय निधी वाटप करण्यात येत आहे.

## महाआवास

गावातील प्रत्येक गरीब व गरजू व्यक्तीला स्वत:चे हक्काचे घर असावे, हा त्यांचा अधिकार आहे. यातून राज्यात महाआवास अभियानाचा प्रारंभ झाला. या अभियानाला



राज्यात प्रतिसाद मिळत आहे. केंद्र आणि राज्य सरकार यांच्या समन्वयाने आपण राज्यात घरकुलांची मोठ्या प्रमाणात बांधणी करत आहोत. लाभार्थ्यांना आवश्कतेनुसार जागा देणे किंवा त्यांना घरकुल बांधून देणे, अर्थसाहाय्य अशा माध्यमातून जास्तीत जास्त बेघरांकरिता घरे उपलब्ध व्हावीत, यासाठी माझे विशेष प्रयत्न असणार आहेत. ग्रामीण क्षेत्राचा अधिक विकास व्हावा, यासाठी मिशन महाग्रामच्या माध्यमातून विकासाचे शाश्वत ध्येय साध्य करण्यासाठी सामाजिक दायित्व निधीच्या (सीएसआर) माध्यमातून ५०० कोटी रुपयांचा निधी उभारण्यात येणार आहे. कॉर्पोरेट कंपन्यांच्या सीएसआरमधून २०२५ पर्यंत मिशन महाग्राम यशस्वीपणे राबवण्याचे माझे ध्येय आहे.

## रस्ते विकास

ग्रामीण भागाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी रस्त्यांचे मजबूत जाळे असणे फार गरजेचे आहे. रस्त्यांची सुविधा असली की, ग्रामीण भागाला मुख्य प्रवाहात आणून गावाच्या विकासाला सुरुवात होते. यासाठी पुढील वर्षी ४५०० कोटी रुपयांची तरतूद करावी लागेल. यासाठी आवश्यकतेनुसार नाबार्ड, आशियाई विकास बँक व तत्सम संस्थेकडून कर्जरूपाने निधी उपलब्ध करून घेण्याबाबत विचार करण्यात येईल. पंतप्रधान ग्राम सडक योजनेतूनही केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठवून रस्त्यांचे जाळे उभारण्यावर माझा भर असणार आहे.

## वैद्यकीय शिक्षण

राज्यातील रुग्णांना अत्याधुनिक सेवा सुविधा देण्यासाठी प्रत्येक जिल्हापातळीवर वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयांच्या सेवांचा विस्तार करण्याची आवश्यकता आहे. प्रत्येक रुग्णालयात ऑक्सिजन, व्हेंटिलेटर्स, रुग्णशय्या या साधनसामग्रीची संख्या वाढवण्यासाठी मी प्रयत्नशील आहे. त्यामुळे सर्व जिल्ह्यांच्या ठिकाणी शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालये काढण्यासाठी मी वैद्यकीय शिक्षण विभागाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर पाऊल उचलले आहे. सर्वसामान्य जनतेला शासकीय वैद्यकीय रुग्णालयात दर्जेदार सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी आगामी काळात आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांची मदत घेण्यात येत आहे. त्यांच्या माध्यमातून नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व अतिविशेषोपचार रुग्णालये स्थापन करण्यासाठी व अस्तित्वात असलेल्याचे श्रेणीवर्धन करण्यासाठी आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थेच्या (आयएफसी) मदतीने कार्यवाही सुरू केली आहे. आम्ही सरकार म्हणून सन २०३० पर्यंत सर्वांना परवडणाऱ्या उच्च दर्जाच्या तृतीयक आरोग्य सेवा पुरवण्याचे उद्दिष्ट ठरवलेले आहे.

चालू वर्षी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयामध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या ३२४ नवीन जागा निर्माण करण्यात आल्या आहेत. याव्यतिरिक्त काही खासगी महाविद्यालयांमध्ये देखील पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या बऱ्याच जागा निर्माण करण्यात आल्या आहेत. त्यामुळे तेवढ्या मोठ्या प्रमाणात दरवर्षी राज्यांना उपलब्ध होणारा डॉक्टरांच्या संख्येतही वाढ झाली आहे.



राज्याच्या विविध भागात अत्याधुनिक स्वरूपाच्या रुग्णसेवा उपलब्ध करण्यासाठी मी कटिबद्ध आहे. राज्यातील केवळ २४ जिल्ह्यांमध्ये २५ शासकीय वैद्यकीय महाविद्यालये आहेत. जागतिक स्तरावरील वित्तीय संस्थांची मदत घेऊन उर्वरित १२ जिल्ह्यांमध्ये शासकीय वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहे. त्याचप्रमाणे अस्तित्वात असलेल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांचा दर्जा सुधारण्यासाठी व तिथे विविध तपासणी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी २०३० पर्यंतचे व्हिजन डॉक्युमेंट तयार करत आहे. यामुळे राज्यभरात शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत अनेक पटीने वाढ होणार आहे. त्यामुळे एमडी, एमएस, बीएनबीच्या अभ्यासक्रमांच्या विद्यार्थी प्रवेश क्षमतेत १०००ने वाढ होईल, तर पदवीच्या विद्यार्थी संख्येत १८००ची वाढ होईल. चालू बाह्यरुग्णांमध्ये १० कोटी व आंतररुग्ण विभागामध्ये १ कोटी रुग्णसंख्येने वाढ होईल. पुढील काळात मुख्य शासकीय संस्थेत आणि आंतररुग्णसंख्येत मोठी वाढ होऊन लोकांना कमी दरात या सुविधा उपलब्ध होतील.

## क्रीडा कामगिरीसाठी आधुनिक तंत्रज्ञान

राज्यातील खेळाडूंना आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये प्रोत्साहन मिळावे, जास्तीत जास्त खेळाडूंनी सहभागी व्हावे, युवकांनी खेळाकडे आकर्षित व्हावे, याकरिता राष्ट्रकूल स्पर्धा २०२२ मधील पदक विजेत्या क्रीडापटूंच्या बक्षीस रकमेत वाढ केली आहे. आता राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील सुवर्णपदक विजेत्या खेळाडूंना ५० लाख रुपये, रौप्यपदक विजेत्या खेळाडूंसाठी ३० लाख रुपये, तर कांस्यपदक विजेत्या खेळाडूंना २० लाख रुपये बक्षीस देण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे सुवर्णपदक विजेत्या खेळाडूंच्या मार्गदर्शकासाठी १२.५० लाख रुपये, रौप्यपदक विजेत्या खेळाडूंच्या मार्गदर्शकांना ७.५० लाख रुपये, तर कांस्यपदक विजेत्या खेळाडूंच्या मार्गदर्शकांना ५ लाख रुपये बक्षीस देण्यात येणार आहे. जागतिक चषक १७ वर्षांखालील मुलींची फूटबॉल स्पर्धा ही जागतिक, भारतीय फूटबॉल संघटनेच्या संयुक्त विद्यमाने व राज्य शासनाच्या सहकार्याने १७ वर्षांखालील मुलींच्या फिफा वर्ल्डकप फूटबॉल स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. यातील अंतिम व उपांत्य फेरीचे सामने राज्यात नवी मुंबई येथे होणार आहेत.

आम्ही शासन म्हणून माझ्याकडे असलेले सर्व विभागांचे सक्षमीकरण करणे, सामान्य ते अतिसामान्य नागरिकांना त्यांच्या हक्कांच्या सेवा पुरवणे, आवश्यकतेनुसार सुविधांचे डिजिटायझेशन करणे आणि महाराष्ट्रातील शेवटच्या घटकाचे जीवनमान सुकर करणे, यावर माझा भर असणार आहे.

**शब्दांकन : संजय ओरके,**
विभागीय संपर्क अधिकारी

# पाणीपुरवठ्याचे उद्दिष्ट



**गुलाबराव पाटील**
मंत्री, पाणीपुरवठा व स्वच्छता

**पाणीपुरवठा व स्वच्छतेबाबत संस्थात्मक बळकटीकरण आणि मागणी आधारित पुरवठा करणारे महाराष्ट्र हे देशातील अग्रगण्य राज्य आहे. पाणीपुरवठा व स्वच्छता विभागामार्फत राज्यातील ग्रामीण भागात स्वच्छ पिण्याचे पाणी पुरवठा करणे, त्यासंबंधित धोरणात्मक निर्णय घेणे, अंमलबजावणी करणे. तसेच नागरिकांच्या वैयक्तिक व सार्वजनिक स्वच्छतेसंबंधित कामे हाताळणे, क्षेत्रीय कार्यक्रमांची देखरेख तसेच बळकटीकरणाचेही काम करण्यात येते.**

राज्यातील नागरिकरणाचा दर देशात सर्वात जास्त असल्याने नव्याने विकसित होत असलेल्या निमशहरी भागांमध्ये राहणाऱ्या जनतेला वाढीव दर्जाच्या पाणीपुरवठा व स्वच्छतेच्या सेवा सुविधा पुरविणे, स्थानिक पातळीवर पाणी व्यवस्थापन करणे, पाणी गुणवत्ताबाधित गाव/वाड्या, वस्त्यांमध्ये गुणवत्तापूर्ण पाणीपुरवठा करणे, त्याच प्रकारे पाणीटंचाई युक्त भागांमध्ये कायमस्वरूपी टंचाई निवारण करणे, यावर मोठ्या प्रमाणावर भर देण्यात येत आहे. त्याचबरोबर परिसर स्वच्छतेच्या उपाययोजना करणे तसेच घनकचरा व द्रव कचरा व्यवस्थापन करणे यावरही भर देण्यात येत आहे.

## नळाद्वारे पाणीपुरवठा

नळाद्वारे पाणीपुरवठा करण्यात देशात महाराष्ट्र अव्वलस्थानी पोचला आहे. राज्यात ग्रामीण भागातील घरांना नळाद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे. जलजीवन मोहिमेची यशस्वीरीत्या अंमलबजावणी करणाऱ्या महाराष्ट्रात ग्रामीण भागातील घरांना नळाद्वारे पाणीपुरवठा होत आहे. जलजीवन मिशन अंतर्गत राज्याच्या ग्रामीण भागातील घरांना नळजोडणी देण्यात येत असून जलजीवन अंतर्गत राज्यात नळजोडणी कमी असलेल्या जिल्ह्यांना प्राधान्य देण्यात येत आहे.

## स्वच्छता मोहिमेत पुरस्कार


केंद्र शासनाने निश्चित करून दिलेल्या विविध अभियान अंतर्गत देशस्तरावरील आणि पश्चिम विभागीय राज्यामध्ये विविध पारितोषिके राज्याला प्राप्त झाली आहेत. तसेच स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण-२०२१ अंतर्गत सिंधुदुर्ग जिल्ह्याला पश्चिम विभागीय राज्यामध्ये द्वितीय क्रमांक प्राप्त झाला आहे. ही सर्व पारितोषिके सरपंचांनी स्वच्छता मोहिमेला दिलेल्या नेतृत्वामुळे व गावकऱ्यांच्या सक्रिय सहभागामुळे मिळाली आहेत.

## स्वच्छ भारत मिशन

स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) ही केंद्र पुरस्कृत महत्त्वाकांक्षी योजना पाणीपुरवठा व स्वच्छता विभागांतर्गत राबवण्यात येत आहे. या अभियानाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील जनतेचे जीवनमान उंचावण्यासाठी महत्त्वाचा घटक असणाऱ्या स्वच्छतेबाबत लोकचळवळ निर्माण झाली. स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत राज्याच्या ग्रामीण भागातील वैयक्तिक शौचालय बांधकामाचे उद्दिष्ट मोठ्या प्रमाणावर साध्य करण्यात आले आहे. केंद्र शासनाने जुलै २०२० मध्ये स्वच्छ भारत मिशन टप्पा-२ च्या मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या. संपूर्ण ग्रामीण स्वच्छता व स्वच्छता शाश्वत टिकवण्याच्या अनुषंगाने स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) दुसऱ्या टप्प्यांतर्गत ग्रामीण भागातील घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनाचे नियोजन करण्यात येत आहे.

## स्वच्छता ही सेवा उपक्रम

गावांमध्ये स्वच्छतेचे सातत्य कायम राहावे, ग्रामस्थांचे आरोग्य सुधारावे यासाठी गावातील प्रत्येक कुटुंबाला स्वच्छतेचे महत्त्व पटणे आवश्यक आहे. या संदर्भात जनजागृती करण्यासाठी सरपंचांनी सक्रिय पुढाकार घेण्यावर विशेष भर देण्यात येत असून याद्वारे गावाचा विकास अधिक गतिमान होऊ शकतो स्वच्छता ही सेवा या उपक्रमांतर्गत गावागावामध्ये स्वच्छते संदर्भात जनजागृती करण्यात आली. गावातील कचराकुंड्या व असुरक्षित ठिकाणांची साफसफाई, सुका व ओला कचरा वेगळे करण्यासाठी जनजागृती उपक्रम, श्रमदान यांसारखे उपक्रम घेण्यात आले. कचरा संकलन आणि विलगीकरण करण्यासाठी केंद्राची निर्मिती, प्लास्टिक कचऱ्याचे व्यवस्थापन, एकल प्लास्टिक वापराच्या दुष्परिणामांबद्दल सभेचे आयोजन करण्यात आले.



## संनियंत्रण अणि सर्वेक्षण

जलजीवन मिशन कार्यक्रमांतर्गत पाणी गुणवत्ता संनियंत्रण अणि सर्वेक्षण कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या २० जुलै २०२२च्या शासन निर्णयानुसार सर्वसमावेशक मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

## सर्वसामान्यांच्या हिताचे निर्णय

- जलजीवन मिशन अंतर्गत ग्रामीण पाणीपुरवठा योजनांच्या तांत्रिक/ प्रशासकीय/ अंमलबजावणीचे अधिकार विभागाच्या १० मार्च २०२१ च्या शासन निर्णयान्वये विहित करण्यात आले आहेत. त्यानुसार विहित मर्यादेनुसार ग्रामपंचायत/जिल्हा परिषद तसेच शासन स्तरावरून जलजीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजनांना प्रशासकीय मान्यता देण्यात येते.
- जलजीवन मिशन अंतर्गत १ जुलै २०२२ ते २६ सप्टेंबर २०२२ दरम्यान गेल्या तीन महिन्यांच्या कालावधीमध्ये संपृक्त आराखड्यामध्ये समावेश असणाऱ्या एकूण ३७,८१६ पाणीपुरवठा योजनांपैकी ८,८९२ योजनांना प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे व एकूण ६,९२० योजनांना कार्यादेश देण्यात आले आहेत.
- शासन निर्णयान्वये पाणीपुरवठा व स्वच्छता विभागांतर्गत राबवण्यात येणाऱ्या जलस्वराज्य प्रकल्प, मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम यासोबतच जलजीवन मिशन या कार्यक्रमांतर्गत राबवण्यात येणाऱ्या पाणीपुरवठा योजनांकरिता सुद्धा जलसंपदा विभागाच्या अखत्यारीतील पाणी आरक्षणाच्या पूर्वमंजुरीची आवश्यकता राहणार नाही.

## ग्राम स्वच्छता अभियान

परिसर स्वच्छता आणि नागरिकांच्या सक्रिय सहभागातून संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान पुन्हा अधिक जोमाने राबवण्यात येणार. संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानातून, महाराष्ट्रात स्वच्छतेचा जागर करून ग्रामपंचायतीत समाविष्ट गावांतील वैयक्तिक शौचालये, त्यांचा वापर, मागणी, हागणदारीमुक्त तपासणीचा अहवाल त्यानुषंगाने दुरुस्त करावयाची शौचालये, एक खड्डा ते दोन खड्डा करावयाची शौचालये, गावे हागणदारीमुक्त म्हणून घोषित करण्याकरिता करावयाची कार्यवाही व पूर्तता याबाबत ठोस कृती कार्यक्रम आखून कार्यवाही करण्यात येणार आहे. या अभियान/कार्यक्रमामध्ये निर्माण होणाऱ्या स्वच्छतेसंबंधी मत्ता, गावांमध्ये तयार होणाऱ्या स्वच्छतेच्या नव्या सुविधा, नागरिकांचे स्वच्छतेबाबतीत होणारे मत परिर्वतन व गावागावांतून सुरू असलेल्या स्वच्छतेच्या चळवळीत ग्रामीण भागातील सर्व नागरिक, ग्रामस्थांचा सक्रिय व सातत्यपूर्ण सहभाग घेऊन, त्यांच्या ग्रामपंचायती, तालुके व जिल्ह्यांत स्वच्छतेच्या विविध पैलूंतील प्रगतीबाबत एक सर्वसमावेशक स्पर्धा राबवून व त्या माध्यमातून ग्रामस्थांना प्रोत्साहित करून, स्वच्छतेच्या कार्यक्रमाचा उद्देश व महत्त्व पटवून देण्याकरिता राज्यात संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान राबवण्यात येत आहे.

## स्वच्छ भारत अभियान

राज्यात केंद्र पुरस्कृत स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा-२ ही योजना राबवण्यात येत आहे. संपूर्ण ग्रामीण स्वच्छता शाश्वत पद्धतीने टिकवण्याच्या अनुषंगाने स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा-२ अंतर्गत, ग्रामीण भागातील सार्वजनिक शौचालय संकुलाचे बांधकाम, घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन, गोबरधन, मैला गाळ व्यवस्थापन, प्लास्टिक कचरा व्यवस्थापन, अशा प्रकारे राज्यामध्ये सुरू असणारी ही सर्व कामे पूर्ण करून, राज्यास हागणदारीमुक्त म्हणून घोषित करावयाचे आहे. या सर्व कामांना गतिमान करण्यासाठी, ग्रामस्थांनी व अधिकाऱ्यांनी या कामात दिलेल्या सहभागाला प्रोत्साहित करण्यासाठी, संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानातील स्पर्धेत यथोचित बदल करून ७ ऑक्टोबर २०२२ च्या शासन निर्णयान्वये नव्याने एकत्रित सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्यानुसार २०२२-२३चे अभियान सुरू करण्यात आले आहे. वेगवेगळ्या महत्त्वाच्या बाबींसंदर्भातील कामगिरीकरिता ग्रामपंचायत, ग्रामपंचायत कर्मचारी व शासकीय कर्मचारी/अधिकाऱ्यांनासुद्धा अनेक पुरस्कार या स्पर्धेत देण्यात येणार आहेत.

## पुढील वाटचाल

- पूर्ण आदिवासी पाड्यातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न.
- राज्यातील प्रत्येक गावात पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्याचे उद्दिष्ट पूर्ण करण्यावर भर.
- 'हर घर जल, हर घर नल' हे उद्दिष्ट २०२४ पर्यंत पूर्ण करणार.
- जलजीवन मिशन अंतर्गत राज्यासाठी अपेक्षित असलेली काम पूर्ण करणार असून, ग्रामीण भागातील प्रत्येक व्यक्तीस पुरेसे पाणी पुरवण्यावर भर देण्यात येणार.
- जलस्वराज्य-२ कार्यक्रमांतर्गत पाणीपुरवठा असलेल्या योजनांच्या घरगुती नळ जोडण्यांची संख्या वाढवणे, सुविधांचा दर्जा वाढवणे, १०० % ग्रामीण जनतेला सुरक्षित पाणीपुरवठा करणे तसेच मुख्यतः निमशहरी, पाणी गुणवत्ताबाधित व पाणीटंचाईग्रस्त भागांमध्ये स्वच्छतेच्या मूलभूत सुविधा पुरवण्याचा मानस.
- ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छतेच्या सेवांचे नियोजन, अंमलबजावणी, संनियंत्रण व शाश्वतता या बाबतीत या क्षेत्रातील संस्थांच्या कामगिरीचा दर्जा उंचावणे, तसेच निमशहरी भागांमध्ये आणि पाणी गुणवत्ताबाधित व पाणी टंचाईग्रस्त भागांमध्ये गुणवत्तापूर्ण आणि शाश्वत पाणीपुरवठा सेवा पुरवण्याचा मानस.
- मुख्यमंत्री पेयजल कार्यक्रमात नवीन योजना, बंद असलेल्या प्रादेशिक पाणीपुरवठा योजनांचे पुनरुज्जीवन व प्रादेशिक ग्रामीण पाणीपुरवठा योजनांना देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदान याद्वारे अधिक बळकट करणार. याबरोबरच ग्रामीण पिण्याच्या पाण्याचा टंचाई कार्यक्रम, महाराष्ट्र सुवर्णमहोत्सवी ग्रामीण दलित वस्ती पाणीपुरवठा व स्वच्छता योजना याद्वारे ग्रामीण भागातील प्रत्येक व्यक्तीस पुरेसे पाणी पुरवण्यावर भर देण्यात येईल.

**शब्दांकन : केशव करंदीकर,**
विभागीय संपर्क अधिकारी

# बंदर विकासाला गती



**दादाजी भुसे**
मंत्री, बंदरे आणि खनिकर्म

**राज्याला ७२० किलोमीटरचा विस्तीर्ण समुद्रकिनारा लाभला आहे. समुद्रमार्गे दळणवळण, व्यापार, मत्स्यव्यवसाय याकरिता बंदरे महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडतात. त्याचप्रमाणे राज्यात असलेली खनिज संपत्ती हे देखील आपले वैभव आहे. खाणींच्या परिसरात खनिजांशी निगडित उद्योग व्यवसाय उभारला गेल्यास भरीव महसूल प्राप्त होण्याबरोबर स्थानिकांसाठी रोजगार निर्मितीसुद्धा होऊ शकते. या बाबी विचारात घेता बंदरांच्या विकासाला आणि खनिकर्म विकासाला चालना देऊन रोजगार निर्मितीला प्राधान्य देण्यात येत आहे.**

बंदरे व खनिकर्म या विभागाचा मंत्री झाल्यानंतर मी राज्याच्या बंदर विकास धोरणाचा आढावा घेतला. बंदरे क्षेत्राच्या विकासाला चालना देण्यासाठी तसेच अधिकाधिक गुंतवणूक आकृष्ट करण्यासाठी बंदर विकासाचे नवीन धोरण तयार करण्याची कार्यवाही प्रगतिपथावर आहे.

## जलवाहतुकीस चालना

मागील आर्थिक वर्षात राज्यातील लहान बंदरांनी एकूण ५२.४७ दशलक्ष मेट्रिक टन इतकी मालहाताळणी केली होती. आगामी दोन वर्षात ७० दशलक्ष मेट्रिक टन इतकी मालहाताळणी करण्याचे उद्दिष्ट ठरवण्यात आले आहे. बंदरांच्या विकासाच्या माध्यमातून राज्यात जलवाहतुकीस चालना देण्यात येणार आहे. २०२०-२१ मध्ये किनारपट्टीवरील लहान बंदरांमध्ये जलवाहतुकीद्वारे एकूण १.३६ कोटी इतक्या प्रवाशांनी प्रवास केला. जलवाहतुकीला चालना देण्यासाठी जेट्टी व तत्सम पायाभूत सुविधांचे जाळे निर्माण करण्यात येत आहे. याद्वारे येत्या दोन वर्षात १.७० कोटी इतके प्रवासी हाताळण्याचे उद्दिष्ट आहे.

महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या अखत्यारित सुरू झालेल्या भाऊचा धक्का ते काशिद, भाऊचा धक्का ते दिघी या जलमार्गावर रो-पॅक्स फेरी सेवा सुरू करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे रेडिओ क्लब, मोरा, राष्ट्रीय जलमार्ग क्र. ५३ मधील भाईंदर, कोलशेत, काल्हेर व डोंबिवली तसेच सुवर्णदुर्ग, पद्मदुर्ग, जंजिरा या जलदुर्गांच्या ठिकाणी जेट्टी बांधणे ही कामे येत्या दोन वर्षात पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

## बंदरांचा विकास

केंद्र सरकारच्या सागरमाला योजनेंतर्गत जेट्टीच्या बांधकामाकरिता राज्य हिश्श्याची तरतूद करण्यात आली आहे. बंदरांकरिता रस्ते, रेल्वे, पोचमार्ग बांधण्यात येणार आहेत. बंदरांमधील गाळ उपसणे, तरंगती जेट्टी व तत्सम सुविधा निर्माण करणे यासाठी देखील निधी उपलब्ध करून देण्यात येत आहे. जलवाहतूक दळणवळण सर्वात स्वस्त असल्याने यावर भर दिला जाईल. राज्यातील बंदरांतून मालहाताळणी जलद व सुलभ व्हावी याकरिता केंद्र शासनाच्या बंदरे, नौवहन व जलमार्ग मंत्रालयाने सूचित केल्यानुसार प्रकल्पांची यादी केंद्र शासनास सादर करण्यात आली आहे. याबाबत मंजुरी प्राप्त करून घेण्यासाठी पाठपुरावा करण्यात येत आहे. पश्चिम किनाऱ्यावरील विजयदुर्ग (जि.सिंधुदुर्ग) येथे बंदर विकसित करण्यासाठी विकासकाची निवड करण्यात येऊन त्यांच्याशी सवलत करारनामा स्वाक्षांकित करण्यात येईल.

फिशरिज ॲण्ड ॲक्वाकल्चर इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट फंड (एफआयडीएफ) अंतर्गत साखरीनाटे (जि. रत्नागिरी), भरडखोल (जि. रायगड), जीवना बंदर (जि. रायगड), हर्णे (जि. रत्नागिरी) आणि सातपाटी (जि. पालघर) या मत्स्यबंदराची कामे पूर्ण केली जाणार आहेत, तर वसई, भाईंदर, डोंबिवली, कल्याण, वाशी, ऐरोली, मीठबंदर (ठाणे)



आणि बेलापूर ही ठिकाणे जलमार्गाने जोडून या ठिकाणी जेट्टीसह विविध सुविधा उपलब्ध करण्यात येणार आहेत.

## खनिकर्माला चालना

महाराष्ट्रात मुबलक खनिजसाठा उपलब्ध असलेल्या खाणींच्या परिसरात संबंधित उद्योग व्यवसाय उभारल्यास महसूल प्राप्त होण्याबरोबर स्थानिकांसाठी रोजगार निर्मितीसुद्धा होऊ शकेल. हा उद्देश साध्य होण्यासाठी खनिकर्म महामंडळांतर्गत येणाऱ्या संचलित खाणी, अखत्यारित क्षेत्र व खनिज साठा, कार्यान्वित अधिकारी-कर्मचारी, कामगारांची संख्या, खनिज विक्री, कोल वॉशरिज कमिशन, एकूण उत्पन्न, खाणकाम करण्यासाठी येणाऱ्या अडचणी आदींसंदर्भात नुकताच सविस्तर आढावा घेण्यात आला आहे. महामंडळाच्या बळकटीकरणासाठी रिक्त पदांची भरती करून भरीव अनुदान तसेच अधिकार बहाल करण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहेत. राज्य शासनाच्या खनिज धोरणांतर्गत कवच यंत्रणा व खनिकर्माची सर्वांगीण प्रगती व्हावी, याला प्राधान्य देण्यात येणार आहे. उत्खननासाठी येणाऱ्या अडचणीही सोडवण्यात येतील.

राज्यात गौण खनिजांचा विपुल साठा उपलब्ध आहे. खनिजांचा शोध, संशोधन व उत्पादनातून महसूल मिळून अर्थव्यवस्था सबळ होण्याबरोबरच रोजगाराची संधीही उपलब्ध होऊ शकते. त्यासाठी व्यापक खनिज सर्वेक्षण कार्यक्रम हाती घेण्यात येणार आहे. खनिजांवर आधारित प्रक्रिया मूल्यवर्धन स्थानिकरीत्या करण्यासाठी प्रकल्प उभे करून रोजगार निर्मितीवर भर दिला जाईल.

## पर्यावरण समतोलासाठी उपाय

राज्यात खाणींमुळे बाधित नागरिकांची यादी तयार करून त्यानुसार लाभ दिले जातील. जिल्हा खनिज प्रतिष्ठान अंतर्गत जमा होणाऱ्या निधीचा विनियोग प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजनेमधून आरोग्य आणि शिक्षणविषयक सुविधानिर्मिती, पिण्याचे पाणी, प्रदूषण नियंत्रण, स्वच्छता, महिला व बालकल्याण, वयोवृद्ध व दिव्यांग कल्याण तसेच कौशल्य विकास आदींसाठी करण्यात येईल. खाणबाधित क्षेत्रात रस्ते, पूल, जलसंधारण आदी पायाभूत सुविधा निर्माण करण्याबरोबरच पर्यावरण समतोलासाठी उपाय योजले जातील.

अवैध रेती चोरी आणि वाहतुकीला प्रतिबंध करण्यासाठी तेलंगणा आणि ओडिशा राज्यांनी अवलंबलेल्या योजनांची माहिती घेऊन त्यानुसार काम करण्याच्या सूचना विभागाला देण्यात आल्या आहेत. या राज्यांच्या धर्तीवर महाराष्ट्रात खनिज उत्खनन प्रक्रिया व धोरणाचे मॉडेल तयार करण्यात येईल. यासाठी प्रायोगिक तत्त्वावर एका जिल्ह्यात मॉडेल यशस्वीरीत्या कार्यान्वित करून त्यानंतर ते राज्यात लागू करण्यात येईल. सामान्य नागरिकांना बाजारभावापेक्षा कमी दरात रेती उपलब्ध होण्यासाठी उपाययोजना आखण्यात येतील. शासनाच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांसाठी रेतीघाट राखीव ठेवण्याच्या शासनाच्या धोरणानुसार प्रकल्पांसाठी रेती खुल्या लिलावातून मिळवण्यात येईल.

## महसूल वाढीचे उद्दिष्ट

विदर्भात प्रामुख्याने कोळसा, लोहखनिज, मँगनीज, बॉक्साईट, क्रोमाईट, तांबे, चुनखडी आदी गौण खनिजांचा नैसर्गिक स्रोत आढळतो. यांचा सविस्तर अभ्यास करून आवश्यकतेनुसार वाटपाचे नियोजन केले जाईल. कोळसा आणि खनिज वाहतुकीवर नियंत्रण ठेवण्यासाठी केंद्र स्थापन करण्यात येईल. तसेच राज्यातील वीज प्रकल्पांना लागणारा खनिजांचा पुरवठा शासकीय यंत्रणेकडून व्हावा, यासाठी कार्यप्रणाली राबवण्यात येईल.

खनिकर्म विभागांतर्गत राज्यातील प्रमुख खनिजांपासून राज्याला मागील वर्षात सुमारे २०४० कोटी रुपये महसूल प्राप्त झाला असून चालू वर्षी २४७५ कोटी इतके उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. यात आणखी वाढ व्हावी, यासाठी भूविज्ञान व खनिकर्म संचालनालयाच्या अखत्यारित आस्थापनेवरील वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूवैज्ञानिक, कनिष्ठ भूवैज्ञानिक व रसायन शास्त्रज्ञ संवर्गात सुमारे १३२ नवीन पदांची वाढ करून खनिकर्म विभागाच्या बळकटीकरणाची कार्यवाही सुरू आहे. चालू वर्षी नव्याने ११ ब्लॉकच्या सर्वेक्षणाची तयारी सुरू आहे. राज्याच्या महसूलात भरीव वाढीसाठी सद्य:स्थितीत प्रमुख खनिजाची ९वी ई-लिलाव फेरी सुरू असून यामध्ये ११ खाणपट्टे ई-लिलावासाठी ठेवण्यात आले आहेत, तर मार्च २०२३ अखेर १० व्या ई-लिलाव फेरीचे आयोजन करण्यात येणार आहे. २०२३-२४ मध्ये सुमारे २५ प्रमुख खनिजांचे ब्लॉक ई-लिलाव प्रक्रियेसाठी ठेवण्याची तयारीही संचालनालयाच्या स्तरावर सुरू करण्यात आलेली आहे. ज्या ठिकाणी अधिक महसूल गोळा होऊ शकतो, त्या ठिकाणी तत्काळ अधिकाऱ्यांची तसेच प्रयोगशाळा शास्त्रज्ञ, सर्वेअर यासारखी पदे प्राधान्याने भरण्यात यावीत. गौण खनिजांचा राज्यातील उद्योग क्षेत्राला पुरवठा करण्यासाठी उपाययोजना आखावी. लीज धारकांना परमिट व पास, उत्खनन केलेल्या खनिज वाहतुकीची पडताळणी, ट्रान्झिट पासच्या सत्यतेची पुनरावलोकन पडताळणी आदी महत्त्वपूर्ण कामांवर आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून नियंत्रण ठेवावे, असे निर्देश देण्यात आले आहेत.



येत्या काही दिवसात मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, पर्यावरणमंत्री, वनमंत्री यांच्यासोबत खनिकर्म व पर्यावरण विभागाची राज्यस्तरीय संयुक्त आढावा बैठक घेण्यात येईल. तसेच केंद्र शासनाच्या दोन्ही विभागांसोबत खाणकामाबाबत येणाऱ्या अडचणींवर चर्चा करून मार्ग काढण्यात येईल. मी स्वत: केंद्र शासनाच्या खाण व पर्यावरण विभागाकडे याबाबत पाठपुरावा करणार आहे. खासगी खाण कंपन्यांना खनिजांचे उत्खनन करण्यासाठी येणाऱ्या अडचणींतून मार्ग काढण्यात येऊन उद्योग वाढीसाठी खासगी कंपन्या आणि राज्य शासनाचा खनिकर्म विभाग असे दोन्ही स्तरावर प्रयत्न केले जातील.

एकंदरीतच कायद्याच्या चौकटीत राहून राज्याच्या विकास प्रक्रियेत जास्तीत-जास्त योगदान देत रोजगारनिर्मिती, पर्यावरण संवर्धन तसेच नागरिकांच्या हिताची काळजी घेत राज्याचे उत्पन्न वाढवण्यावर माझ्या विभागाचा भर असणार आहे.

**शब्दांकन : ब्रिजकिशोर झंवर,**
विभागीय संपर्क अधिकारी

# निर्भेळ आणि सकस आहार



**संजय राठोड**
मंत्री, अन्न व औषध प्रशासन

**प्रत्येक नागरिकाच्या दैनंदिन जीवनाशी निगडित असलेला विभाग म्हणजे अन्न व औषध प्रशासन विभाग आहे. सकाळी घरी येणारे दूध निर्भेळ असावे, इथपासून ते दिवसभर घेतला जाणार आहार सकस आणि शुद्ध असावा, आजारपणासाठी लागणाऱ्या औषधांचा पुरवठा सुरळीत व्हावा, या सर्व बाबींची काटेकोर पाहणी करणारा विभाग म्हणून अन्न व औषध प्रशासन विभाग कार्य करत असतो.**

अन्न व औषध प्रशासन या विभागाचा मंत्री म्हणून माझ्याकडे जबाबदारी आहे. या विभागामार्फत केल्या जाणाऱ्या कामांचा आढावा आणि काम करताना भेडसावणाऱ्या समस्या यांची सखोल माहिती घेतली.

निर्भेळ अन्न मिळावे यासाठी अनेक स्तरावर काळजी घेतली जाते. प्रत्येक टप्प्यावर तपासणी केली जाते. रोजच्या वापरातल्या वस्तुंचा जिथे साठा केला जातो, तिथे जर काही भेसळयुक्त असे पदार्थ आहेत याची माहिती मिळताच आमचे पथक तिथे तत्काळ धाड टाकून माल जप्त करते. यामुळे सर्व सामान्य जनतेस दुषित अन्न न मिळता आजारी पडण्याचा धोका कमी होतो. आता सणासुदीचे दिवस सुरू होत आहेत. याकाळात अधिक सतर्कतेने काम करणे गरजेचे आहे. आमचा विभाग तर अत्यंत दक्ष राहून हे कार्य करत आहेच, मात्र एक सामान्य नागरिक म्हणून प्रत्येकाने जागरूक असणे आवश्यक आहे. आपण विकत घेत असलेल्या अन्नपदार्थांची 'एक्स्पायरी डेट' तपासणी केली पाहिजे. काही ठिकाणी जर अस्वच्छता आढळून आली तर त्याबद्दल तक्रार करावी. यांसारख्या छोट्या मोठ्या गोष्टीतून एकत्रित प्रयत्नांमधून सर्वांना निर्भेळ आणि सकस आहार हे लक्ष्य साध्य होऊ शकणार आहे.

### बनावट कंपन्यावर धडक कारवाई

औषधांच्या बाबतीतही विभागाने काटेकोरपणे पावले उचलायला सुरुवात केली आहे. बनावट आणि विनापरवाना औषध तयार करणाऱ्या कंपन्यांवर कडक कारवाई करण्यात येत आहे. आतापर्यंत धाडी आणि जप्तीची कारवाई करून एकूण ४१.२७ कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. प्रत्येक गरजू व्यक्तीला त्याच्या आजारपणात वाजवी दरात औषध मिळावे ही आमची प्राथमिकता आहे. काळाबाजार होऊ नये, यासाठी आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या आहेत.

औषध विभागातील सर्व कंपन्या जागतिक स्तरावरील तसेच केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करतात किंवा कसे याबाबत कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. कॅन्सर, डायबेटीज यांवरील औषध उत्पादक कंपन्या त्यांचेकडील कर्मचारी वर्ग यांच्या संरक्षणासाठी आवश्यक त्या उपाययोजना करतात. या कंपन्यांमधील औषधाचा दर्जा हा केंद्रशासनाने नेमून दिलेल्या संगणक प्रणालीप्रमाणे मशीनरी वापरतात काय, याबाबत तपासणीच्या सूचना सर्व अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

### भेसळ रोखण्यास कठोर उपाययोजना

अन्न विभागामध्ये भेसळ रोखण्यास कठोर उपाययोजना करण्याचे निर्देश दिले आहेत. केंद्र शासनाने परवानगी दिलेल्या अन्न उद्योगामधील उत्पादन प्रकरणात तपासणी करता येत नाही अशी अडचण



येते असे लक्षात आले. तरीही अशा सर्व पदार्थाच्या वितरक व विक्रेते यांचेकडील नमुने कायदेशीर पद्धतीने तपासण्याचे निर्देश दिले आहेत.

नुकतीच विभागाच्या वरिष्ठ पदावरील अधिकाऱ्यांची सह्याद्री अतिथिगृह येथे मी सविस्तर बैठक घेतली, तेव्हा औरंगाबाद विभागातील जालना, बीड व औरंगाबाद येथील भगरीच्या विषबाधेच्या पार्श्वभूमीवर राज्यातील भगर विक्री करणाऱ्या सर्व उत्पादक व विक्रेत्यांकडील प्रतिजिल्हा दहा नमुने तपासणी करून अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या.

## इट राईट मोहीम

आपण कारवाई करतो म्हणजे केवळ नियमन करणारा आपला विभाग आहे का, असा गैरसमज होण्याची शक्यता आहे. अन्न व औषध क्षेत्रातील उद्योजकांना 'इज ऑफ डुईंग बिजनेस'अंतर्गत अनेक बाबींचे सुलभीकरण करण्यात आले आहे. आपला व्यवसाय करत असताना आंतरराष्ट्रीय मानके पाळण्यासाठी मदत केली जात आहे.

जागतिक स्तरावर असलेली समस्या कुपोषणाची समस्या आपल्या देशातील युवा पिढीला भेडसावू लागली आहे. यासाठी शालेय स्तरावरच 'इट राईट' ही मोहीम आपण सुरू केली आहे. कोवळ्या वयातच पोषणाचे महत्त्व आणि योग्य खाणेपिणे याचे प्रशिक्षण दिले जात आहे.

कोविडमधून जग सावरायला लागले आहे. कोविड काळात आपल्या आरोग्याप्रती जागरूकता निर्माण झाली आहे. यापुढे येणारा काळ हा सुदृढतेचा असेल, असा मला विश्वास आहे. अन्न व औषध प्रशासन विभाग हा सर्वसामान्यांच्या जिव्हाळ्याचा विभाग आहे, म्हणूनच या विभागाचा प्रमुख म्हणून माझ्यावर असलेल्या जबाबदारीची मला जाण आहे.

## ग्राहकांच्या हिताचे रक्षण करणारी संस्था

अन्न व औषध प्रशासन ही ग्राहकांच्या हिताचे रक्षण करणारी प्रमुख संस्था आहे. ग्राहकांना उत्तम दर्जाचे औषधे, सौदर्य प्रसाधने व सुरक्षित अन्नपदार्थ मिळण्यासाठी असलेल्या अधिनियमांची अंमलबजावणी या प्रशासनामार्फत केली जाते.

अन्न व औषध प्रशासनामध्ये प्रामुख्याने दोन विभाग आहेत. अन्न विभाग आणि औषध विभाग. अन्न विभाग हे प्रामुख्याने अन्नविषयक कायद्याची अंमलबजावणी करून मानवी वापरासाठी सुरक्षित आणि पौष्टिक अन्नाची उपलब्धता सुनिश्चित करते, तर औषध विभाग हे प्रामुख्याने औषध विषयक कायद्याची अंमलबजावणी करून औषधे आणि सौंदर्यप्रसाधने यांचा दर्जा सुनिश्चित करते.

## राज्य अन्नसुरक्षा निर्देशांकात झेप

राज्य अन्नसुरक्षा निर्देशांक २०२१-२२ मधील मोठ्या राज्यांमधून १५व्या स्थानावरून तिसऱ्या स्थानावर झेप घेतली आहे.

गुटखा, पानमसाला, सुगंधित तंबाखू, सुगंधित सुपारी यासारख्या प्रतिबंधित अन्न पदार्थांवर कार्यवाही केली जाते. या वर्षी २०२१-२२ या वर्षात १ हजार ६४५ तपासण्या करण्यात आल्या, तर ९५९ जप्ती प्रकरणे झाली आहेत, तर सुमारे ३२ कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या वर्षी यासंदर्भात ६०४ खटले दाखल झाले आहेत.

## प्रयोगशाळांचे बळकटीकरण

राज्यातील अन्नसुरक्षा प्रणालीचे बळकटीकरण करण्यासाठी अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरण, नवी दिल्ली व राज्य शासन यांच्यामध्ये सामंजस्य करार झाला आहे. या सामंजस्य करारानुसार अंमलबजावणी आणि अनुपालन प्रणाली सक्षम करणार आहे. त्याचबरोबर अन्न चाचणी प्रणाली सक्षम करण्यात येणार आहे.

## फूड सेफ्टी ऑन व्हिल्स

अन्न तपासणीसाठी राज्यात प्रयोगशाळांची संख्या पुरेशी नसल्याने 'फूड सेफ्टी ऑन व्हिल्स' ही फिरती प्रयोगशाळा सुरू केली जाणार आहे. यात १८ नव्या वाहनांच्या खरेदीसाठी मंजुरी देण्यात आली आहे. या वाहनांमध्ये प्रयोगशाळेसारख्या सर्व सोयी सुविधा असणार आहेत. यात चालकासह तंत्रज्ञ आणि सहकारी असा चमू असणार आहे. अन्न नमुन्यांची तपासणी जलदगतीने होण्यासाठी याचा उपयोग होणार आहे.

'इट राईट इंडिया मुव्हमेंट'अंतर्गत विविध उपक्रम राज्यभरात राबवण्यात येणार आहेत. या अंतर्गत 'इट राईट कॅम्पस', 'इट राईट स्कुल', 'क्लिन स्ट्रिट फूड हब', 'क्लिन फ्रूट ॲण्ड व्हेजिटेबल मार्केट' यावर भर देण्यात येणार आहे. मंदिरात चढवला जाणारा प्रसाद तयार करण्यासाठी 'भोग' हा उपक्रम राबवण्यात येणार आहे. मंदिरात राखली जाणारी स्वच्छता आणि अन्नपदार्थ तयार करण्यासाठी प्रमाणित पद्धती विकसित करण्याचे प्रशिक्षण दिले जाणार आहे.

## प्रणालीचे सुलभीकरण

औषध उत्पादक व विक्रेते यांना परवाने मंजुरीसाठी असलेली संगणक प्रणाली ही 'मैत्री पोर्टल' सोबत जोडून या प्रणलीचे सुलभीकरण करण्यात आले. औषध निर्यातीसाठी आवश्यक असलेल्या डब्ल्यूएचओ जीएमपी दाखले मंजुरीसाठी कालमर्यादा निश्चित केली आहे. औषध निरीक्षकांद्वारे तपासण्या करण्यासाठी संगणकीय पद्धतीद्वारे परवानाधारक नेमून देण्यात येतात. औषध विक्रेते व उत्पादक यांचे सर्व प्रकारचे अर्ज निकाली काढण्यासाठी कालमर्यादा आखून देण्यात आली आहे. त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

या विभागाचे बळकटीकरण करण्यावर माझा भर असणार आहे. त्याचबरोबर येथे असलेल्या मनुष्यबळाचा अभाव, साधनसामग्रीचा तुटवडा यांसारख्या मर्यादांची मला माहिती आहे, असे असले तरी सामान्य जनतेला कायम स्वच्छ आणि निर्भेळ अन्न मिळेल आणि योग्य वेळी औषध पुरवठा होईल, याची अन्न व औषध प्रशासन विभागाचा मंत्री म्हणून हमी घेतो.

**शब्दांकन : अर्चना शंभरकर,**
विभागीय संपर्क अधिकारी

# कामगारांची सुरक्षा



**डॉ. सुरेश खाडे**
मंत्री, कामगार

**राज्याच्या प्रगतीमध्ये उद्योग, उद्योजक यांचा जेवढा वाटा आहे तेवढाच कामगार हा देखील महत्त्वाचा घटक आहे. या दोन्ही घटकांमध्ये समन्वय राखून उद्योग चालले पाहिजेत अशी कामगार मंत्री म्हणून माझी भूमिका आहे. कामगारांच्या कल्याणासाठी आणि त्यांच्या हिताच्या रक्षणासाठी कायदे व नियम तयार करण्याची जबाबदारी कामगार विभागाची आहे. कामगारांच्या उन्नतीसाठी आणि कामगार विभागाच्या विविध योजनांचा लाभ शेवटच्या घटकांपर्यंत पोहोचवण्यासाठी विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत.**

राज्यातील संघटित, असंघटित कामगारांना शासनाकडून ठरवलेल्या किमान लाभापेक्षा कमी लाभ मिळणार नाही, याची दक्षता घेतली जाते. त्याचप्रमाणे कामगारांचे आरोग्य चांगले राहावे, त्यांना विमा संरक्षण मिळावे यासाठी तसेच कंपनी कामगार, सुरक्षा रक्षक, माथाडी कामगार यांच्या कल्याणासाठी विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत. माझ्या विभागांतर्गत कामगार आयुक्तालय ही एक महत्त्वाची शाखा आहे. माथाडी मंडळाच्या माध्यमातून माथाडी कामगारांना आर्थिक साहाय्य, कोविडमुळे मृत्यू पावलेल्या सुरक्षा रक्षकांच्या कुटुंबीयांना आर्थिक लाभ मिळवून दिला जातो.

## ऑनलाईन सेवा

बालकामगार कृतिदलाच्या माध्यमातून यावर्षी आतापर्यंत २२ बालकामगार आणि ९६ किशोरवयीन कामगारांची मुक्तता करण्यात आली. साखर कामगारांच्या वेतन व सेवाशर्ती संदर्भात गठित समितीने त्यांच्या मागण्यांबाबत सामंजस्य करार घडवून आणला. व्यवसायात सुलभता आणताना



ऑनलाईन सेवांबाबत माहिती देण्यासाठी तसेच उपभोक्त्यांच्या तक्रारीवर कार्यवाही करण्यासाठी सपोर्ट डेस्क तयार करून जनजागृती करण्यात आली. महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियमांतर्गत आस्थापनांचे नामफलक मराठीत असणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्याचबरोबर मद्य पुरवल्या जाणाऱ्या आस्थापनांच्या नामफलकावर महान व्यक्ती अथवा गडकिल्ल्यांची नावे लिहिता येणार नाहीत, अशी तरतूद करण्यात आली आहे.

## कुशल मनुष्यबळाद्वारे प्रगती

महाराष्ट्र हे आशियातील बाष्पक (बॉयलर) निर्मिती करणारे महत्त्वाचे केंद्र आहे. येथे सुमारे १२०० बाष्पकांची निर्मिती होऊन बरीच बाष्पके निर्यात होतात. बाष्पकांची काटेकोरपणे तपासणी करून जीवित व मालमत्तेचे बाष्पक स्फोटापासून संरक्षण करणे, तसेच उत्पादन दर्जेदार करण्यासाठी निरीक्षण करणे हे बाष्पके संचालनालयाचे महत्त्वाचे काम आहे. सौर ऊर्जेसारख्या स्रोतांवर चालणाऱ्या बाष्पकांची निर्मिती करण्यासाठी उद्योगांना प्रोत्साहन देणे, त्यांना इंधन म्हणून लाकडाऐवजी अपारंपरिक ऊर्जेचा वापर करण्यास उद्युक्त करणे, हीदेखील महत्त्वाची कामे केली जात आहेत. बाष्पक निर्मितीचे देशातील एक प्रमुख केंद्र ही ख्याती कायम राखण्यासाठी उद्योजकांना दर्जेदार उत्पादनासाठी विविध मार्गांनी प्रोत्साहित केले जात आहे. अनाथाश्रमात वयाची १६ वर्षे पूर्ण केलेल्या १५ युवकांना दरवर्षी प्रशिक्षण देऊन प्रमाणित सांधता म्हणून रोजगाराची संधी उपलब्ध करून दिली जाणार आहे. त्याचप्रमाणे अभियंता, परिचर, सांधाते यांच्यासाठी नियमित परीक्षा घेऊन कार्यक्षम, कुशल मनुष्यबळाद्वारे राज्याची औद्योगिक प्रगती साधता येणार आहे.

बाष्पके, उद्योग व शासन या त्रिसूत्रीची सांगड घालून बाष्पक व्यवसायाला चालना देणे, निर्यात वाढवणे या हेतूने बॉयलर इंडिया-२०२२ या कार्यशाळा व प्रदर्शनाचे नुकतेच नवी मुंबई येथे आयोजन करण्यात आले. नवनवीन तंत्रज्ञान वापरण्याचे फायदे व कार्यक्षम बाष्पकाचा वापर हादेखील या कार्यशाळेचा उद्देश होता. यात २१६१ प्रतिनिधींनी सहभाग घेतला. २३ हजारांहून अधिक व्यावसायिक प्रतिनिधींनी, तर ४२ देशांच्या राजकीय व व्यावसायिक प्रतिनिधींनी या प्रदर्शनास भेट दिल्याने भारताला बाष्पक निर्मितीचे जागतिक व्यासपीठ बनवण्यासाठी हे प्रदर्शन उपयुक्त ठरेल, याची प्रचिती आली.

## औद्योगिक सुरक्षेविषयी प्रोत्साहन

कारखान्यातील कामगारांची सुरक्षितता, आरोग्य व कल्याणकारी तरतुदींची अंमलबजावणी करण्यासाठी कामगार विभागांतर्गत औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय कार्यरत आहे. या संचालनालयाकडून कारखान्याचे नकाशे मंजूर करणे, परवाना देणे, नूतनीकरण करणे, निरीक्षण करणे आणि सुरक्षेच्या दृष्टीने प्रतिबंधात्मक उपाययोजना सुचवणे आदी महत्त्वपूर्ण कामे केली जातात. संचालनालयामार्फत रासायनिक कारखान्यांचे निरीक्षण करून अपघात हाताळण्याची तालीम घेण्यात येणार आहे, यासाठी औद्योगिक सुरक्षेविषयी प्रोत्साहन मिळण्याकरिता राष्ट्रीय सुरक्षा सप्ताह साजरा करण्यात येईल. कारखान्यांमधील ऑपरेटर्स आणि पर्यवेक्षक यांच्याकरिता देखील प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात येणार आहे.

## प्रशिक्षण आणि प्रकल्प

कामगार विभागांतर्गत 'नारायण मेघाजी लोखंडे महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्थे'मार्फत औद्योगिक क्षेत्रात शांतता नांदण्याकरिता आवश्यक असणारी मानवी संसाधने व्यावसायिक तत्त्वावर विकसित करण्याचे काम केले जाते. तसेच शिक्षण प्रशिक्षण व संशोधन करणे आणि कामगारविषयक अध्ययनातील उत्कृष्टतेचे केंद्र बनवणे आदी कामे करण्याचेही उद्दिष्ट आहे. यासाठी 'मास्टर ऑफ लेबर स्टडीज' हा दोन वर्षांचा व्यावसायिक पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम चालवण्याबरोबरच विविध चर्चासत्रे, कार्यशाळा, प्रशिक्षण, प्रकल्पांचे आयोजन करण्यात येणार आहे.

## गुणवंत कामगारांना पुरस्कार

कामगार व त्यांच्यावर अवलंबून असलेल्या व्यक्तींच्या हितसंवर्धनासाठी महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ स्थापन करण्यात आले आहे. असे मंडळ स्थापन करणारे महाराष्ट्र हे अग्रगण्य राज्य आहे. याअंतर्गत पाच किंवा त्यापेक्षा अधिक कामगार कार्यरत असलेल्या आस्थापनांना मंडळाकडे नोंदणी बंधनकारक आहे. या मंडळामार्फत ऑनलाईन पोर्टल, महाकल्याण कौशल्य विकास व रोजगार कार्यक्रम, क्रीडा प्रबोधिनी, श्रमकल्याण युग हे मासिक, आर्थिक लाभ योजना आदी योजना, उपक्रमांच्या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. विविध क्षेत्रात गुणवंत कामगारांना पुरस्कार देऊन गौरवले जाते.

## नूतनीकरण व लाभवाटप

विकास आयुक्त (असंघटित कामगार) यांच्यामार्फत महाराष्ट्र घरेलू कामगार कल्याण मंडळ तसेच महाराष्ट्र राज्य सामाजिक सुरक्षा मंडळाच्या माध्यमातून असंघटित कामगारांचे कल्याण साधले जाते. याअंतर्गत विविध योजनांच्या माध्यमातून आर्थिक लाभ देण्यात येतो. असंघटित कामगारांमध्ये गृहउद्योग करणारा, स्वयंरोजगार करणारा, असंघटित क्षेत्रात वेतनावर काम करणारा आदींचा समावेश होतो. पुढील काळात मनुष्यबळ वाढवणे, कामगार सुविधा केंद्र स्थापन करणे, कामगारांची नोंदणी आदी कामे प्राधान्याने केली जाणार आहेत.



राज्यातील इमारत व इतर बांधकामांवर काम करणाऱ्या बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण, लाभवाटप सुलभ व जलद व्हावे, या उद्देशाने ऑनलाईन नोंदणी, नूतनीकरण व लाभ वाटप करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. राज्यातील नाका कामगारांना व बांधकाम कामगारांना मध्यान्ह भोजन योजना लागू करण्यात आली आहे.

असंघटित कामगारांना सामाजिक सुरक्षितता पुरवण्याच्या उद्देशाने असंघटित कामगारांचा राष्ट्रीय डेटाबेस तयार करण्याचा निर्णय केंद्राने घेतला आहे. असंघटित कामगारांच्या नोंदणीसाठी ई-श्रम पोर्टल सुरू करण्यात आले असून १६ ते ५९ या वयोगटातील कामगार पात्र असणार आहेत. नोंदणी वाढवण्यासाठी जनजागृती करण्यात येत आहे. ई-श्रम पोर्टलवर नोंदीत असंघटीत कामगारांना केंद्र शासनामार्फत लागू केल्या जाणाऱ्या सर्व योजनांचे लाभ लागू असतील.

## कल्याणकारी योजना

देशात काम करणाऱ्या एकूण श्रमशक्तीपैकी असंघटीत क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांची संख्या संघटित क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांच्या अधिक म्हणजे ९३ टक्के आहे. यातही बांधकाम कामगारांची संख्या लक्षणीय आहे. या कामगारांकरिता महाराष्ट्रासाठी त्रिपक्षीय महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची स्थापना झाली आहे. या मंडळामार्फत कामगारांची नोंदणी, नूतनीकरण करण्याबरोबरच विविध योजनांतर्गत लाभ वितरित करण्यात येतो. याअंतर्गत एकूण ३५,५२,४१५ बांधकाम कामगारांची नोंदणी झाली असून त्यापैकी ११,५५,६०० बांधकाम कामगारांची नोंदणी सक्रीय आहे. या कामगारांसाठी पहिलीपासून ते पदव्युत्तर पदवीपर्यंतच्या शिक्षणाकरिता शैक्षणिक साहित्य, आर्थिक साहाय्य, आरोग्य व सामाजिक सुरक्षिततेच्या विविध कल्याणकारी योजना राबवण्यात येतात. यामध्ये प्रसूती लाभ, नैसर्गिक किंवा अपघाती मृत्यू झाल्यास वारसांना मदत आदींचा समावेश आहे. विविध योजनांतर्गत आजपर्यंत सुमारे ४०४ कोटी इतके अर्थसाहाय्य वितरित करण्यात आले आहे. तसेच जवळपास १३,९८,८२३ बांधकाम कामगारांना दररोज मध्यान्ह/रात्रीचे भोजन वितरित करण्यात आले असून १९,९२,३१७ कामगारांना अत्यावश्यक संच/सुरक्षा संच वितरित करण्यात आले आहेत. बांधकाम कामगारांसाठी कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देण्यात येणार असून त्याबाबतची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.

कामगारांसाठीच्या शासनाच्या विविध योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी मी आणि माझा विभाग प्रयत्नशील असून या माध्यमातून कामगारांचे जीवनमान उंचावण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

**शब्दांकन : ब्रिजकिशोर झंवर,**
विभागीय संपर्क अधिकारी

# रोजगाराला प्राधान्य



**संदिपान भुमरे**
मंत्री, रोहयो आणि फलोत्पादन

**राज्यात ग्रामीण भागाचा विकास करणाऱ्या अनेक योजना राबवण्यात येत आहेत. त्यात सर्वात महत्त्वाची व ज्या योजनेचा प्रत्येक गावातील शेतकरी, शेतमजूर, मजूर हे लाभ घेऊ शकतात अशी योजना म्हणजे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना होय. या योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या जमिनीचा विकास, पाण्याची उपलब्धता, जमिनीचा पोत सुधारणे अशा अनेक बाबींच्या माध्यमातून शाश्वत विकास करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करण्यात येणार आहे.**

वाढत्या लोकसंख्येबरोबर रोजगाराचे प्रश्न निर्माण होत आहेत. त्यात अकुशल कामगारांचा प्रश्न सरकारसमोर उभा आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील अकुशल कामगारांना रोजगार मिळावा आणि त्यामार्फत जलसंधारण व पाणलोट क्षेत्राची कामे करून घ्यावीत, असा उद्देश डोळ्यासमोर ठेवून आम्ही रोजगार हमी योजनेची कामे करणार आहोत.

## रोजगाराची हमी

केंद्र शासन या योजनेंतर्गत १०० दिवस प्रतिकुटुंब रोजगाराची हमी देते व १०० दिवस प्रतिकुटुंब मजुरीच्या खर्चासाठी निधी पुरवते. प्रतिकुटुंब १०० दिवसांवरील प्रत्येक मजुराला मिळणाऱ्या मजुरीच्या खर्चाचा आर्थिक भार राज्य शासन उचलते. केंद्र शासनाच्या निर्देशानुसार राज्य शासन राज्यात अधिकाधिक सुविधा पुरवण्याचा प्रयत्न करणार आहे.

राज्यात पेयजल स्रोतांसह भूजलाचे पुनर्भरण करण्यावर विशेष भर देऊन भूमिगत पाट, मातीची धरणे, रोधी धरणे, संरोधी धरणे यांसारखी भूजलस्तर वाढवणारी, त्यात सुधारणा करणारी जलसंधारणाची व जलसंचयाची बांधकामे अशी नैसर्गिक साधनसंपत्ती व्यवस्थापनाशी संबंधित सार्वजनिक बांधकामे करण्यावर भर देण्यात येणार आहे. व्यापक पाणलोट क्षेत्रप्रक्रिया करता येईल असे समतल चर, समतल बांध, दगडी संरोधक, दगडमातीचे कक्षबोध (गॅबियन संरचना) आणि पाणलोट विकासाची कामे यांसारखी जल व्यवस्थापनाविषयक कामांवर भर देण्यात येणार असून सूक्ष्म व लघू पाटबंधाऱ्याची कामे आणि सिंचन कालवे व नाली बांधणे, त्यांचे नूतनीकरण करणे, परिरक्षण करणे आदी कामांना प्राधान्य देण्यात येणार आहे.

सिंचन तलाव व इतर जलाशये यांमधील गाळ उपसण्यासह पारंपरिक जलाशयांचे नूतनीकरण करणे, कुटुंबांना फलोपयोग घेण्याचा रितसर हक्क मिळवून देईल असे सर्वसामान्य व वन जमिनींवरील सडक पट्ट्या, कालवा बांध, तलाव अग्रतट (टँक फोरशोअर) आणि किनारीपट्टे यावरील वनरोपण, वृक्षलागवड आणि फलोत्पादन असे विविध कामांमुळे ग्रामीण भाग हरित होण्यास नक्की मदत होणार आहे.



## गाव समृद्ध तर माझा महाराष्ट्र समृद्ध

राज्यातील शेतकरी आणि गावकरी समृद्ध व्हावेत, या दृष्टिकोनातून 'मी समृद्ध तर गाव समृद्ध आणि गाव समृद्ध तर माझा महाराष्ट्र समृद्ध' ही संकल्पना मनरेगा व राज्य रोहयोच्या माध्यमातून राबवण्यात येणार आहे.

मनरेगाच्या माध्यमातून शेत-पाणंद रस्ते बांधण्याच्या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येणार आहे. राज्यात शेत-पाणंद रस्त्यांची मोठ्या प्रमाणावर गरज आहे. रस्त्यांअभावी शेतकऱ्यांना तयार पीक बाहेर काढून साठवणे व बाजारात विकणे अवघड जाते. पावसाळ्यातील पिके आर्थिकदृष्ट्या फायदेशीर असली तरी रस्त्याअभावी ती पिकवण्याचा विचार करता येत नाही. पाणंद रस्ते नसल्यामुळे शेतकऱ्यांना विविध पीक घेण्यात मोठा अडसर होतो आणि म्हणूनच या कामांना मंजुरी देण्यात येणार आहे.

या योजनेच्या उद्दिष्टानुसार रोहयोअंतर्गत मागेल त्याला अकुशल रोजगार उपलब्ध करून ग्रामीण भागात सामूहिक उत्पादक मत्ता व मूलभूत सुविधा निर्माण करता येणार आहे. या योजनेमुळे सर्व शेतांपर्यंत योग्य गुणवत्तेचे बारमाही वापरता येतील असे शेतरस्ते, पाणंद तयार करता येणार आहेत. प्रत्येक गावात सरासरी पाच किलोमीटर्सच्या शेत, पाणंद रस्त्यांची गरज आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये ग्रामपंचायतीच्या लोकसंख्येच्या प्रमाणात नवीन सिंचन विहिरींची कामे सुरू करण्यात आली आहेत. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत घेण्यात येणाऱ्या सिंचन विहिरींची मर्यादा २० पर्यंत वाढवण्यात आले आहे. सिंचन विहिरींचा लाभ जास्तीत जास्त लाभार्थ्यांना मंजूर करण्यात येणार आहे.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत वृक्षलागवड कार्यक्रमांतर्गत गुलाब, मोगरा व निशिगंध या फूलपिकांच्या लागवडीचा अंतर्भाव करण्यास मान्यता देण्यात येणार आहे.

सिंचन विहिरींच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार सुलभ करण्यात येणार आहेत. तसेच शेततळ्यांचे अस्तरीकरण करण्यात येणार आहे.

## स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमध्ये ग्रामीण भागात जो अकुशल मजूर कामाच्या शोधात आहे अशा मजुरास स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या अनुषंगाने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची अंमलबजावणी करताना नियोजन व लेबर बजेट तयार करण्यास अनन्यसाधारण महत्त्व देण्यात येणार आहे. गावपातळीवर ग्रामपंचायतीमध्ये किती मजुरांना किती दिवस कामाची आवश्यकता आहे, अशा मजुरांना मागणीनुसार रोजगार उपलब्ध करून देताना त्यातून कोणत्या मत्ता निर्माण करता येतील, या बाबीचे सूक्ष्म नियोजन करण्यात येणार आहे. तसेच शेतकऱ्यांना गाय व म्हैस यांच्याकरिता पक्का गोठा बांधणे, शेळीपालन शेड बांधणे, कुक्कुटपालन शेड बांधणे, भू-संजीवनी नाडेप कंपोस्टिंग आदी कामांना मंजुरी देण्यात येणार आहे.

## फलोत्पादन

मोसंबी फळपिकाची उच्च दर्जाची कलमे पुरेशा प्रमाणात निर्माण करून तालुका फळरोपवाटिका-पैठण, जि. औरंगाबाद या फळरोपवाटिका प्रक्षेत्रावर उच्च तंत्रज्ञानावर आधारित फळरोपवाटिका स्थापन झाले असून या प्रक्षेत्रावर मोसंबीची जातिवंत मातृ वृक्षलागवड करणे, मोसंबी फळपिकाच्या शास्त्रोक्त लागवड पद्धतीच्या फळबागा विकसित करण्यासाठी शेतकऱ्यांना कीड-रोगमुक्त उच्च दर्जाची कलमे पुरेशा प्रमाणात किफायतशीर दराने उपलब्ध करून देणे हे या योजनेचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहेत.



राज्यात लिंबुवर्गीय फळपिकांमध्ये संत्रा पाठोपाठ मोसंबी फळपिकाचे उत्पादन घेतले जाते. मोसंबी उत्पादनात महाराष्ट्राचा देशात प्रथम क्रमांक लागतो. जागतिक हवामान बदलाच्या परिणामस्वरूप गत ७-८ वर्षांत फळपिकांखालील क्षेत्रात चढउतार होत आहेत. मराठवाड्यात मोसंबी पिकांसाठी अनुकूल हवामान पीक पद्धतीचा विचार करता मोसंबी हे फळपीक शेतकऱ्यांना अधिक लाभदायक ठरते. मराठवाड्यात सुमारे ३९ हजार ३७० हेक्टर क्षेत्रावर मोसंबी उत्पादन घेतले जाते. त्यापैकी औरंगाबाद जिल्हा २१ हजार ५२५ हेक्टर व जालना जिल्हा १४ हजार ३२५ हेक्टर हे प्रमुख मोसंबी उत्पादक जिल्हे आहेत. मराठवाड्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या मोसंबी फळपिकाचे शाश्वत उत्पादन, प्रक्रिया तसेच निर्यातीसाठीचे क्लस्टर निर्माण करण्याची गरज निर्माण झाली आहे. त्या दृष्टीने औरंगाबाद जिल्ह्यातील तालुका फळरोपवाटिका - पैठण प्रक्षेत्रावर मोसंबी फळपिकासाठी सिट्रस इस्टेट स्थापन करण्यात आले असून याविषयावर प्रभावीपणे काम करण्यात येणार आहे.

## भाजीपाला रोपांची मागणी

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, राज्य रोजगार हमी योजनेंतर्गत फळबाग लागवड कार्यक्रमांतर्गत कलमे/रोपे तसेच फळबाग लागवड, वृक्षलागवड याकरिता राज्यातील स्थानिक भौगोलिक व क्षेत्र परिस्थितीनुसार लागवडीचे अंतर निवडण्याची मुभा संबंधित लाभार्थी/यंत्रणेस मान्यता देण्यात येणार आहे. महाराष्ट्र राज्य हे फलोत्पादनामध्ये अग्रेसर आहे. तसेच मोठ्या प्रमाणात भाजीपाला पिकाचे व्यावसायिक पद्धतीने लागवड करून उत्पादन घेतले जाते. त्याची निर्यातही मोठ्या प्रमाणात करण्यात येते. मागील दोन-तीन वर्षापासून भाजीपाला पिकाचे निर्यातक्षम व विषमुक्त उत्पादन करण्याकडे शेतकऱ्यांचा कल वाढला आहे. त्यामुळे भाजीपाला अभियानाच्या चांगल्या जाती व चांगली रोपे याची मागणी वाढत आहे. त्या दृष्टीने भाजीपाला रोपांची नियंत्रित वातावरणामध्ये तयार झालेली कीड व रोगमुक्त भाजीपाला रोपांची मागणी मोठ्या प्रमाणात वाढत आहे. भाजीपाला रोपांच्या मागणीप्रमाणे पुरवठा करण्यात येणार आहे.

**शब्दांकन : राजू धोत्रे,**
विभागीय संपर्क अधिकारी

# उद्योगस्नेही धोरण



**उदय सामंत**
मंत्री, उद्योग

**महाराष्ट्र हे देशात उद्योजकांचे नेहमीच पसंतीचे स्थान राहिले आहे. राज्यात येणारी परकीय गुंतवणूक असेल किंवा राज्यातून होणारी निर्यात, यात राज्याने आपला प्रथम क्रमांक राखण्यात नेहमीच यश मिळवले आहे. उद्योजकांना आवश्यक असणाऱ्या पायाभूत सुविधा, त्यांना लागणारे मनुष्यबळ येथे आहेच, त्याचबरोबर राज्याचे धोरण उद्योगस्नेही असेल तर उद्योजक हे राज्याला पसंती देतात.**

राज्याच्या उद्योगमंत्री म्हणून मी जबाबदारी स्वीकारली आहे. जास्तीत जास्त उद्योजक राज्यात निर्माण व्हावे, युवा पिढीसाठी रोजगार निर्मिती व्हावी, यावर माझा भर असणार आहे, या वर्षी आपण देशाच्या स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करत आहोत. यानिमित्ताने राज्यातील किमान ७५ हजार युवक युवतींसाठी रोजगार निर्माण करण्याचा निर्धार केला आहे. त्या दृष्टीने खासगी उद्योग समूहांना आवाहन केले आहे.

## उद्योग गुंतवणुकीस प्रोत्साहन

बेंगळूरु-मुंबई औद्योगिक कॉरिडॉरसाठी कोरेगाव सातारा येथील जागा देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. टेक्सटाईल पार्क, मेडिकल पार्क आणि बल्क ड्रग पार्कची कामे जलदगतीने करणार आहे. दिघी-माणगाव औद्योगिक क्षेत्र विकसित करण्यासाठी भूसंपादनाला चालना देणार आहे. राज्य शासनाच्या उद्योग विभागाने जेएसडब्लू नीओ एनर्जी या कंपनीशी ४२०० कोटींच्या सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली आहे. हा प्रकल्प रायगड जिल्ह्यातील पेण येथे प्रस्तावित आहे. यासह कोरियास्थित ह्योसंग या टेक्सटाईल क्षेत्रातील कंपनीच्या प्रतिनिधी मंडळाने नुकतीच भेट घेतली. राज्यात सुमारे ८००० कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यासाठी नियोजित प्रकल्पांबाबत सकारात्मक चर्चा झाली. यामुळे स्थानिकांना मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होणार आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या सदस्य मंडळाची ३९३वी बैठक महामंडळाचे नूतन अध्यक्ष तथा उद्योगमंत्री म्हणून माझ्या अध्यक्षतेखाली पार पडली. त्यात उद्योगस्नेही व जनहिताचे अनेक निर्णय घेण्यात आले. यामुळे राज्याच्या गुंतवणुकीत वाढ होऊन रोजगार निर्मितीस चालना मिळणार आहे.

## सिंधुदुर्ग विमानतळास बॅ. नाथ पै यांचे नाव

महामंडळाने विकसित केलेल्या सिंधुदुर्ग येथील विमानतळास बॅ. नाथ पै विमानतळ, सिंधुदुर्ग असे नाव देण्याचा ठराव संमत करण्यात आला. वाळूज औद्योगिक क्षेत्रामध्ये अघातक घन कचरा प्रक्रिया केंद्रांची संयुक्त राष्ट्रांच्या स्वच्छ विकास यंत्रणेंतर्गत हवामान बदलाविषयी परिषदेकडून कार्बन क्रेडिट प्राप्त करून घेणे यासारख्या एका महत्त्वाच्या विषयास महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या सदस्य मंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ मधील तरतुदींमधून महामंडळासाठीच्या भूसंपादन प्रक्रियेस वगळण्याबाबतची अधिसूचना



शासनाने पारित केली असून महामंडळासाठी भूसंपादन करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ मधील तरतुदीपेक्षा अधिक मोबदला देण्यात येणार असल्याचा निर्णय घेण्यात आला.

नवापूर औद्योगिक क्षेत्रामध्ये टेक्सटाईल पार्ककरिता मोठ्या प्रमाणातील क्षेत्र पास थ्रू पद्धतीने संपादित करण्यास मान्यता देण्यात आली. बारवी धरणाकरिता तळ्याची वाडी गावठाणसाठी सहा हेक्टर जमीन हस्तांतरणाचा निर्णय झाला. महामंडळाच्या चाळीसगाव, यवतमाळ व परभणी या औद्योगिक क्षेत्रांमध्ये पोलीस स्टेशनकरिता भूखंड वाटप करणार आहे. अकोला विकास केंद्रातील जागा इंडियन रेड क्रॉस सोसायटीकरिता वाटप करणार आहे. अकुशल व अर्धकुशल कामगारांना प्रशिक्षण देण्यासाठी नागपूरच्या बुटीबोरी मॅन्युफॅक्चरिंग असोसिएशनला ५० लाख रुपये देण्यात येणार आहेत. तसेच महामंडळाच्या कर्मचाऱ्यांकरिता उपदान कमाल मर्यादा १४ लाख रुपयांवरून २० लाख रुपये इतकी वाढवण्यात आली आहे. केवळ उद्योजकच आनंदी नाहीत, तर कर्मचाऱ्यांमध्येही यामुळे उत्साहाचे वातावरण आहे.

## निर्यात प्रचालनास प्रोत्साहन

माझ्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र राज्य निर्यात प्रचालन परिषदेची स्थापना करण्यात आली असून ही परिषद निर्यात वृद्धीसाठी संभाव्य क्षेत्राची निवड, प्रोत्साहने व सवलती, धोरणे इत्यादी बाबींच्या अनुषंगाने धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी गठित झाली आहे.

प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा निर्यात प्रचालन समिती गठित करण्यात आली आहे. या समिती निर्यातीचा जिल्हानिहाय आराखडा तयार करून जिल्हा हा विविध उत्पादनांसाठी निर्यात हब म्हणून उदयास येण्यासाठी कार्यवाही करत आहे. 'वन डिस्ट्रिक्ट वन प्रोडक्ट'अंतर्गत जिल्ह्यांची निर्यात क्षमता असणारी कृषी उत्पादने, अभियांत्रिकी उत्पादने निश्चित करण्यात आली. त्यामुळे त्यांना आंतरराष्ट्रीय बाजारपेठ उपलब्ध व्हावी, म्हणून कार्यवाही करण्यात येत आहे. राज्यातील उद्योजकांमध्ये निर्यातीबद्दल जागरुकता निर्माण करणे, निर्यात प्रचलनात वाढ आणि विशेषत: सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगांमार्फत भविष्यात विकसित करावयाच्या निर्यातक्षम उद्योगांसाठी मार्गदर्शन करण्यासाठी निर्यात मार्गदर्शिका तयार करण्यात आलेली आहे. राज्याचे स्वत:चे निर्यात धोरण आखण्याची प्रक्रिया सुरू आहे.

### औद्योगिक विकासासाठीची उद्दिष्टे

- कृषी आधारित व माहिती तंत्रज्ञान उद्योगांना प्रोत्साहन.
- ग्रामीण व लघुउद्योग विकास.
- उद्योजकता विकास.
- सहकारी औद्योगिक वसाहती.
- पायाभूत क्षेत्रामध्ये खासगी क्षेत्रांचा सहभाग.
- आजारी उद्योगांचे पुनर्वसन.
- उद्योगांना वित्तीय साहाय्य.
- निर्यात प्रचलनात वाढ.

## औद्योगिक समुह विकास योजना

राज्यातील क, ड व ड+ क्षेत्र, विनाउद्योग जिल्हे, नक्षलग्रस्त क्षेत्र या क्षेत्रातील सूक्ष्म व लघू उपक्रमाच्या सर्वांगीण विकासासाठी राज्य शासनाच्या महाराष्ट्र राज्य औद्योगिक समूह विकास योजनेची अंमलबजावणी राज्यात केली जात आहे.

या योजनेतंर्गत औद्योगिकदृष्ट्या मागास असलेल्या जिल्ह्यांमध्ये औद्योगिक विकास होण्यासाठी निर्मिती उद्योगांना शासनामार्फत प्रोत्साहन अनुदान देण्यात येते. सध्या राज्यात सामूहिक प्रोत्साहन योजनेमध्ये उद्योगपूरक सबसिडी, व्याजावरील सबसिडी, विजदरात सबसिडी, मुद्रांकशुल्क आणि विजपुरवठा शुल्कमाफी यांसारखे प्रोत्साहन देण्यात येते. या योजनेतंर्गत मागील तीन वर्षांत रुपये १० हजार ९४० कोटी एवढे अनुदान वितरित करण्यात आले असून यामधून रुपये १ हजार ६७८ कोटी एवढे अनुदान सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगांना वितरित करण्यात आलेले आहे. २०२२-२३ मध्ये या कार्यक्रमासाठी रुपये ३ हजार कोटी एवढी तरतूद उपलब्ध करण्यात आलेली आहे.

## मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम

राज्यातील होतकरू युवक/युवतींसाठी राज्याची सर्व सर्वसमावेशक व स्वयंरोजगारास प्रोत्साहन देणारी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजना २०१९-२० पासून राज्यात अंमलबजावणी करण्यात येत आहे. या योजनेस युवक-युवतींचा मोठा प्रतिसाद लाभत आहे. २०२२-२३ करिता प्राप्त लक्षांक भौतिक लक्षांक-२५ हजार कर्ज प्रकरणे, मार्जिन मनी अनुदानाकरिता अर्थसंकल्पीत निधी-५५० कोटी रुपये, शासनाद्वारे अर्थसंकल्पित एकूण तरतूद ५९१.०७ कोटी एवढी करण्यात आली आहे. सर्वसाधारण प्रवर्ग - ५२८ कोटी, अनुसुचित जातीच्या प्रवर्ग - ५३.०७ कोटी, अनुसूचित जमाती प्रवर्ग १० कोटी रुपये असा आहे.

## महिला उद्योजकता विकास कार्यक्रम

महिला उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी विशेष योजना राबवणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे. सामूहिक प्रोत्साहन योजना-२०१९ मध्ये देऊ करण्यात आलेल्या फायद्यांमध्ये महिला उद्योजकांसाठी अतिरिक्त प्रोत्साहन अनुदान देण्यात येत आहे. या योजनेंतर्गत मार्च २०२२ पर्यंत १७६ औद्योगिक घटकांमध्ये रुपये ५६.१३ कोटी एवढे प्रोत्साहन पर अनुदान वाटप करण्यात आले आहे.

## पायाभूत सुविधा

ज्या उद्योगाना एमआयडीसीमध्ये स्थलांतरित व्हायचे असेल किंवा नव्याने उद्योग सुरू करावयाचा असेल अशा उद्योगांना त्यांच्या गरजेप्रमाणे पायाभूत सुविधा व पूरक सुविधा (प्लग ॲण्ड प्ले सुविधा) उपलब्ध करून देण्यात येत आहेत त्यामुळे उद्योजकांना आपले उद्योग तत्काळ सुरू करता येतील. राज्यात गुंतवणूक करणाऱ्या उद्योजकांनी दाखवलेला विश्वास सार्थ ठरवण्यासाठी उद्योगमंत्री म्हणून कटिबद्ध आहे.

**शब्दांकन : अर्चना शंभरकर,**
विभागीय संपर्क अधिकारी

# आरोग्यसेवा अधिक सक्षम



**प्रा. डॉ. तानाजी सावंत**
मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण

**कोविड-१९ महामारीमुळे सार्वजनिक आरोग्य सेवेचे महत्त्व अधोरेखित झाले आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांनी कोविड कालावधीत अतिशय महत्त्वाचे काम करून राज्याला आव्हानात्मक परिस्थितीतून बाहेर काढले. या परिस्थितीत आलेल्या अनुभवावरून आरोग्य सेवेचे विस्तारीकरण आणि आधुनिकीकरणावर भर दिला जाणार आहे.**

प्रत्येक व्यक्तीच्या विकासात निरोगी आरोग्याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. राज्यातील जनता निरोगी राहावी, त्यांच्या आरोग्यासाठी आवश्यकतेनुसार सेवा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी विशेष प्रयत्नांची गरज आहे. लोकांच्या मूलभूत गरजांपैकी आरोग्यसेवा महत्त्वाची मानली जाते. राज्यातील जनतेला सहज आणि नजिकच उपलब्ध असणारी आरोग्यसेवा अधिक सक्षम व गुणवत्तापूर्ण करणे याला प्राधान्य देण्याची आवश्यकता आहे. गाव, तालुका, जिल्हा व शहरी भागातील आरोग्य सेवांचा गुणात्मकरीत्या वापर करून सामान्य माणसाला सेवा देण्यासाठी राज्य शासनाच्या वतीने विविध उपाययोजना करण्यात येत आहेत.

## आरोग्यवर्धिनी केंद्र

ग्रामपातळीवरील आरोग्य सेवा उपकेंद्राच्या ठिकाणी आरोग्यवर्धिनी केंद्रात बदल झाले आहेत. गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवांचा विकास करून समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत आरोग्यसेवा पोहोचण्यासाठी शासन आणि प्रशासन यांच्या समन्वयाने व लोकसहभागाच्या माध्यमातून कार्य घडणे आवश्यक आहे. यामुळे प्राथमिक, द्विस्तरीय व त्रिस्तरीय, विशेष तज्ज्ञ यांच्या आरोग्यसेवा सामान्य माणसापर्यंत पोहोचवण्यासाठी विशेष प्रयत्न केले जात आहेत.

ग्रामीण भागातील नागरिकांच्या आरोग्यासाठी आरोग्यवर्धिनी केंद्र महत्त्वाची ठरत आहेत. या केंद्रात जनतेला आवश्यक असणाऱ्या १३ प्रकारच्या प्राथमिक आरोग्यसेवा पुरवणे आवश्यक आहेत. त्यांचा गुणात्मकरीत्या विकास होऊन जनसामान्य जनतेला या सेवा उपलब्ध करून दिल्यामुळे निरोगी ग्रामजीवनाची सुरुवात झाली आहे. ही सेवा अत्यंत महत्त्वाची अशी आहे. या केंद्राच्या बळकटीकरणासाठी प्रयत्न केले जाणार आहेत.

## तज्ज्ञांच्या सेवा उपलब्ध

प्राथमिक आरोग्य केंद्राच्या ठिकाणी दिली जाणारी तज्ज्ञ डॉक्टरांच्या सेवा देऊन आरोग्य सेवेचा विकास करण्याकडे विशेष लक्ष दिले जाणार आहे. ग्रामीण रुग्णालयातील सुविधा सर्वसामान्य जनतेला आपल्याशा वाटाव्यात यासाठी पायाभूत सुविधा आणि तज्ञांच्या सेवा याकडे लक्ष दिले जाणार आहे. या ठिकाणी तज्ज्ञांच्या सेवा अधिक बळकट झाल्यास जिल्हास्तरावरील आरोग्यसेवेचा ताण कमी होणार आहे.

जिल्ह्याच्या ठिकाणी उपलब्ध असणाऱ्या जिल्हा रुग्णालयात विशेष तज्ज्ञांमार्फत आरोग्यसेवा व उपचार होणे अपेक्षित आहे. या ठिकाणी उपलब्ध असणारे तज्ज्ञ तालुका पातळीवरून संदर्भित झालेल्या रुग्णांना तज्ज्ञ सेवा उपलब्ध करून दिल्यामुळे त्यांचा



आरोग्यावरील खर्चही वाचण्यास मदत होणार आहे. त्यामुळे त्या ठिकाणी उपलब्ध असणाऱ्या सेवांचा गुणवत्तापूर्ण विकास व्हावा, यासाठी विशेष लक्ष देण्यात येईल.

## दर्जा सुधारण्यावर भर

नाशिक, अमरावती येथील विशेष रुग्णालयांचाही दर्जा वाढवण्यासाठी प्रयत्न केले जातील. त्यामुळे जनतेला आवश्यक असणाऱ्या सुविधा जिल्ह्याच्या ठिकाणी मिळून त्यांचा आरोग्यावरील ताण कमी करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य सेवेची अधिक मदत होऊ शकेल. विकेंद्रीत प्रशासन, आरोग्य सेवेचा विकास करण्यासाठी राज्य, जिल्हा, तालुका, गाव अशा विकेंद्रीत प्रशासनामुळे विविध ठिकाणच्या सेवा विकसित करण्याची जबाबदारी स्थानिक पातळीवर दिली जाणार आहे.

## लोकसहभाग

विशेष आरोग्य कार्यक्रम केंद्र व राज्य शासनाच्या वतीने राबवण्यात येणारे आरोग्य कार्यक्रमात समन्वय निर्माण करून जनतेसाठी राबवण्यात येणाऱ्या योजनांची अंमलबजावणी व त्यासाठी लोकांचा सहभाग मिळवण्यासाठी दृढनिश्चय करणे आवश्यक आहे, तसेच शहरी आरोग्य सेवांचा विकास, समन्वय करणे आवश्यक बनले आहे. या भागातील आरोग्यसेवा केवळ बाह्य रुग्णसेवा न राहता त्या आंतररुग्ण सेवेत समावेश व्हाव्यात, यासाठी विशेष प्रयत्न केले जात आहेत. दुर्गम व अतिदुर्गम भागातील आरोग्य सेवा पुरवणे आव्हानात्मक असे काम आहे. यासाठी या भागातील रुग्णांना विशेष सेवा देण्याच्या दृष्टीने व त्यांचा आरोग्य कार्यक्रमात सहभाग वाढवण्याच्या दृष्टीने विशेष प्रयत्न केले जातील.

## टीबी मुक्तच्या दिशेने

माता व बाल आरोग्यसेवेचा गुणात्मक विकास व्हावा यासाठीही पाठपुरावा करावा लागणार आहे. त्याचप्रमाणे टीबी मुक्त महाराष्ट्राच्या दृष्टीनेही राबवण्यात येणारा कार्यक्रम गतिमान करून जास्तीत जास्त रुग्णांपर्यंत ही सेवा देऊन राज्याला टीबी मुक्त करण्यासाठी विशेष प्रयत्न करावे करणार आहेत.

## महात्मा फुले जन आरोग्य योजना

महात्मा फुले जन आरोग्य योजनेच्या माध्यमातून अधिकाधिक लोकांना त्यांच्या गरजेनुसार उपचार मिळावेत, यासाठी अधिकाधिक रुग्णालयांचा या योजनेत समाविष्ट करून सामान्य जनतेसाठी सहजसाध्य आरोग्य सेवा पुरवण्याकडेही आपण विशेष लक्ष देणार आहोत.

## संवाद वाढवण्यावर भर

शासनाच्या आरोग्य योजनांविषयी विश्वास निर्माण करण्यासाठी आरोग्य शिक्षण व्यापक करावे लागणार आहे. तसेच उपलब्ध असणाऱ्या आरोग्यसेवा, त्या ठिकाणचे असणारे वातावरण, स्वच्छता, रुग्णांशी होणारा संवाद, पुरवण्यात येणाऱ्या सेवांची गुणवत्ता, डॉक्टरांची उपलब्धता, कर्मचाऱ्यांची उपलब्धता याकडेही विशेष लक्ष दिले जाईल.

## महिलांच्या आरोग्याबाबत जागर

राज्यात १८ वर्षावरील महिला, माता, गर्भवती यांच्या सर्वांगीण आरोग्य तपासणीसाठी एकात्मिक बालविकास विभाग आणि इतर विभागांच्या समन्वयाने आरोग्य तपासणी कार्यक्रम राबवण्यात येत आहे. महिलांच्या आरोग्याबाबत सजगता निर्माण करणे, हा या उपक्रमाचा उद्देश आहे. कार्यक्रमामध्ये राज्यातील १८ वर्षांवरील महिलांना, मातांना, गर्भवतींना प्रतिबंधात्मक आणि उपचारात्मक आरोग्य सुविधा उपलब्ध करून देणे आणि सुरक्षित व सुदृढ आरोग्यासाठी समुपदेशन सुविधा उपलब्ध करून देणे आदी उद्दिष्टे आहेत.

## विविध योजनांची माहिती

राज्य शासन, महापालिका आणि जिल्हा परिषदेच्या विविध दवाखान्यातून आरोग्य सुविधा पुरवण्यात येतात. या सर्व आरोग्य सेवा आणि सुविधांची माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध व्हावी, यासाठी माहिती तंत्रज्ञान आधारित व्यवस्था निर्माण करण्याचा मानस आहे. यामध्ये धर्मादाय आयुक्त नोंदणीकृत दवाखान्यात उपचारासाठी आणि मुख्यमंत्री साहाय्यता निधीतून दिल्या जाणाऱ्या मदतीचीही माहिती दिली जाण्याचा विचार आहे.

## मनुष्यबळाचे व्यवस्थापन

सार्वजनिक आरोग्य विभागातील रिक्त पदांचा आढावा घेऊन अधिकारी, कर्मचारी भरती करण्यासाठी प्रयत्न केले जातील. रिक्त पदांच्या भरतीसाठी कालबद्ध कार्यक्रम आखण्यात येणार आहे. आरोग्यविषयक समित्यांचे पुनर्गठन करण्यात येणार आहे.

## नव तंत्रज्ञानाचा वापर

नवतंत्रज्ञानाद्वारे डॉक्टर आणि रुग्ण यांचा संपर्क आता अधिक गतिमान व जवळ झाला आहे. त्याचा विकास करताना टेलिमेडिसीन, ई-संजीवनी, आयुष्यमान कार्ड या सेवांचाही आपणाला विकास करावा लागणार आहे. त्यासाठी तंत्रज्ञानाचा कुशलतेने वापर करून अधिकाधिक लोकांना या तंत्रज्ञानाचाही लाभ करून देण्यासाठी आरोग्य सेवेतील यंत्रणा अधिक कार्यक्षम होणे आवश्यक आहे. उपलब्ध असणाऱ्या आरोग्यसेवा अधिकाधिक गुणवत्तापूर्ण कशा होतील व सामान्य माणसाला त्याचा कसा उपयोग करून देता येईल, याकडे विशेष लक्ष असणार आहे.

सामान्य जनतेला आरोग्यसेवा त्यांच्या जवळच्या ठिकाणी उपलब्ध होऊन त्यांच्यात आरोग्य सेवेच्या समाधानाची भावना निर्माण करण्यासाठी विशेष भर द्यावा लागणार आहे व हे कार्य शासन आणि जनता यांच्या समन्वयाने व सहभागाने करण्याचा दृढ निश्चय आपण करू या आरोग्य सेवा ही देशात महाराष्ट्र राज्यातील आरोग्य सेवा एक आदर्श आरोग्यसेवा म्हणून ओळखली जाईल यासाठी कटिबद्ध होऊ या.

**शब्दांकन : रवींद्र राऊत,**
विभागीय संपर्क अधिकारी

# रस्ते विकासाला चालना



**रवींद्र चव्हाण**
मंत्री, सार्वजनिक बांधकाम
(सार्वजनिक बांधकाम वगळून),
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण

**राज्याच्या पायाभूत विकासामध्ये सर्वाधिक महत्त्वाची भूमिका बजावणारा विभाग म्हणून सार्वजनिक बांधकाम विभागाची ओळख आहे. हा विभाग खऱ्या अर्थाने जनसामान्यांशी निगडित असल्याने या विभागाचा कारभार अधिकाधिक पारदर्शक करून अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून रस्ते, पूल, इमारती यांचे बांधकाम गतीने करण्यावर भर देण्यात येईल. त्याचप्रमाणे राज्याची सार्वजनिक वितरण व्यवस्था अधिक सक्षम करून राज्यातील कोट्यवधी जनतेला दर्जेदार सेवा देण्याचा अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागामार्फत प्रयत्न राहणार आहे.**

राज्यातील अपघातप्रवण क्षेत्र सुधारणा व उपाययोजना करण्यासाठी विविध उपाययोजनांवर भर देण्यात येत आहे. आशियाई विकास बँक योजना, हायब्रीड न्युईटी योजना, खासगीकरण, नाबार्ड, केंद्रीय मार्ग निधी या योजनांतर्गत घेण्यात येणारे रस्ते विकासाचे प्रकल्प अधिक गतीमान करणे. रस्ते बांधकामाकरिता विविध नावीन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा वापर करणे, डांबरीकरणाच्या कामांमध्ये टाकावू प्लास्टिकचा वापर करणे, बांधकामाच्या कचऱ्याचा रस्ते बांधकामात वापर करणे, डांबरीकरणासाठी पर्यावरणपूरक कोल्ड मिक्स तंत्रज्ञान वापरणे यांसह परिणामकारक, टिकाऊ व आर्थिकदृष्ट्या परवडणाऱ्या तंत्रज्ञानावर भर देण्यात येत आहे. मर्यादीत मनुष्यबळामध्ये गुणवत्तापूर्ण काम करणे याबरोबर कामांची गुणवत्ती सुधारणे. तसेच सामान्यांना कायमस्वरूपी दिलासा देण्यासाठी राज्यातील रस्ते अधिक दर्जेदार व उत्तम बनवण्यासाठी आम्ही प्राधान्य देणार आहोत.

## प्रगतिपथावरील कामे

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्ग नागपूर ते भंडारा, गोंदिया, आणि नागपूर ते गडचिरोलीपर्यंत पुढे वाढवण्यात येणार आहे. गडचिरोली पर्यंतच्या टप्प्याचा सविस्तर प्रकल्प अहवाल बनवण्याचे काम प्रगतिपथावर असून भूसंपादन प्रक्रिया आणि इतर बाबींसाठी या महामार्गाच्या मंजूर आराखड्यातील वित्तीय बदलास राज्य शासनाने मान्यता दिली आहे. भिवंडी-कल्याण-शीळफाटा रस्त्याचे सहापदरी रुंदीकरण प्रकल्पही गतीने पूर्ण होण्यासाठी कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक असणारा निधी राज्य शासनाच्या निधीतून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास हस्तांतरित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या कामांतर्गत उड्डाणपूल, रेल्वेवरील पूल, पुलाचे महामार्ग, जंक्शन सुधारणा, सुचना फलके, माहिती फलके व तत्सम आनुषंगिक कामे हाती घेण्यात येत आहेत.

## पथकरातून सूट

दरवर्षी मुंबई आणि परिसरातून कोकणात जाणाऱ्या गणेशभक्तांची संख्या मोठी असते. या गणेशभक्तांची गैरसोय होऊ नये, यासाठी राज्य शासनाने कोकणात जाणाऱ्या गणेशभक्तांच्या वाहनांना पथकरातून सूट देण्याचा निर्णय घेतला होता. त्याच पद्धतीने गणेशोत्सवापूर्वी पंढरपूर येथे जाणाऱ्या सर्व वारकरी विठ्ठल भक्तांच्या वाहनांनाही पथकरातून सूट देण्याचा निर्णय घेतला.

## रस्त्यांची दर्जोन्नती

औरंगाबाद जिल्ह्यातील पैठण तालुक्यातील इतर जिल्हा मार्ग रस्ते व ग्रामीण मार्ग रस्ते प्रमुख जिल्हा मार्ग म्हणून दर्जोन्नत करण्याचा निर्णय विभागाने घेतला. या गावांची संख्या, तेथील लोकसंख्या, वाहनांचा वापर आणि जिल्हा परिषदेने दिलेला ठराव विचारात घेऊन या मार्गांना दर्जोन्नत करण्याचा निर्णय घेण्यात आला. याच पद्धतीने ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ, बदलापूर आणि मुरबाड तालुक्यातील इतर जिल्हा मार्ग आणि ग्रामीण मार्ग रस्ते प्रमुख जिल्हा मार्ग म्हणून दर्जोन्नत करण्याचा निर्णय घेण्यात आला. पालघर जिल्ह्यातील मोखाडा तालुक्यातील इतर जिल्हा मार्ग ५२ ते किरकिरेवाडी मरकटवाडी अवर्गीकृत रस्ता हा रस्ते विकास योजनेमध्ये ग्रामीण मार्ग म्हणून समाविष्ट करण्यात आला. धुळे जिल्ह्यातील शिरपूर तालुक्यातील एकूण



११ इतर जिल्हा मार्ग, ग्रामीण मार्ग रस्ते हे प्रमुख जिल्हा मार्ग म्हणून दर्जोन्नत करण्याचा निर्णय घेण्यात आला. रत्नागिरी जिल्ह्यातील खेड तालुक्यातील आंबडस चिरणी लोटे हा इतर जिल्हा मार्ग -४२ रस्ता प्रमुख जिल्हा मार्ग म्हणून दर्जोन्नत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

## शिवभोजन थाळी

गरीब व गरजू नागरिकांना सवलतीच्या दरात भोजनाची सुविधा 'शिवभोजन थाळी' योजनेच्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्रात उपलब्ध करून देण्यात आली आहे. शिवभोजन थाळी योजना २६ जानेवारी २०२० पासून राज्यात सुरू करण्यात आली आहे. योजना सुरू झाल्यापासून आजपर्यंत या योजनेच्या माध्यमातून २७ सप्टेंबर २०२२ पर्यंत ११ कोटी ६१ लाख ९७ हजार ०१६ इतक्या गरजू जनतेने या योजनेचा लाभ घेतला आहे. ही योजना 'कोरोना कालावधी' तसेच 'पूरग्रस्तांसाठी' देखील दिलासा देणारी ठरली आहे. शिवभोजन थाळीचे वितरण ॲपद्वारे करण्यात येते. कोरोना प्रादुर्भावाच्या कालावधीत शिवभोजळ थाळीची किंमत दहा रुपयांवरून ५ रुपये अशी होती. या योजनेला जिल्हास्तरावर मिळत असलेला उत्स्फूर्त प्रतिसाद पाहून तसेच तालुकास्तरावरही शिवभोजन थाळींचे वितरण केंद्र सुरू करण्यात आले आहे.



टाळेबंदीच्या कालावधीत असलेल्या कडक निर्बंधामुळे गरीब व गरजू जनतेचे हाल होऊ नये, म्हणून १५ एप्रिल २०२१ पासून पावणेदोन कोटी शिवभोजन थाळ्यांचे वितरण करण्यात आले. महापुरामुळे बाधित झालेल्या जिल्ह्यांमध्ये शिवभोजन थाळीचा इष्टांक दुप्पट करण्यात आला होता. आपत्तिग्रस्त भागातील शिवभोजन केंद्रावर दुप्पट क्षमतेने शिवभोजन थाळीचे वितरण करण्यात आले होते. त्याचप्रमाणे ज्या ठिकाणी शिवभोजन केंद्र वाहून गेले आहे किंवा पाण्यात आहे तेथे इतर ठिकाणावरून शिवभोजनाची पाकिटे वितरित करण्यासाठी परवानगी देण्यात आली होती. राज्यात सध्या १५५५ शिवभोजन केंद्रे कार्यरत आहेत. सद्यःस्थितीत शिवभोजन योजनेचा इष्टांक प्रतिदिन २ लाख एवढा आहे. शिवभोजन थाळीचे वितरण सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत करण्यात येत आहे. राज्यात शिवभोजन योजनेची अधिक प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी तसेच कार्यरत शिवभोजन केंद्रांवर परिणामकारक नियंत्रण ठेवण्याकरिता राज्यातील सर्व शिवभोजन केंद्रांमध्ये सी.सी.टी.व्ही. यंत्रणा बसवणे अनिवार्य करण्यात आले आहे. त्यामुळे सर्व शिवभोजन केंद्रांच्या १०० मीटर परिघामध्ये जिओ फेन्सिंग सुविधाही २२ डिसेंबर २०२१ पासून सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे शिवभोजन केंद्रचालकांना शिवभोजन केंद्राच्या १०० मीटर परिघामध्येच शिवभोजन योजनेचे व्यवहार करता येतात. शिवभोजन योजनेची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने शिवभोजन ॲपमध्ये सुधारणा करण्यात येत आहेत. योजना सुरू झाल्यापासून आतापर्यंत सुमारे ३६० कोटी रुपये खर्च करण्यात आला आहे.

## धानाची विक्रमी खरेदी

किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत केंद्र शासनाने २०२२-२३ खरीप पणन हंगाम २०२२-२३ करिता ज्वारी, बाजरी, रागी, मका या पिकांकरिता किमान आधारभूत किंमत जाहीर केलेली आहे. त्यानुसार १ कोटी ४९ लाख इतक्या धानाच्या व ६१,०७५ क्विंटल इतक्या भरडधान्याच्या खरेदीस मान्यता दिलेली आहे.

## शिधापत्रिकेचे वाटप

ज्या दिव्यांग व्यक्तींना स्वतंत्र शिधापत्रिका हवी आहे अशा दिव्यांग व्यक्तींना नवीन शिधापत्रिकेसाठी संबंधित शिधावाटप कार्यालयाकडे अर्ज करता येतो. निकषातंर्गत पात्र दिव्यांग व्यक्तींना शिधापत्रिका प्राप्त होते. अनाथांना वयाच्या २८ वर्षापर्यंत तात्पुरती पिवळी (बीपीएल) शिधापत्रिका वितरित करण्याबाबतचा निर्णय प्राधान्य कुटुंब योजनेंतर्गत घेण्यात आला आहे. अनाथ असल्याचा पुरावा म्हणून महिला व बालविकास विभागाने वितरित केलेले अनाथ प्रमाणपत्र किंवा आई व वडील यांचे मृत्यू प्रमाणपत्र यापैकी कोणताही एक पुरावा ग्राह्य धरण्यात येणार आहे.

तृतीयपंथीयांना सर्वसामान्य जनतेप्रमाणे शिधापत्रिका वितरित करताना कागदोपत्री अडचणींचा सामना करावा लागतो. त्यांनादेखील सन्मानाने जगण्याचा व शासकीय योजनांचा लाभ घेण्याचा मूलभूत अधिकार आहे ही बाब लक्षात घेऊन २७ सप्टेंबर २०२२ रोजी शिधापत्रिका देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

## फोर्टिफाईड तांदळाचे वितरण

राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये फोर्टिफाईड तांदूळ (पोषणतत्त्व गुणसंवर्धित तांदूळ) सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत दोन टप्प्यांमध्ये वितरित करण्यास नुकत्याच झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. केंद्र सरकारच्या अन्न व सार्वजनिक विभागाच्या पत्रान्वये तीन टप्प्यात ही योजना राबवण्यास मंजुरी दिली आहे. त्यातील पहिला टप्पा मार्च २०२२ पर्यंत राज्याच्या महिला व बालविकास आणि शालेय शिक्षण विभागामार्फत राबवण्यात आला आहे. आता ही योजना एप्रिल २०२२ ते मार्च २०२३ पर्यंत नंदुरबार, वाशिम, गडचिरोली, उस्मानाबाद या चार आकांक्षित जिल्ह्यांमध्ये तसेच बुलडाणा, परभणी, नाशिक, नंदुरबार, जालना, ठाणे, यवतमाळ, वाशिम, नांदेड, अकोला, औरंगाबाद, उस्मानाबाद आणि हिंगोली या १३ जिल्ह्यांमध्ये हा फोर्टिफाईड तांदूळ वितरित करण्यात येईल. एप्रिल २०२३ ते मार्च २०२४ या कालावधीत राज्यातील वरील चारही आकांक्षीत आणि अतिरिक्त भार जिल्ह्यांसह उर्वरित सर्व जिल्ह्यांमध्ये हा तांदूळ वितरित करण्यात येईल.

## नवीन गोदामांचे बांधकाम

नाबार्ड ग्रामीण पायाभूत विकास निधी अंतर्गत नवीन गोदामांचे व नाबार्ड व्यतिरिक्त इतर नवीन गोदामांसाठी आवश्यक अतिरिक्त कामांचे बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करण्यात येते. तसेच या गोदामांपर्यंतचे रस्तेही विभागाकडून परिपूर्ण करण्यात येतील.

**शब्दांकन : संध्या गरवारे,**
विभागीय संपर्क अधिकारी

# कृषीचे सर्वंकष धोरण



**अब्दुल सत्तार**
मंत्री, कृषी

**शेतकरी बांधवांना येणाऱ्या अडचणी दूर करून त्यांचे आर्थिक सक्षमीकरण व जीवनमान उंचावण्यासाठी सर्वंकष धोरण तयार करण्यात येत आहे. शेतकऱ्यांच्या जीवनात परिवर्तन घडवून आणण्याच्या दृष्टीने अत्याधुनिक तंत्रज्ञान, सुधारित बियाणे, उत्कृष्ट पद्धतीची खते, दर्जेदार कृषी अवजारे शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचवण्यावर कृषी विभाग भर देत आहे.**

शेतकऱ्यांमध्ये कमी कालावधीत येणारे आणि जास्त उत्पादन देणाऱ्या पिकांच्या वाणाचा अधिक प्रसार व्हावा यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. ड्रोन तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शेतीमध्ये क्रांती होत आहे. औषध फवारणी, पिकांच्या वाढीचे संनियंत्रण आदींसाठी ड्रोन तंत्रज्ञान उपयुक्त होत आहे. ड्रोन तंत्रज्ञानावर आधारित शेतीच्या प्रचाराकरिता आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी राज्य शासन सर्वतोपरी सहकार्य करत आहे.

नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाद्वारे (पोक्रा) शेतकऱ्यांच्या जीवनात परिवर्तन घडत आहे. प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजनेंतर्गत महाराष्ट्रामध्ये देशात सर्वाधिक १ हजार ३९४ इतक्या वैयक्तिक प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली असून ७०९ प्रकल्प कार्यान्वित झाले आहेत. 'आत्मा'अंतर्गत शेतकरी प्रशिक्षण, कृषी व संलग्न प्रात्यक्षिके, शेतकरी अभ्यासदौरे, जिल्हा कृषी महोत्सवासाठी भरीव निधी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

## महत्त्वपूर्ण निर्णय

- राज्यासाठी हळद संशोधन व प्रक्रिया धोरण लागू करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. तसेच हिंगोली जिल्ह्यात बाळासाहेब ठाकरे हरिद्रा (हळद) संशोधन व प्रशिक्षण केंद्र स्थापण्यास मान्यता देण्यात आली.
- अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना मदतीचा हात. अतिवृष्टिचा २८ जिल्ह्यांना फटका बसला. १८ लाख हेक्टर जमिनीचे नुकसान झाले. अतिवृष्टीग्रस्त भागांमध्ये वेगाने पंचनामे करण्यात आले.
- एनडीआरएफच्या मदतीपेक्षा दुप्पट मदत देण्याचा निर्णय. सध्या ही मदत दोन हेक्टर मर्यादेत करण्यात येते, ती वाढवून तीन हेक्टर मर्यादेत करण्याचा निर्णयही घेण्यात आला. नैसर्गिक आपत्तीमध्ये यापूर्वी जिरायत शेतीसाठी १० हजार रुपये प्रतिहेक्टरऐवजी त्यात बदल करून १३ हजार ६०० रुपये प्रतिहेक्टर, बागायत शेतीसाठी २७ हजार रुपये प्रतिहेक्टर आणि बहुवार्षिक शेतीसाठी २५ हजार रुपयांवरून ती आता ३६ हजार रुपये प्रतिहेक्टर मदत करण्यात आली आहे.
- सततच्या पावसामुळे ३३ टक्क्यांपेक्षा जास्त नुकसान झाले असल्यास त्याचे पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्यात येणार.
- उच्च दाब व उच्च दाब उपसा जलसिंचन योजनेतील शेतकऱ्यांना जून २०२१ पासून एक रुपया १६ पैसे प्रतियुनिट इतकी सवलत कायम. लघू दाब जलसिंचन ग्राहकांना एक रुपया प्रतियुनिट हा सवलतीचा दर जून २०२१ पासून नव्याने देण्याचा निर्णय.
- शंखीगोगलगायीमुळे नुकसानीची भरपाई देणार, समिती स्थापणार.
- पाटण तालुक्यातील आंबेघर खालचे, आंबेघर वरचे, ढोकावळे, मिरगाव, हुंबरळी, शिद्रुकवाडी, जितकरवाडी



(जिती) या सात गावांच्या कायमस्वरूपी पुनर्वसनासाठी ४ कोटी रुपयांच्या निधीची तरतूद.

- पुराचा धोका लक्षात घेता नदीपात्रातील वाळू व गाळ काढण्यासाठी उपाययोजना करण्याचे निर्देश.
- बाजार समितीच्या निवडणुकीमध्ये शेतकऱ्यांना मतदानाचा अधिकार.
- किसान उत्पादक समूहास प्रोत्साहन.
- महाराष्ट्रातील ड्रॅगन फ्रुटच्या शेतीसाठी हेक्टरी १ लाख ६० हजारांचे अनुदान. ड्रॅगन फ्रूटच्या लागवडीसाठी अनुदान मिळवायचे असल्यास शेतकऱ्यांना महाडीबीटी ऑनलाइन पोर्टलवर अर्ज दाखल करणे आवश्यक आहे.

## पुढील वाटचाल

- शेतकरी आत्महत्यामुक्त महाराष्ट्र करण्याचा निश्चय.
- पीक पद्धतीतील वैविध्य, सिंचन व्यवस्थेचे बळकटीकरण, शेतीत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, पारंपरिक शेतीबरोबरच सेंद्रिय व नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देणे आदीच्या माध्यमातून राज्यातील कृषी क्षेत्रात आमूलाग्र बदल करण्यावर भर.
- पीक विविधीकरणांतर्गत तेलबिया, डाळवर्गीय पिके व फलोत्पादन यावर विशेष भर देण्यात येऊन मूल्यसाखळी विकसित करण्यात येणार.
- उच्च मूल्य दर्जाची पिके व फलोत्पादक पिके यांना प्रोत्साहन देण्यासाठी इको सिस्टिम तयार करण्यात येणार.
- कृषी क्षेत्रामध्ये सुगंधित व औषधी वनस्पती लागवड करण्यासाठी त्यांना योग्य त्या सुविधा व केंद्रासमवेत सहकार्य साधण्याचे कार्य प्रभावी पद्धतीने हाती घेण्यात येत आहे.
- ॲग्रिकल्चर इन्फ्रास्ट्रक्चर फंडमध्ये प्रोजेक्ट मॉनिटरिंग युनिट सक्षम करण्यात येत आहे.
- महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी सर्वकष कृती आराखडा तयार करण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.
- दरवर्षी संपर्क तुटणाऱ्या गावांसाठी कायमस्वरूपी व्यवस्था निर्माण करण्यात येत आहे.
- मदतीची रक्कम बाधितांना देण्यामधील विलंब टाळण्यासाठी यापुढे पंचनाम्यासाठी मोबाईल ॲपचा वापर रिमोट सेन्सिंग तंत्रज्ञानाचा (सॅटेलाइट इमेज) वापर करण्यात येणार आहे.
- आधुनिक शेतीमध्ये ड्रोन टेक्नॉलॉजी, नॅनो युरिया, इरिगेशन ऑटोमायझेशन, कंट्रोल कल्टिव्हेशन या टेक्नॉलॉजीच्या वापरास प्रोत्साहन देण्यात येणार आहे.
- मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पाला गती देण्यात येणार.
- पीकविमा मिळण्यासाठी असलेल्या जाचक अटी शिथिल करण्यासाठी मार्ग काढणार
- दरड कोसळणे किंवा वारंवार पूर येणे यांसारख्या समस्यांवर मात करण्यासाठी ड्रोन तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येणार. आपत्तिप्रवण क्षेत्रातील नागरिकांच्या पुनर्वसनाबाबत लवकरच धोरण निश्चित करण्यात येणार आहे. शेतीच्या दृष्टीने या उपाययोजना महत्त्वपूर्ण ठरणार आहेत.
- मराठवाड्यासाठी विकासाची गंगा ठरणारा जालना जिल्ह्यातील ड्रायपोर्ट प्रकल्प.
- जालना जिल्ह्यातील जवसगाव आणि दरेगाव परिसरात १८२ हेक्टर क्षेत्रावर या प्रकल्पासाठी २६४ कोटी रुपयांची गुंतवणूक केली जाणार आहे. त्यात कृषिपूरक उद्योगांना मोठ्या प्रमाणावर चालना मिळणार आहे. त्यात प्रक्रिया केलेली फळ व रस, प्रक्रिया केलेल्या भाज्या हे कृषी आधारित उद्योग उभारले जाणार आहेत. या प्रकल्पाचा शेतकऱ्यांना मोठा फायदा होणार आहे.
- शालेय शिक्षणात कृषी विषयाचा समावेश. शेतकऱ्यांच्या मुलांनी नोकरीसाठी जरूर प्रयत्न करावेतच तो त्यांचा हक्क आहेच मात्र नोकरी आणि इतर बाबींवर सक्षम पर्याय म्हणून शेतीत सुद्धा रममाण व्हावे, महाराष्ट्र राज्यात कृषी शिक्षणाला अधिक वाव मिळावा, शेती क्षेत्रात संपन्नता यावी हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून येत्या काळात शालेय शिक्षणामध्ये कृषी विषयाचा समावेश करण्यात येणार आहे. राज्यात शालेय स्तरावर ग्रामीण भागामध्ये इयत्ता पाचवीनंतर कृषी विषयाचा समावेश करण्यासाठी प्रारंभी राज्यभर ग्रामसभांमध्ये विषय मांडण्यात येऊन सरपंच, ग्रामसेवक, ग्रामस्थ कृषिसहायक, प्राथमिक शिक्षक आणि गावातील विविध समित्यांचे पदाधिकारी यांचे मते जाणून घेण्यात येतील. राज्यभरात याला मिळालेला कौल लक्षात घेऊन पुढे शालेय शिक्षणामध्ये कृषी विषयाचा समावेश करण्याचे धोरण अमलात आणावे किंवा कसे यावर विचार करण्यात येणार आहे.

## 'माझा एक दिवस माझ्या बळीराजासाठी'

'माझा एक दिवस माझ्या बळीराजासाठी' यासारख्या उपक्रमातून शेतकऱ्यांच्या अडचणी जाणून त्या कायमस्वरूपी दूर करण्यासाठी प्रभावी उपाययोजना राबवण्यावर भर देण्यात येत आहे. 'माझा एक दिवस माझ्या बळीराजासाठी'चा अमरावती जिल्ह्यात मेळघाटात आरंभ करण्यात आला. कृषी विभागाच्या या राज्यस्तरीय उपक्रमाचा आरंभ माझ्या उपस्थितीत धारणी तालुक्यातील सादराबाडी येथे झाला.

मी सादराबाडी शिवारातील अनेक शेतांना भेट देऊन पाहणी केली. अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानाबद्दल तत्काळ भरपाई देण्यात येईल अशी ग्वाही दिली. बळीराजासोबत एक दिवस हा उपक्रम लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्यांच्या सहभागाने राज्यभर १०० दिवस राबवण्यात येणार असून याद्वारे प्राप्त सूचना लक्षात घेऊन प्रभावी धोरण राबवण्यात येणार आहे.

शेतकरी बांधवांच्या अडचणी व त्यांचे जीवनमान सुधारण्यासाठी आवश्यक बाबी जाणून घेता याव्यात, यासाठी मी संपूर्ण दिवस सावलकर, धांडे शेतकरी कुटुंबासोबत व्यतीत केला. त्यांच्या घरात मुक्काम केला. आपुलकी व जिव्हाळ्याने त्यांच्याशी संवाद साधत शेतकऱ्यांची दिनचर्या स्वतः अनुभवली. रानभाजी व भाकरीचे अप्रतिम जेवण व आपुलकीचे आतिथ्य येथे अनुभवले.

**शब्दांकन : केशव करंदीकर,**
विभागीय संपर्क अधिकारी

# सर्वसमावेशक शिक्षण



**दीपक केसरकर**
मंत्री, शालेय शिक्षण, मराठी भाषा

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात राज्यात लोकाभिमुख, कार्यक्षम आणि पारदर्शक कारभाराची आश्वासक सुरुवात झाली आहे. नव्या सरकारच्या मंत्रिमंडळात शालेय शिक्षण आणि मराठी भाषा विभागाचा मंत्री म्हणून मी कार्यभार स्वीकारताना राज्याच्या शैक्षणिक क्षेत्राला एक नवा आयाम देण्याबरोबरच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबवण्याचा संकल्प केला आहे.**

राज्य शासनाचा प्रयत्न हा काळानुरूप येणाऱ्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी आवश्यक असलेली ध्येये व मूल्ये यांची जपणूक करणारे असणार आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास केंद्रबिंदू मानून त्यांच्या शैक्षणिक, मानसिक, शारीरिक, सामाजिक विकासासाठी शिक्षण विभागाच्या माध्यमातून विशेष प्रयत्न करण्याचा आगामी काळात शासनाचा प्रयत्न असणार आहे. या बदलत्या काळात कौशल्यावर आधारित शिक्षणाला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. पारंपरिक अभ्यासक्रमाबरोबरच विद्यार्थ्यांनी वेगवेगळी कौशल्ये आत्मसात करणे खूप आवश्यक बनले आहे.

## कौशल्य विकास

कौशल्य आणि ज्ञान हे देशाच्या आर्थिक वाढीचा आणि सामाजिक विकासाची प्रेरक शक्ती आहेत. यासाठी शालेय अभ्यासक्रमात याचा कसा समावेश करता येईल या अनुषंगाने शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींची समिती नेमून त्यांची मते विचारात घेतली जाणार आहेत. विद्यार्थ्यांमध्ये कौशल्य विकास घडवून आणण्याचे केंद्र सरकारचे धोरण आहेच. या शिक्षण धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी राज्य शासन विशेष प्रयत्नशील आहे. व्यावसायिक शिक्षण क्षेत्रात मुलांना रुची निर्माण व्हावी, म्हणून त्यांच्या आवडीबाबत सहाव्या इयत्तेपासून समजून घेतले जाईल. श्रमाची प्रतिष्ठा (डिग्निटी ऑफ लेबर) बाबत विद्यार्थ्यांची मानसिकता बनवली जाईल. तसेच त्यांना आवडीच्या क्षेत्रातील व्यावसायिक प्रशिक्षण घेण्याची संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्याचा सरकारचा मानस आहे.

विद्यार्थ्यांमध्ये कोणतेही काम करताना उत्कृष्टता यावी. तसेच त्यांना दर्जेदार कौशल्य प्रशिक्षण मिळावे, या उद्देशाने टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस या नामांकित संस्थेद्वारे पदविका व पदवी प्राप्त करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. याअंतर्गत 'कमवा व शिका' या तत्त्वावर कला व वाणिज्य शाखेतील विद्यार्थी बारावीनंतर प्रवेश घेऊ शकणार आहेत. टाटा या संस्थेने या अभ्यासक्रमाकरिता ताज ग्रुप, एलआयसी, टायटन, टीसीएस, मारूती सुझुकी, फोर्टिस, स्टार हेल्थ इन्शुरन्स, लेन्सकार्ट, ल्युपिन अशा विविध ३७५० उद्योग कंपन्यांसोबत करार केला असून विद्यार्थ्यांना स्थानिक स्तरावर त्यांच्या आवडीनुसार विषय निवडण्याची सोय उपलब्ध असणार आहे. यात प्रामुख्याने पारंपरिक अभ्यासक्रमासोबत टुरिझम ॲण्ड हॉस्पिटॅलिटी, माहिती तंत्रज्ञान, मीडिया व एंटरटेनमेंट, बँकिंग व वित्तीय क्षेत्रातील संधीचा समावेश आहे. या माध्यमातून सुमारे १५ हजार तरुणांना रोजगार व शिक्षणाची संधी उपलब्ध होणार आहे. यासाठी राज्यात एकाच वेळी विद्यार्थ्यांची कलचाचणी घेण्याचे नियोजन करण्यात येणार आहे. यामुळे विध्यार्थ्यांना रोजगाराची आणि उत्पन्नाची हमी मिळणार आहे.

## युवकांना संधी

राज्याच्या समग्र शिक्षा कार्यालयाने यापूर्वी सुरू केलेल्या 'मिलाप' या कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यावर विशेष भर असणार



आहे. मिलापद्वारे माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना करिअरच्या नवीन संधी उपलब्ध करून देण्यासाठी एचसीएल कंपनीसोबत सामंजस्य करार करण्यात आला आहे. तरुणांना रोजगार उपलब्ध होईल, असा विश्वास वाटतो. या माध्यमातून जास्तीत जास्त युवकांना संधी उपलब्ध करून देण्यावर लक्ष केंद्रित करण्यात येणार आहे.

## सोपी अध्यपन पद्धती

वेगवेगळ्या घटकांकडून अभ्यासाबाबत केल्या जाणाऱ्या जबरदस्तीमुळे आणि बरोबरच्या मुलांना काही गोष्टी येतात आणि आपल्याला येत नाहीत, हे जेव्हा मुलाच्या लक्षात येते तेव्हा त्याची स्वप्रतिमा नकारात्मक होते. एकंदरच अभ्यास, शाळा, शिक्षक या सर्वाबाबत नावड, चिंता, भीती यांसारख्या भावना निर्माण होतात. हे सर्व टाळण्यासाठी आगामी शैक्षणिक वर्षापासून राज्यातील पहिली ते तिसरीच्या विद्यार्थ्यांचा गृहपाठ बंद करता येईल का यावर अभ्यास चालू आहे. मुलांवर अभ्यासाचे ओझे न देता त्यांच्या मेंदूचा विकास होईल, या दृष्टीने प्रयत्न आहेत. विद्यार्थ्यांना सहजपणे समजेल अशा पद्धतीची अध्यापन पद्धती स्वीकारली, तर विध्यार्थ्यांना तो विषय सहज समजेल आणि आकलन होऊन लक्षात राहील. त्यामुळे त्यांना वेगळा त्यांना गृहपाठ करण्याची गरज भासणार नाही. आगामी शैक्षणिक वर्षापासून हा निर्णय अमलात आणण्याचा मानस असून त्यासाठी राज्यातील सर्व शिक्षणतज्ज्ञ, विविध शिक्षक संघटना, संस्थाचालक आदींसोबत सविस्तर चर्चा करून अंतिम निर्णय घेतला जाईल.

## कार्यगटाची स्थापना

राज्यातील शैक्षणिक क्षेत्रात स्वायत्तता आणि उत्कृष्टता सक्षम करणे, शाळांपासून कौशल्य विकास तसेच उच्च आणि तांत्रिक शिक्षणापर्यंतच्या सर्व शैक्षणिक बाबींवर लक्ष केंद्रित करण्यासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणासंदर्भात नेमलेल्या कार्यबल गटाच्या अहवालातील शिफारशींनुसार राज्यात या धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्र्यांचा कार्यगट स्थापन करण्यात आला आहे. कार्यगटाच्या सदस्यपदी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह सहा मंत्र्यांचा समावेश आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी सक्षम संनियंत्रणासाठी म्हणून हा कार्यगट काम करेल.

आपण शिक्षण प्रक्रियेत तंत्रज्ञानाच्या उपयोगाचा एक टप्पा पूर्ण केला आहे. भविष्यात आणखी काही टप्पे पूर्णत्वाला घेऊन जाण्याची निश्चित गरज आहे. त्यासाठी राज्य शासनाने माहिती तंत्रज्ञानाच्या मदतीने नियोजन केले आहे. जगातील अनेक गोष्टी आणि सिद्धान्त काळाच्या ओघात टाकाऊ होतात. नवनवीन शोध लागतात त्याचा उपयोग शिक्षणात करणे अपरिहार्य आहे, त्यासाठी शिक्षकांचे सक्षमीकरण करावे लागते. स्थानिक परीस्थितीनुसार व सरकारी धोरणाची गरज लक्षात घेऊन गरजेनुसार प्रशिक्षण उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्यास प्राधान्य देण्यात येणार आहे.

## आनंददायी अभ्यासक्रम

शासनाने विविध उपक्रमांचा विचार केलेला असला तरी आनंददायी अभ्यासक्रमाचा विचारही महत्त्वाचा ठरणार आहे. सध्याच्या काळात विविध कारणांनी लहान वयातही विद्यार्थ्यांना ताणतणाव, उदासीनता, नैराश्य या मानसिक विकारांना सामोरे जावे लागत आहे. तसेच कोरोना संकटामुळे सुद्धा गेल्या काही वर्षात मानसिक स्वास्थ्य टिकवणे हे आव्हान ठरले आहे. तर्कसंगत विचार, कार्य करण्यासाठी सक्षम असणाऱ्या तसेच करुणा, सहानुभूती, साहस, लवचिकता, वैज्ञानिक चिंतन, रचनात्मक कल्पनाशक्ती, नैतिक मूल्य असणाऱ्या उत्तम मनुष्यत्वाचा विकास हा नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा महत्त्वाचा उद्देश आहे. या सर्व पार्श्वभूमीवर आनंददायी अभ्यासक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची शिक्षणातील अभिरुची वाढवणे, गळतीचे प्रमाण कमी करणे, विद्यार्थ्यांचे मानसिक स्वास्थ्य राखणे, विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक, भावनिक, संभाषण, समस्या निराकरण, ताणतणावाचे व्यवस्थापन करण्याचे कौशल्य विकसित करणे इ. उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आनंददायी कृतीचे नियोजनाबाबत आग्रही आहे. या माध्यमातून अनेक सकारात्मक परिणाम दिसतील, असा विश्वास वाटतो.

## परसबाग संकल्पना

शालेय पोषण आहार अधिक रुचकर बनावा, मुलांना शेतीची आवड निर्माण व्हावी म्हणून कृषी खात्याच्या सहकार्याने परसबाग संकल्पना राबवण्याचा शासनाचा मानस आहे. याबरोबरच वाचनाची आवड निर्माण व्हावी, म्हणून ई-लायब्ररीसारखे उपक्रम राबवण्याचा शासनाचा मानस आहे.

## विविध स्पर्धेचे आयोजन

आय. आय. टी किंवा तत्सम संस्थामध्ये प्रवेश मिळावा म्हणून असंख्य विद्यार्थी कोचिंग क्लासेसमध्ये भरती होत असतात. विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढावी, स्पर्धात्मक परीक्षेमध्ये त्यांना यश मिळावे, या दृष्टीने आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून विद्यार्थ्यांना प्रशिक्षित केले जाईल. विशेषतः विज्ञान, गणित व इंग्रजीबाबत अधिक भर दिला जाईल. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास व्हावा यासाठी खेळ, वक्तृत्व, नाट्य, साहित्य अशा विविध बाबतीत विद्यार्थी यांना प्रशिक्षण दिले जाईल. यासाठी विविध पातळीवर स्पर्धा आयोजन करण्याचा शासनाचा मानस आहे.

शिक्षकांना देण्यात येणारे अशैक्षणिक कामकाज कमी करण्याबाबत वेळोवेळी शिक्षक संघटनांकडून मागणी होत असते. या सर्व कामकाजासाठी तंत्रज्ञानाच्या माध्यमातून काही पर्याय उपलब्ध होतो का याचा विचार केला जाईल. त्यासाठी एक विशेष धोरणही निश्चित केले जाईल. राज्याच्या निर्मितीपासून शैक्षणिक क्षेत्राचा विकास घडवण्यासाठी विविध उपक्रम वेगवेगळ्या संस्था, व्यक्ती यांच्यामार्फत राबवण्यात आलेले आहेत. या सर्व उपक्रमांची माहिती घेऊन त्यांची उपयुक्तता लक्षात घेऊन सदर उपक्रम सुरू ठेवण्यात येतील. त्या उपक्रमांना प्रोत्साहन देण्यात येईल. तसेच राज्यव्यापी स्वरूपदेखील देण्याचा मानस आहे. आपल्या देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नवीन शैक्षणिक धोरणाद्वारे भारतातील शिक्षण क्षेत्रात क्रांती करण्याचा निर्धार केला आहे.

**शब्दांकन : मनीषा पिंगळे,**
विभागीय संपर्क अधिकारी

# सहकारातून समृद्धी



**अतुल सावे**
मंत्री, सहकार,
इतर मागास बहुजन कल्याण

**'सहकारातून समृद्धी' हा विकासात्मक दृष्टिकोन वास्तवात उतरवण्यासाठी केंद्र सरकारने पूर्णपणे स्वतंत्र अशा सहकार मंत्रालयाची स्थापना करण्याचे ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. देशातील सहकार चळवळ बळकट करण्यासाठी सहकार मंत्रालय एक प्रशासकीय, वैधानिक आणि धोरणात्मक चौकट नव्याने निर्माण करत आहे. त्यामुळे सहकारी संस्थांची मुळे घट्ट रुजून सहकार चळवळीला खऱ्या अर्थाने जनाधार मिळेल. सहकाराच्या संकल्पनेत ग्रामीण आणि शहरी भागाचा समावेश असल्याने देशात सहकारावर आधारित ग्रामीण अर्थव्यवस्था अधिक मजबूत होण्यास नक्कीच मदत होईल. सहकारची पाळेमुळे महाराष्ट्रात खोलवर रुजल्यामुळे देशासाठी महाराष्ट्र राज्य हे पथदर्शी राज्य म्हणून भूमिका बजावत आहे.**

कृषी-औद्योगिक, अर्थकारण आणि विशेषतः ग्रामीण पत क्षेत्रात सहकार विभागाची महत्त्वाची भूमिका आहे. या क्षेत्राला सक्षम करणारे सर्व भागीदार यावर लक्ष्य केंद्रित केले आहे. या विभागाचे काम ग्रामीण वित्त, कृषी, पणन, औद्योगिक, सहकार, बाजार नियामक आणि कर्ज देण्यासारख्या बाबींशी संबंधित आहे.

सहकारी संस्थांसाठी 'व्यवसाय सुलभीकरण' प्रक्रिया सुरळीत करण्याचे आणि बहुराज्यीय सहकारी संस्थांच्या विकासासाठी पोषक वातावरण निर्माण करण्याचे काम सहकार विभागाकडून झाले पाहिजे. समुदायाधारित विकासात्मक भागीदारीसाठी केंद्र सरकार अधिक काम करत आहे. या व्यापक भूमिकेसाठी महाराष्ट्र राज्य कायम आघाडीवर राहिले आहे.

## शेतकऱ्यांसाठी कर्जपुरवठा

राज्यातील शेतकऱ्यांना शेती कर्जपुरवठा करण्यात त्रिस्तरीय सहकारी पतपुरवठा संरचनेची महत्त्वाची भूमिका आहे. यामध्ये राज्यस्तरावर महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, जिल्हास्तरावर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका व गावपातळीवर प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांचा समावेश होतो. राज्यात ३१ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका व २०,९८६ प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्था कार्यरत आहेत. नाबार्डच्या पुढाकाराने राज्यातील सर्व ३१ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमध्ये सीबीएस संगणक प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे. या प्रणालीद्वारे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या सर्व ग्राहकांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या आधारे सर्व प्रकारच्या बँकिंग सुविधा उपलब्ध करण्यात येत आहेत. जिल्हा



मध्यवर्ती सहकारी बँकांना संलग्न असलेल्या बहुतांश प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्था अद्यापही संगणकीय तांत्रिक सुविधांच्या कक्षेबाहेर आहेत. प्राथमिक कृषी पतपुरवठा व्यवस्थेत या संस्थांचे संगणकीकरण हा मैलाचा दगड ठरेल.

## सहकारी संस्थांचे संगणकीकरण

प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांमध्ये प्रामुख्याने शेतकरी व ग्रामीण कारागीर यांचा सहभाग असून सभासदांमध्ये बचत व परस्पर मदतीला चालना देणे, त्यांच्या कर्जविषयक गरजांची पूर्तता करणे, पतपुरवठ्याशी संलग्न अशा निविष्ठा पुरवठा, शेतमालाची साठवणूक आणि विपणन सुविधा पुरणे हा या संस्थांचा प्रमुख उद्देश आहे. या संस्थांमार्फत त्यांच्या सभासदांना संगणकीय तंत्रज्ञानाच्या आधारे विविध प्रकारच्या सेवा पुरवून त्यांना सक्षम व्यवसाय उपक्रम बनवण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. ही बाब विचारात घेऊन देशातील प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांना 'आत्मनिर्भर भारत' अभियानाच्या धर्तीवर स्वावलंबी बनवण्यासाठी केंद्र शासनाने 'केंद्रपुरस्कृत प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांचे संगणकीकरण' या प्रकल्पास मान्यता दिली आहे. केंद्र शासनाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचनेनुसार महाराष्ट्रात राज्य व जिल्हा स्तरावर अंमलबजावणी व संनियंत्रण समिती गठित करण्यात आली आहे. केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांच्या पुढाकाराने सहकारी संस्थांचे संगणकीकरण हा देशपातळीवर महत्त्वाकांक्षी कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे.

विदर्भ व मराठवाड्यातील शेतकऱ्यांनी परवानाधारक सावकारांकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड करण्यासाठी २०२२-२३ या आर्थिक वर्षासाठी १ कोटी एवढा निधी वितरित करण्यास मान्यता देण्यात आली आहे. तसेच महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ मध्ये शेतकऱ्यांना कर्जमुक्ती देण्यात आली होती. यामध्ये नियमितपणे परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना

लाभ मिळाला नाही, यासाठी प्रोत्साहनपर लाभ योजनेसाठी शासनाने निधी वितरीत करण्यास मान्यता दिली. त्यामुळे अल्प मुदतीच्या पीककर्जाची नियमितपणे परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजारापर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्यासाठी २ हजार ३५० कोटी इतका निधी वितरित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

## मॅट्रिकोत्तर विद्यार्थ्यांसाठी ७२ वसतिगृहे



इतर मागास प्रवर्गातील मॅट्रिकोत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी मुलांसाठी आणि मुलींसाठी प्रत्येकी एक शासकीय वसतिगृह सुरू करण्यास मान्यता देण्यात आली. ३६ जिल्ह्यांच्या ठिकाणी प्रत्येकी २ (१०० मुले व १०० मुलींसाठी) या प्रमाणे ७२ शासकीय वसतिगृहांमध्ये ७ हजार २०० विद्यार्थ्यांच्या निवासाची सोय करण्यात येणार आहे. या वसतिगृहांमुळे ओबीसी समाजातील विद्यार्थ्यांना जिल्ह्याचे ठिकाणी शिक्षण घेणे सुलभ होणार आहे.

## वंचित घटकांचा विकास

राज्यातील विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग तसेच विशेष मागास प्रवर्गातील लोकांच्या आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक उन्नतीसाठी राज्य शासन कटिबद्ध आहे. शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत यासाठी विविध योजना राबवणार आहोत.

## परदेशातील शिष्यवृत्तींची संख्या वाढवली

इतर मागासवर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती तसेच विशेष मागास प्रवर्गातील गुणवंत विद्यार्थ्यांसाठी परदेशातील उच्च शिक्षणाच्या शिष्यवृत्तींची संख्या दहावरून ५० करण्याचा शासनाचा मानस आहे. त्यामुळे अधिक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ मिळणार आहे. २०२२-२३ या वर्षापासून त्याचा लाभ मिळेल. यासाठीची पालकांच्या वार्षिक उत्पन्नाची मर्यादा आठ लाख रुपये आहे. या निर्णयामुळे कला, वाणिज्य, विधी या शाखेतील प्रत्येकी पाच, अभियांत्रिकी, वास्तुकला शास्त्राच्या पंधरा, औषधनिर्माण, व्यवस्थापन शाखेच्या प्रत्येकी सात आणि विज्ञान शाखेच्या सहा अशा ५० विद्यार्थ्यांना परदेशातील उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मिळणार आहे.

## संशोधन व प्रशिक्षण संस्था

महात्मा जोतिराव फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था या महामंडळांतर्गत संशोधन (पीएच.डी.) करणाऱ्या पहिल्या दोन वर्षासाठी रुपये ३१ हजार, तर पुढील तीन वर्षासाठी ३५ हजार रुपये, अधिक घरभाडे भत्ता आणि अधिक आकस्मिक खर्च देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. तो लवकर सुरू करण्यात येईल. पीएच.डी. सोबतच एम.फिल. उमेदवारांना एम.फिल. ते पीएच.डी. असे एकत्रित लाभ देण्याबाबत निर्णय घेण्यात आला. यासंदर्भात बार्टीच्या तज्ज्ञ समितीने दिलेल्या शिफारशींवर चर्चा सुरू आहे.

यूपीएससीसाठी नवी दिल्ली येथे पूर्वतयारी करणाऱ्या उमेदवारांना मासिक विद्यावेतन १० हजारावरून १३ हजार इतके करण्यात आले आहे. तसेच आकस्मिक खर्च एक वेळा १८ हजार रुपये अनुज्ञेय करण्यात आला आहे.

एमपीएससी राज्य मुख्य परीक्षा उत्तीर्ण झालेल्या मुलाखतीस पात्र उमेदवारांना २५ हजार एक वेळ अर्थसाहाय्य देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. व्यावसायिक वैमानिक प्रशिक्षणासाठी निवड झालेल्या २० उमेदवारांना १० हजार रुपये प्रतिमाह विद्यावेतन देण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे. जेईई, नीट, सीईटी परीक्षांसाठी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात येत आहे. विविध स्पर्धा परीक्षांसाठी तसेच अभ्यासक्रमांसाठी विद्यार्थ्यांना महाज्योती संस्थेमार्फत प्रशिक्षणाची कार्यवाही सुरू आहे. खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील युवक-युवती व इतर उमेदवारांसाठी विविध योजना राबवण्यासाठी महाराष्ट्र संशोधन उन्नत व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) संस्थेची नाशिक येथे स्थापना करण्यात आली आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येईल.

## शैक्षणिक कर्ज व्याज परतावा

राज्यातील इतर मागास प्रवर्गाकरिता शैक्षणिक कर्ज व्याज परतावा योजनेच्या ऑनलाईन पोर्टल सुरू करण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळामार्फत राज्यातील इतर मागासवर्ग प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताच्या दृष्टिकोनातून त्यांना उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहित करणे, त्यांना शैक्षणिक व आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे, याकरिता विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी बँकेकडून मंजूर करण्यात आलेल्या कर्जावरील व्याजाची प्रतिपूर्ती करण्याच्या हेतूने इतर मागास बहुजन कल्याण विभागाने महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाच्या माध्यमातून ऑनलाईन पोर्टलद्वारे शैक्षणिक कर्ज व्याज परतावा योजना राबवण्यास मान्यता दिली आहे.

इतर मागासवर्ग प्रवर्गातील विद्यार्थ्यांना राज्य व देशांतर्गत अभ्यासक्रमांकरिता महत्तम १० लाख रुपये तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील उच्च शिक्षणाकरिता महत्तम २० लाख रुपये इतक्या रकमेच्या मर्यादेत शैक्षणिक कर्ज बँकेमार्फत उपलब्ध करून देण्यात येते. शैक्षणिक कर्ज रकमेची नियमित परतफेड करणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता कमाल १२% पर्यंतच्या व्याजाचा परतावा महामंडळामार्फत करण्यात येतो. ज्या अभ्यासक्रमाकरिता शैक्षणिक कर्ज आवश्यक आहे त्या अभ्यासक्रमासाठीची पात्रता परीक्षा विद्यार्थ्याने उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. या योजनेचा लाभ १७ ते ३० वर्ष वयोगटातील इतर मागासवर्ग प्रवर्गातील विद्यार्थ्यांना घेता येतो. या योजनेची महामंडळाच्या www.msobcfdc.org या संकेतस्थळावर शैक्षणिक कर्ज व्याज परतावा योजनेची माहिती उपलब्ध आहे.

**शब्दांकन : काशीबाई थोरात,**
विभागीय संपर्क अधिकारी

# महसूल संवर्धनावर भर



**शंभूराज देसाई**
मंत्री, राज्य उत्पादन शुल्क

**राज्यातील विविध विभागांच्या विकास कामांना निधी लागतो. हा निधी मिळवून देण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाचे मोठे योगदान आहे. राज्यातील विकास कामांना निधीचा पुरवठा करण्यासाठी आणि विविध कल्याणकारी योजना राबवण्यासाठी आवश्यक असणारा निधी उभारण्यात उत्पादन शुल्क विभाग महत्वाची भूमिका बजावतो. राज्याला विकासाच्या वाटेवर कायम ठेवण्यासाठी महसुलाचे संवर्धन आणि संरक्षण करण्याबरोबरच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यावर भर दिला जात आहे.**

राज्य उत्पादन शुल्क विभाग महसूल देणारा महत्वाचा विभाग आहे. विभागामार्फत मुंबई दारुबंदी कायदा, विषद्रव्य कायदा, १९१९, मुंबई औषधीद्रव्य (नियंत्रण) कायदा, १९५९, अंमली द्रव्य व मनोवैज्ञानिक पदार्थ अधिनियम, १९८५ कायद्यांची अंमलबजावणी केली जाते. मुंबई दारुबंदी कायद्यांतर्गत केलेल्या नियमांतर्गत मद्य/मद्यार्क/ताडी इत्यादी बाबतच्या वेगवेगळ्या अनुज्ञप्ती मंजूर केल्या जातात. मुंबई दारुबंदी कायदा १९४९ मधील तरतुदी व त्या अंतर्गत वेगवेगळे नियम, आदेश, निर्देश यांच्या अधीन राहून तरतुदीप्रमाणे विशिष्ट कालावधीसाठी दिल्या जातात.

शासनातर्फे वेगवेगळ्या अनुज्ञप्तींसाठी वेगवेगळे शुल्क आकारले जाते. मद्यावर उत्पादन पातळीवर शासन दरानुसार अबकारी कर वसूल करून घाऊक विक्रेत्यांना आणि किरकोळ विक्रेत्यांना मद्य विक्री केली जाते. शासनास अशा प्रकारे अबकारी करांपासून तसेच अनुज्ञप्ती शुल्कापासून मोठ्या प्रमाणात महसूल प्राप्त होतो. त्याचप्रमाणे अशा मद्यविक्रीवर ४० टक्के दराने विक्रीकरही शासनास प्राप्त होतो. शासनास मागील वर्षी १७२२८.८४ कोटी रुपयांचा महसूल प्राप्त झाला. यावर ४० टक्के विक्रीकर मिळाला आहे. सद्य:स्थितीत राज्य शासनाचे पूर्ण नियंत्रण असलेला राज्य उत्पादन शुल्क सर्वात महत्त्वाचा कर आहे. या महसुलाचे संवर्धन आणि संरक्षण करणे विभागाचे अत्यंत महत्त्वाचे काम आहे. कारण या महसुलातूनच राज्यातील विविध विकास कामांसाठीचा निधी उपलब्ध करून देण्यात येतो.

अनुज्ञप्तीचे नियंत्रण व नियमन करण्यासाठी तसेच अवैध धंद्यांवर कठोर व परिणामकारक कारवाई करण्यासाठी. राज्यात सद्य:स्थितीत १४० कार्यक्षेत्रीय निरीक्षक, ४५ भरारी पथक निरीक्षक आणि १२ सीमा तपासणी नाक्यावर निरीक्षक गट कार्यरत आहे. या प्रत्येक निरीक्षक गटात साधारणत: दोन दुय्यम निरीक्षक, तीन जवान व एक साहाय्यक दुय्यम निरीक्षक मदतीसाठी आहेत. कमी मनुष्यबळाच्या आधारे मागील वर्षी विभागाने गुन्हा अन्वेषणांतर्गत एकूण ४७,७४९ इतके गुन्हे नोंदवले असून, त्यापैकी ३४,५४६ इतके वारस गुन्हे नोंदवून एकूण १४४.४१ कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. महसूलाचे उद्दिष्ट गाठण्यासाठी मुळ कायद्यातील तरतुदीस बांधील राहून विभागाने वेळोवेळी देण्यात येणाऱ्या वेगवेगळ्या अबकारी अनुज्ञप्तींचे सुलभीकरण तसेच महसूल संवर्धनासाठी नवीन-नवीन योजना, धोरण आखले जातात. तसेच गुन्हा अन्वेषणामध्ये जास्तीत-जास्त परिणामकारकता आणण्यासाठी योग्य उपाययोजना आखल्या जातात.



## अनुज्ञप्तीचे सुलभीकरण

विभागांतर्गत शासनाने पारित केलेले महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९ आणि त्याखालील वेगवेगळे नियम, आदेश, निर्देश, अटी व शर्ती इ. अंतर्गत मद्य/मद्यार्क/ताडी इत्यादींचे रीतसर व्यवहार करण्यासाठी वेगवेगळ्या अबकारी अनुज्ञप्ती मंजूर केल्या जातात. या अनुज्ञप्तींचे बदलत्या काळात महाराष्ट्र दारुबंदी कायद्याच्या कक्षेत

राहून सुलभीकरण केले जाते. यामुळे राज्य शासनाचा महसूल वाढीस हातभार लागेल; शिवाय शासनाचे मर्यादित व लोकाभिमुख दारुबंदीचे धोरण अबाधित राहील, याकडे लक्ष देण्यात येते.

## धोरणात्मक सुधारणा

इथेनॉल धोरण केंद्र शासनाच्या धोरणाशी सुसंगत असेल मोटार इंधनात इथेनॉल वापराबाबत शासन अधिसूचना १४ ऑक्टोबर २०२० नुसार अत्यंत सुलभ धोरण स्वीकारून त्यानुसार बी-हेवी मळीचे उत्पादन व इथेनॉल निर्मितीसाठी सहज सुलभ धोरण स्वीकारले आहे. सर्व मद्य निर्मात्यांना किमान २० टक्के धान्यधारित मद्यार्क वापरणे बंधनकारक केले आहे. वाया जाणाऱ्या धान्यापासूनच्या मद्यार्काच्या वापरामुळे शेतकऱ्यांच्या धान्यास शाश्वत भाव मिळण्यास मदत होईल.

## सेवा हमी आणि ऑनलाईन सेवा

सेवा हमी कायद्यांतर्गत एकूण ५२ सेवा जाहीर केल्या असून त्यात सर्व महत्त्वाच्या अबकारी अनुज्ञप्ती संबंधित सेवा घेतलेल्या आहेत. यापैकी २५ सेवा ऑनलाईन पद्धतीने दिल्या जातात. इतर १३ सेवा विभागाच्या एससीएम संगणक प्रणालीमार्फत ऑनलाईन सेवा दिल्या जातात. त्यामुळे लोकाभिमुख, पारदर्शक व गतिमान सेवा विभागाकडून प्रदान करण्यात येत आहेत.

## मोहाफुलांबाबत धोरण

शासनाने आदिवासी बांधवांचे सशक्तीकरण करण्यासाठी नेमलेल्या खारगे समितीचा शिफारशी विचारात घेऊन मोहाफुलांबाबत धोरणात बदल करून त्यानुसार आता मोहाफुले खरेदी, गोळा करणे, वाहतूक करणे यासाठी अनुज्ञप्तींची आवश्यकता रद्द केली.

## व्यवसाय सुलभता धोरण

व्यवसाय सुलभता धोरणानुसार अबकारी अनुज्ञप्त्यांसाठी असलेल्या अधिकारांचे विकेंद्रीकरण केले आहे. तसेच आता वेगवेगळ्या अनुज्ञप्ती मंजुरीसाठी सुलभ प्रक्रिया केली आहे. यात फक्त नमुना एफएल-३, फॉर्म-ई, ई-२ या अनुज्ञप्ती वगळता इतर संबंधित अनुज्ञप्ती मंजुरीसाठी आता जिल्हा पातळीवरील समितीची आवश्यकता राहिलेली नाही. त्याचप्रमाणे बहुतांश अधिकार आता अधीक्षक पातळीवर दिल्याने कामात सुलभता व गतिमानता आणण्याचा प्रयत्न केला आहे. ताडीबाबत वेळोवेळीच्या मागणीनुसार याबाबत शासनाने नेमलेल्या रमानाथ झा समितीच्या अहवालानुसार २०२१ मध्ये निविदा ई-लिलाव पद्धतीने ताडीची अनुज्ञप्ती देऊन पुढील पाच वर्षे दरवर्षी सहा टक्के वाढीप्रमाणे दर आकारून नूतनीकरण करण्याचे धोरण स्वीकारले.

राज्यातील फळे, फुले किंवा केळी (देठ वर्गीय म्हणून) किंवा तांदुळ यामध्ये साखर व गुळ न घालता मुख्यत: फळाच्या सालामध्ये नैसर्गिकरीत्या उपलब्ध किण्व किंवा बाहेरून टाकेलेले किण्व यामुळे आंबवून केलेल्या रसापासून बाहेरून मद्यार्काचे मिश्रण न करता किंवा कृत्रिम अर्क न टाकता केलेले उत्पादित केलेले वाईन म्हणजे क्राफ्ट वाईन अशी व्याख्या जाहीर केली.

शासनाने नमुना आय, नमुना सीएल-१, नमुना पीएलएल व नमुना बीआरएल अनुज्ञप्तींच्या टायअप कराबाबत धोरण बनवून अशा अनुज्ञप्ती नूतनीकरण शुल्काच्या दरवर्षी १५% विशेषाधिकार शुल्क आकारून करारावर देण्याची तरतूद केली असून यातून शासन महसूलात भर पडली आहे.

## आयातीत मद्यावरील कर

परदेशातून आयात होणाऱ्या विदेशी मद्यावरील करात बदल करुन अवैधरीत्या बाजारात उपलब्ध होणाऱ्या बनावट व अन्य राज्यातून आलेल्या स्कॉचवर नियंत्रण आणण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे वैध बायो दर्जाच्या विदेशी मद्याची मोठ्या प्रमाणात विक्रीतून महसुलात मोठी वाढ झाल्याचे निदर्शनास आले आहे.

वाईनवर असलेल्या १०० टक्के कर सवलत कमी करून वाईनवर १० रुपये प्रतिलीटर कर आकारण्याचा निर्णय घेतल्यामुळे महसुलात काही प्रमाणात भर पडेल.

## प्रतिबंधात्मक निर्णय

गड किल्यावर मद्य पिऊन गोंधळ करणाऱ्या समाजकंटकांना आळा घालण्याच्या दृष्टीने उपाययोजना केल्या. जनतेच्या व लोकप्रतिनिधींची मागणी विचारात घेऊन गडकिल्ल्यांची आणि महापुरुषांची नावे अबकारी अनुज्ञप्तींना न देण्याबाबतचे धोरण स्वीकारले. महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९ अवैध मद्य निर्मिती, वाहतुक व विक्री बंदी कायद्यानुसार कारवाई केली जाते. राज्यात एकूण ३८४२ पदांना मंजुरी देण्यात आलेली आहे. एकूण ४५ भरारी पथके कार्यरत आहेत. १२ सीमा तपासणी नाके व १४० निरीक्षकांची कार्यालये आहेत. पथकात अधिकारी व कर्मचाऱ्यांची एकूण संख्या ८ असते. साधारणपणे १६०० च्या जवळपास अधिकारी व कर्मचारी गुन्हा अन्वेषण कामगिरी करत असतात.

## सीमा तपासणी नाके

परराज्यातील मद्य तस्करी रोखणे तसेच थेट वाहतुक पास मंजूर करण्याकरिता एकूण १२ ठिकाणी सीमा तपासणी नाके परराज्याच्या सीमेवर मंजूर करण्यात आलेली आहेत. शासन निर्णयाला अनुसरून परिवहन विभाग, विक्रीकर विभाग व राज्य उत्पादन शुल्क विभागाचे एकूण २४ एकात्मिक सीमा तपासणी नाके उभारण्याचे निर्णय घेण्यात आलेला आहे. त्यातील १६ तपासणी नाक्याचे काम पूर्ण होऊन ती कार्यान्वित झालेली आहेत.

## नियंत्रण कक्ष

नागरिकांना अवैध मद्य निर्मिती व विक्रीबाबत तक्रार करण्यासाठी टोल फ्री १८००२३३९९९९ व व्हॉट्सअॅप क्र. ८४२२००११३३ उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. आयुक्त कार्यालयात २४ x ७ नियंत्रण कक्ष कार्यरत आहे. ठाणे, पालघर जिल्ह्यातील खाडी परिसरातील हातभट्टी निर्मिती केंद्रावर ड्रोन व यांत्रिक बोटीच्या साहाय्याने कारवाई केली जाते.

**शब्दांकन : रवींद्र राऊत,**
विभागीय संपर्क अधिकारी

# पर्यटनातून रोजगार



**मंगलप्रभात लोढा**
मंत्री, पर्यटन, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता, महिला व बालविकास

**राज्याचे नवीन पर्यटन धोरण तयार होत आहे. कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नावीन्यता विभागामार्फत राज्यातील युवक-युवतींसाठी विविध योजना राबवण्यात येत आहेत. याचबरोबर महिला व बालविकास हा राज्याच्या विकासाच्या दृष्टीने सर्वात महत्त्वाचा घटक आहे. त्यांच्यासाठी असणाऱ्या पायाभूत सुविधांच्या बळकटीकरणासह सक्षमीकरणाकडे लक्ष देण्याचे आम्ही ठरवले आहे.**

पर्यटन क्षेत्रात झालेल्या बदलांमुळे सध्याच्या धोरणात कालानुरूप बदल करून गुंतवणूक, रोजगार आणि माहिती तंत्रज्ञान आधारित कौशल्य वृद्धिंगत करण्यासाठी राज्याचे नवीन पर्यटन धोरण तयार करण्याचे काम सुरू आहे. पर्यटनवाढीसाठी स्थानिक संस्कृतीचे जतन करून समृद्ध व पर्यावरण पूरक पर्यटनावर भर देण्यात येत आहे. हे धोरण या क्षेत्रात नवीन संधी आणि रोजगार निर्मितीसाठी उपयुक्त ठरणार आहे.

## इमारतींवर विद्युत रोशणाई

राज्यात पर्यटन वृद्धी व्हावी, स्थानिकांचा जास्तीत जास्त सहभाग, बेरोजगारांना स्वयंरोजगार मिळावा, या उद्देशाने 'व्हेकेशनल रेन्टल होम' तसेच 'होम स्टे' योजना तयार करण्यात आली आहे. राज्यातील पर्यटन क्षेत्रात नावीन्यपूर्ण कामगिरी करणाऱ्या सहभागीदारांना सन्मानित करण्यासाठी राज्य पर्यटन पुरस्कार योजना तयार करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत २५ एवढ्या पुरस्कारांची वर्गवारी केलेली असून त्या अंतर्गत एकूण ४८ पुरस्कार देण्याबाबत काम सुरू आहे. स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त मुंबई शहरातील मुंबई उच्च न्यायालयाची इमारत, शहर दिवाणी न्यायालय, मुंबई उच्च न्यायालयाच्या आवारातील सार्वजनिक बांधकाम विभागाची इमारत, महाराष्ट्र पोलीस मुख्यालय इमारत, पदवीदान समारंभाचे सभागृह, एलफिन्स्टन महाविद्यालयाची इमारत एल्फिन्स्टन टेक्निकल इन्स्टिट्यूट, रॉयल सायन्स इन्स्टिट्यूट, नॅशनल गॅलरी ऑफ मॉडर्न आर्ट, पश्चिम रेल्वेचे मुख्यालय,



गेट वे ऑफ इंडिया या महत्त्वाच्या ऐतिहासिक इमारतींवर विद्युत रोशणाई करण्यात येणार आहे. नवीन पर्यटन धोरण २०१६ अंतर्गत राज्यात विशेष पर्यटन क्षेत्र घोषित करण्याची तरतूद आहे. त्यानुसार जुन्नर तालुक्याला विशेष पर्यटन क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले आहे आणखी ३२ तालुक्यांना विशेष पर्यटन क्षेत्राचा दर्जा देण्याचे कामदेखील सुरू आहे.

राज्यातील पर्यटन क्षेत्रात खासगी गुंतवणूकदारांना सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी व त्यायोगे राज्यात पर्यटन क्षेत्रात गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी पर्यटन संचालनालयांतर्गत गुंतवणूक सुविधा कक्ष स्थापन करण्यात येणार आहे. राज्यातील राष्ट्रीय, राज्य, इतर जिल्हा मार्गावर असलेल्या किंवा त्यालगत असलेल्या पर्यटन स्थळांना भेट देणाऱ्या पर्यटकांसाठी सार्वजनिक अथवा खासगी तत्त्वावर सुविधा निर्माण करण्यात येणार आहे. राज्यातील २० रोपवे (रज्जूमार्ग)बाबत नॅशनल हायवे लॉजिस्टिक्ससमवेत सामंजस्य कराराबाबतची प्रक्रिया सुरू आहे.

## पर्यटकांसाठी सुविधा

नागपूर जिल्ह्यातील रामटेक येथे व नाशिक जिल्ह्यातील अंजनेरी येथे साहसी पर्यटन प्रशिक्षण केंद्र कार्यान्वित करण्यात येणार आहे. पर्यटकांच्या दृष्टीने आकर्षण ठरलेली डेक्कन ओडिसी ट्रेन पुन्हा चालू करण्यात येणार आहे. पर्यटकांना मुंबई दर्शन सुविधा उपलब्ध व्हावी, तसेच महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या उत्पन्न वाढीकरिता बसद्वारे महामंडळाची प्रसिद्धी करण्याकरिता उच्च प्रतीच्या हो हो बसेस सुरू करण्याचे नियोजन आहे. पर्यटक निवास ग्रेप पार्क नाशिक येथे कैरावान पार्कची निर्मिती करण्यात येणार आहे. पर्यटक निवासांमध्ये १०० दिवसांत विविध महोत्सव आयोजित करणे, पर्यटकांच्या सोयीसाठी आणि त्यांना माहिती मिळण्यासाठी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे मोबाइल ॲप तयार करणे, दिल्ली हाट येथे महाराष्ट्र खाद्य महोत्सव

आयोजित करणे या बाबी विशेषत्त्वाने मार्गी लावण्यात येणार आहेत.

## स्वयंरोजगाराला चालना

राज्य शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नावीन्यता विभागामार्फत राज्यातील युवक-युवतींसाठी विविध योजना राबवण्यात येत आहेत. नुकताच औरंगाबाद येथे मराठवाडा मुक्ती संग्राम दिन तसेच प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त



महारोजगार मेळावा घेण्यात आला. या मेळाव्यामध्ये रोजगाराच्या सुमारे ५ हजार संधी उपलब्ध करून देण्यात आल्या. त्याच धर्तीवर आता राज्यात ही महारोजगार मिळावे घेण्यात येणार आहेत. महाराष्ट्र राज्य नावीन्यता सोसायटीमार्फत राज्यात नुकतीच स्टार्टअप यात्रा संपन्न झाली. स्टार्टअपच्या विकासामध्ये महाराष्ट्र हे देशातील अग्रेसर राज्य आहे. देशात सर्वात जास्त मान्यताप्राप्र स्टार्टअप तसेच युनिकॉर्न आपल्या राज्यात आहेत.

## सक्षम महिला, सुदृढ बालक

महिला व बालविकास हा राज्याच्या विकासाच्या दृष्टीने सर्वात महत्त्वाचा घटक. पायाभूत सुविधांच्या बळकटीकरणासह सक्षमीकरणाकडे अधिक लक्ष देण्याचे महिला व बालविकास विभागाने ठरवले आहे. विशेषता बालकांच्या सुरक्षित व सुदृढ आरोग्याकडे लक्ष देणे यास प्रथम प्राधान्य देण्यात येत आहे. एकात्मिक बालविकास सेवा योजनाचे सार्वत्रिकीकरण करण्याच्या दृष्टीने पावले उचलली आहेत. ग्रामीण भागात ज्या पद्धतीने एकात्मिक बालविकास सेवा योजनेची अंमलबजावणी होते. त्याच पद्धतीने नागरी भागात प्रभावी अंमलबजावणी व्हावी, यासाठी राज्य शासनाने नेमलेल्या अभ्यास गटाने नागरी प्रकल्पात संरचनात्मक आणि कार्यात्मक बदलाची शिफारस केली. त्यानुसार ग्रामीण प्रकल्पामध्ये जी अंगणवाडी केंद्रे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्यक्षेत्रात होती, त्यांचे नागरी प्रकल्पांमध्ये हस्तांतरण करण्यात आले आहे.

महिला व बालविकास विभागाने आगामी कालावधीत पर्यवेक्षीय संरचना सुव्यवस्थित करणे, आरोग्य आणि पोषण उद्दिष्ट साध्य करण्याकरिता अधिक महत्त्व देण्यात आले आहे. नागरी भागामध्ये एकात्मिक बालविकास सेवा योजनेचा लाभ घेण्याचे प्रमाण वाढावे, यासाठी ज्या क्षेत्रामध्ये एकात्मिक बालविकास सेवा योजनेच्या सेवा उपलब्ध करून दिल्या जात नाहीत, अशा ठिकाणीदेखील सेवा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न आहे. प्रायोगिक तत्त्वावर बृहन्मुंबई महानगरपालिकासमवेत त्यांच्या अधीनस्थ बालवाडीमध्ये वृद्धी संनियंत्रण आणि पूर्व बाल्यावस्थेंतर्गत शिक्षण व संगोपन या बाबींवर अंगणवाडी केंद्राप्रमाणे काम केले जाईल.

बालवाडीमध्ये एक ते सहा वर्षे वयोगटातील मुलांना डे-केअर, प्री-स्कूल शिक्षण उपलब्ध करून देण्यात येते. एकात्मिक बालविकास सेवा योजनेमधील अंगणवाडी व महानगरपालिकेची बालवाडी यामध्ये योग्य समन्वय साधून महापालिका क्षेत्रातील ३ ते ६ वर्षे वयोगटातील जी बालके एकात्मिक बालविकास सेवा योजनेमध्ये नाहीत, परंतू बालवाडीमध्ये समाविष्ट आहेत, अशा बालकांचे वृद्धी संनियंत्रण आणि पोषण विकास केला जाईल.

याकरिता महिला व बालविकास विभागाने मार्गदर्शक तत्त्वे तयार केली आहेत. मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील एकूण ८७१ बालवाड्यांचे जिओटॅगिंग करून अंगणवाडी केंद्रांशी सांगड घालण्यात येईल.

## डिजिटल प्लॅटफॉर्म

'तरंग सुपोषित महाराष्ट्राचा' हा डिजिटल प्लॅटफॉर्म आहे. ज्यामध्ये इंटरॲक्टिव्ह व्हॉईस रिस्पॉन्स हेल्पलाइन आहे. यामध्ये व्हॉट्सअप, चॅटबॉट, ब्रॉडकास्ट कॉल आणि एसएमएस यांचा समावेश आहे. ज्याचा उपयोग समुपदेशनासाठी केला जातो, सामाजिक मुल्यांकनासाठी प्रणाली तयार करून पालकांना त्यांच्या मुलांच्या पोषण स्थितीचे घरगुती चाचण्यांद्वारे मूल्यांकन करण्यासाठी सुविधा उपलब्ध करून देण्यात येते. याद्वारे ३० लाख लाभार्थ्यांपर्यंत पोहोचण्याचा विभागाचा प्रयत्न आहे. महिला आणि मुलींना त्यांच्या जीवनातील सर्व क्षेत्रात आवश्यक त्या संधी व सुविधा उपलब्ध करून देणे आणि सामाजिक, आर्थिक व इतर क्षेत्रात विकास साधणे, याबाबतचा राज्याचा चौथा महिला धोरणाचा मसुदा तयार करण्यात येत आहे. बालकांची काळजी व संरक्षणासाठी 'राज्य बाल निधी' स्थापन करण्यात आला आहे. त्याच्या व्यवस्थापनासाठी आदर्श कार्यपद्धती तयार करण्यात येणार असून महिला आर्थिक विकास महामंडळ आणि महिला बालविकास विभागाने माविम 'ई-बिझनेस प्लॅटफॉर्म' तयार केला आहे.

## आरंभ प्रकल्प

ग्रामीण भागातील अतितीव्र कुपोषित बालकांसाठी ग्राम बालविकास केंद्रे सुरू आहेत. प्रायोगिक तत्त्वावर मुंबई महानगरपालिकेमधील निवडक एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्पामध्ये नागरी बालविकास केंद्रे सुरू करण्यात आली आहेत. महिला व बालविकास विभागाने बालकांमधील कुपोषण, त्याचे प्रतिबंध आणि व्यवस्थापन यास अधिक महत्त्व दिले आहे. आदिवासी भागातील अतितीव्र कुपोषित बालकाच्या आईला अथवा बालकाची काळजी घेणाऱ्याला १४ दिवसांसाठी दररोज ३५० रुपये देण्यात येतील, तर बिगर आदिवासी भागातील अशा बालकाच्या आईला अथवा बालकाची काळजी घेणाऱ्याला १४ दिवसांसाठी दररोज १५० रुपये देण्यात येतील. युनिसेफद्वारे बालविकासाला चालना देण्यासाठी 'आरंभ प्रकल्प' हा कार्यक्रम राबवण्यात येत आहे. औरंगाबाद आणि यवतमाळ जिल्ह्यांतील प्रायोगिक तत्त्वावरच्या या प्रकल्पास यश मिळाल्याने आता हा कार्यक्रम राज्यातील १९ जिल्ह्यांमध्ये राबवण्यात येत आहे.

**शब्दांकन : संध्या गरवारे,**
विभागीय संपर्क अधिकारी

# दहा विधेयकांना मंजुरी

संध्या गरवारे

**विधिमंडळाचे यंदाचे पावसाळी अधिवेशन १७ ते २५ ऑगस्ट २०२२ या कालावधीत पार पडले. या अधिवेशनामध्ये राज्याच्या हिताचे महत्त्वपूर्ण विधायके मांडण्यात आली. कृषी, आरोग्य, महिला व बालविकास, शिक्षण, गृह, नगरविकास, ग्रामविकास अशा विविध विभागांच्या अनुषंगाने अधिवेशनात महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. या विधिमंडळाच्या विधानसभा कामकाजाचा थोडक्यात आढावा.**

महाराष्ट्र विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात एकूण १० विधेयके मांडण्यात आली. सर्व विधेयके संमत करण्यात आली. विधेयकामध्ये महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम सुधारणा, ग्रामपंचायत अधिनियमात सुधारणा, नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक सुधारणा, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ सुधारणा अधिनियम, महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम २०१७ यांचा समावेश आहे.

## मुंबई–गोवा महामार्ग

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाचे काम डिसेंबर २०२३ पर्यंत पूर्ण करणार असून मुंबई -गोवा महामार्गावरील कामे गतीने होण्यासाठी कोकणातील सर्व लोकप्रतिनिधींच्या सूचनांचा विचार केला जाईल. परशुराम घाट आणि कशेडी घाटातील कामकाज अधिक सुरक्षित होण्यासाठी टेरी संस्थेचा सल्ला घेतला जाईल, असे सार्वजनिक बांधकाम मंत्री (सार्वजनिक उपक्रम) रवींद्र चव्हाण यांनी सांगितले.

## आदिवासी भागातील रस्ते विकास

पालघर जिल्ह्यातील मोखाडा तालुक्यात रस्त्याअभावी नवजात जुळ्या बालकांचा उपचाराअभावी मृत्यू होण्याची घटना अत्यंत दुर्दैवी आहे. शासनाने ही घटना अतिशय गंभीरपणे घेतली असून आदिवासी भागात चांगल्या दर्जाचे रस्ते असावेत. या भागात अशा प्रकारे घटना घडू नये, त्यासाठी शासन पूर्णपणे प्रयत्न करणार असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

## वस्तू व सेवा कर सुधारणा विधेयक

महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (सुधारणा) विधेयक २०२२ विधानसभेत मांडण्यात आले . या विधेयकामध्ये अनेक क्लिष्ट बाबी सोप्या व जनहितार्थ आहेत. शिवाय या विधेयकात सुधारणा करताना परतावा भरण्यासंदर्भातच सुधारणांवर भर देण्यात आला आहे, असे उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले.

## समृद्धी महामार्ग गडचिरोलीपर्यंत वाढवणार

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्ग नागपूर ते भंडारा, गोंदिया, आणि नागपूर ते गडचिरोलीपर्यंत पुढे वाढवण्यात येणार आहे. गडचिरोलीपर्यंतच्या टप्प्याचा सविस्तर प्रकल्प अहवाल बनवण्याचे काम प्रगतिपथावर असून भूसंपादन प्रक्रिया आणि इतर बाबींसाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे. मुंबई महानगरात 'एमएमआरडीए'च्या माध्यमातून स्कायवॉक बांधण्यात आलेले आहेत. या स्कायवॉकची उपयुक्तता पाहण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका आणि




एमएमआरडीएच्या माध्यमातून आढावा घेण्यात येणार आहे. अनेक ठिकाणी स्कायवॉकचा वापर ज्येष्ठांना करताना अडचणी निर्माण होतात, त्यासाठी सरकते जिने, अथवा उद्‌वाहने बसवण्याचा विचार आहे. काही नगरपालिकांची आर्थिक परिस्थिती पाहता विकासकामे थांबणार नाहीत, याची दक्षता घेण्यात येईल. कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर नवीन रस्ते डांबरीकरणाचे आणि काँक्रिटीकरणाचे काम हाती घेतले आहे.

## थेट जनतेतून नगराध्यक्षाची निवड

नगरपरिषदा व नगरपंचायतींचे अध्यक्ष थेट जनतेमधून निवडण्याबाबतचे विधेयक विधानसभेत बहुमताने मंजूर करण्यात आले.पारदर्शक कारभारासाठी जनतेतून नगराध्यक्षाची निवड करण्यासंदर्भातील विधेयक महत्त्वपूर्ण आहे, असे विधेयक मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मांडले. थेट सरपंच निवडण्याचा निर्णय घेतला, या निर्णयाच्या समर्थनात राज्यातील ९ हजार ग्रामपंचायतींनी ठराव केला असल्याची माहिती मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी या वेळी दिली.

## पाणीपुरवठा योजना मंजूर



रायगड जिल्ह्यातील गावे आणि वाड्यांना नियमित पाणीपुरवठा करण्यासाठी जलजीवन मिशन अंतर्गत १०७० नळ पाणी पुरवठा योजना मंजूर करण्यात आल्या आहेत. त्यापैकी ४५९ योजनांचा कार्यारंभ आदेश देण्यात आला असून ३९७ योजना प्रगतिपथावर आहेत, अशी माहिती पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी दिली.

## दर्जेदार शिक्षण देण्यासाठी कटिबद्ध

शहर आणि ग्रामीण भागात दर्जेदार शिक्षण देण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. जुन्या शाळा दुरुस्तींसह कोविडदरम्यान काम करताना जे शिक्षक मृत पावले त्यांना ५० लाख रुपयांचे अनुदान देण्यात आले. पदोन्नती प्रक्रिया, रात्रशाळा तसेच मराठी, उर्दू शाळांबाबत निर्णय लवकरच घेण्यात येणार असल्याचे शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी सांगितले.

## आश्रमशाळांसाठी ६०० कोटींची तरतूद

आश्रमशाळांसाठी ६०० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. १२७ बांधकाम सुरू करण्यात आली असून, उर्वरित कामांना लवकरच मंजुरी देऊन अपूर्णावस्थेतील आश्रमशाळा आणि वसतिगृहांचे काम प्राधान्याने पूर्ण केले जाणार आहे. शबरी घरकुलासाठी ३०० कोटींची तरतूद करण्यात आलेली आहे. पंतप्रधान आवास योजनेंतर्गत १ लाख ४२ हजार रुपयांची, तर महानगर प्रदेशात १७ हजार २८०, तर डोंगराळ व नक्षलवादी भागात १८ हजार २४० रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली असल्याची माहिती आदिवासी विकास विभागाची मंत्री डॉ. विजयकुमार गावित यांनी दिली.

## साकवाचे रूपांतर पुलांमध्ये

राज्यात अनेक साकव वाहतुकीसाठी धोकादायक असल्याचे लक्षात येत असल्याने साकवांचे रूपांतर पुलांमध्ये करण्यासाठी शासनस्तरावर सकारात्मक निर्णय घेण्यात येईल अशी माहिती सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांनी दिली.

## पावसामुळे नुकसान झाल्यास भरपाई

सततच्या पावसामुळे ३३ टक्क्यांपेक्षा जास्त नुकसान झाले असल्यास त्याचे पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्यात येणार असून, यापुढे पंचनाम्यासाठी मोबाईल ॲपचा वापर करण्यात येईल असे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले. गोगलगायी, एयलो मोझॅक या कीड रोग प्रादुर्भावामुळे झालेल्या नुकसानीचे शेतकऱ्यांना मदत करण्यात येईल. यापूर्वी प्रत्येक २४०० महसूल मंडळात एक स्वयंचलित हवामान केंद्र उभारण्यात आलेले आहे. ही संख्या अपुरी असल्यामुळे स्वयंचलित हवामान केंद्रांची संख्या वाढवण्यात येईल. पीक नुकसान भरपाईसाठी विमा कंपनीला सूचना देण्यात येतात. नियमित कर्जफेड केलेल्या शेतकऱ्यांना ५०,००० रुपये प्रोत्साहन अनुदान दिले जाणार आहे.

जुलैमध्ये शेती पिकांच्या झालेल्या नुकसानीकरिता राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून (एसडीआरएफ) सुधारित दराप्रमाणे मदत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ही मदत प्रतिहेक्टरी वाढीव मदत असून पूर्वी दोन हेक्टर मर्यादेत मदत केली जायची आता ती तीन हेक्टर इतकी वाढवली आहे. आपत्तीमध्ये तत्काळ देण्यात येणारी मदत ही पाच हजार रुपयांवरून १५ हजार रुपये करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. एनडीआरएफचे नुकसानीबाबतचे निकष बदलण्याबाबत पंतप्रधान अनुकूल आहेत. त्यांचा शेती आणि शेतकरी हाच प्राधान्याचा विषय असल्याचेही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी या वेळी सांगितले.

## मुंबइ परिसरातील पायाभूत सुविधा

धारावी पुनर्विकास प्रकल्प हा अतिशय महत्त्वाचा प्रकल्प आहे. २०१६ ला त्याचा विकास आराखडा (डीपीआर)तयार केला. हा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी रेल्वेची जागा घेणे आवश्यक आहे. त्यासाठी ८०० कोटी रुपये दिले. केंद्राशी काही बाबतीत चर्चा सुरू आहे. महिनाअखेरपर्यंत त्याचा निर्णय होईल. त्यानंतर नव्याने निविदा मागवून या प्रकल्पाला गती देण्यात येईल. आशियातील सर्वात मोठा असा हा प्रकल्प पूर्णत्वास जाईल.

पोलिसांना बीडीडी चाळीतील घर निश्चितपणे देण्यात येईल. आधीच्या सरकारने ५० लाख रुपये आकारण्याचा



निर्णय घेतला होता. खरे तर २५ लाख रुपयेसुद्धा अधिक होतात. त्यापेक्षा कमी किमतीत देण्याचा आमचा प्रयत्न असेल. पोलिसांना नाममात्र दरात मालकी हक्काचे घर देण्याचा राज्य शासन प्रयत्न करेल. गिरणी कामगारांना ५० हजार सदनिका देण्यासाठी उपलब्ध होत आहेत. त्या त्यांना देण्यात येतील. एसबीयुटी (सैफी बुऱ्हाणी अपलिफ्टमेंट ट्रस्ट) हा महत्त्वाचा 'अर्बन रिनिवल' पथदर्शी प्रकल्प आहे. मागील काळात या संदर्भातील आराखडा बदलला होता तो बदलून जुना आराखडा कायम ठेवण्यात येईल. २९ हजार सफाई कर्मचाऱ्यांची घरे मालकी हक्काने देण्यात येईल. एचडीआयएलच्या घरांसंदर्भात निविदा काढून सर्व घरांची दुरुस्ती करावी आणि झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाला हस्तांतरित करून झोपडपट्टीधारकांना एचडीआयएलची घरे देण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी एमएमआरडीएला दिले आहेत.

रेल्वेच्या मालकीच्या जमिनीवरील झोपडपट्ट्यांच्या अतिक्रमणाबाबत केंद्रीय मंत्र्यांसोबत बैठक घेऊन रेल्वेच्या जमिनीवरील झोपडपट्ट्यांसंदर्भात धोरण तयार करण्याचा प्रयत्न केला जाईल. झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत रखडलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पांना गती देण्यासाठी पर्यायांचा अबलंब केला जात असून निविदा प्रक्रियेने विकासकाची नियुक्ती करणे, झोपू प्राधिकरण आणि म्हाडाच्या संयुक्त भागीदारीतून प्रकल्प पूर्ण करण्यात येणार आहेत. मुंबई आणि एमएमआर भागातील पायाभूत सुविधांच्या दूरवस्थेबाबत सत्तापक्षाच्या विधानसभा नियम २९३ अन्वये प्रस्तावाला उत्तर देताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते.

## फीडर सेपरेशनच्या कामास प्राधान्य

महावितरण कंपनीमार्फत लातूर जिल्ह्यातील सिंगल फेज रोहित्र दुरुस्त करून अखंडित वीजपुरवठा सुरू ठेवण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येणार असून मराठवाड्यातील फिडर सेपरेशनचे काम प्राधान्याने ठरावीक कालावधीत पूर्ण करणार. रोहित्र दुरुस्तीसाठी आवश्यक साधनसामग्री उपलब्ध असल्याची माहिती उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी विधानसभेत दिली.

## स्मारकांच्या विकासासाठी तरतूद

राज्यातील ऐतिहासिक आणि वारसा स्मारकांचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून तीन टक्के रक्कम राखीव ठेवण्यासाठी विचार केला जाईल, स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त राज्यातील विविध शहरांमधील ऐतिहासिक आणि वारसा स्मारकांचे जतन करण्यात येत आहे. राज्यातील सर्व स्मारकांचे जतन करण्यासाठी सुमारे ५ हजार कोटी रुपयांची गरज आहे. त्यासाठी जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून तीन टक्के रक्कम राखीव ठेवण्यासाठी विचार केला जाईल, असे सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी विधानसभेत सांगितले.

## शिवाजी नगर ते हिंजवडी मेट्रो प्रकल्प

शिवाजी नगर ते हिंजवडी मेट्रो रेल्वे प्रकल्पाची २३.३ किलोमीटर लांबी आहे. संकल्पना करा, बांधा, आर्थिक पुरवठा करा, वापरा आणि हस्तांतरित करा या तत्त्वानुसार हा प्रकल्प बांधण्यात येत आहे. या कामास सुरुवात झाली असून प्रकल्प



कालावधी ४० महिने आहे. या प्रकल्पातील एकात्मिक उड्डाण पुलाचे काम सुरू आहे. या कामामुळे वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी एकेरी मार्ग करणे, नो पार्किंग, नो हॉल्टिंग झोन करणे, सायकल ट्रॅक आणि फुटपाथ काढून रस्ता रुंदीकरण करण्यात आले आहेत, असे मंत्री दीपक केसरकर यांनी विधानसभेत सांगितले

## कोळीवाड्यांच्या विकासासाठी नियमावली

मुंबई शहरातील कोळीवाड्यांचा विकास नवीन विकास नियमावलीनुसार केला जाईल. मुंबईतील कोळीवाड्यांचे रेखांकन करण्यात आले आहे. रेखांकनाच्या बाहेर असलेल्या झोपडपट्टींचा विकास केला जाईल. मात्र रेखांकनात समावेश असलेल्या कोळीवाडा क्षेत्रांचा विकास करण्यासाठी नवीन विकास नियमावली तयार करण्यात येत आहे. त्या नियमावलीनुसार कोळी वाड्यांचा विकास केला जाईल, असे उपमुख्यमंत्री तथा गृहनिर्माण मंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत सांगितले.

## पावसाळी अधिवेशनात दहा विधेयके

पावसाळी अधिवेशनात एकूण १० विधेयके मांडण्यात आली. त्यापैकी दहा विधेयके दोन्ही सभागृहात संमत करण्यात आली.पावसाळी अधिवेशन यशस्वीरीत्या पार पडले असे विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी विधानसभेत सांगितले. अधिवेशनामध्ये एकूण सहा बैठका झाल्या. प्रत्यक्ष ५७ तास २५ मिनिटे कामकाज झाले. रोजचे सरासरी कामकाज ९ तास २५ मिनिटे चालले. तारांकित प्रश्नांमध्ये ४८१५ प्रश्न प्राप्त होते. त्यापैकी सभागृहाने २५१ तारांकित प्रश्न स्वीकारलेले होते यातील २२ तारांकित प्रश्नांना उत्तरे देण्यात आली. सभागृहात ८६२ लक्षवेधी सूचना प्राप्त झाल्या होत्या ९४ स्वीकारण्यात आल्या व ३७ प्रश्नांवरती चर्चा झाल्या. नियम ९७च्या अन्वये सभागृहात २२ सूचना प्राप्त होत्या. अल्पकालीन चर्चेसाठी १ सूचना प्राप्त होती ती मान्य होऊन त्याच्यावरती चर्चा झाली. चार शासकीय ठरावांवरती चार सूचना प्राप्त होत्या त्या चारही सूचना मान्य होऊन ४ सूचनांवर चर्चा झाल्या.

अशासकीय ठरावासाठी १५१ सूचना प्राप्त होत्या. त्यापैकी ११ सूचना मान्य झाल्या होत्या. मात्र एकाही सूचनेवर चर्चा झाली नाही. अभिनंदन पर दोन प्रस्ताव प्राप्त झाले होते. या दोन्ही प्रस्तावावर चर्चा झाल्या. सभागृहामध्ये जास्तीत जास्त ८७ टक्के सदस्य उपस्थित होते. अधिवेशनात अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा झाली.

**विभागीय संपर्क अधिकारी**

# २२ सूचनांवर चर्चा...

मनीषा पिंगळे

**राज्याचे मंत्रिमंडळ अस्तित्वात आल्यानंतर विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन १७ ते २५ ऑगस्ट या कालावधीत मुंबई येथे घेण्यात आले. विधानपरिषद हे महाराष्ट्र विधिमंडळाचे वरिष्ठ सभागृह आहे. प्रभारी सभापती तथा उपसभापती नीलम गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली विधान परिषदेच्या या सहा दिवसीय पावसाळी सत्राचे एकूण कामकाज ४२ तास ३० मिनिटे झाले.**

विधान परिषदेच्या कामकाजाच्या सुरुवातीलाच राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांचे अभिनंदन करण्यात आले.

भारतासारख्या खंडप्राय देशाच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचा जीवनप्रवास थक्क करणारा आहे. विशेषतः सर्वच स्त्रियांना द्रौपदी मुर्मू यांचा जीवनसंघर्ष भावुक करणारा व प्रेरणादायीही आहे. घराणेशाही, अमर्याद संपत्ती आणि खानदानाचा दर्प नसलेल्या सामान्य माणसाला अभिमान वाटावा असाच त्यांचा जीवनप्रवास असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत सांगितले. तसेच या वेळी उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांचेही सभागृहात अभिनंदन करण्यात आले. अभिनंदनाचा हा प्रस्ताव विधानपरिषदेत एकमताने संमत करण्यात आला. या अभिनंदन प्रस्तावावर उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, सदस्य कपिल पाटील यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

### सभागृह नेतेपदी देवेंद्र फडणवीस

विधानपरिषद सभागृह नेतेपदी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची नियुक्ती करण्यात आली. उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी सभागृह नेतेपदी त्यांची नियुक्ती केल्याची घोषणा केली.

### विरोधी पक्षनेत्यांचा परिचय

विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांचा विधानपरिषद सभागृहात परिचय करून देण्यात आला. उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी विरोधी पक्षनेते श्री. दानवे यांचा सभागृहाला परिचय करून दिला.

### संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे विधानपरिषद सभागृहात वाचन करण्यात आले. उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन केले.

### नवनिर्वाचित मंत्रीमहोदयांचा परिचय

विधानपरिषदेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नवनिर्वाचित मंत्रिमहोदयांचा परिचय सभागृहाला करून दिला. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राधाकृष्ण विखे-पाटील - महसूल, पशुसंवर्धन आणि दुग्धविकास मंत्री; सुधीर मुनगंटीवार - वने, सांस्कृतिक कार्य मंत्री; चंद्रकांत पाटील - उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग आणि संसदीय कार्ये मंत्री; डॉ. विजयकुमार गावित - आदिवासी विकास मंत्री; गिरीश महाजन - ग्रामविकास आणि पंचायत राज, वैद्यकीय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण मंत्री; गुलाबराव पाटील-पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री; दादाजी भुसे-बंदरे व खनिकर्म मंत्री; संजय राठोड- अन्न व औषध प्रशासन मंत्री; डॉ. सुरेश खाडे-कामगार मंत्री; संदीपान भुमरे- रोजगार हमी योजना, फलोत्पादन मंत्री; उदय सामंत-उद्योग मंत्री; प्रा. तानाजी सावंत- सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री; रवींद्र चव्हाण-सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री; अब्दुल सत्तार-कृषी मंत्री; दीपक केसरकर-शालेय शिक्षण, मराठी भाषा मंत्री; अतुल सावे-सहकार, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री; शंभूराज देसाई-राज्य उत्पादन शुल्क मंत्री, मंगलप्रभात लोढा- पर्यटन, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता, महिला आणि बालविकास मंत्री यांचा परिचय सभागृहाला करून देण्यात आला.

### दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली

विधानपरिषदेत दिवंगत सदस्यांना शोकप्रस्तावाद्वारे श्रद्धांजली वाहण्यात आली. माजी राज्यपाल काटीकल शंकरनारायणन, माजी वि.प.स. व माजी राज्यमंत्री हरिभाऊ जागोबाजी नाईक, माजी वि.प.स. विनायक तुकाराम मेटे यांच्या निधनाबद्दल उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी शोकप्रस्ताव मांडला व आपले विचार व्यक्त केले व दोन मिनिटे मौन पाळून श्रद्धांजली वाहण्यात आली. हा

शोकप्रस्ताव सर्वसंमतीने संमत करण्यात आला.

### औद्योगिक विकासासाठी कटिबद्ध

शासनाकडून विदर्भ क्षेत्रातील उद्योग वाढीसाठी प्रोत्साहन व सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. विदर्भातील औद्योगिक विकासासाठी शासन कटिबद्ध असल्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी विधापरिषदेत सांगितले.

विदर्भातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे नागपूर व अमरावती अशा दोन महसुली विभागांतर्गत एकूण ११ जिल्ह्यांमध्ये हजारो हेक्टर क्षेत्र संपादित केले आहे. त्यामध्ये प्रादेशिक कार्यालय, नागपूर येथे ५२ औद्योगिक क्षेत्रे विकसित करण्यात आली आहेत. अमरावती येथे ४४ औद्योगिक क्षेत्रे विकसित करण्यात आलेली आहेत. ही दोन्ही प्रादेशिक कार्यालये मिळून आजपर्यंत विविध औद्योगिक क्षेत्रामध्ये भूखंडाचे वाटप करण्यात आले आहे.

### राज्य शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी

आज मोठ्या प्रमाणात शेतकरी अडचणीत आहे. शासन त्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे आहे. आपण सर्वजण मिळून त्यांना मदत करू, असे उपमुख्यमंत्री तथा सभागृह नेते देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेत सांगितले.

विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी नियम २६० अन्वये राज्यातील कृषी क्षेत्र आणि पूरपरिस्थिती यावर प्रस्ताव मांडला होता. यास उत्तर देताना उपमुख्यमंत्री बोलत होते.

### ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी डॉ. केशवराव धोंडगे यांच्या कार्याचा गौरव

मराठवाड्याच्या नांदेड जिल्ह्यातील कंधार ही जन्मभूमी आणि कर्मभूमी असलेल्या डॉ. केशवराव धोंडगे यांनी सुरुवातीपासूनच शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी आणि विकासासाठी काम केले आहे. दांडगा जनसंपर्क असलेले लोकप्रतिनिधी, साहित्याचे जाणकार, अभ्यासू लेखक आणि व्यासंगी पत्रकार म्हणून डॉ. केशवराव धोंडगे यांचे कार्य मोलाचे असल्याचे गौरवोद्‌गार उपमुख्यमंत्री तथा सभागृह नेते देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेत काढले.

ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी डॉ. केशवराव धोंडगे यांच्या शतकपूर्तीनिमित्त त्यांच्या संसदीय कार्याचा गौरव करण्याचा प्रस्ताव उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी मांडला. हा प्रस्ताव सभागृहाने एकमताने संमत केला. या वेळी उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते. सभागृहात बोलायला लागले की, विरोधी पक्षानेही कान टवकारून ऐकावे असे त्यांचे सभागृहातील निवेदन असे. जातिपातीच्या जोखडातून समाज मुक्त व्हावा, यासाठी ते प्रयत्नशील होते आणि आहेत. अंधश्रद्धा आणि त्यामुळे येणारे सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक गुलामगिरी यातून भोळ्याभाबड्या समाजाला बाहेर काढण्यासाठी त्यांनी समाजजागृतीचे कार्य केले. छत्रपतींचा राष्ट्राभिमान, मुत्सद्दीपणा, लोकसंग्रह, महात्मा गांधींची लोकजागृती, निःस्वार्थ निरपेक्ष विचार, लोकमान्यांचा कर्मयोग आणि कर्मयोगावर आधारलेली समाजरचना घडवण्यासाठी त्यांनी सातत्याने संघर्ष केला. उपेक्षित समाजाला जगण्याचा हक्क त्यांनी सांगितला.

### रशियात लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचा अर्धाकृती पुतळा, सभागृहात अभिनंदन

मार्गारिटा रूडोमिनो ऑल रशिया स्टेट लायब्ररी फॉर फॉरेन लिटरेचर मॉस्को, रशिया या संस्थेच्या प्रांगणात साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचा अर्धाकृती पुतळा बसविल्याबद्दल संस्थेचे अभिनंदन सभागृहात करण्यात आले. २०२० हे वर्ष अण्णा भाऊ साठे यांचे जन्मशताब्दी वर्ष म्हणून साजरे करण्यात आले आहे. त्यांचा रशियात अर्धाकृती पुतळा बसवणे ही बाब देशाची शान व मान वाढणारी आहे. त्यामुळे या संस्थेचे हे सभागृह अभिनंदन करत असल्याचे उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे म्हणाल्या. हा प्रस्ताव विधान परिषदेत एकमताने संमत करण्यात आला.

### स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवावर चर्चा

देशाच्या विकासात महाराष्ट्राने कायम योगदान दिले आहे. महाराष्ट्राचे काल, आज असलेले योगदान हे उद्याही कायम राहील, असे गौरवोद्‌गार उपमुख्यमंत्री तथा सभागृह नेते देवेंद्र फडणवीस यांनी भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त चर्चेच्या प्रस्तावावर बोलताना विधान परिषदेत काढले.

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त चर्चेचा प्रस्ताव उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी मांडला होता. या चर्चेदरम्यान बोलताना उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते.

समाज हाच संस्कृती आणि राष्ट्राच्या विकासासाठी महत्त्वाचा आधार आहे. समाज संस्कृती निर्माण करतो आणि समाजच राष्ट्र निर्माण करतो. त्यामुळे संस्कृती आणि समाजाचे रक्षण करण्याच्या दृष्टीने जी भावना निर्माण होते ती राष्ट्रभावना असते, असे उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले. या वेळी झालेल्या चर्चेत विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, सदस्य भाई जगताप यांनी सहभाग घेतला.

### निवृत्त होणाऱ्या सदस्यांना निरोप

विधान परिषद सभागृहातून येत्या ५ डिसेंबर २०२२ रोजी निवृत्त होणाऱ्या अमरनाथ अनंतराव राजूरकर (नांदेड स्थानिक प्राधिकारी संस्था), अनिल शिवाजीराव भोसले (पुणे स्थानिक प्राधिकारी संस्था), चंदूभाई विश्रामभाई पटेल (जळगाव स्थानिक प्राधिकारी संस्था), दुष्यंत सतीश चतुर्वेदी (यवतमाळ स्थानिक प्राधिकारी संस्था), डॉ. परिणय रमेश फुके (भंडारा-गोंदिया स्थानिक प्राधिकारी संस्था) आणि मोहनराव श्रीपती कदम (सांगली-सातारा स्थानिक प्राधिकारी संस्था) या सहा सदस्यांना सभागृहात निरोप देण्यात आला. सभागृह नेते उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, सदस्य निरंजन डावखरे, अरुण लाड, सचिन अहिर, सुरेश धस, निलय नाईक तसेच उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे यांनी निवृत्त होणाऱ्या सदस्यांच्या संसदीय आणि सामाजिक कार्याचा गौरव केला. त्याचप्रमाणे

त्यांच्या भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

### विधानपरिषद कामकाज आढावा

पावसाळी अधिवेशन २०२२, १७ ते २५ ऑगस्ट २०२२ या सत्र कालावधीतील विधान परिषद कामकाज ४२ तास ३० मिनिटे झाले. एकूण बैठकींची संख्या ६, प्रत्यक्षात झालेले कामकाज- ४२ तास ३० मिनिटे, रोजचे सरासरी कामकाज ७ तास ०५, मंत्री उपस्थित नसल्यामुळे वाया गेलेला वेळ- ३० मिनिटे, अन्य कारणांमुळे वाया गेलेला वेळ ५० मिनिटे, मंत्र्यांचा परिचय १९ मिनिटे, नवनिर्वाचित सदस्यांचा परिचय ९ मिनिटे, अध्यादेश सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले : ६, शोकप्रस्ताव ०३ 'तारांकित प्रश्न' प्राप्त झालेल्या प्रश्नांची संख्या १३८२, स्वीकृत झालेल्या प्रश्नांची संख्या ३६०, उत्तरीत झालेल्या प्रश्नांची संख्या २९, 'अतारांकित प्रश्न', प्राप्त झालेल्या प्रश्नांची संख्या ३४, तारांकित प्रश्नांतून अतारांकित झालेल्या प्रश्नांची संख्या : ३९४, प्राप्त झालेल्या उत्तरित प्रश्नांची संख्या (मागील सत्रातील स्वीकृत प्रश्नांसह) ४२०, म.वि.प. नियम ९३ अन्वयेच्या सूचना - प्राप्त झालेली संख्या २७, स्वीकृत झालेली संख्या २१, पटलावर ठेवण्यात आलेल्या २०, सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेली एकूण निवेदने- २०, म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव, प्राप्त झालेल्या प्रस्तावांची संख्या २ चर्चा झालेल्या प्रस्तावांची संख्या २, लक्षवेधी सूचना प्राप्त झालेल्या सूचनांची संख्या २९३, मान्य झालेल्या सूचनांची संख्या १०७, चर्चा झालेल्या सूचना २२ असल्याचे जाहीर करण्यात आले.

### हिवाळी अधिवेशन नागपुरात

महाराष्ट्र विधिमंडळाचे पुढील हिवाळी अधिवेशन १९ डिसेंबर २०२२ रोजी नागपूर येथे होणार असल्याची घोषणा विधानपरिषदेत उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी केली.

**विभागीय संपर्क अधिकारी**

# महाराष्ट्र नव्याने घडवू या..

**राज्यातील शेती आणि शेतकरी बांधवांसाठी दिलासा देणारे निर्णय जाहीर करतानाच शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी सर्वंकष कृतिआराखडा करण्यात येत असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानसभेत सांगितले. शेतकरी बांधवांना भावनिक आवाहन करत 'रडायचं नाही, लढायचं...अशा शब्दांत मुख्यमंत्र्यांनी बळीराजाला दिलासा दिला.**

विधानसभेत नियम २९३ अन्वये झालेल्या चर्चेला उत्तर देताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यातील शेतकरी बांधवांना उद्देशून लिहिलेले पत्र वाचून दाखवले. या वेळी मुख्यमंत्री म्हणाले, 'महाराष्ट्र लढवय्यांचा... कष्टकरी शेतकऱ्यांचा आहे. भारताच्या सीमेवर डोळ्यात तेल घालून पहारा देणारे लढाऊ बाण्याचे जवान शेतकऱ्यांच्या पोटी जन्माला आले आहेत. घाम गाळत जमीन कसून त्यातून मिळणाऱ्या उत्पन्नातून तुम्ही केवळ स्वतःचेच नव्हे, तर उभ्या महाराष्ट्राची आणि देशाची भूक भागवण्याचेही काम करत आहात. म्हणून मराठी मातीवर पहिला हक्क शेतकरी बांधवांचा आहे,' असे भावनिक उद्गार मुख्यमंत्र्यांनी काढले.



मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, नैसर्गिक, कौटुंबिक, आर्थिक संकट आल्यावर तुम्हाला हवालदिल होताना पाहून मन कासावीस होऊन जाते, तुमच्यातले काही शेतकरी बांधव अनेक संकटातून सावरताना थकून जातात आणि आत्मघाताचा मार्ग पत्करतात. हे चित्र पाहून मात्र एक सामान्य कष्टकरी कुटुंबातील माणूस म्हणून आणि या महाराष्ट्राचा कारभारी म्हणून मन विषण्ण होऊन जाते. आपल्याच घरातले कुणी आपण गमावल्याची भावना मुख्यमंत्र्यांनी या वेळी व्यक्त केली.

तुम्ही आहात तर छत्रपती शिवरायांचा महाराष्ट्र आहे. तुमचा जीव असा कोणत्याही झाडाला टांगण्याइतका स्वस्त नाही. तुम्ही आमची संपत्ती आहात. शिवसेनाप्रमुख हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे खेड्यापाड्यांतल्या शिवसैनिकांना नेहमी म्हणायचे की, 'रडायचं नाही, लढायचं...'त्याप्रमाणे तुम्ही खचून न जाता तुमचा तोलामोलाचा जीव वाऱ्यावर सोडून निघून जाऊ नका. आत्महत्या करू नका, अशी भावनिक साद मुख्यमंत्र्यांनी शेतकरी बांधवांना घातली.

मी तुमच्यासारखा सरळसाधा माणूस आहे. मला तुमच्या वेदना कळतात. काळजाला भिडतात. या अस्मानी संकटातून, या सावकारी दुष्टचक्रातून तुम्हाला बाहेर काढण्यास मी कटिबद्ध आहे, असे सांगून मुख्यमंत्री म्हणतात, आत्मघातात पराभव असतो आणि संघर्षात जगण्याचे लखलखते यश असते. मी आणि माझे सरकार सतत तुमच्या सोबत आहे, याची खात्री बाळगा... जीव देणे बंद करूया, जीव लावूयात एकमेकांना.. चला, नव्या सूर्याची नवी किरणे गाठीशी बांधू या आणि आपण मिळून छत्रपती शिवाजी महाराज यांचा महाराष्ट्र नव्याने घडवू या, असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी या पत्राद्वारे केले.

**राज्याच्या प्रगतीचा आलेख दिवसेंदिवस उंचावत आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली मंत्रिमंडळ काम करत आहे. देशाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त विविध योजना, अभियानांचा शुभारंभ केला जात आहे. विविध विभागांचा मंत्रिमंडळाकडून आढावा घेतला जात आहे. आढावा बैठकांमध्ये देण्यात आलेल्या सूचना, निर्देश तसेच पुस्तक प्रकाशन, प्रकल्पांचे लोकार्पण, प्रकल्पाच्या कामांची पाहणी, पुरस्कार वितरण आदींचा थोडक्यात आढावा...**

# पाऊल पडते पुढे

## मेट्रो लाईन-३ ची चाचणी

राज्य शासन पायाभूत सुविधांना प्राधान्य देत आहे. त्याअंतर्गत मुंबईकरांसाठी नव्याने जीवन वाहिनी ठरणारा मेट्रो-३ प्रकल्प सार्वजनिक वाहतुकीची सुविधा देण्याबरोबरच पर्यावरणाचा समतोल राखण्यास मदत करणारा ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला.

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या वतीने कुलाबा-वांद्रे-सिप्झ कॉरिडोर (एक्वा लाईन) मुंबई मेट्रो-३च्या पहिल्या भूमिगत ट्रेन चाचणीचा शुभारंभ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सारिपुत नगर, आरे कॉलनी येथे झाला. या वेळी आमदार दिलीप लांडे, अतुल भातखळकर, जपान सरकारचे डेप्युटी कौन्सुल जनरल तोशीहिरो कानेको, मुंबई मेट्रो प्रकल्पाच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे आदी उपस्थित होते.



मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या वतीने कुलाबा-वांद्रे-सिप्झ कॉरिडोर (एक्वा लाईन) मुंबई मेट्रो-३ च्या पहिल्या भूमिगत ट्रेन चाचणीच्या शुभारंभाप्रसंगी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस.

## मोफत प्रवास योजनेचा शुभारंभ

देशाच्या अमृतमहोत्सवानिमित्त राज्यातील ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना एसटी बसमधून मोफत प्रवास योजनेचा लाभ सुमारे १५ लाख ज्येष्ठ नागरिकांना होणार असून एसटीच्या शिवनेरीसह सर्व सेवांसाठी ही मोफत प्रवास योजना लागू असेल, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

विधिमंडळाच्या समिती कक्षात ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवास योजनेसाठी ज्येष्ठांना प्रमाणपत्रांचे वितरण आणि योजनेचा शुभारंभ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमास कृषी मंत्री अब्दुल सत्तार, आमदार भरत गोगावले, प्रताप सरनाईक, परिवहन विभागाचे अपर मुख्य सचिव आशिषकुमार सिंग, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक शेखर चन्ने, महाव्यवस्थापक शिवाजी जगताप, अखिल भारतीय ज्येष्ठ नागरिक महासंघाचे उपाध्यक्ष अण्णासाहेब टेकाळे यांच्यासह ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.

## 'भूमिपुत्र' स्मृतिग्रंथाचे प्रकाशन

राज्याचे दिवंगत माजी कृषिमंत्री भाऊसाहेब तथा पांडुरंग फुंडकर यांचे जीवनकार्य, त्यांच्या विधिमंडळ व संसदीय कामकाजाच्या योगदानावर आधारित 'भूमिपुत्र' या ग्रंथाचे प्रकाशन विधिमंडळातील मध्यवर्ती सभागृहात मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी व्यासपीठावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विधानसभेचे अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ, माजी राज्यपाल राम नाईक, संसदीय कार्य मंत्री चंद्रकांत पाटील, विधानसभेचे विरोधी

पक्ष नेते अजित पवार, विधानपरिषदेचे विरोधीपक्ष नेते अंबादास दानवे, वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्राचे मानद सल्लागार हेमंत टकले, दिवंगत फुंडकर यांचे चिरंजीव व विधानसभा सदस्य आकाश फुंडकर, सागर फुंडकर, पत्नी सुनीताताई फुंडकर, भूमिपुत्र स्मृतिग्रंथाचे संपादक सुधीर पाठक उपस्थित होते.

## ई-बसेसचा लोकार्पण सोहळा

पुणे शहरातील वाहतूक कोंडीतून नागरिकांची मुक्तता करण्याचा शासनाचा संकल्प आहे. त्यासाठी उड्डाणपुलांची रखडलेली कामे, मेट्रो विस्ताराच्या कामांना गती, चांगले रस्ते उपलब्ध करून देणे यासोबतच सार्वजनिक बससेवेत सुधारणा करणे यावर शासनाचा भर असणार आहे. त्या दृष्टीने फेम-२ अंतर्गत ई-बसची सुविधा महत्त्वाची ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला.

पुणे स्टेशन ई-बस डेपो उद्घाटन आणि पुणे महानगर परिवहन महामंडळाला फेम-२ अंतर्गत प्राप्त ९० ई-बसेसच्या लोकार्पण सोहळ्यात ते बोलत होते. कार्यक्रमाला केंद्रीय अवजड उद्योगमंत्री डॉ. महेंद्रनाथ पांडे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विभागीय आयुक्त सौरभ राव, पुणे महानगर परिवहन महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक लक्ष्मीनारायण मिश्रा आदी उपस्थित होते.

## सुशासन नियमावलीचा आढावा

सामान्य नागरिक केंद्रबिंदू ठेऊन त्यांना शासकीय सेवा आणि योजनांचा लाभ सुलभरीत्या मिळावा, यासाठी सामान्यांच्या समस्या आणि शासकीय कार्यपद्धती यांची सांगड घालत सुशासन नियमावली करावी, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले. कृषी, आरोग्य, माहिती तंत्रज्ञान, शिक्षण, आदिवासी विकास, रोजगार निर्मिती या क्षेत्रांना विशेष प्राधान्य देऊन अन्य राज्यांना हा आदर्श ठरेल अशी नियमावली तयार करावी, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

सुशासन नियमावली तयार करण्याकरिता नियुक्त समितीची वर्षा निवासस्थानी बैठक झाली. या समितीचे अध्यक्ष निवृत्त तत्कालीन उपलोकायुक्त सुरेश कुमार, माजी मुख्य सचिव तथा समिती सदस्य जयंतकुमार बांठिया, स्वाधीन क्षत्रिय, के. पी. बक्षी, अजितकुमार जैन, मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव या वेळी उपस्थित होते.

## प्रकल्पाच्या कामाची पाहणी

मुंबई ट्रान्स हार्बर लिंक प्रकल्पाचे काम ८४ टक्के पूर्ण झाले आहे. पुढील वर्षी डिसेंबरपूर्वी हा प्रकल्प पूर्ण होईल. त्यामाध्यमातून रायगड जिल्ह्यातील चिर्लेजवळील पेण, पोयनाड परिसरात ग्रोथ सेंटर निर्माण करण्यात येणार आहे. लॉजिस्टिक्स पार्क, टाऊनशिप आणि रोजगार निर्मिती या तीन बाबींवर लक्ष केंद्रित केले जाणार असून त्यामाध्यमातून या भागाचा सुनियोजितपणे विकास होईल, असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला.



मुंबई ट्रान्स हार्बर लिंकच्या कामाची पाहणी करताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे.

शिवडी येथून सुरू झालेल्या मुंबई ट्रान्स हार्बर लिंक प्रकल्पाच्या कामाची पाहणी मुख्यमंत्र्यांनी केली. या वेळी त्यांनी प्रत्यक्ष सागरी सेतूवर जाऊन कामाचा आढावा घेतला. या वेळी एमएमआरडीएचे महानगर आयुक्त एस.व्ही.आर. श्रीनिवास यांनी कामाबाबत माहिती दिली.

## मदत पुरवण्याचे निर्देश

पुणे, सातारा, रायगड, नाशिक, अहमदनगर या जिल्ह्यांच्या काही भागात गेल्या काही दिवसांत झालेल्या ढगफुटीसदृश पावसामुळे नागरिकांचे नुकसान झाले आहे. नुकसानग्रस्तांना आवश्यक ती मदत तातडीने पुरवण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत.

नाशिक, अहमदनगर, पुणे, सातारा, रायगड जिल्ह्याच्या काही भागांमध्ये ढगफुटीसदृश मुसळधार पाऊस झाला आहे. मुख्य सचिवांसह पुणे, सातारा जिल्हाधिकाऱ्यांकडून मुख्यमंत्र्यांनी या अतिवृष्टीची माहिती घेतली असून या पावसामुळे नुकसान झालेल्या नागरिकांना तातडीने आवश्यक ती मदत पुरवण्याच्या सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्या आहेत.

ढगफुटीसदृश्य पाऊस झालेल्या गावांमध्ये नुकसानीचे पंचनामे करून तातडीने मदत पोहोचवण्याच्या सूचना देतानाच मुख्य सचिवांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या संपर्कात राहून नुकसानीची आणि मदतकार्याची माहिती घेण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत.

## वाढीव दराने मदत

राज्यात लातूर, उस्मानाबाद व बीड या तीन जिल्ह्यांमध्ये शंखी गोगलगायीमुळे शेती पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. याबाबत मदत देण्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जाहीर केले होते त्यानुसार शंखी गोगलगायीमुळे शेती पिकांच्या नुकसान झालेल्या बाधित शेतकऱ्यांना ९८ कोटी ५८ लाख रूपये निधी राज्य आपत्ती प्रतिसाद निधी पेक्षा वाढीव दराने मदत वितरित करण्यात येणार आहे. या आपत्तीमुळे १ लाख १८ हजार

९९६ इतके शेतकरी बाधित झाले आहेत. या बाधित झालेल्या शेतकऱ्यांसाठी ९८ कोटी ५८ लाख रुपयांची मंजूर मदत तातडीने वितरित करण्याचे आदेश नुकतेच मदत व पुनर्वसन विभागाकडून काढण्यात आले आहेत.

नैसर्गिक आपत्तीमध्ये बाधितांच्या मदतीत वाढ करण्याचा निर्णय सरकारने काही दिवसांपूर्वी घेतला होता. त्यानुसार जिरायत शेतीसाठी पूर्वीचा दर प्रतिहेक्टरी ६८०० वरून वाढवून प्रतिहेक्टरी १३ हजार ६०० रुपये, बागायत शेतीसाठी प्रतिहेक्टरी १३ हजार ५०० रुपयांवरून २७ हजार रुपये आणि बहुवार्षिक शेतीसाठी पूर्वीचा दर १८ हजार रुपयांवरून ३६ हजार रुपये करण्यात आला आहे. जिरायत, बागायत व बहुवार्षिक पिकांच्या बाबतीत यापूर्वी दोन हेक्टरच्या मदतीत वाढ करून प्रति तीन हेक्टर अशी वाढ करण्यात आली आहे. याबाबतचा शासननिर्णय मदत व पुनर्वसन विभागाने १४ सप्टेंबर २०२२ रोजी निर्गमित केला आहे.

## विद्यापीठाच्या विकासासाठी सकारात्मक

छत्रपती शिवाजी महाराज हे प्रजाहित दक्ष, मुत्सद्दी, धोरणी आणि रणधुरंदर होते. त्यासोबतच ते कुशल प्रशासक आणि श्रेष्ठ व्यवस्थापकही होते. अशा बहुआयामी व्यक्तिमत्त्व असलेल्या महाराजांचा पुतळा प्रेरणादायी ठरेल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या विकासासाठी शासन प्रयत्नशील असून त्या दृष्टीने विविध मागण्यांबाबत शासन निश्चितच सकारात्मक भूमिका घेणार असल्याची ग्वाहीही मुख्यमंत्र्यांनी दिली.

औरंगाबाद येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या परिसरात उभारण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमास उद्योग मंत्री उदय सामंत, कृषी मंत्री अब्दुल सत्तार, रोहयो मंत्री संदीपान भुमरे, सहकार, बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, आमदार प्रदीप जैस्वाल, संजय शिरसाठ, नारायण कुचे, कुलगुरू डॉ.प्रमोद येवले, प्र. कुलगुरू डॉ. श्याम शिरसाठ, कुलसचिव जयश्री सूर्यवंशी आदी उपस्थित होते.

## कोस्टल रोड कामाची पाहणी

मुंबई किनारी रस्ता प्रकल्प (दक्षिण) अर्थात मुंबई कोस्टल रोडचे सुमारे ६२ टक्के काम पूर्ण झाले असून पुढील वर्षाअखेरीस हा प्रकल्प पूर्ण होईल. त्यामुळे मुंबईकरांना वाहतूक कोंडीतून मोठा दिलासा मिळेल,



मुंबई कोस्टल रोड प्रकल्पाच्या कामाची पाहणी करताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस.

असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला.

मुंबई कोस्टल रोडच्या प्रगतिपथावर असलेल्या कामाची पाहणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. प्रकल्पाच्या प्रियदर्शिनी उद्यान (नेपियन सी) येथील कार्यालयात मुंबई महानगरपालिका आयुक्त डॉ. इकबाल सिंह चहल, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पूर्व उपनगरे) अश्विनी भिडे यांनी प्रकल्पाचे सादरीकरण केले. या वेळी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांनी प्रियदर्शिनी पार्क येथील भूमिगत बोगदा, हाजी अली आणि वरळी येथील आंतरमार्गिका बदल (इंटरचेंज) सह संपूर्ण प्रकल्प रस्त्याची पाहणी केली. या वेळी खासदार राहुल शेवाळे, आमदार सदा सरवणकर, आमदार प्रकाश सुर्वे, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) आशिष शर्मा यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

## मराठवाड्याच्या विकासासाठी कटिबद्ध

मराठवाडा पवित्रभूमी असून येथे संतांचे संस्कार, मेहनती तरुण, वाढणारे उद्योग, यासह पर्यटनाच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. येथील विकासाचे प्रश्न सोडवण्यासाठी आम्ही कटिबद्ध असून विविध विकास कामांसाठी शासन भरीव निधी उपलब्ध करून देत आहे. तसेच या सर्व कामांचा यापुढे मंत्रालय स्तरावरून नियमित आढावा घेतला जाईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. मराठवाड्यातील जिल्ह्यांसाठी विविध विकास कामांच्या घोषणाही त्यांनी केल्या.

मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त मुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते येथील सिद्धार्थ उद्यानात ध्वजारोहण करण्यात आले. या निमित्ताने मुक्तिसंग्रामाचा अमृतमहोत्सवी वर्षासही सुरुवात झाली. या कार्यक्रमास केंद्रीय वित्त राज्यमंत्री डॉ. भागवत कराड, विधान परिषद विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, आमदार हरिभाऊ बागडे, संजय शिरसाट, अभिमन्यु पवार, प्रशांत बंब, विभागीय आयुक्त सुनील केंद्रेकर, जिल्हाधिकारी सुनील चव्हाण यांच्यासह अधिकारी, कर्मचारी, नागरिक उपस्थित होते.

## निती आयोगाच्या तज्ज्ञ गटासमवेत बैठक

महाराष्ट्रात विविध क्षेत्रांमध्ये परिवर्तनासाठी निती आयोगाच्या धर्तीवर राज्यस्तरीय संस्था स्थापना होत असून त्यामाध्यमातून कृषी, आरोग्य, शिक्षण रोजगार, पर्यावरण या विषयावर विशेष लक्ष केंद्रीत करण्यात आले आहे. प्रत्येक क्षेत्रात सामान्यांच्या अपेक्षापूर्तीसाठी राज्य शासन प्रयत्नशील असून त्यासाठी निती आयोगाने राज्याला सहकार्य करावे, असे

आवाहन करतानाच देशाच्या पाच ट्रिलियन अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी महाराष्ट्राच्या १ ट्रिलियन अर्थव्यवस्थेचा महत्वाचा वाटा असेल, त्यासाठी आम्ही प्रयत्नशील असल्याची ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

सह्याद्री अतिथिगृह येथे निती आयोगाचे मुख्य कार्यकारी अधिकारी परमेश्वरन अय्यर यांच्या आयोगातील तज्ज्ञांनी मुख्यमंत्री श्री. शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव यांच्यासह राज्य प्रशासनातील विविध विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव उपस्थित होते.

## नवीन संवर्धन राखीव क्षेत्र

राज्यात १८ नवीन आणि ७ प्रस्तावित संवर्धन राखीव क्षेत्र घोषित करण्यास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मान्यता दिली. त्यामुळे महाराष्ट्रात संवर्धन राखीव क्षेत्रांची संख्या ५२ होणार आहे. त्यामाध्यमातून राज्यात सुमारे १३ हजार चौरस किलोमीटर क्षेत्र संरक्षित होण्यास मदत होणार आहे. अशा संवर्धन राखीव क्षेत्रातील वन्यजीवांचे संवर्धन करताना त्या भागातील ग्रामस्थांच्या दैनंदिन जीवनात अडचण येणार नाही, त्यांचे हक्क बाधित होणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देश मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी या वेळी दिले.

मंत्रालयात मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली राज्य वन्यजीव मंडळाची १९ वी बैठक झाली. या वेळी वनमंत्री सुधीर मुनगंटीवार, वन विभागाचे प्रधान सचिव वेणुगोपाल रेड्डी, प्रधान मुख्य वनसंरक्षक डॉ. वाय. एल. पी. राव, वन्यजीव मंडळाचे सदस्य सचिव तथा प्रधान मुख्य वनसंरक्षक सुनील लिमये आदी या वेळी उपस्थित होते.

## माथाडी भूषण पुरस्कारांचे वितरण

समाजातील सर्व घटकांना न्याय देणारे हे सरकार आहे. माथाडी कामगाराच्या घरांचा, त्यांच्या मुलांच्या शिक्षणाचा तसेच वैद्यकीय सुविधांचा प्रश्न सोडवण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे. मराठा समाजात नव उद्योजक तयार व्हावेत, यासाठी स्व. अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या निधीत वाढ केली जाईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

माजी आमदार स्व. अण्णासाहेब पाटील यांच्या ८९ व्या जयंतीनिमित्त महाराष्ट्र राज्य माथाडी, ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियनच्या वतीने तुर्भे येथील एपीएमसी मार्केटमध्ये आयोजित माथाडी कामगार मेळावा आणि गुणवंत कामगार पुरस्कार, माथाडी भूषण पुरस्कार वितरण सोहळा झाला. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, कामगार मंत्री सुरेश खाडे, आमदार प्रवीण दरेकर, आमदार निरंजन डावखरे, आमदार छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले, आमदार गणेश नाईक, आमदार मंदा म्हात्रे, आमदार महेश शिंदे, माजी आमदार नरेंद्र पाटील, माजी खासदार संजीव नाईक, माजी आमदार संदीप नाईक, मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अशोक डक आदी उपस्थित होते.

## अधिसंख्य पदांवर नियुक्ती

राज्य शासनाच्या विविध निवड प्राधिकरणांनी निवड आणि शिफारस केलेल्या मराठा समाजासह अन्य प्रवर्गातील सुमारे १ हजार ६४ उमेदवारांना अधिसंख्य पदांवरील नियुक्तीचे पत्र देण्यात येणार आहे. त्यातील ७८ उमेदवारांना प्रातिनिधिक स्वरूपात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते विविध विभागातील नियुक्तिपत्रे देण्यात आली.



मराठा समाजासह अन्य प्रवर्गातील उमेदवारांना अधिसंख्य पदावरील नियुक्तीचे पत्र देताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि आदी मान्यवर.

मंत्रिमंडळ बैठक सभागृहात झालेल्या या कार्यक्रमास महसूल मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, वनमंत्री सुधीर मुनगंटीवार, वैद्यकीय शिक्षण मंत्री गिरीष महाजन, कृषी मंत्री अब्दुल सत्तार, रोहयो मंत्री संदिपान भुमरे, शिक्षण मंत्री दीपक केसरकर, सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण आदी या वेळी उपस्थित होते.

## संगीत महाविद्यालयाचे उद्घाटन

भारतरत्न लता मंगेशकर आंतरराष्ट्रीय संगीत महाविद्यालयाचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. या वेळी आंतरराष्ट्रीय संगीत महाविद्यालयाच्या बोधचिन्हाचे मान्यवरांच्या हस्ते अनावरण करण्यात आले.

शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागामार्फत दरवर्षी गायन व वादन या क्षेत्रात अतुलनीय कामगिरी करणाऱ्या ज्येष्ठ कलाकारांस गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. रवींद्र नाट्यमंदिर येथे आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सन २०२० चा गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार ज्येष्ठ गायिका उषा मंगेशकर यांना, तर सन २०२१ चा पुरस्कार ज्येष्ठ बासरीवादक पं.हरीप्रसाद चौरसिया यांना प्रदान करण्यात आला.

सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्यासह महसूल मंत्री राधाकृष्ण विखे- पाटील, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, उद्योगमंत्री उदय सामंत, शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर, आमदार सदा

सरवणकर, आमदार आशिष शेलार, ज्येष्ठ संगीतकार अशोक पत्की, मीनाताई खडीकर, पद्मश्री सोनू निगम, आदिनाथ मंगेशकर, संगीतकार मयुरेश पै, ज्येष्ठ गायक अनुप जलोटा, ज्येष्ठ गायक पंकज उधास, ज्येष्ठ गायक रूपकुमार राठोड, सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव सौरभ विजय यांच्यासह रसिक प्रेक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत

अतिवृष्टीसाठी विहित करण्यात आलेल्या निकषांमध्ये बसत नसतानाही जून ते ऑगस्ट २०२२ या कालावधीत अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना राज्य शासनाने मोठा दिलासा दिला आहे. विशेष बाब म्हणून सुमारे ७५५ कोटी रुपयांची मदत देण्याचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखालील मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत घेण्यात आला. याचा राज्यातील अंदाजे ५ लाखांपेक्षा अधिक शेतकऱ्यांना लाभ मिळणार आहे.

नैसर्गिक आपत्तीमध्ये बाधित आपद्ग्रस्तांना मदत देण्याबाबत निर्णय घेण्यासाठी मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक मंत्रालयात झाली. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेसह ग्रामविकास मंत्री गिरीष महाजन आणि अपर मुख्य सचिव (वित्त) मनोज सौनिक, मदत व पुनर्वसन विभागाचे प्रधान सचिव असीमकुमार गुप्ता, कृषी विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले आदी वरिष्ठ अधिकारी या वेळी उपस्थित होते.

## स्वच्छ महाराष्ट्र अभियानाचा शुभारंभ

स्वच्छता अभियानात महाराष्ट्र नेहमीच अग्रेसर असून आता स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० अंतर्गत स्वच्छ, सुंदर आणि कचरामुक्त शहरे ही लोकचळवळ बनणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. यशवतंराव चव्हाण प्रतिष्ठान सभागृह येथे स्वच्छ महाराष्ट्र अभियान नागरी (२.०) चा शुभारंभ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आला. या वेळी शालेय शिक्षणमंत्री तथा मुंबई शहराचे पालकमंत्री दीपक केसरकर, आमदार प्रताप सरनाईक, मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त इकबालसिंह चहल, वॉररूमचे महासंचालक राधेश्याम मोपलवार उपस्थित होते.

## उमेदवारांना नियुक्तिपत्र

एसटीतील २०१९च्या भरती अंतर्गत चालक, वाहक पदाच्या भरतीतील पात्र उमेदवारांपैकी २७ पुरुष उमदेवारांना नेमणुकीचे, तर २२ महिलांना सेवापूर्व प्रशिक्षणाचे पत्र मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते देण्यात आले. एसटी महामंडळाच्या निर्णयामुळे या भरतीप्रक्रियेतील पात्र उमेदवारांना मोठा दिलासा मिळाला आहे.



एसटीतील २०१९च्या भरतीअंतर्गत पात्र उमेदवारांना नेमणुकीचे पत्र देताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस.

राज्य परिवहन महामंडळामध्ये २०१९ मध्ये चालक, वाहक पदासाठी भरती प्रक्रिया राबवण्यात आली होती. या भरती प्रक्रियेतील १ हजार ४३१ पात्र उमेदवारांना यापूर्वीच नेमणूक देण्यात आली आहे. मात्र कोरोना महामारीमुळे दोन वर्षांपासून रखडलेल्या उर्वरित पात्र उमेदवारांच्या नेमणुकीला राज्य सरकारने हिरवा कंदील दाखवला होता. त्यानुसार मंत्रालयात मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्या हस्ते पात्र उमेदवारांना नियुक्ती पत्र देण्याचा कार्यक्रम पार पडला.

या वेळी शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर, वैद्यकीय शिक्षण मंत्री गिरीश महाजन, पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील, बंदरे व खनिकर्म मंत्री दादाजी भुसे, आरोग्यमंत्री डॉ. तानाजी सावंत यांच्यासह एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक शेखर चन्ने तसेच विविध विभागाचे महाव्यवस्थापक, वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. पात्र उमेदवारांपैकी २७ पुरुष उमेदवारांना नेमणुकीचे पत्र देण्यात आले असून उर्वरित उमेदवारांची लवकरच नेमणूक करण्यात येणार आहे.

## फाईव्ह-जी तंत्रज्ञानाचा शुभारंभ

फाईव्ह-जी नेटवर्कच्या राष्ट्रव्यापी शुभारंभ कार्यक्रमासाठी निवडलेल्या पनवेलमधील शाळेतील विद्यार्थ्यांशी संवाद साधताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे स्वत: विद्यार्थी बनले. खुर्चीऐवजी त्यांनी बेंचवर बसणे पसंत केले आणि विद्यार्थ्यांशी गप्पा मारताना मुख्यमंत्र्यांनी फाईव्ह-जीचे महत्त्व सांगितले. क्रांतिकारक क्षणाचे आपण साक्षीदार असल्याचे सांगत शिक्षण, कृषी, आरोग्य, बँकिंग यासह सर्वच क्षेत्रात फाईव्ह-जी तंत्रज्ञानाने क्रांती होणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते देशव्यापी फाईव्ह-जी तंत्रज्ञानाचा शुभारंभ झाला. यामध्ये व्हर्च्युअल क्लासरुमसाठी महाराष्ट्रातील रायगड जिल्ह्यातील पनवेल महापालिकेच्या सावित्रीबाई फुले शाळा क्रमांक-८ मधील विद्यार्थ्यांची निवड झाली होती. या कार्यक्रमास मुख्यमंत्री श्री. शिंदे उपस्थित होते.

## परिवहन विभागाचा आढावा

एस.टी. महामंडळाच्या ताफ्यात डिसेंबरपर्यंत १५० इलेक्ट्रिक आणि मार्चपर्यंत १००० सीएनजी बसगाड्यांचा समावेश करण्यात येणार आहे, त्या माध्यमातून प्रवाशांना अधिक दर्जेदार सेवा पुरवण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले. दरम्यान, एसटी संपाच्या काळात बडतर्फ केलेल्या ११८ कर्मचाऱ्यांना कामावर घेण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी महामंडळाला दिले.

परिवहन विभागाच्या अखत्यारीतील महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ आणि परिवहन आयुक्तालयाची आढावा बैठक मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात पार पडली. मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव मनोज सौनिक, परिवहन विभागाचे अपर मुख्य सचिव आशिषकुमार सिंह, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. नितीन करीर यांच्यासह राज्य परिवहन महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक शेखर चन्ने, परिवहन आयुक्त विवेक भीमनवार या बैठकीस उपस्थित होते.

## लोकशाहिरांच्या पुतळ्याचे लोकार्पण

लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांनी आपल्या आयुष्यात इतके मोठे संस्थात्मक काम केले. त्यामुळे ते केवळ एक व्यक्ती नव्हे, तर विद्यापीठ होते, असे गौरवोद्गार महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले.

रशियातील मॉस्को येथे मार्गारिटा रुडामिनो ऑल रशिया स्टेट लायब्ररी फॉर फॉरेन लिटरेचरच्या आवारात लोकशाहीर, साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांच्या पुतळ्याचे लोकार्पण करण्यात आले. त्या वेळी ते बोलत होते. महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, भारतीय सांस्कृतिक संबंध परिषदेचे अध्यक्ष डॉ. विनय सहस्त्रबुद्धे, आमदार सुनील कांबळे, प्रा. संजय देशपांडे, माजी आमदार सुधाकर भालेराव, अमित गोरखे या कार्यक्रमाला उपस्थित होते.

## दुष्काळमुक्तीसाठी प्राधान्य

मराठवाड्याच्या विकासाच्या दृष्टीने गेल्या काही वर्षांपासून आपण प्रयत्न करत आहोत. अजून खूप काही काम करावे लागेल. येथील सिंचनाचे प्रश्नांचा सखोल अभ्यास करून यावर काम करण्याचा निर्णय घेतला आहे. एका बाजूला पश्चिम वाहिनी नद्यातील मुबलक पाणी समुद्राला वाहून जाते. हे पाणी तुटीच्या गोदावरी खोऱ्यात वळवण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. मराठवाड्याला आता दुष्काळातून मुक्त करण्याची गरज असून येथील शेतकऱ्यांना सुजलाम सुफलाम करू, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. मराठवाडा मुक्तिदिनाच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या मुख्य शासकीय समारंभात ते बोलत होते.

येथील माता गुजरीजी विसावा उद्यान येथे आयोजित समारंभास माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण, खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर, खासदार हेमंत पाटील, महापौर जयश्री पावडे, आमदार अमर राजुरकर, आमदार राम पाटील रातोळीकर, आमदार बालाजी कल्याणकर, आमदार डॉ. तुषार राठोड, आमदार मोहनअण्णा हंबर्डे, आमदार भिमराव केराम, आमदार शामसुंदर शिंदे, आमदार राजेश पवार, माजी केंद्रीय राज्यमंत्री सुर्यकांता पाटील, जिल्हाधिकारी खुशालसिंह परदेशी उपस्थित होते.

## जलसंपदा विभागाचा आढावा

प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना आणि दुष्काळी भागासाठी असलेल्या बळीराजा जलसंजीवनी या केंद्र अर्थसाहाय्यित योजनांबरोबर राज्यातील रखडलेल्या सिंचन प्रकल्पांना गती द्यावी. यासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही, अशा सूचना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रशासनाला दिल्या. यामुळे आता केंद्र साहाय्यित सिंचन योजनांसह राज्यातील सिंचन प्रकल्पांना नवसंजीवनी मिळणार आहे.

सह्याद्री अतिथिगृहात उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली जलसंपदा विभागाची आढावा बैठक झाली. या वेळी जलसंपदा विभागाचे प्रधान सचिव भूषण गगराणी, सचिव विलास राजपूत, सचिव राजन शहा, उपमुख्यमंत्र्यांचे खासगी सचिव श्रीकर परदेशी आदी वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. या वेळी बैठकीच्या प्रारंभी श्री.राजपूत यांनी सादरीकरणाच्या माध्यमातून विभागाची माहिती दिली.

## आयुष्मान भारत हेल्थ कार्डचे वितरण

मंत्रालयातील त्रिमूर्ती प्रांगणात झालेल्या कार्यक्रमात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते 'आयुष्मान भारत हेल्थ कार्ड'चे वितरण करण्यात आले.

या वेळी आरोग्य मंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत, केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री डॉ. भारती पवार, मुख्य सचिव मनु कुमार श्रीवास्तव, सार्वजनिक आरोग्य विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे, सचिव एन. नवीन सोना, राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे संचालक तुकाराम मुंढे आदी मंचावर उपस्थित होते.



## ई–बिल व व्हाऊचर प्रोजेक्ट्स प्रणाली

गतिमान ई-प्रशासनासाठी विकसित करण्यात आलेल्या ई-बिल आणि व्हाउचर प्रोजेक्ट्स प्रणालीचे उद्घाटन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मंत्रालयातील दालनात करण्यात आले. वित्त विभागांतर्गत संचालनालय, लेखा व कोषागारे, यांच्यामार्फत राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र, पुणे यांच्या माध्यमातून ही प्रणाली विकसित करण्यात आली आहे.

उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली वित्त व नियोजन विभागाची आढावा बैठक झाली. या वेळी अतिरिक्त मुख्य सचिव मनोज सौनिक, प्रधान सचिव ओ पी गुप्ता, प्रधान सचिव आभा शुक्ला. प्रधान सचिव राजगोपाल देवरा, सचिव (वित्त) शैला ए उपस्थित होते.

## गृहनिर्माण विभागाचा आढावा

मुंबईतील गृहनिर्माण प्रकल्पांना पूर्ण करून मुंबईचा कायापालट करण्यासाठी यंत्रणांनी कामांची गती वाढवावी तसेच कामकाजात पारदर्शकता आणावी असे निर्देश उपमुख्यमंत्री तथा गृहनिर्माण मंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

गृहनिर्माण विभागाशी संबंधित विविध विषयांचा आढावा घेण्यासाठी बांद्रा येथील महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा) च्या कार्यालयात आयोजित बैठकीत ते बोलत होते. या वेळी गृहनिर्माण विभागाचे प्रधान सचिव मिलींद म्हैसकर, एमएमआरडीएचे महानगर आयुक्त एस.व्ही.आर. श्रीनिवास, बृहन्मुंबई पोलीस आयुक्त विवेक फणसळकर, म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल डिग्गीकर यांच्यासह अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## शेतकऱ्यांसाठी सौर कृषिपंप

राज्यातील शेतकऱ्यांना २ लाख सौर कृषिपंप, मार्च २०२२ पर्यंतच्या सर्व शेतिपंप जोडण्याचा अनुशेष पूर्ण करणे आणि कृषिफिडर सौर ऊर्जेवर आणणे, असे अनेक महत्त्वपूर्ण निर्णय उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या ऊर्जा विभागाच्या आढावा बैठकीत घेण्यात आले.

वांद्रे येथील प्रकाशगड कार्यालयात महाऊर्जा नियामक मंडळाची बैठक उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या अध्यक्षतेत झाली, त्या बैठकीत हे निर्णय घेण्यात आले. महावितरण, महापारेषण, महानिर्मिती, तसेच होल्डिंग कंपनीचे तसेच उर्जा विभागाचे वरिष्ठ अधिकारी या बैठकीला उपस्थित होते.

राज्यात २ लाख सौर कृषिपंपाचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. केंद्र सरकारच्या कुसुम योजनेंतर्गत १ लाख मेडातर्फे तसेच महावितरणच्या माध्यमातून १ लाख सौर कृषिपंपाचे उद्दिष्ट ठरवण्यात आले आहे. त्याचप्रमाणे मार्च २०२२ पर्यंतचे संपूर्ण पेडपेडिंग पूर्ण करण्याचेसुद्धा नियोजन करण्यात आले असल्याचे उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.

## हॅलोऐवजी वंदे मातरम् अभियान

सर्वसामान्य माणसाला स्वातंत्र्य लढ्याशी जोडून बापूजींनी तो लढा खऱ्या अर्थाने एका मोठ्या जनांदोलनात परावर्तित केला. बापूजी सर्वसामान्य माणसाच्या सेवेला ईशसेवा-देशसेवा मानत होते. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रपित्याचे विचार कृतीत आणण्यासाठी सर्व पातळ्यांवर प्रयत्न सुरू केले आहेत. समाजातल्या प्रत्येक वर्गासाठी जाणिवेने काम केले जात आहे म्हणून राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता सेवा पंधरवडा सर्वार्थाने औचित्यपूर्ण असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता सेवा पंधरवड्याचा समारोप तसेच स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त ७५ नद्यांची परिक्रमा, हॅलोऐवजी वंदे मातरम् अभियानाचा प्रारंभ आणि वर्धा जिल्हाधिकारी कार्यालय व नियोजन भवनाच्या उद्घाटनानिमित्त जिल्हा क्रीडा संकुल, वर्धा येथील कार्यक्रमात उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते.

महसूल मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, वने व सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार, खासदार रामदास तडस,

## लम्पीबाधित पशुधनावरील औषधांचा खर्च शासन करणार




राज्यात लम्पी रोगावर नियंत्रणासाठी मोठ्या प्रमाणात लसीकरण मोहीम राबवण्यात येत असून लम्पीबाधित पशुधनावरील औषधांचा सर्व खर्च शासनातर्फे करण्यात येईल, तसेच जिल्हास्तरावर उपचारासाठी आवश्यक औषधांची 'ड्रग्ज बँक' देण्यात येईल, असे प्रतिपादन पशुसंवर्धन मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले. पशुसंवर्धन आयुक्तालय येथे दूरदृश्य प्रणालीद्वारे आयोजित राज्यस्तरीय आढावा बैठकीत ते बोलत होते. या वेळी पशुसंवर्धन विभागाचे प्रधान सचिव जे. पी. गुप्ता, पशुसंवर्धन आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह, जिल्हाधिकारी डॉ.राजेश देशमुख, अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन डॉ. डी. डी परकाळे आदी उपस्थित होते.

आमदार रामदास आंबटकर, दादाराव केचे, समीर कुणावार, डॉ. पंकज भोयर, मॅगसेसे पुरस्कार विजेते जलतज्ज्ञ डॉ. राजेंद्रसिंग, विशेष पोलीस महानिरीक्षक छेरिंग दोरजे, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे या वेळी उपस्थित होते.

## दस्तनोंदणी संदर्भात बैठक

राज्यात तुकडेबंदी व ग्रामपंचायत हद्दीतील सदनिकांची दस्तनोंदणी बंद असून त्यामुळे सर्वसामान्य सदनिकाधारकांना अडचणी येत असल्याबाबतच्या तक्रारी प्राप्त होत आहेत. यावर सकारात्मक निर्णय घेण्यात येईल, असे सांगून सर्वसामान्यांना न्याय देण्यासाठी गुंठेवारीतील जाचक अटी दूर होईपर्यंत दस्त नोंदणी त्वरित सुरू करण्याबाबत विभागाने त्वरित प्रस्ताव सादर करावा, अशा सूचना बैठकीत देण्यात आल्या.

मंत्रालयात महसूल मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील आणि उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली याबाबत बैठक झाली. या वेळी महसूल विभागाचे प्रधान सचिव डॉ. नितीन करीर, नोंदणी महानिरीक्षक श्रावण हर्डीकर, महसूल व नोंदणी खात्याचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## मोबाईल ॲपचे लोकार्पण

स्वातंत्र्य आंदोलनाचा इतिहास वाचकांना मातृभाषेतून उपलब्ध झाल्यास तो अधिक लोकांपर्यंत पोहोचण्यास मदत होईल. त्यामुळे लोकार्पण करण्यात आलेले साहित्य मराठीत प्राधान्याने उपलब्ध करून देण्यात यावे, अशा सूचना सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिल्या.

'स्वातंत्र्य आंदोलन इतिहास आधार साहित्य खंड-१ ते १३' या मोबाईल ॲपचे लोकार्पण सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते रवींद्र नाट्यमंदिर येथे करण्यात आले. या वेळी सांस्कृतिक कार्य विभागाचे उपसचिव विलास थोरात, विद्या वाघमारे, दर्शनिका विभागाचे कार्यकारी संपादक आणि सचिव डॉ. दिलीप बलसेकर, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीचे प्रकल्प संचालक संतोष रोकडे, पुरातत्त्व संचालक डॉ. तेजस गर्गे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

## ७५ मुलांना शिष्यवृत्ती

भारतीय स्वातंत्र्याचे अमृतमहोत्सवी वर्ष साजरे करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र कांदळवन आणि सागरी जैवविविधता संवर्धन प्रतिष्ठानमार्फत जैवविविधता विषयात संशोधन करणाऱ्या ७५ मुलांना जगभरातील सर्वोत्कृष्ट विद्यापीठात जाऊन संशोधन करण्यासाठी येत्या तीन वर्षांत शिष्यवृत्ती देण्यात येईल. याशिवाय अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त कांदळवन क्षेत्रात ७ हजार ५०० नवीन रोजगार निर्माण करण्यात येणार आहेत, अशी माहिती वन मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिली.

महाराष्ट्र कांदळवन आणि सागरी जैवविविधता संवर्धन प्रतिष्ठान नियामक मंडळाची पाचवी बैठक सह्याद्री अतिथिगृह येथे वनमंत्री श्री. मुनगंटीवार यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

मंत्री श्री. मुनगंटीवार म्हणाले की, जैवविविधता विषयातील या ७५ विद्यार्थ्यांनी आपल्या संशोधनाचा उपयोग महाराष्ट्रासाठी करणे गरजेचे असेल. प्रत्येक वर्षी साधारण २५ विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती देण्यात येणार असून तीन वर्षे हा उपक्रम राबवण्यात येईल. यासाठी प्रत्येक वर्षी १० कोटी रुपयांची तरतूद करण्यात येणार आहे.

या बैठकीला वन विभागाचे प्रधान सचिव बी. वेणुगोपाल रेड्डी, अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक वीरेंद्र तिवारी, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) डॉ. वाय. एल.पी. राव, महाराष्ट्र राज्य जैव विविधता मंडळाचे अध्यक्ष डॉ. क्षे. ही. पाटील. मत्स्यविकास आयुक्त अतुल पाटणे, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) सुनील लिमये, वित्त विभागाचे सहसचिव विवेक दहिफळे, पर्यावरण संचालक नरेंद्र टोके, डेप्युटी कमांडंट कोस्टगार्ड आशुतोष आदी उपस्थित होते.

## टॅक्सिडर्मी सेंटरचे लोकार्पण

काही वर्षांपूर्वी संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात सर्वांनाच मोहित करणारी 'वनराणी' ट्रेन कार्यान्वित होती. कालांतराने ही ट्रेन बंद पडली. भारतीय स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करत असताना देशातील सर्वोत्तम ट्रेन या उद्यानात आणली जाईल असे वन मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी सांगितले.

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील टॅक्सिडर्मी सेंटर (मृगया चिन्ह केंद्र), वन्यजीव रुग्णालय आणि कॅट ओरिएंटेशन सेंटर (मार्जार वंशाची सर्व माहिती देणारे केंद्र), आदी बांधकामांचा लोकार्पण सोहळा वनमंत्री श्री. मुनगंटीवार यांच्या अध्यक्षतेखाली संजय गांधी राष्ट्रीय उद्यान येथे आयोजित करण्यात आला होता, त्या वेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाला संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रमाचे माजी कार्यकारी संचालक इरिक सोलेम, खासदार गोपाळ शेट्टी, आमदार प्रविण दरेकर, अभिनेत्री रवीना टंडन यांच्यासह वन विभागाचे प्रधान सचिव बी. वेणुगोपाल रेड्डी, अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक वीरेंद्र तिवारी, प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा वन बल प्रमुख डॉ. वाय. एल. पी. राव, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) सुनील लिमये, संजय गांधी



राष्ट्रीय उद्यानाचे वनसंरक्षक व संचालक जी. मल्लिकार्जुन, प्राध्यापक हरिप्रिया आदी उपस्थित होते.

अभिनेत्री रविना टंडन या राज्य शासनाच्या वन्यजीव सदिच्छादूत म्हणून काम करणार असून वन्यजीव संरक्षण आणि संवर्धनासाठी त्यांची मदत होणार आहे.

## शासकीय वसतिगृहांचा आढावा

विद्यार्थ्यांना वेळेत वसतिगृह प्रवेश न मिळाल्यास त्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ शकते. त्यामुळे वसतिगृहाची देखभाल, नूतनीकरण, दुरुस्ती अशा प्रशासकीय अडचणीमुळे विद्यार्थी वसतिगृह प्रवेशापासून वंचित राहणार याची खबरदारी घेऊन वसतिगृहाच्या अडचणी तातडीने दूर करण्यासाठी कालबद्ध पद्धतीने नियोजन करावे, अशा सूचना उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिल्या.

मंत्रालयात मुंबईतील शासकीय वसतिगृह महाविद्यालय, संस्थाबाबत आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, मुंबई विभागाच्या सहसंचालक डॉ. सोनाली रोडे, संबंधित अधिकारी उपस्थित होते.

## समितीची बैठक

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जागतिक दर्जाचे लेखन, भाषणे संकलित आणि संपादित करून प्रकाशित करण्याचे अतिशय महत्त्वाचे आणि ऐतिहासिक असे कार्य सुरू आहे. या समितीत कार्यरत असलेल्या सदस्य सचिव व सदस्यांना काम करताना त्यांच्या पदाला अनुसरून मानधन व सोयी सुविधा दिल्या पाहिजेत. म्हणून त्यांच्या मानधनात १० हजार रुपयांवरून २५ हजार रुपये अशी वाढ करण्यात येत असल्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगितले.

मंत्रालयात मंत्री श्री. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली या समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. त्या वेळी श्री.पाटील बोलत होते. या वेळी आमदार लहू कानडे, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकास चंद्र रस्तोगी, पुणे सहसंचालक डॉ. प्रकाश बच्छाव, सहसंचालक डॉ.सोनाली रोडे, समितीचे सदस्य, प्रा. सिद्धार्थ खरात, ज.वि. पवार, डॉ.भालचंद्र मुणगेकर, डॉ. योगीराज बागुल, डॉ.संभाजी बिरांजे, डॉ. धनराज कोहचाडे, डॉ. कमलाकर पायस, समितीचे सदस्य सचिव डॉ. प्रदीप आगलावे व संबंधित अधिकारी उपस्थित होते.



**३६वी राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा – २०२२ मध्ये सहभागी होणाऱ्या खेळाडूंना ध्वज प्रदान आणि १७ वर्षांखालील मुलींची वर्ल्ड कप फुटबॉल स्पर्धा–२०२२ यजमान शहर, बोधचिन्ह अनावरण करताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे. सोबत क्रीडा मंत्री गिरीष महाजन.**

## बोधचिन्हाचे अनावरण

मंत्रालयातील त्रिमूर्ती प्रांगणात ३६वी राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा - २०२२ मध्ये सहभागी होणाऱ्या खेळाडूंना ध्वज प्रदान आणि १७ वर्षाखालील मुलींची वर्ल्ड कप फुटबॉल स्पर्धा - २०२२ यजमान शहर, बोधचिन्ह अनावरण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी क्रीडा मंत्री गिरीष महाजन, क्रीडा विभागाचे सचिव रणजीत सिंह देओल, आयुक्त सुहास दिवसे, फिफाचे प्रतिनिधी रोमा खान, अखिल भारतीय फुटबॉल महासंघाचे प्रतिनिधी उपस्थित होते. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते राष्ट्रकुल स्पर्धेतील सुवर्णपदक विजेते चिराग शेट्टी, महाराष्ट्र कबड्डी संघाच्या सोनाली शिंगटे यांना ध्वजप्रदान करण्यात आला.

## क्रीडापटूंचा सत्कार

मोबाईल आणि संगणकाच्या युगात आरोग्य सांभाळणे गरजेचे आहे. मुलांना शालेय जीवनापासून मैदानी खेळासाठी वेळ दिला पाहिजे. शाळेत शारीरिक शिक्षणाचा तास पुन्हा सुरू करणे आवश्यक असून प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात खेळाला विशेष महत्त्व असल्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री गिरीष महाजन यांनी सांगितले.

राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त डॉन बॉस्को विद्यालयात ऑलम्पिक आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर उत्कृष्ट कामगिरी केलेल्या क्रीडापटूंचा सत्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, त्या वेळी ते बोलत होते.

या कार्यक्रमास शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण सचिव रणजित सिंह देओल तसेच पुरस्कार प्राप्त खेळाडू एम. एम. सोमय्या, कमलेश मेहता, प्रदीप गंधे, जय कवळी डॉन बास्को शाळेच मुख्याध्यापक फादर क्रीस्पियानो आदींची उपस्थिती होती. या वेळी शालेय विद्यार्थिनींनी विविध कार्यक्रमांचे सादरीकरण केले. प्रास्ताविक उपसंचालक स्नेहल साळुंके, सूत्रसंचालन प्रियंका बुवा यांनी, तर आभार मुंबई शहर जिल्हा क्रीडा अधिकारी अभय चव्हाण यांनी मानले.

## वैद्यकीय शिक्षण विभागाचा आढावा

वैद्यकीय शिक्षण विभागांतर्गत विविध संवर्गातील रिक्त पदे भरण्याकरिता तातडीने प्रक्रिया राबवण्याच्या सूचना वैद्यकीय शिक्षण मंत्री गिरीश महाजन यांनी दिल्या.

वैद्यकीय शिक्षण विभागाच्या कामांचा सविस्तर आढावा श्री. महाजन यांनी सह्याद्री अतिथिगृह येथे झालेल्या बैठकीत

घेतला. या बैठकीला वैद्यकीय शिक्षण सचिव सौरभ विजय, वैद्यकीय शिक्षण आयुक्त वीरेंद्र सिंह, सहसंचालक डॉ. अजय चंदनवाले, हाफकिन संस्थेच्या श्रीमती चंद्रा, विविध शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता यांच्यासह वैद्यकीय शिक्षण विभागाचे संबंधित अधिकारी उपस्थित होते.

## पाणीपुरवठा योजनांना मंजुरी

केंद्र सरकारच्या जलजीवन मिशन कार्यक्रमांतर्गत विहित निकषापेक्षा जादा दरडोई खर्च असलेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या २ व जिल्हा परिषदेच्या २५३ अशा सुमारे ३१४ कोटी रुपयांच्या २५५ ग्रामीण पाणीपुरवठा योजनांच्या प्रस्तावांना आज मान्यता देण्यात आली. पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात झालेल्या उच्चाधिकार समितीच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

बैठकीस पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे प्रधान सचिव संजीव जयस्वाल, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सदस्य सचिव अभिषेक कृष्णा, जलजीवन मिशनचे अभियान संचालक ऋषिकेश यशोद, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणेचे आयुक्त सी. डी. जोशी उपस्थित होते.

जलजीवन मिशन हा केंद्र शासनाचा महत्त्वाकांक्षी व कालबद्ध कार्यक्रम असून त्यांतर्गत २०२४ पर्यंत देशातील सर्व ग्रामीण कुटुंबांना वैयक्तिक नळ जोडणीद्वारे दरडोई ५५ लिटर मानकाप्रमाणे शाश्वत व गुणवत्तापूर्ण पेयजल उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. शासनाच्या २९ जून २०२२ च्या शासन निर्णयानुसार ग्रामीण नळ पाणीपुरवठा योजनांसाठी दरडोई खर्चाचे सुधारित निकष निश्चित करण्यात आले आहे.

## सरपंच संवाद

गावांमध्ये स्वच्छतेचे सातत्य कायम राहावे, ग्रामस्थांचे आरोग्य सुधारावे यासाठी गावातील प्रत्येक कुटुंबाला स्वच्छतेचे महत्त्व पटणे आवश्यक आहे. यासंदर्भात जनजागृती करण्यासाठी सरपंचांनी सक्रिय पुढाकार घेतल्यास गावाचा विकास अधिक गतिमान होऊ शकतो, असे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी सांगितले.

१५ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत 'स्वच्छता ही सेवा' अभियानाचे आयोजन केंद्र व राज्य शासनाच्या वतीने करण्यात आले होते. या अभियानात पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली 'स्वच्छता के लिए एकजुट भारत' मोहिमेंतर्गत सरपंच संवादाचे ऑनलाईन प्रणालीद्वारे आयोजन करण्यात आला. या वेळी राज्यातील प्रत्येक तालुका पंचायत समिती कार्यालयातून संबधित तालुक्यातील ग्रामपंचायतीचे सरपंच, पंचायत समितीचे पदाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षातील सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## 'बॉयलर इंडिया २०२२' चे उद्घाटन

महाराष्ट्र शासनाच्या कामगार विभागांतर्गत असलेल्या बाष्पके संचालनालयाच्या वतीने आयोजित जागतिक स्तरावरील 'बॉयलर इंडिया २०२२' प्रदर्शन, चर्चासत्र व कार्यशाळेचे उद्घाटन उद्योगमंत्री उदय सामंत आणि कामगार मंत्री तथा परिषदेचे स्वागताध्यक्ष सुरेश खाडे यांच्या हस्ते झाले. राज्यात उद्योगासाठी पूरक वातावरण असून उद्योगांना लागणाऱ्या सर्व सुविधा व प्रोत्साहनपर पॅकेज राज्य शासन देईल, असे प्रतिपादन उद्योग मंत्री श्री. सामंत यांनी या वेळी केले.



वाशीतील सिडको प्रदर्शन केंद्राच्या ठिकाणी तीन दिवस 'बॉयलर इंडिया २०२२' प्रदर्शन, चर्चासत्र भरवण्यात आले. या वेळी आमदार निरंजन डावखरे, आमदार महेश बालदी, आमदार रमेश पाटील, कामगार विभागाच्या प्रधान सचिव विनिता सिंघल, विभागीय आयुक्त तथा रायगडचे जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर, कामगार आयुक्त सुरेश जाधव, बाष्पके संचालनालयाचे संचालक धवल अंतापूरकर, अदानी पॉवरचे थर्मल हेड चैतन्य प्रसाद साहू, थायसन ग्रुपचे व्यवस्थापकीय संचालक विवेक भाटिया आदी या वेळी उपस्थित होते.

## विकासकामांचा आढावा

सतगुरु श्री सेवालाल महाराज तीर्थक्षेत्र, पोहरादेवी, ता. मानोरा जि. वाशिम या तीर्थक्षेत्रांच्या विकासकामांना गती देण्यात यावी, असे निर्देश अन्न व औषध प्रशासन मंत्री संजय राठोड यांनी दिले. मंत्रालयात झालेल्या आढावा बैठकीत ते बोलत होते.

या बैठकीला वाशिमचे जिल्हाधिकारी एस शन्मुगराजन यांच्यासह सार्वजनिक बांधकाम विभाग, ग्रामविकास विभाग, वन विभाग, महावितरण, ऊर्जा विभाग, वित्त विभाग यासह इतर संबंधित विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

संग्रहालय बांधकामाचा आढावा व अतिरिक्त मागणी, बांधकामाच्या सद्य:स्थितीचा आढावा, प्रकल्पासाठी सौर

ऊर्जेचा वापर करणे, अंतर्गत विद्युतीकरण, अंतर्गत गॅलरी डिझाईन निविदा, केसुला वन उद्यान, वाई-गोळ-पोहरा-उमरी राष्ट्रीय महामार्ग, बोटॅनिकल गार्डन यासह इतर महत्त्वाच्या विषयांवर या वेळी चर्चा झाली.

## अन्न व औषध प्रशासन विभागाचा आढावा

औरंगाबाद विभागातील जालना, बीड व औरंगाबाद येथील भगरीपासून विषबाधेच्या पार्श्वभूमीवर राज्यातील भगर विक्री करणाऱ्या सर्व उत्पादक व विक्रेत्यांकडील प्रतिजिल्हा दहा नमुने तपासणी करून अहवाल सादर करण्याच्या सूचना अन्न व औषध प्रशासन मंत्री संजय राठोड यांनी दिल्या.

मंत्री श्री. राठोड यांनी विभागाच्या वरिष्ठ पदावरील अधिकाऱ्यांची सह्याद्री अतिथिगृह येथे बैठक घेतली, त्या वेळी ते बोलत होते. या वेळी सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, सहआयुक्त, अन्न व औषध प्रशासन व इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. अन्न व औषध तसेच सौंदर्य प्रसाधने यामध्ये गैरप्रकार करणाऱ्यांविरुद्ध कडक कार्यवाही करण्याच्या मंत्री श्री. राठोड यांनी सूचना दिल्या. औषध विभागातील सर्व कंपन्या जागतिक स्तरावरील तसेच केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करतात किंवा कसे, याबाबत कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. कॅन्सर, डायबिटीज यावरील औषध उत्पादक कंपन्या त्यांच्याकडील कर्मचारी वर्ग यांच्या संरक्षणासाठी आवश्यक त्या उपाययोजना, कंपनीमधील औषधाचा दर्जा हा केंद्रशासनाने नेमून दिलेल्या संगणक प्रणालीप्रमाणे मशीनरीचा वापरतात काय हे तपासण्याच्या सूचना या वेळी त्यांनी सर्व अधिकाऱ्यांना दिल्या.

## राष्ट्रीय परिसंवाद

केंद्र शासन व राज्य शासनाच्या संघटित व असंघटित कामगारांच्या हिताच्या विविध योजना एकत्रितपणे समन्वयाने भविष्यात राबवणार असल्याचे, कामगार मंत्री डॉ. सुरेश खाडे यांनी सांगितले.

२५ व २६ ऑगस्ट रोजी केंद्र शासनाच्या श्रम मंत्रालयामार्फत तिरूपती आंध्र प्रदेश येथे आयोजित करण्यात आलेल्या राज्य व केंद्रशासित प्रदेशांच्या कामगार मंत्री व कामगार सचिवांच्या राष्ट्रीय परिसंवादात मंत्री डॉ. खाडे बोलत होते. या परिषदेला केंद्रीय श्रम मंत्री भूपेंद्र यादव तसेच विविध राज्यांचे कामगार विभागाचे मंत्री व कामगार प्रधान सचिव तसेच राज्याच्या कामगार प्रधान सचिव विनिता वेद-सिंगल आदी उपस्थित होते.

## कामगारांच्या प्रश्नांबाबत बैठक

माथाडी कामगारांना सहकार्य करण्याची शासनाची भूमिका असून त्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी आणि त्यांच्या पाल्यांसाठी शासन योग्य ती पावले उचलत असल्याची ग्वाही कामगार मंत्री डॉ. सुरेश खाडे यांनी कामगार संघटनाच्या प्रतिनिधींना दिली. माथाडी कामगारांच्या विविध प्रश्नासंदर्भात सह्याद्री अतिथिगृह येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीस विधानपरिषद सदस्य शशिकांत शिंदे, माजी आमदार नरेंद्र पाटील, कामगार विभागाच्या प्रधान सचिव विनिता वेद-सिंघल, कामगार आयुक्त सुरेश जाधव, उपसचिव दादासाहेब खताळ, माथाडी कामगार संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

## कांदाचाळ साठवणूक मर्यादेत वाढ

राज्यात कांदाचाळीकरिता पाच मेट्रिक टन ते २५ मेट्रिक टनाची मर्यादा वाढवून ती ५० मेट्रिक टनापर्यंत वाढवण्यासाठीचे निर्देश फलोत्पादन मंत्री संदिपान भुमरे यांनी दिले. फलोत्पादन विभागाच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. या वेळी फलोत्पादन विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, आयुक्त धिरज कुमार, फलोत्पादन विभागाचे संचालक कैलास मोते यांच्यासह विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

या वेळी आंबा फळमाशी नियंत्रण मोहिम घडी पत्रिका आणि भित्तिपत्रक विमोचन मंत्री श्री. भुमरे यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच या वेळी रोजगार हमी योजना आणि फलोत्पादन विभागाच्या विविध योजनांचा सविस्तर आढावा त्यांनी घेतला.

## कार्यशाळेचे उद्घाटन

गृहनिर्माण आणि आरोग्य यांचा एकमेकांशी अतिशय निकटचा संबंध आहे. त्यामुळे आरोग्य, गृहनिर्माण आणि वातावरणातील बदल यांचा एकत्रित विचार करण्याची आवश्यकता आहे असे प्रतिपादन सार्वजनिक आरोग्य मंत्री डॉ. तानाजी सावंत यांनी केले.



डॉ. सावंत यांच्या हस्ते नागरी स्वास्थ्य, गृहनिर्माण आणि वातावरणीय बदल या विषयावरील कार्यशाळेचे उद्घाटन झाले. बांद्रा-कुर्ला संकुल येथील हॉटेल सोफिटेल येथे झालेल्या या कार्यशाळेत आरोग्य विभागाचे विविध अधिकारी उपस्थित होते. डॉक्टर फॉर यू आणि युनिव्हर्सिटी ऑफ केंब्रिज यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी डॉक्टर फॉर यू स्वयंसेवी संस्थेचे अध्यक्ष डॉ. रजत जैन, संस्थापक डॉ. रविकांत सिंग, मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुभाषचंद गुप्ता, युनिसेफच्या देविका देशमुख, हिमांशू जैन आदी उपस्थित होते.

### जेएसडब्ल्यूसोबत सामंजस्य करार

जेएसडब्ल्यू आणि महाराष्ट्र शासनाच्या उद्योग विभाग यांच्यामध्ये पेण (रायगड) येथील निओ एनर्जी प्रकल्पासंदर्भात सामंजस्य करार करण्यात आला आहे. या माध्यमातून कोकणात सुमारे ४ हजार २०० कोटींची गुंतवणूक आहे. पेण येथे ९६० मेगावॅटचा पीएसपी प्रकल्प उभा राहणार आहे, अशी माहिती उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिली.

सह्याद्री अतिथिगृह येथे उद्योग मंत्री श्री. सामंत यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत हा सामंजस्य करार करण्यात आला. या वेळी प्रधान सचिव हर्षदीप कांबळे, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.पी.अनबलगन, कंपनीचे शिष्टमंडळ व सर्व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

### 'माता सुरक्षित तर घर सुरक्षित अभियान'

'माता सुरक्षित तर घर सुरक्षित' अभियान दिवाळी पर्यंत राबवावे, अशा सूचना सार्वजनिक आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांनी दिल्या. मंत्री श्री. सावंत यांनी पुणे येथून दूरदृश्य प्रणालीद्वारे सार्वजनिक आरोग्य विभागाच्या कामाचा आढावा घेतला. त्या वेळी त्यांनी या सूचना दिल्या. या वेळी अतिरिक्त मुख्य सचिव डॉ. प्रदीप व्यास, प्रधान सचिव नवीन सोना, आयुक्त तथा अभियान संचालक डॉ. एन. रामास्वामी, आरोग्य संचालक डॉ. साधना तायडे, डॉ. नितीन आंबेडकर आदी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी आधिकारी यांनी या अभियानात सक्रिय सहभाग घेऊन आपापल्या यंत्रणेला कार्यान्वित करण्याच्या सूचना द्याव्यात. जनजागृती, समुपदेशन, तसेच प्रत्यक्ष भेटी यावर पुढील काळात भर देऊन मोहीम यशस्वी करावी. मोहीम फक्त तपासणी वरच न थांबता पुढे गंभीर आजारा संबंधी उपचार आणि त्याकरिता लागणारा खर्च या बाबत रूग्णास सर्वोतोपरीने मदत करावी.

### स्वच्छता आणि सुरक्षिततेचा संकल्प

स्वच्छ समुद्र-सुरक्षित समुद्र अभियानात दोन ते तीन हजार युवक सहभागी होत आहेत. या युवकांनी स्वच्छता आणि सुरक्षिततेचा संकल्प करावा, हा संकल्प सर्वांपर्यंत पोहोचवावा, युवकांनी स्वच्छता आणि सुरक्षितेसाठी उचललेले पाऊल अभिमानास्पद आहे, असे प्रतिपादन सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांनी केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रेरणेने मुंबईत ५ जुलैपासून सुरू करण्यात आलेल्या ७५ दिवसांच्या 'स्वच्छ समुद्र, सुरक्षित समुद्र' अभियानातंर्गत सागरी किनारा स्वच्छता आंतरराष्ट्रीय दिनाच्या निमित्ताने गिरगाव चौपाटी येथे आयोजित विशेष स्वच्छता कार्यक्रमात श्री. चव्हाण बोलत होते.

या वेळी मुंबईचे जिल्हाधिकारी राजीव निवतकर, अनंत सिंघानिया, समीर सोमय्या, अजित मांगरुलकर, रवींद्र सांगवी, भारतीय तटरक्षक दलातील वरिष्ठ आधिकारी यांच्यासह नागरिक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

### भरडधान्य खरेदीस परवानगी

राज्य शासनाने केंद्र सरकारकडे सादर केलेल्या धान व भरडधान्य खरेदीच्या आराखड्यास केंद्राने मान्यता दिली असून, राज्यास १ कोटी, ४९ लाख क्विंटल धान व ६१,०७५ क्विंटल भरडधान्य खरेदीस परवानगी दिल्याची माहिती अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री रवींद्र चव्हाण यांनी दिली.

खरीप पणन हंगाम २०२२-२३ मध्ये धान व भरडधान्य खरेदी संदर्भात मंत्रालयात त्यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. या वेळी विभागाचे सचिव विजय वाघमारे, मार्केट फेडरेशनचे व्यवस्थापकीय संचालक सुधाकर फेले, पालघरचे जिल्हाधिकारी गोविंद बोडके, सहसचिव सुधीर तुंगार, उपायुक्त पुरवठा व सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी उपस्थित होते.

### माझा एक दिवस बळीराजासाठी

शेतकरी बांधवांना येणाऱ्या अडचणी दूर करून त्यांचे आर्थिक सक्षमीकरण व

### सामंजस्य करार

राज्यातील बारावीच्या १५ हजार विद्यार्थ्यांना रोजगार व शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यासाठी टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस सोबत सामंजस्य करार करण्यात आल्याची माहिती शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी दिली. यापूर्वी एचसीएल कंपनीसोबत करार झालेल्या 'मिलाप' या कार्यक्रमांतर्गत २५ हजार विद्यार्थ्यांना रोजगार उपलब्ध होणार असल्याने या दोन करारांद्वारे ४० हजार विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच रोजगाराची संधी उपलब्ध होणार असल्याचे त्यांनी सांगितले.



शालेय शिक्षण मंत्री श्री.केसरकर यांच्या उपस्थितीत मंत्रालयातील दालनात झालेल्या या करार हस्तांतरण कार्यक्रमास शालेय शिक्षण सचिव रणजितसिंह देओल, समग्र शिक्षा राज्य प्रकल्प संचालक कैलास पगारे, सहसचिव इम्तियाज काझी, टाटा इन्स्टिट्यूटच्या वतीने स्कूल ऑफ व्होकेशनल एज्युकेशनच्या प्रमुख प्राचार्य मधुश्री शेखर, तानिया शॉ, विनीता कौशल आदी उपस्थित होते.

जीवनमान उंचावण्यासाठी सर्वंकष धोरण निर्माण करण्यात येईल. 'माझा एक दिवस माझ्या बळीराजासाठी' उपक्रमातून शेतकऱ्यांच्या अडचणी जाणून त्या कायमस्वरूपी दूर करण्यासाठी प्रभावी उपाययोजना राबवण्यात येतील, असे प्रतिपादन कृषी मंत्री अब्दुल सत्तार यांनी केले.

कृषी विभागाच्या 'माझा एक दिवस माझ्या बळीराजासाठी' या राज्यस्तरीय उपक्रमाचा शुभारंभ कृषी मंत्री श्री. सत्तार यांच्या उपस्थितीत अमरावती जिल्ह्यातील धारणी तालुक्यातील सादराबाडी येथे झाला. कृषी मंत्री श्री. सत्तार यांचे रात्री अकराच्या सुमारास साद्राबाडी येथे आगमन झाले. त्यांनी गावातील शैलेंद्र सावलकर या शेतकरी बांधवाच्या घरी मुक्काम केला. या शेतकरी कुटुंबासोबत जेवण केले. या वेळी त्यांनी गावकऱ्यांशी संवाद साधून शेतीबाबत विविध विषयांची माहिती घेतली. शैलेंद्र सावलकर, संजू धांडे, दत्तात्रय पटेल, सरपंच लक्ष्मीताई पटेल, तसेच इतर शेतकरी बांधवांशी चर्चा करून शेतीविषयक अडचणी व आवश्यक उपाययोजना याबाबत माहिती जाणून घेतली.

## रोजगाराभिमुख शिक्षण

राज्यातील बारावीच्या १५ हजार विद्यार्थ्यांना शिक्षण व रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे. यासाठी टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेससोबत नुकताच सामंजस्य करार करण्यात आला असून यासाठीच्या नोंदणीची सुरुवात येत्या १ ऑक्टोबर २०२२ पासून सुरू होणार असल्याची माहिती शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी दिली.

शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर, शालेय शिक्षण सचिव रणजितसिंह देओल, समग्र शिक्षा राज्य प्रकल्प संचालक कैलास पगारे तसेच टाटा इन्स्टिट्यूटच्या वतीने स्कूल ऑफ व्होकेशनल एज्युकेशनच्या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झालेल्या करारानुसार या अभ्यासक्रमासाठी https://admissions.tiss.edu या संकेतस्थळावर नोंदणी करता येणार असून डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यापर्यंत प्रवेशाची अंतिम तारीख असेल, तर जानेवारी २०२३ च्या दुसऱ्या आठवड्यात प्रत्यक्ष अभ्यासक्रमाची सुरुवात होणार आहे. अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना नॅशनल स्किल क्वॉलिफिकेशन फ्रेमवर्क आधारित प्रमाणपत्र देण्यात येईल. यामध्ये पहिल्या वर्षानंतर डिप्लोमा कोर्स, दुसऱ्या वर्षानंतर डव्हान्स डिप्लोमा कोर्स, तर तिसऱ्या वर्षानंतर बॅचलर इन व्होकेशनल एज्युकेशन हे प्रमाणपत्र मिळेल.

## विविध कल्याणकारी योजना



राज्याच्या पोलीस अधिकारी-कर्मचारी यांच्या कल्याणासाठी पोलीस विभागात अनेक योजना राबवल्या जातात. याच धर्तीवर राज्य उत्पादन शुल्क विभागातील कर्मचाऱ्यांसाठी योजना राबवण्यात याव्यात. या योजनाबाबत प्रस्ताव तयार करण्याचे निर्देश राज्य उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाई यांनी दिले.

मंत्री श्री. देसाई यांच्या अध्यक्षतेखाली पोलीस विभागातील विविध कल्याणकारी योजना या राज्य उत्पादन शुल्क विभागात राबवण्याबाबत आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीस अपर मुख्य सचिव नितीन करीर, अतिरिक्त पोलीस महासंचालक अनुप कुमार सिंग, आयुक्त राज्य उत्पादन शुल्क विभाग कांतीलाल उमाप, उपसचिव राज्य उत्पादन शुल्क युवराज अजेटराव यांच्यासह विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## 'महाज्योती'च्या माध्यमातून उपक्रम

विविध अभ्यासक्रम तसेच स्पर्धा परीक्षांमधील विद्यार्थी आणि उमेदवार यांच्यासाठी 'महाज्योती'ने आर्थिक पाठबळ देण्याचा निर्णय घेतला असून, ओबीसी विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम राबवणार असल्याचे इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी सांगितले.

'महाज्योती'च्या संचालक मंडळाच्या बैठकीत मंत्री श्री. सावे बोलत होते. या बैठकीला महाज्योतीचे व्यवस्थापकीय संचालक प्रदीप डांगे, संचालक डॉ. सिद्धार्थ गायकवाड, मुख्य लेखा व वित्त अधिकारी अतुल वासनिक, कंपनी सेक्रेटरी अविनाश गंधेवार उपस्थित होते.

पीएच.डी. करणाऱ्या उमेदवारांना ॲवॉर्ड दिनांकापासून पहिल्या दोन वर्षांसाठी ३१ हजार रुपये, तसेच घरभाडे भत्ता आणि आकस्मिक खर्च, तर पुढील तीन वर्षांसाठी ३५ हजार रुपये तसेच घरभाडे भत्ता आणि आकस्मिक खर्च देण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली. एम.फिल. उमेदवारांना एम.फिल ते पीएच.डी. असे एकत्रित देण्याबाबत बार्टी, पुणेच्या तज्ज्ञ समितीने दिलेल्या शिफारशीनुसार कार्यवाही करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. एम.फिल. उमेदवारांना ३१ हजार रुपये, घरभाडे भत्ता आणि आकस्मिक खर्च देण्याचा निर्णयही घेण्यात आला. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेसाठी दिल्ली येथे प्रशिक्षण घेणाऱ्या उमेदवारांना मासिक

विद्यावेतन १३ हजार रुपये आणि १८ हजार रुपये आकस्मिक एकवेळ खर्च देण्याचा निर्णय घेण्यात आला.

राज्य लोकसेवा आयोगाच्या राज्य सेवा मुख्य परीक्षा उत्तीर्ण झालेल्या आणि मुलाखतीस पात्र उमेदवारांना २५ हजार रुपये एकवेळ अर्थसाहाय्य देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. व्यावसायिक वैमानिक प्रशिक्षणासाठी निवड झालेल्या २० उमेदवारांना १० हजार रुपये प्रतिमाह विद्यावेतन देण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे मंत्री श्री. सावे यांनी सांगितले.

## राष्ट्रीय महामार्गाच्या कामाचा आढावा

कराड ते चिपळूण राष्ट्रीय महामार्गाच्या प्रलंबित कामाबाबत राज्य उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाई यांनी मंत्रालयात आढावा घेतला. मंत्री श्री.देसाई म्हणाले, नाडे, मल्हारपेठ, आडूळ, म्हावशी या गावातील अपूर्ण राहिलेली कामे तत्काळ पूर्ण करावी. हेळवाक ते ढाणकल रस्त्याचे डांबरीकरणाचे काम तातडीने पूर्ण करावे. पाटण ते संगमनगर नव्याने होणाऱ्या रस्त्याच्या काँक्रिटीकरणाचे काम लवकरात लवकर सुरू करण्यात यावे. तसेच कराड ते चिपळूण या राष्ट्रीय महामार्गावरील प्रलंबित रस्त्याची कामे एल अँड टी कंपनीने तातडीने पूर्ण करावीत, अशा सूचना संबंधितांना मंत्री श्री. देसाई यांनी दिल्या.

या बैठकीस साताऱ्याचे जिल्हाधिकारी रूचेश जयवंशी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनय गौडा, मुख्य अभियंता संतोष शेलार, अधीक्षक अभियंता संभाजी धोत्रे तसेच विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## ई-बस व बायोटॉयलेट सुविधेचे लोकार्पण

सातारा जिल्ह्यातील कास पठारावरील पर्यटन आता प्रदूषणमुक्त आणि पर्यावरणपूरक होणार असून यासाठी पर्यटनमंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या हस्ते तिथे सुरू करण्यात येत असलेल्या ४ ई-बसेसचे तसेच बायोटॉयलेट सुविधेचे लोकार्पण करण्यात आले. तेथील पर्यटनाला चालना देण्यासाठी वॉक वे तसेच दर्शन गॅलरी (व्हिविंग गॅलरी) सुरू करणे, स्थानिकांना रोजगार वाढवण्यासाठी आराखडा तयार करणे, सुरक्षा वाढवणे तसेच, घनकचरा व्यवस्थापन याबाबतही कार्यवाही करण्यात येईल मंत्री श्री.लोढा यांनी सांगितले. मंत्रालयातून मंत्री श्री. लोढा यांच्या हस्ते दूरदृश्यप्रणालीद्वारे, ई-बसेसचा शुभारंभ करण्यात आला. याप्रसंगी अपर मुख्य सचिव डॉ. नितीन करीर, पर्यटन संचालक मिलिंद बोरीकर, सहसंचालक धनंजय सावळकर उपस्थित होते, तर दूरदृश्यप्रणालीद्वारे सातारा येथून आमदार छत्रपती शिवेंद्रसिंह राजे भोसले, जिल्हाधिकारी रूचेश जयवंशी यांसह इतर अधिकारी या वेळी उपस्थित होते.

## पर्यटन गीताचे लोकार्पण

राज्याला गडकिल्ले, समुद्रकिनारे, मंदिरे, ऐतिहासिक वास्तू यांचा समृद्ध वारसा लाभला आहे. त्यामुळे आंतरराज्य तसेच आंतरराष्ट्रीय पर्यटकांसाठी महाराष्ट्र नेहमीच आकर्षणाचा केंद्रबिंदू राहिला आहे. महाराष्ट्राला पर्यटन क्षेत्रात अग्रस्थानी ठेवण्यासाठी आपण सर्वजण प्रयत्न करु या, असे आवाहन पर्यटन मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी केले.

जागतिक पर्यटन दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळातर्फे यशवंतराव चव्हाण सेंटर येथे आयोजित कार्यक्रमात पर्यटनमंत्री श्री. लोढा बोलत होते. या वेळी पर्यटन विषयक प्रसिद्धी मोहीम, पर्यटनाबाबत सामंजस्य करार, पर्यटन क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मान्यवरांचा सत्कार, गायक शंकर महादेवन व अमृता फडणवीस यांनी गायलेल्या महाराष्ट्र पर्यटन गीताचे लोकार्पण करण्यात आले. या कार्यक्रमास अप्पर मुख्य सचिव डॉ. नितीन करीर, पर्यटन संचालनालयाचे संचालक मिलिंद बोरीकर यांच्यासह पर्यटन क्षेत्रातील विविध मान्यवर उपस्थित होते.

**– टीम लोकराज्य**

## स्वच्छता अभियानास प्रतिसाद




गेट वे ऑफ इंडिया हे पर्यटकांचे आकर्षण केंद्र आहे. या ठिकाणी अनेक पर्यटक मोठ्या प्रमाणात भेट देतात. पर्यटन स्थळ स्वच्छ व सुंदर ठेवणे सर्वांचेच कर्तव्य आहे. गेट वे ऑफ इंडिया परिसर स्वच्छता अभियानात सर्वजण सहभागी झाले आहेत. या उपक्रमास सर्वांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे, असे पर्यटन मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी सांगितले.

जागतिक पर्यटन दिनाचे औचित्य साधून गेट वे ऑफ इंडिया परिसरात स्वच्छता अभियान आयोजित करण्यात आले होते. या वेळी नगरसेवक हर्षिता नार्वेकर, मकरंद नार्वेकर, पर्यटन संचालक मिलींद बोरीकर, अमृता फडणवीस, सहायक संचालक धनंजय सावळकर, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे महाव्यवस्थापक चंद्रशेखर जयस्वाल, मुंबई महापालिकेचे सहायक आयुक्त एस.के.गुरव, दिव्याज फाऊंडेशन, ब्राईट फ्युचर या संस्थानी या स्वच्छता मोहिमेमध्ये सहभाग घेतला.

राज्य मंत्रिमंडळाच्या १२, २१, २७ सप्टेंबर आणि ४ ऑक्टोबर २०२२ रोजीच्या बैठकीत मदत व पुनर्वसन, वित्त, जलसंपदा, विधि व न्याय, सहकार, ग्रामविकास, उच्च व तंत्रशिक्षण, गृह, सामाजिक न्याय, शालेय शिक्षण, परिवहन, पणन, गृहनिर्माण, सामान्य प्रशासन, अन्न व नागरी पुरवठा, नियोजन, वैद्यकीय शिक्षण, नगरविकास, गृह, इतर मागास बहुजन कल्याण, अल्पसंख्याक विकास, वने, महसूल अन्न व नागरी पुरवठा आदी विभागाचे महत्त्वपूर्ण निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आले. या निर्णयांची थोडक्यात माहिती...



# मंत्रिमंडळात ठरले !

## सर्वसमावेशक धोरण

राज्यामध्ये अतिवृष्टीने निर्माण झालेल्या पुरासारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित गावांचे पुनर्वसन करण्याबाबतच्या सर्वसमावेशक धोरणास मान्यता देण्यात आली. त्यानुसार बाधित गाव, वाडी, तांड्यांचे नवीन ठिकाणी स्थलांतर करून त्यांना नागरी सुविधा देण्यात येतील.

अतिवृष्टीमुळे आलेला पूर, जमिनीचे भूस्खलन किंवा जमिनीला मोठमोठ्या भेगा पडणे, डोंगर खचणे किंवा दरडी कोसळणे इ. प्रकारची ज्या ज्या वेळी नैसर्गिक आपत्ती येते त्या त्या वेळी नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीची भरपाई प्रचलित धोरणानुसार शासनस्तरावरून उपलब्ध करून देण्यात येते.

पुरग्रस्तांच्या पुनर्वसनाबाबत शासनाचे धोरण निश्चित होऊन जवळपास १५ वर्षांपेक्षा जास्त कालावधी असून सध्याची आर्थिक, भौतिक व सामाजिक परिस्थिती तसेच शासनाची प्रचलित धोरणे विचारात घेता, पुरामुळे तसेच इतरही नैसर्गिक आपत्तींमुळे बाधित तसेच या प्रकारची नैसर्गिक व आपत्तिप्रणव असलेल्या गावाचे, वाडीचे, तांड्याचे तातडीने नवीन ठिकाणी स्थलांतरित करून पुनर्वसन करण्याकरिता सर्वसमावेशक असे धोरण निश्चित करण्याबाबतचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला.

अतिवृष्टीमुळे आलेला पूर, जमिनीचे भूस्खलन किंवा जमिनीला मोठमोठ्या भेगा पडणे, डोंगर खचणे किंवा दरडी कोसळणे इ. नैसर्गिक आपत्तीमुळे एखाद्या बाधित गावाचे, वाडीचे, तांड्याचे तसेच या प्रकारची नैसर्गिक आपत्तिप्रवण असलेल्या गावाचे नवीन ठिकाणी स्थलांतरित करून पुनर्वसन करण्याकरिता त्या ग्रामीण भागातील पात्र लाभधारकांच्या पुनर्वसनाकरिताचे निकष, पुनर्वसित गावठाणामध्ये उपलब्ध करून द्यावयाच्या नागरी सुविधा व त्याची अंमलबजावणी कशा प्रकारे करावी, यासंदर्भात देखील निर्णय घेण्यात आला.

## खंडपीठांना मुदतवाढ

विक्रीकर न्यायाधिकरणाच्या नव्याने स्थापन करण्यात आलेल्या मुंबई, पुणे, नागपूर खंडपीठांना ३१ मार्च २०२४ पर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच मुंबईतील खंडपीठ पुणे येथे स्थलांतरित करण्यासही मंत्रिमंडळाने मान्यता दिली. या तीन खंडपीठांकरिता निर्माण करण्यात आलेल्या एकूण ४१ नियमित व बाह्ययंत्रणेच्या १२ सेवा अशा एकूण ५३ पदांनाही मुदतवाढ देण्यास तत्वतः मान्यता देण्यात आली.

मुंबई विक्रीकर कायदा व मुल्यवर्धित कर कायद्यांतर्गत महाराष्ट्र विक्रीकर न्यायाधिकरणासमोर प्रलंबित व नव्याने दाखल होणाऱ्या अपील प्रकरणांचा जलदगतीने निपटारा करण्यासाठी न्यायाधीकरणाची तीन नवीन खंडपीठे मुंबई, पुणे व नागपूर येथे दोन वर्षांच्या कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरूपात स्थापन करण्याचा निर्णय १९ सप्टेंबर २०१७ च्या



मंत्रिमंडळ बैठकीमध्ये घेण्यात आला होता. यामुळे महाराष्ट्र विक्रीकर न्यायाधिकरणाकडे प्रलंबित प्रकरणे निकालात निघतील, तसेच थकीत कराची वसुली होऊन महसुली उत्पन्नात वाढ होणे अपेक्षित आहे.

## उर्ध्व गोदावरी प्रकल्पास सुप्रमा

नाशिक जिल्ह्यातील उर्ध्व गोदावरी प्रकल्पाच्या १ हजार ४९८ कोटी ६१ लाख रुपये खर्चास चौथी सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला. हा प्रकल्प आदिवासी क्षेत्रात असून गोदावरी नदीच्या उपनद्यांवर आहे. नाशिक,



अहमदनगर, औरंगाबाद या जिल्ह्यांतील ७४ हजार २१० हेक्टर सिंचन क्षेत्रास याचा लाभ होईल. यामुळे नाशिक व नगर जिल्ह्यातील सिंचनाच्या पाण्याची तूट भरून निघेल.

### सिन्नर येथे दिवाणी न्यायालय

नाशिक जिल्ह्यातील सिन्नर येथे दिवाणी न्यायालय (वरिष्ठ स्तर) स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. यासाठी १६ नियमित व ४ पदे बाह्य यंत्रणेद्धारे अशा २० पदांनादेखील मान्यता देण्यात आली. यासाठी एकूण ९७ लाख ८६ हजार रुपये खर्च येणार आहे. बहुसंख्य पक्षकारांना पाच लाखांवरील दिवाणी दावे तसेच विवाह याचिका, लँड रेफरन्स ही प्रकरणे दाखल करण्यासाठी नाशिकच्या न्यायालयात जावे लागत असल्याने पक्षकारांची आणि वकीलांचे हाल होतात आणि पक्षकारांना न्याय मिळण्यास अडचणी निर्माण होतात म्हणून हा निर्णय घेण्यात आला.

### सहकारी संस्थांचे संगणकीकरण

केंद्र पुरस्कृत प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांचे संगणकीकरण या नव्या योजनेची अंमलबजावणी राज्यात करण्यास मान्यता देण्यात आली. एकंदर १२ हजार सहकारी संस्थांना याचा लाभ होणार आहे. या योजनेसाठी राज्याच्या हिश्श्याची १५६ कोटी ५५ लाख रक्कम २०२२-२३ ते २०२४-२५ या तीन वर्षात उपलब्ध करून देण्यात येतील आणि त्यासाठी २०२२-२३ या वर्षासाठी ५१ कोटी ८ लाख रुपये उपलब्ध करून देण्यात येतील.

नाबार्डच्या पुढाकाराने राज्यातील ३१ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकामध्ये



सीबीएस संगणक प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे. तथापि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना संलग्न असलेल्या बहुतांश कृषी पतपुरवठा सहकारी संस्थामध्ये अद्यापही संगणक प्रणाली नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना आणि सभासदांना विविध प्रकारच्या सेवा सक्षमपणे पुरवण्यासाठी ही सेवा उपयोगी ठरेल. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी सहकार विभागाच्या अपर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय तर जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय संनियंत्रण समिती स्थापन करण्यात येत आहे.

### प्रशासकांच्या कालावधीत वाढ

राज्यातील ग्रामीण भागातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रशासकांचा कालावधी वाढवण्यासंदर्भात महाराष्ट्र जिल्हा परिषद अधिनियमात सुधारणा करून अध्यादेश काढण्याचा निर्णय घेण्यात आला. सर्वोच्च



न्यायालयाने दिलेल्या आदेशामुळे ग्रामीण भागातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका सप्टेंबर-२०२२ पूर्वी पार पडणार नसल्यामुळे हा निर्णय घेण्यात आला.

राज्यातील २५ जिल्हा परिषदा आणि २८३ पंचायत समित्यांच्या प्रशासक नियुक्तीचा कार्यकाळ सप्टेंबर-२०२२ मध्ये संपत आहे. मात्र राज्य निवडणूक आयोगाची प्रक्रिया आणि सर्वोच्च न्यायालयाचे आदेश लक्षात घेता या निवडणुका सप्टेंबरपूर्वी पार पडणार नसल्यामुळे महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ मधील कलम ९१-ब व कलम ७५-ब मधील प्रशासक नियुक्तीचा महत्तम कालावधी हे परंतूक वगळणे आवश्यक आहे. यासाठी हा निर्णय घेण्यात आला.

### संगीत महाविद्यालयातील अभ्यासक्रम

भारतरत्न लता दीनानाथ मंगेशकर आंतरराष्ट्रीय संगीत महाविद्यालयातील प्रमाणपत्र अभ्यासक्रम पु.ल. देशपांडे अकादमीमध्ये तात्पुरत्या काळासाठी २८ सप्टेंबरपासून सुरू करण्यास मान्यता देण्यात आली. या संदर्भात १४ सदस्यांची समिती गठण करण्यात आली होती. तसेच १६ ऑगस्ट रोजी झालेल्या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी निर्देश दिले होते. त्यानुसार एकूण एक वर्ष कालावधीचे सहा अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहेत. त्यामध्ये मिळून १५० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येतील.

या अभ्यासक्रमांमध्ये हिंदुस्थानी शास्त्रीय संगीतातील प्रमाणपत्र अभ्यासक्रम, भारतीय बासरी वादन, तबला वादन, सतार वादन, हार्मोनियम/किबोर्ड वादन, ध्वनी अभियांत्रिकी अशा अभ्यासक्रमांचा समावेश आहे. या महाविद्यालयाचे कामकाज व्यवस्थित व उत्कृष्ट दर्जाचे होण्यासाठी हृदयनाथ मंगेशकर यांच्या अध्यक्षतेखाली सल्लागार मंडळ नेमण्यात आले असून यामध्ये उषा मंगेशकर, आदिनाथ मंगेशकर, सुरेश वाडकर, मयुरेश पै तसेच कला संचालक सदस्य असतील. या महाविद्यालयासाठी ग्रंथालय संचालनालयाची कलिना येथील ७ हजार चौरस मीटर जागा कला संचालकांकडे सुपुर्द करण्यात येत आहे. सध्या तात्पुरत्या स्वरूपात पु.ल.देशपांडे कला अकादमीची जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

सध्या अध्यापक पदे ही मानधन तत्त्वावर तसेच लिपिक टंकलेखक पदे बाह्य यंत्रणेकडून भरण्यात येतील. याशिवाय यंत्रसामग्री व साधनसामग्रीदेखील खरेदी करण्यात येईल. यासाठी महिन्याला सुमारे १ कोटी ७५ लाख खर्च येईल.

### मालमत्ता पुनर्रचना कंपनी

राज्यात केंद्र सरकारच्या धर्तीवर राज्य



मालमत्ता पुनर्रचना कंपनी स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. यामुळे शासनाची जमीन, भागभांडवल, कर्ज, कर्ज हमी याबाबतीतील सार्वजनिक हिताचे रक्षण होईल. केंद्र सरकारकडे नॅशनल सेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी आहे. सध्या राज्य शासन विविध संस्थांना जमीन, भागभांडवल, अनुदान, कर्ज हमी देते. त्यांच्या मालमत्ता वेगवेगळ्या कारणास्तव संकटात सापडल्या तर त्यांच्या पुनर्निर्माणात शासनाची भूमिका मर्यादित असते. पर्यायाने शासनाचे म्हणजेच जनतेचे नुकसान होते. राज्य मालमत्ता पुनर्रचना कंपनी स्थापन झाल्यास अशा आजारी व पारदर्शक कारभार न करणाऱ्या संस्थांचे पुनर्निर्माण करणे शक्य होईल.

या कंपनीचे भागभांडवल १११ कोटी निश्चित करण्यात आले असून वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव कंपनीचे अध्यक्ष आणि वित्तीय सुधारणा सचिव, व्यवस्थापकीय संचालक, सार्वजनिक उपक्रम सहसचिव संचालक आणि सहकार तसेच वस्त्रोद्योग आणि उद्योग विभागाचे प्रधान सचिव पदसिद्ध संचालक असतील.

## पोलिसांच्या रजा वाढवल्या

राज्यातील पोलीस शिपाई ते पोलीस निरीक्षक यांच्या नैमितिक रजा १२ पासून २० इतक्या वाढवण्याचा घेण्यात आला. पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना एक वर्षात १२ ऐवजी ८ रजा मंजूर करण्याचा निर्णय शासनाने घेतला होता व त्या अनुषंगाने विशेष बाब म्हणून पोलीस अधिकारी कर्मचाऱ्यांना १२ दिवस नैमित्तिक रजा मंजूर करण्यात आल्या. मात्र, पोलिसांवरील कामाचा वाढता ताण, विविध सण आणि उत्सवाच्या अनुषंगाने बंदोबस्त, व्हीआयपी ड्युट्या यामुळे या नैमित्तिक रजा आणखी वाढवून २० दिवस करण्याची विशेष बाब म्हणून मंजूर करण्यात आली.

## उपसमिती नेमण्याचा निर्णय

सफाई कामगारांच्या वारसा हक्काच्या अंमलबजावणीत सुधारणा करण्यासाठी मंत्रिमंडळ उपसमिती नेमण्याचा निर्णय घेण्यात आला. सफाईगार व मेहतर हे अनुसूचित तसेच इतर जातीतील असतात. त्यांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीच्या तसेच कामाच्या पद्धतीचा अभ्यास करण्यासाठी केंद्र व राज्य शासनाने विविध समित्या नेमल्या होत्या. या कामगारांचे जीवनमान उंचावण्यासाठी लाड समितीच्या शिफारशीनुसार वारसा हक्काची अंमलबजावणी करण्यासाठी सर्व संबंधितांना सूचना देण्यात आल्या होत्या. या समितीच्या शिफारशींचा अभ्यास करून निर्णय घेण्यासाठी मंत्रिमंडळ उपसमिती नेमण्याचा निर्णय घेण्यात आला.

## वसतिगृहाकरिता भाडेतत्त्वावर जागा

नाशिक येथील शासकीय अध्यापक विद्यालयाच्या मुलींच्या वसतिगृहाकरिता भाडेतत्त्वावर जागा देण्यासंदर्भात करार करण्यासाठी निर्णय घेण्यात आला. नाशिक येथे मुलींचे शासकीय वसतिगृह ज्या जागेत आहे त्या जागेतील २४८५ चौरस मीटर क्षेत्र वसतिगृहाच्या म्हणजेच शासनाच्या ताब्यात आहे. या ठिकाणी वसतिगृहाचे जेवढे क्षेत्रफळ आहे तेवढे म्हणजेच ११९० चौ. मी. चटईक्षेत्राचे बांधकाम जमीन मालकाने करून द्यावे आणि त्यासाठी शालेय शिक्षण विभागास ५८२ चौ.मी. इतकी जागा कायमस्वरूपी मालकी तत्त्वावर वर्ग करण्यात यावी, अशा स्वरूपाच्या काही अटी व शर्ती या करारात असतील.



## नवीन रेल्वे मार्गाला वेग

वडसा देसाईगंज-गडचिरोली या नवीन रेल्वे मार्गाला वेग देण्यासाठी १ हजार ९६ कोटी इतक्या द्वितीय सुधारित खर्चास आणि राज्य शासनाच्या ५० टक्के आर्थिक सहभागास मान्यता देण्यात आली. त्यानुसार ५४८ कोटी राज्य शासनाच्या



हिश्श्याचे असतील. सध्या या रेल्वे मार्गाची केवळ ७ टक्के भौतिक प्रगती झाली आहे. सन २०१० या वर्षी प्रकल्पाची किंमत २०० कोटी रुपये होती, २०१५ या वर्षी ती ४६९ कोटी रुपये झाली. प्रकल्प खर्चात विविध कारणांमुळे वाढ झाली.

या प्रकल्पासाठी भूसंपादनाचा मोबदला त्वरित द्यावा. तसेच वन विभागाशी संबंधित मुद्दे तातडीने मार्गी लावावेत, असे निर्देशही मंत्रिमंडळाने परिवहन विभागास दिले. ३१ मार्च २०२२ पर्यंत केंद्र सरकारने या प्रकल्पासाठी २९ कोटी २२ लाख रुपये निधी दिला असून राज्य सरकारने १९ कोटी २२ लाख रुपये इतका निधी दिला आहे.

## कांदा अनुदान योजना

बार्शी येथील लक्ष्मी सोपान ॲग्रिकल्चर प्रोड्युस मार्केटिंग कंपनी या खासगी बाजार समितीचा कांदा अनुदान योजनेत समावेश करण्याचा निर्णय घेण्यात आला. या खासगी कंपनीला आगामी अधिवेशनात पुरवणी मागणीद्वारे ७ कोटी ४७ लाख रुपये उपलब्ध करून वितरित करण्यात येतील. तसेच हे कांदा अनुदान थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यांवर पणन संचालकांमार्फत जमा केले जातील.

## औसा येथे न्यायालय स्थापन

लातूर जिल्ह्यातील औसा येथे दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर न्यायालय स्थापन करून पद निर्मिती करण्यास मान्यता देण्यात आली. यासाठी ७ पदे नव्याने निर्माण करण्यात येतील, तर १५ पदे औसा दिवाणी न्यायालय (कनिष्ठ स्तर) यांच्याकडून हस्तांतरित होतील. यासाठी सुमारे ६५ लाख रुपये इतक्या खर्चास देखील मान्यता देण्यात आली. औसा-

लातूर या दोन्ही ठिकाणांमध्ये १८ कि.मी. अंतर असून १३९ गावांतील पक्षकारांना लातूर येथे ये-जा करावी लागते.

## धारावी पुनर्विकासासाठी निविदा

धारावी पुनर्विकासासाठी पुन्हा नव्याने निविदा मागवून तसेच प्रकल्पाला अतिरिक्त सवलती देऊन प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात आली. धारावी पुनर्विकास प्रकल्पाचा विशेष हेतू कंपनी मॉडेलच्या माध्यमातून (एसपीव्ही) एकत्रित पुनर्विकास करण्यासाठी पुन्हा नव्याने निविदा मागवून तसेच प्रकल्पाला अतिरिक्त सवलती देण्याचा निर्णय घेण्यात आला. यामध्ये रेल्वे जमीन विकास प्राधिकरणामार्फत रेल्वेच्या जमिनीच्या हस्तांतरणाचा उल्लेख केलेल्या अटी व शर्ती देखील असतील. या संदर्भात ५ नोव्हेंबर २०१८ रोजीचा शासन निर्णय रद्द करण्याबाबतचा गृहनिर्माण विभागामार्फत काढण्यात आलेला १५ सप्टेंबर २०२२ चा शासन निर्णय रद्द करण्यात आला आहे. त्यामुळे ५ नोव्हेंबरचाच शासन निर्णय पुनरुज्जीवित करण्यात येईल.

कोविडच्या आजारातून उद्‌भवलेली स्थिती आणि एकूणच बाजारातील मंदीचा विचार करून निविदेच्या अटी व शर्तीमध्ये सुधारणा करून रेल्वेच्या अंदाजे ४५ एकर जागेचा प्रकल्पात समावेश करण्याबाबत मान्यता देण्यात आली.

## लिपिकांची सर्व रिक्त पदे भरणार

राज्यातील वर्ग-३ मधील लिपिकांची सर्व रिक्त पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्याचा निर्णय घेण्यात आला. सध्या राज्यातील अ आणि ब गटातील अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही आयोगामार्फत केली जाते. आयोगाच्या कार्यक्षमतेचा विचार करून मुंबईप्रमाणेच राज्यभरातील लिपिकांची देखील रिक्त पदे आयोगामार्फतच भरण्यात यावीत असे ठरले.



## आपत्ती निवारणांसदर्भात उपसमिती

आपत्ती निवारणाच्या विविध प्रकरणांची चर्चा व निर्णय घेण्यासाठी मंत्रिमंडळ उपसमितीची स्थापना करण्याचा निर्णय घेण्यात आला. राज्यात विविध नैसर्गिक आपत्तीमुळे संकटे येतात या संदर्भात मदत पुनर्वसन तसेच इतर बाबतीत योग्य तो निर्णय घेण्यामध्ये सुसूत्रता राहावी म्हणून मंत्रिमंडळ उपसमितीची स्थापना करण्याचा निर्णय घेण्यात आला.

## फोर्टिफाईड तांदूळ वितरण

राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये फोर्टिफाईड तांदूळ (पोषणतत्त्व गुणसंवर्धित तांदूळ) सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत दोन टप्प्यांमध्ये वितरित करण्यास मान्यता देण्यात आली. केंद्र सरकारच्या अन्न व सार्वजनिक विभागाच्या पत्रान्वये तीन टप्प्यात ही योजना राबवण्यास मंजुरी दिली आहे. त्यातील पहिला टप्पा मार्च २०२२ पर्यंत राज्याच्या महिला व बालविकास आणि शालेय शिक्षण विभागामार्फत राबवण्यात आला आहे. आता ही योजना एप्रिल-२०२२ ते मार्च-२०२३ पर्यंत नंदुरबार, वाशिम, गडचिरोली, उस्मानाबाद या चार आकांक्षित जिल्ह्यांमध्ये तसेच बुलडाणा, परभणी, नाशिक, नंदुरबार, जालना, ठाणे, यवतमाळ, वाशिम, नांदेड, अकोला, औरंगाबाद, उस्मानाबाद आणि हिंगोली या १३ जिल्ह्यांमध्ये हा फोर्टिफाईड तांदूळ वितरित करण्यात येईल.

एप्रिल-२०२३ ते मार्च-२०२४ या कालावधीत राज्यातील वरील चारही आकांक्षित आणि अतिरिक्त भार जिल्ह्यांसह उर्वरित सर्व जिल्ह्यांमध्ये हा तांदूळ वितरित करण्यात येईल. तथापि, सध्याच्या खरीप हंगामात खरेदी होणाऱ्या धानाच्या भरडाई नंतर प्राप्त होणाऱ्या तांदुळाची फोर्टिफिकेशन प्रक्रिया सुरू झाल्यास मार्च-२०२३ पूर्वीच वितरण पूर्ण करण्यात येईल. या संपूर्ण कालावधीत भरडाई सुरू असताना सर्वसाधारण तांदळात एफआरके मिसळून हा फोर्टिफाईड तांदूळ तयार करण्यासाठी जिल्हाधिकारी स्तरावरून नोंदणीकृत मिलर्सची निवड करण्यात येईल. या एफआरके पुरवठादारांची राज्यस्तरावर खुल्या स्पर्धात्मक निविदेद्वारे निवड कमीत कमी दर प्राप्त तीन वर्षाकरिता करण्यात येईल. फोर्टिफिकेशन तसेच वितरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती गठित करण्यात येईल.



यासाठी येणाऱ्या दुसऱ्या टप्प्यातील ६८ कोटी ९३ लाख रुपये खर्चास तसेच तिसऱ्या टप्प्यातील २२१ कोटी रुपये एवढ्या खर्चास मान्यता देण्यात आली. सर्वसाधारण कच्च्या तांदळाच्या फोर्टिफिकेशनसाठी एफआरके खरेदीसाठी प्रतिक्विंटल ७३ रुपये आणि इतर आनुषंगिक खर्चाची १०० टक्के प्रतिपूर्ती केंद्राकडून होणार आहे. मात्र हा खर्च प्रथम राज्य शासनास करावा लागणार आहे.

## विकास मंडळे पुनर्गठित

राज्यातील विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र या तीनही विकास मंडळांच्या पुनर्गठनासाठी केंद्र सरकारला विनंती करण्याच्या निर्णयास मान्यता देण्यात आली. या विकास मंडळांना वैधानिक विकास मंडळे असे संबोधण्याचा देखील निर्णय झाला. या तीनही मंडळांचा कालावधी ३० एप्रिल २०२० रोजी संपुष्टात आला आहे. आता पुनर्गठनाबाबतचा प्रस्ताव पाठवताना तो राज्यपालांमार्फत केंद्र सरकारला पाठवण्यात येईल. यापूर्वी विकास मंडळांना वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आली आहे.

## पायाभूत सुविधेसाठी योजना

नगरविकास विभागाच्या प्रशासकीय कामकाजासाठी व राज्य शहर नियोजन संस्थेकरिता पायाभूत सोयी सुविधा निर्माण करणाऱ्या योजनेस मान्यता देण्यात आली. राज्यात नागरी भागाचा विस्तार मोठ्या प्रमाणावर होत आहे. सध्या राज्यात २८ महापालिका व ३८३ नगरपालिका, नगरपंचायती आहेत. यामध्ये दरवर्षी अंदाजे १५ ते २० नवीन नगरपंचायतींची स्थापना होते. या भागाचे योग्य नियोजन आणि विकासाचे कामकाज पाहणाऱ्या नगरविकास विभागाची प्रशासकीय कार्यालये, क्षेत्रीय कार्यालयाच्या इमारती, प्रशिक्षण संस्था, निवासी संकुल इत्यादी शासकीय इमारतींची बांधकामे हाती घ्यावयाची झाल्यास त्यासाठी नगरविकास विभागाकडे कोणतीही योजना नाही. त्यामुळे या संदर्भातील निर्णय घेण्यात आला. यासाठी प्रस्तावित अद्ययावत आणि सर्व सोयीसुविधांनी सुसज्ज नगरविकास संकुलामध्ये नगरविकास विभागांतर्गत विविध संचालनालये आणि नगरपरिषद प्रशासन कार्यालय संकुल तसेच नागरी संशोधन केंद्र व नागरी सुविधा केंद्र हेदेखील राहील.

## पोलीस शिपायांची पदभरती

पोलीस दलातील शिपाई संवर्गातील रिक्त पदे १०० टक्के भरण्यासाठी पदभरती निर्बंधांतून सूट देण्याचा निर्णय घेण्यात आला. यामुळे २० हजार पोलीस शिपायांची पदे भरण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

सद्य:स्थितीत पोलीस दलातील ७ हजार २३१ पदे भरण्याची कार्यवाही शासनाच्या मंजुरीमुळे सुरू झाली आहे. याव्यतिरिक्त २०२१ मध्ये पोलीस शिपाई, पोलीस शिपाई



चालक, सशस्त्र पोलीस शिपाई या संवर्गातील एकूण ११ हजार ४४३ पदे उपलब्ध झाली आहेत. २०२० आणि २०२१ या वर्षातील रिक्त पदे एकत्रितरीत्या भरण्याची कार्यवाही झाल्यास पद भरती यंत्रणेवरील ताणही कमी करता येईल, यासाठी हा निर्णय घेण्यात आला.

## विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे

इतर मागास प्रवर्गातील मॅट्रिकोत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी मुलांसाठी आणि मुलींसाठी प्रत्येकी एक अशी ७२ शासकीय वसतिगृहे सुरू करण्यास मान्यता देण्यात आली. या प्रवर्गातील व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी जिल्ह्यांच्या ठिकाणी कोणतीही वसतिगृहांची सोय नाही. लोकप्रतिनिधींकडून शासकीय वसतिगृह भाड्याच्या इमारतीत सुरू करण्याबाबत मागणी वाढत आहे. तसेच मंत्रिमंडळ उपसमितीने केलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने हा निर्णय घेण्यात आला. ३६ जिल्ह्यांच्या ठिकाणी प्रत्येकी २ या प्रमाणे ७२ शासकीय वसतिगृहांमध्ये ७ हजार २०० विद्यार्थ्यांच्या निवासासाठी सुमारे ७३ कोटी ८१ लाख रुपयांच्या खर्चासदेखील मान्यता देण्यात आली. या वसतिगृहांसाठी गृहपाल, कनिष्ठ लिपिक, शिपाई, पहारेकर, सफाई कामगार हे कंत्राटी पद्धतीने घेण्यात येतील.

## विद्यार्थ्यांना दिलासा

इतर मागास वर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती तसेच विशेष मागास प्रवर्गातील गुणवंत विद्यार्थ्यांसाठी परदेशातील उच्च शिक्षणाच्या शिष्यवृत्तींची संख्या दहावरून ५० करण्याचा निर्णय घेण्यात आला. यामुळे अधिक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ मिळणार आहे. २०२२-२३ या चालू वर्षापासून त्याचा लाभ मिळेल. यासाठीची पालकांच्या वार्षिक उत्पन्नाची मर्यादा आठ लाख रुपये असून, या निकषात कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

या निर्णयामुळे कला, वाणिज्य, विधी या शाखेतील प्रत्येकी पाच, अभियांत्रिकी, वास्तुकला शास्त्राच्या पंधरा, औषधनिर्माण,



व्यवस्थापन शाखेच्या प्रत्येकी सात आणि विज्ञान शाखेच्या ६ अशा ५० विद्यार्थ्यांना परदेशातील उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मिळणार आहे. शिष्यवृत्तीचा लाभ अधिक विद्यार्थ्यांना द्यावयाचा असल्यामुळे एकूण वाढीव सुमारे १२ कोटी ९० लाख रुपयांचा वित्तीय भार येईल.

## अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी योजना

राज्यातील अल्पसंख्याक समुदायातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सुधारित शिष्यवृत्ती योजना राबवण्याचा निर्णय घेण्यात आला. या योजनेत शिष्यवृत्तीची रक्कम ५० हजारांपर्यंत वाढवण्यात येणार आहे. वर्ष २०११ मध्ये ही शिष्यवृत्तीची रक्कम २५ हजार रुपये इतकी होती. २०१८ मध्येदेखील यात काही बदल झाले नाहीत. केवळ पालकांच्या उत्पन्नाची वार्षिक मर्यादा २ लाखांवरून ८ लाखांपर्यंत वाढवली गेली होती. सुधारित योजनेमुळे प्रत्यक्ष शैक्षणिक शुल्क आणि परीक्षा शुल्क किंवा ५० हजार रुपये यापैकी जी रक्कम कमी असेल, ती शिष्यवृत्ती म्हणून विद्यार्थ्यांना देण्यात येईल. त्याचप्रमाणे बारावीपर्यंत कला, वाणिज्य आणि विज्ञान या बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांचे शैक्षणिक शुल्क आणि परीक्षा शुल्क यांची एकत्रित रक्कम किंवा ५ हजार रुपये यापैकी जी रक्कम कमी असेल, ती शिष्यवृत्ती म्हणून देण्यात येईल. जुन्या शिष्यवृत्ती योजनेतील इतर सर्व अटी, नियम पूर्वीप्रमाणेच राहतील.

## वारसांना नुकसान भरपाई

वन विभागाच्या अधिकारी-कर्मचारी यांचा वणव्यात, प्राणी हल्ला, तस्कर-

शिकारी यांच्या हल्ल्यात, वन्य प्राण्यांचा बचाव करताना मृत्यू झाल्यास किंवा कायमचे अपंगत्व आल्यास वारसांना लाभ देण्याचा निर्णय घेण्यात आला.

मृत्युमुखी पडलेल्या वन अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांच्या कुटुंबास २५ लाख रुपये, तर कायमचे अपंगत्व आल्यास अधिकाऱ्यास ३ लाख ६० हजार रुपये, गट-ब कर्मचाऱ्यास ३ लाख ३० हजार रुपये आणि गट-क आणि ड मधील कर्मचाऱ्यांस ३ लाख रुपये देण्यात येतील.

नुकसान भरपाईची २५ लाख रुपयांची रक्कम कायदेशीर वारसदारांच्या नावाने संयुक्त मुदत ठेव म्हणून ठेवण्यात येईल. तसेच ती १० वर्षांपर्यंत काढता येणार नाही. यावरील व्याज रक्कम दर महिन्याला घेता येईल. मुदत ठेवीची रक्कम अपवादात्मक परिस्थितीत पाच वर्षांनंतर काढून घेता येईल.

मृत अधिकारी, कर्मचाऱ्याच्या कुटुंबात अनुकंपा नियुक्तीस पात्र नसल्यास किंवा अशी नियुक्ती स्वीकारण्यास वारसाने नकार दिला असल्यास मृत अधिकारी किंवा कर्मचारी मृत्यूच्या वेळी जे पद धारण करत होते, त्या पदावरून पदोन्नतीसाठीचे लाभ हे त्याच्या नियत वयोमानानुसार सेवा निवृत्तीच्या दिनांकापर्यंत वेतनवाढीसाठीसह देण्याचा निर्णय घेण्यात आला. मृत्युमुखी पडलेल्या वन अधिकारी, कर्मचाऱ्याचे पार्थिव वाहनाद्वारे नेण्याचा सर्व खर्च शासनाद्वारे करण्यात येईल. तसेच जखमी कर्मचाऱ्यांच्या औषधोपचाराचा खर्चदेखील राज्य शासन करेल.

## सातवा वेतन आयोग लागू

शासकीय वैद्यकीय, दंत, आयुर्वेद महाविद्यालयातील पूर्णवेळ ग्रंथपाल, शारीरिक शिक्षण निर्देशकांना सातवा वेतन आयोग लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला. यासाठी एकूण ८९ लाख ६० हजार रुपये एवढा खर्च येईल. या सर्व ३४ पदांवरील ग्रंथपाल, निर्देशकांना २०१९ पासूनची थकबाकीदेखील रोखीने अदा करण्यात येईल.

## न्यायिक अधिकाऱ्यांना सुधारित वेतन

राज्यातील दुय्यम न्यायालयातील न्यायिक अधिकाऱ्यांना दुसऱ्या राष्ट्रीय न्यायिक वेतन आयोगाच्या शिफारसीनुसार सुधारित वेतन लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला. या न्यायिक अधिकाऱ्यांना वेतन थकबाकी तीन टप्प्यांत देण्यात येईल.

## सुधारणा विधेयक मागे

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ सुधारणा विधेयक क्र. ३५ (तिसरी सुधारणा) २०२१ मागे घेण्याचा निर्णय घेण्यात आला. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २००६ मध्ये सुधारणा करण्यासाठी १९ ऑक्टोबर २०२० रोजी विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. सुखदेव थोरात यांच्या समितीने काही सुधारणा सुचवल्या होत्या. या सुधारणांना १५ डिसेंबर २०२१ रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देऊन २०२१च्या हिवाळी अधिवेशनात या संदर्भातील विधेयक संमत करण्यात आले होते. हे विधेयक राज्यपालांकडे अंतिम मान्यतेसाठी सादर करण्यात आले होते.

या अधिनियमातील मूळ कलम-११ आणि कलम-१३ मध्ये बदल केला असल्यामुळे अनेक नागरिक, विद्यार्थी व शिक्षकांनी विधेयकाला मान्यता देऊ नये, अशी विनंती राज्यपालांना केली होती. या विधेयकातील काही तरतुदी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या तरतुदींच्या विरुद्ध असल्याने राष्ट्रपतींच्या संमतीसाठी देखील राखून ठेवल्याचे राज्यपाल कार्यालयानेदेखील कळवले होते. यापार्श्वभूमीवर हे विधेयक मागे घेण्याचा निर्णय घेण्यात आला.

## विनियमन विधेयक मागे

राज्यातील अभिमत विद्यापीठांमधील प्रवेश तसेच शुल्क याचे विनियमन करण्यासाठी केंद्र शासनाकडे मंजुरीसाठी पाठवण्यात आलेले विधेयक मागे घेण्याचा निर्णय घेण्यात आला. यामुळे महाराष्ट्र विनाअनुदानित खासगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम सुधारणाचे विधेयक मागे घेण्यात येईल व दुरुस्तीसह पुन्हा लागू करण्यात येईल. केंद्र शासनाच्या प्राधिकरणांकडून घेण्यात येणाऱ्या प्रवेश प्रक्रियेच्या आधारे अभिमत विद्यापीठांमध्ये प्रवेश बंधनकारक करण्यात आलेले आहे. वैद्यकीय अभ्यासक्रमांचे प्रवेशदेखील संबंधित शिखर संस्थांकडून विनियमित होतात. ही बाब लक्षात घेता हे विधेयक मागे घेण्याचा निर्णय घेण्यात आला.

## मुद्रांक शुल्क माफ

एअर इंडियाकडून एअर इंडिया इंजिनिअरिंग सर्व्हिसेस लिमिटेड या केंद्र शासनाच्या कंपनीस हस्तांतर होणाऱ्या ५० एकर जमिनीच्या मुल्यावरील मुद्रांक शुल्क माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला. एअर इंडियाकडून या कंपनीस नागपूर मिहान सेझ प्रकल्पातील ५० एकर जमीन हस्तांतरित होत असून. केंद्र शासनाची कंपनीस मुद्रांक शुल्क भरण्यापासून सवलत असल्यामुळे याबाबतचा निर्णय घेण्यात आला.

## चिपी विमानतळाला बॅरिस्टर नाथ पै विमानतळ असे नाव

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील चिपी विमानतळाला बॅरिस्टर नाथ पै विमानतळ असे नाव देण्याचा निर्णय घेण्यात आला. बॅरिस्टर नाथ पै यांचा जन्म सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वेंगुर्ला येथे झाला. त्यांनी स्वातंत्र्य लढ्यामध्ये सहभाग घेतला व वेळोवेळी कारावास भोगला. गोवा मुक्ती संग्रामातदेखील ते अग्रेसर होते. स्वातंत्र्योत्तर कालावधीत त्यांनी राजापूर लोकसभा मतदार संघातून प्रतिनिधित्व केले.

कोकण रेल्वेच्या संकल्पनेमध्ये त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. बॅरिस्टर नाथ पै



यांचे हे जन्मशताब्दी वर्ष आहे. हे औचित्य लक्षात घेऊन चिपी परुळे येथील ग्रीनफिल्ड विमानतळाला बॅरिस्टर नाथ पै विमानतळ असे नाव देण्याचा निर्णय घेण्यात आला. हा प्रस्ताव विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांमधील सदस्यांच्या मान्यतेने केंद्र शासनाकडे पाठवण्यात येईल.

### शिधापत्रिकाधारकांना दिवाळी भेट

दिवाळीच्या निमित्ताने राज्यातील शिधापत्रिकाधारकांना शिधा वस्तूंचे दिवाळी पॅकेज केवळ १०० रुपयात देण्याचा निर्णय घेण्यात आला. या संचामध्ये प्रत्येक शिधापत्रिकाधारकांना प्रति १ किलोच्या परिमाणात रवा, चणाडाळ, साखर व १ लिटर पामतेल याचा समावेश असेल. राज्यातील १ कोटी ७० लाख कुटुंबांना म्हणजेच सुमारे ७ कोटी लोकांना याचा प्रत्यक्ष लाभ होणार आहे. हा संच एक महिन्याच्या कालावधीकरिता देण्यात येऊन त्याचे वितरण ई-पॉस प्रणालीद्वारे करण्यात येईल. यासाठी येणाऱ्या एकूण ५१३ कोटी २४ लाख खर्चासदेखील मान्यता देण्यात आली.

### आपत्ती व्यवस्थापनच्या कामांसाठी कंपनी

आपत्ती व्यवस्थापनातील प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी केंद्र किंवा राज्य सरकारच्या कंपन्यांना प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणा म्हणून नेमण्याचा निर्णय घेण्यात आला. या कंपन्यांना मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली राज्य कार्यकारी समितीकडून प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणा म्हणून टर्न की तत्त्वावर नेमण्यात येईल. या कंपन्यांना नियुक्त करण्यासाठी स्वारस्य अभिव्यक्ती जाहिरातदेखील प्रसिद्ध करण्यात येईल. या कंपन्यांसमवेत सामंजस्य करार करण्यात येऊन त्यांना थेट नियुक्तीने कामे देण्यात येतील. कोणत्याही आपत्तीस तोंड देताना तसेच आपत्ती सौम्यीकरणासाठी ज्या उपाययोजना करण्यात येतात. त्यातील कामांच्या अंमलबजावणीसाठी मदत पुनर्वसन विभागाकडे स्वत:ची यंत्रणा नाही. या कंपन्यांच्या माध्यमातून ही कामे करण्यात येतील.

### पोलिसांना घरबांधणीसाठी कर्ज

राज्यातील पोलीस दलातील अधिकारी आणि अंमलदारांना पूर्वीप्रमाणेच बँकांमार्फत घरबांधणीसाठी कर्ज देण्याचा निर्णय घेण्यात आला. १० एप्रिल २०१६ च्या शासन निर्णयाप्रमाणे राज्यातील पोलिसांना खासगी बँकांकडून कर्ज घेऊन पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळामार्फत योजना राबवण्यात येत होती. त्याप्रमाणे ५ हजार १७ पोलीस अधिकारी व अंमलदारांना मे २०१९ पर्यंत घरबांधणी अग्रिम देण्यात आले आहे. त्यानंतर ७ जून २०२२ च्या शासन निर्णयाप्रमाणे ही योजना खंडित करून पोलिसांना शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे शासकीय नियमित घरबांधणी अग्रीम योजना देण्याचा निर्णय झाला होता. मात्र, या घरबांधणी अग्रीमासाठी ७ हजार ९५० अर्ज प्राप्त झाले असून त्यासाठी २ हजार १२ कोटींची गरज भासणार आहे. मात्र इतकी मोठी रक्कम शासनाकडून एकरकमी उपलब्ध होणे शक्य नसल्याने पूर्वीप्रमाणेच बँकामार्फत कर्ज घेण्याची योजना सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला.

### नागपूर मेट्रो रेल प्रकल्पास गती

नागपूर मेट्रो रेल प्रकल्प टप्पा-१ ला गती देण्यासाठी सुधारित ९ हजार २७९ कोटींच्या सुधारित खर्चास मान्यता देण्यात आली. प्रकल्पाचा मूळ मंजूर खर्च ८ हजार ६८० कोटी इतका असून त्यात ५९९ कोटी ६ लाख रुपये इतकी वाढ झाली आहे.

नागपूर मेट्रो रेल टप्पा १-प्रकल्पामध्ये ऑटोमोटिव्ह चौक ते मिहान मार्गिका क्र.१ व प्रजापतीनगर ते लोकमान्यनगर ही मार्गिका क्र.२ अशा एकूण ३८.२१५ कि.मी. लांबीच्या दोन मार्गिकांचा व ३८ स्थानकांचा समावेश आहे. या प्रकल्पास २०१४ मध्ये मंजुरी देण्यात आली होती. प्रकल्पाचा मूळ नियोजित बांधकाम कालावधी एप्रिल २०१३ ते एप्रिल २०१८ असा ५ वर्षांचा होता. प्रत्यक्षात जून २०१५ मध्ये कामास सुरुवात झाली. या प्रकल्पाच्या एकूण ३८.२१५ कि.मी. लांबीपैकी २६ कि.मी.वर मेट्रो सुरू आहे. प्रकल्पाची उर्वरित १२ कि.मी. मार्गिका लवकरच कार्यान्वित होणार आहे.

प्रकल्पाच्या बांधकामास झालेला विलंब, प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या जमिनीच्या क्षेत्रात तसेच किमतीत झालेली वाढ, दोन अतिरिक्त मेट्रो स्थानकांची उभारणी, मंजूर बाह्य कर्ज अनुदानित कॉन्ट्रॅक्ट पॅकेजेसच्या किमतीमध्ये झालेली वाढ इत्यादी कारणांमुळे प्रकल्प खर्चात वाढ झाली आहे.

### सुरेवाडा उपसा सिंचन योजना

भंडारा जिल्ह्यातील सुरेवाडा उपसा सिंचन योजनेस गती देण्यासाठी योजनेस सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला. एकूण ३३६ कोटी २२ लाख इतक्या सुधारित खर्चास मान्यता देण्यात आली. या प्रकल्पामुळे भंडारा जिल्ह्यातील २७ व गोंदिया जिल्ह्यातील १ अशा २८ गावांतील ५ हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. सुरेवाडा गावाजवळ वैनगंगा नदीच्या डाव्या तिरावर हा प्रकल्प बांधण्यात येत असून यासाठी ३८.६२५ दशघमी पाणी उपलब्ध आहे.

### कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्प

उस्मानाबाद आणि बीड जिल्ह्यातील दुष्काळी तालुक्यांना संजीवनी मिळणार आहे. कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्पास गती देण्यासाठी ११ हजार ७३६ कोटी ९१ लाख रुपयांच्या सुधारित खर्चास मान्यता देण्यात आली. या प्रकल्पामुळे मराठवाड्यातील २ जिल्ह्यांतील अवर्षणप्रवण क्षेत्रातील १३३ गावांतील १ लाख १४ हजार हेक्टर क्षेत्राला लाभ होणार आहे. कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्प हा गोदावरील मराठवाडा पाटबंधारे विकास मंडळ, औरंगाबाद अंतर्गत उस्मानाबाद आणि बीड जिल्ह्यातील कृष्णा खोऱ्याच्या भागात प्रस्तावित असून प्रथम टप्प्यात ७ अघफू व दुसऱ्या टप्प्यात १६.६६ अघफू असे एकूण २३.६६ अघफू पाणी वापर आहे. या प्रकल्पामुळे उस्मानाबाद जिल्ह्यातील परांडा, भूम, वाशी, कळंब, तुळजापूर, लोहारा व उमरगा तसेच बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्याला लाभ होणार आहे.

**– टीम लोकराज्य**

# सेवा पंधरवडा

संजय ओरके

शासनामार्फत राज्यातील नागरिकांना देण्यात येत असलेल्या सेवा त्यांच्यापर्यंत कालमर्यादेत पोहोचवण्यासाठी तसेच सामान्य नागरिकांनी केलेल्या अर्जावर तत्काळ आणि कालमर्यादेत पारदर्शक पद्धतीने निपटारा व्हावा, यासाठी १७ सप्टेंबर २०२२ ते २ ऑक्टोबर २०२२ या कालावधीत 'राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता सेवा पंधरवडा' आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला. या सेवा पंधरवड्यात आपले सरकार या वेबपोर्टलवरील ३९२ सेवा, ऊर्जा विभागाच्या महावितरण पोर्टलवरील २४ सेवा, थेट निधी हस्तांतरण पोर्टलवरील ४६ सेवा त्याचप्रमाणे नागरी सेवा केंद्रामार्फत देण्यात येणाऱ्या शासकीय सेवा, विभागाच्या योजनांशी सबंधित पोर्टलवरील प्रलंबित अर्ज यांचा निपटारा करण्यात आला.

## सेवा हक्क कायद्याची फलश्रुती

राज्यात २०१५ साली राज्य सेवा हक्क कायदा हे विधेयक आणले आणि विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात ते एकमताने मान्य झाले. या सेवा हक्क कायद्यात शासनाचे ३८ विभाग आणि ५०९ सेवा अधिसूचित करण्यात आला. या कायद्यामुळे सर्वसामान्यांना त्यांना मिळणाऱ्या सेवा हक्काने मिळाव्या, यासाठी आपले सरकार हे पोर्टल सुरू केले. लोकांना घरबसल्या ऑनलाईन स्वरूपात माहिती मिळावी, हा उद्देश तर सरकारचा होताच. २०१७ पासून आजपर्यंत १२ कोटी ५६ लाख अर्जदारांनी या कायद्यांतर्गत अर्ज केले आणि त्यापैकी ११ कोटी ९४ लाख ९४ हजार अर्जदारांना त्यांना हवी असलेली माहिती देण्यात आली. याचा अर्थ या कायद्याची फलश्रुती म्हणजे सुमारे ९५ टक्के लोकांना या कायद्यामुळे लाभ मिळाला.

या सेवा अभियान कार्यक्रमात विभागीय आयुक्त, कोकण, पुणे, अमरावती आणि नागपूर विभागाने २७ सप्टेंबर २०२२ पर्यंत अर्ज निकाली काढले आहेत, त्याची माहिती पुढीलप्रमाणे :-

## कोकण विभाग

मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्ह्यांतील ३१ हजार ८०४ अर्जांचा निपटारा केला. या अर्जांमध्ये डोंगर/दुर्गम क्षेत्रात राहत असलेले प्रमाणपत्र, मिळकत, तात्पुरता रहिवास, ऐपत, गौण खनिज उत्खनन, अल्प भू-धारक, प्रतिज्ञापत्र साक्षांकन, जात, नॉन-क्रिमिलेअर, शेतकरी, अधिकार अभिलेख प्रमाणन, भूमिहिन शेतमजूर, प्रलंबित फेरफार, शिधापत्रिका वितरण, वनहक्क पट्टे आदी




सेवा पंधरवाडा समारोपाप्रसंगी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस.

**प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा १७ सप्टेंबर हा जन्मदिवस आणि राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची २ ऑक्टोबर ही जयंती विचारात घेऊन १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२२ हा कालावधी 'राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता सेवा पंधरवडा' म्हणून साजरा करण्यात आला. हे अभियान आता ५ नोव्हेंबर २०२२ पर्यंत राबवण्यात येत आहे. राज्यातील सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी यांनी या पंधरवड्यात कमाल प्रलंबित अर्ज निकाली काढले व सर्वसामान्य नागरिकांच्या अडचणी सोडवून जनतेला दिलासा दिला.**

प्रमाणपत्रांचा समावेश आहे. एकूण झालेल्या कामांची टक्केवारी ४१.४५ अशी आहे.

## पुणे विभाग

विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे यांनी २७ सप्टेंबरपर्यंत पुणे आणि सातारा जिल्ह्यात नॉन क्रिमिलेअरचे ९७४ अर्ज निकाली काढले. 'आपले सरकार' या पोर्टलवरही पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर या जिल्ह्यांतील ३३३ अर्ज, नागरी सेवा केंद्रामार्फत देण्यात येणाऱ्या सोयी सुविधा अंतर्गत एकूण १ लाख ३७ हजार ९७० अर्ज, संजय गांधी निराधार अनुदान योजनेचे २१३८ अर्ज, श्रावण बाळ सेवा राज्य निवृत्तिवेतन योजनेचे १६६५ अर्ज, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्तिवेतन योजनेचे ३६५ अर्ज, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्ती योजनेचे ८४ अर्ज, इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग निवृत्तिवेतन योजनेचे १२ अर्ज तसेच राष्ट्रीय कुटुंब लाभ योजनेचे ११५ अर्ज निकाली काढले.

## अमरावती विभाग

विभागीय आयुक्त, अमरावती यांनी अमरावती, अकोला, बुलडाणा, यवतमाळ, वाशिम या जिल्ह्यांतील १ लाख १२ हजार २१५ लाभार्थ्यांना सर्व ऑनलाईन सेवा पुरवल्या. यात अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयाचे २१ हजार अर्ज, अकोला जिल्हाधिकारी कार्यालयाचे १५ हजार ४४१ अर्ज, बुलडाणा जिल्हाधिकारी कार्यालयाचे १० हजार ६११ अर्ज, यवतमाळ जिल्हाधिकारी कार्यालयाचे १८ हजार ७७३ अर्ज आणि वाशिम जिल्हाधिकारी कार्यालयाचे ४६ हजार ३९० अर्जांचा समावेश असून एकूण ५४.६२ टक्के अर्ज निकाली काढण्यात आले आहे.

## नागपूर विभाग

विभागीय माहिती कार्यालय, नागपूर यांनी एकूण १ लाख ४८ हजार ९९४ संदर्भ अर्ज निकाली काढले. यात अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना मदत निधीचे वितरण करण्यासंदर्भातील १ लाख ८ हजार २१० अर्ज, पंतप्रधान सन्मान निधी योजनेचे ११ हजार २१४ अर्ज, फेरफार नोंदीचे ६ हजार २०२ अर्ज, पात्र शिधापत्रिका वितरणाचे १ हजार ६२२ अर्ज, विवाह नोंदणी प्रमाणपत्राचे ७४१ अर्ज, मालमत्ता हस्तांतरण नोंदीचे ४७२ अर्ज, नव्याने नळ जोडणीचे ८७३ अर्ज, मालमत्ता कर आकारणीचे २ हजार ८५ अर्ज, घरगुती विद्युत जोडणीचे ३ हजार ३०२ अर्ज, सिंचन विहिर नोंदणीचे २०५ अर्ज, वनहक्क पट्टे मंजुरीचे ४९१ अर्ज, विद्युत जोडणीत नवीन धारकाचे ७ हजार




**दिव्यांग ओळखपत्राचे वितरण करताना चंद्रपूर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी अजय गुल्हाने.**

५२९ अर्ज, दिव्यांग प्रमाणपत्राचे २ हजार ५८९ अर्ज आणि नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र संदर्भातील ३ हजार ४५९ अर्जांचा समावेश आहे. नागपूर विभागात निकाली काढलेल्या संदर्भ तसेच अर्जाची टक्केवारी २९.६० टक्के असून प्रलंबित प्रकरणात कार्यवाही सुरू आहे.

## नाशिक विभाग

विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक यांनी २८ सप्टेंबरपर्यंत एकूण ७ लाख ७१ हजार ८९४ अर्ज निकाली काढले. यात अतिवृष्टीमुळे नुकसान झाले शेतकरी, पंतप्रधान किसान सन्मान निधी योजना, भूमी अभिलेख अद्ययावतीकरण, लाभार्थ्यांचा केवायसी अद्ययावत करणे, प्रलंबित फेरफार, शिधापत्रिका वितरण, विवाह नोंदणी, मालमत्ता हस्तांतरण, नळ जोडणी, मालमत्ता कर, विद्युत जोडणी, नवीन मालमत्ताधारकांची नोंद, बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेंतर्गत सिंचन विहिरी, वनहक्क पट्टे, दिव्यांग प्रमाणपत्र आणि नॉन क्रिमिलेअर या सेवेंचा समावेश आहे.

या सेवा हक्क कायद्यामुळे सर्वसामान्य जनतेला मिळणाऱ्या सोयी सुविधा आणि त्यांनी केलेले तक्रार अर्ज निकाली काढण्याचे प्रमाण पाहता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या पंधरवड्यात वाढ करून आता ५ नोव्हेंबर २०२२ हे अभियान राबवण्याचे प्रशासनाला निर्देश दिले. साहजिकच यामुळे अधिकाधिक नागरिकांचे प्रश्न निकाली लागतील, यात शंका नाही.

**विभागीय संपर्क अधिकारी**

# आपली सेवा आमचे कर्तव्य

**दिलीप शिंदे,**
भा.प्र.से. (से.नि.)

शासनाच्या सेवा सामान्य माणसापर्यंत बऱ्याचदा पोहोचत नाहीत किंवा त्या सेवा प्राप्त करण्यासाठी नागरिकांना अनेक मार्गांनी प्रयत्न करावे लागतात ही वस्तुस्थिती मान्य करावी लागेल. या परिस्थितीमध्ये आमूलाग्र बदल करण्याच्या दृष्टीने सेवा हक्क कायदा पारित करण्यात आला. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ हा २८ एप्रिल २०१५ पासून राज्यात अमलात आला. या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक असलेली नियमावली १६ नोव्हेंबर २०१६ रोजी प्रसिद्ध करण्यात आली. १ मार्च २०१७ रोजी राज्याचे माजी मुख्य सचिव, स्वाधीन क्षत्रिय यांची राज्याचे पहिले राज्य मुख्य लोकसेवा हक्क आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली. त्यांच्या वयाची ६५ वर्षे २५ जानेवारी २०२२ रोजी पूर्ण होऊन ते सेवानिवृत्त झाले नंतर राज्याचे माजी अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी दिलीप शिंदे हे राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त,(अतिरिक्त कार्यभार) म्हणून कार्यरत आहेत.



१ डिसेंबर २०२१ रोजी पुणे, औरंगाबाद, नाशिक, अमरावती आणि नागपूर विभागाकरिता पाच विभागीय राज्य सेवा हक्क आयुक्तांची खालीलप्रमाणे नेमणूक करण्यात आली आहे.

१) दिलीप शिंदे, भा.प्र.से. (से.नि.) पुणे विभाग, २) कोकण विभाग रिक्त, ३) अभय यावलकर, भा.प्र.से. (से.नि.), नागपूर विभाग, ४) डॉ. किरण जाधव, भा.पो.से. (से.नि.) औरंगाबाद विभाग, ५) डॉ. नारुकुल्ला रामबाबू, भा.व.से. (से.नि.) अमरावती विभाग, ६) चित्रा कुलकर्णी, (से.नि. अपर राज्यकर आयुक्त) नाशिक विभाग.

वरीलप्रमाणे आयुक्तांच्या नेमणुकांमुळे व विभागीय राज्य सेवा हक्क आयुक्तालये स्थापन झाल्यामुळे महाराष्ट्र राज्य लोकसेवा हक्क कायद्याची अंमलबजावणी अधिक गतिमान होत आहे.

## अर्जावरील कार्यवाही

- सन २०१७ पासून प्राप्त अर्ज १२,५६,५५,३३६ निकाली अर्ज ११,९४,८४,१२७ (९५.१२%) विहित वेळेत दिले ८,८६,७३,६६९ (७४.२%)
- या वर्षात १ एप्रिल २०२२ ते २१ सप्टेंबर २०२२ पर्यंत ऑनलाईन प्राप्त १,०३,२१,२६१ अर्जांपैकी निकाली काढलेले ९१,९५,७८७ अर्ज (८९%). प्रलंबित ११,२५,४२३ त्यापैकी अर्जदाराकडे ४,२८,९५०, तर विभागाकडे प्रलंबित ६,९६,४७३ अर्ज.
- एकूण प्राप्त प्रथम अपील १,२५,८४७, द्वितीय अपील १६,६९५, तृतीय अपील १३८० निकाली १३७७.

## कायद्याची वैशिष्ट्ये

- प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरण (यामध्ये शासनाचे सर्व विभाग, महानगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायत, औद्योगिक वसाहत, नियोजन प्राधिकरण, जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत, स्थानिक स्वराज्य संस्था, महामंडळ इ. चा समावेश होतो.) त्याने पुरवावयाच्या लोकसेवांची सूची, त्या देण्यासाठीचा नियत कालावधी, असल्यास शुल्क, विहित नमुना, सेवा देणारा पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितीय अपील प्राधिकारी यांचा तपशील कार्यालयाच्या सूचना फलकावर, संकेतस्थळावर प्रदर्शित करील. कलम ३ - (१)
- प्रत्येक पात्र व्यक्तीस, कायदेशीर, तांत्रिक व आर्थिक व्यवहार्यतेच्या अधीन राहून

**आपल्या राज्यातील नागरिकांना राज्य शासन व अधीनस्थ सर्व कार्यालये यांच्यामार्फत दिल्या जाणाऱ्या सेवा पारदर्शक, गतिमान व कालबद्ध पद्धतीने देण्याकरिता 'महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५' पारित करण्यात आला. नागरिकांना अधिकार देणारा आणि प्रशासनाला जबाबदार व उत्तरदायी करणारा हा क्रांतिकारी कायदा आहे. या कायद्याचे उद्दिष्ट नागरिकांना पारदर्शकपणे, तत्परतेने, सहज व सुलभपणे सेवा देण्यात यावी असे आहे.**

नियत कालमर्यादेत सेवा प्राप्त करण्याचा हक्क असेल. (अपवाद निवडणुकीचा व नैसर्गिक आपत्तीचा कालावधी) कलम - (४)

- लोकसेवा प्राप्त करण्यासाठी कोणत्याही पात्र व्यक्तीस पदनिर्देशित अधिकाऱ्याकडे अर्ज करता येईल. अर्ज मिळाल्याची रीतसर पोच देण्यात येईल आणि अर्जदारास, असा अर्ज निकाली काढण्यासाठी नियत केलेल्या कालमर्यादेसह, असा अर्ज मिळाल्याचा दिनांक आणि ठिकाण, विशिष्ट अर्ज क्रमांक, लेखी किंवा इलेक्ट्रॉनिक साधनांमार्फत, कळवण्यात येईल. लोकसेवा प्राप्त करण्यासाठी सर्व बाबतीत परिपूर्ण असलेला आवश्यक तो अर्ज, पदनिर्देशित अधिकाऱ्याला किंवा अर्ज स्वीकारण्यास जिला यथोचितरीत्या प्राधिकृत केले असेल, अशा एखाद्या व्यक्तीला ज्या दिनांकास मिळाला असेल त्या दिनांकापासून नियत कालमर्यादा मोजली जाईल. (कलम ५ (१))
- पदनिर्देशित अधिकारी, पोट-कलम (१) अन्वये अर्ज मिळाल्यावर नियतकालमर्यादेत एकतर थेट लोकसेवा देईल किंवा ती सेवा मंजूर करील किंवा फेटाळण्याची कारणे लेखी नमूद करून अर्ज फेटाळील. पदनिर्देशित अधिकारी, अर्जदाराला, त्याच्या आदेशाविरुद्ध अपील करण्याचा कालावधी आणि ज्याच्याकडे पहिले अपील दाखल करता येईल त्या प्रथम अपील प्राधिकाऱ्याचे नाव व पदनाम, त्याच्या कार्यालयीन पत्त्यासह, लेखी कळवील. (कलम ५ (२))
- कोणत्याही लोकसेवांसाठी अर्ज केलेल्या प्रत्येक पात्र व्यक्तीला, संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाकडून एक विशिष्ट अर्ज क्रमांक देण्यात येईल, जेणेकरून जेथे ऑनलाईन प्रणाली कार्यान्वित असेल तेथे, तो आपल्या अर्जाच्या स्थितीची, ऑनलाईन पाहणी करू शकेल. (कलम-६)
- प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरण, जेथे अशी ऑनलाईन प्रणाली कार्यान्वित असेल तेथे, लोकसेवांच्या सर्व अर्जांची स्थिती ऑनलाईन अद्ययावत ठेवण्यास कर्तव्यबद्ध असेल. (कलम - ६ (२))
- शासन, नियत कालमर्यादेत संबंधित लोकसेवा पुरवण्यासाठी माहिती तंत्रज्ञानाचा वापर करण्याकरिता सर्व सार्वजनिक प्राधिकरणांना प्रोत्साहन व प्रेरणा देईल. (कलम ७)
- सार्वजनिक प्राधिकरण, विहित करण्यात येईल अशी यथोचित कार्यपद्धती अनुसरून, लोकसेवांसाठीचा पात्र व्यक्तींचा अर्ज फेटाळल्याच्या किंवा त्या लोकसेवा देण्यास विलंब केल्याच्या



विरुद्ध तिने दाखल केलेल्या अपीलाची सुनावणी करण्यासाठी आणि निर्णय देण्यासाठी प्रथम अपील प्राधिकारी म्हणून कार्य करण्याकरिता पदनिर्देशित अधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा वरिष्ठ दर्जा असलेल्या, गट-ब दर्जाच्या किंवा त्याच्या समकक्ष दर्जाच्या अधिकाऱ्याची नियुक्ती करील. कलम ८-(१)
- सार्वजनिक प्राधिकरण, प्रथम अपील प्राधिकऱ्याच्या आदेशाविरुद्ध एखाद्या पात्र व्यक्तीने तसेच पदनिर्देशित अधिकाऱ्याने दाखल केलेल्या अपीलाची सुनावणी करण्यासाठी आणि निर्णय देण्यासाठी द्वितीय अपील प्राधिकारी म्हणून वरिष्ठ दर्जा असलेल्या अधिकाऱ्याची नियुक्ती करील. कलम ८-(२)
- अर्ज फेटाळण्यात आला असेल किंवा नियत कालमर्यादेच्या आत लोकसेवा दिली नसेल अशा कोणत्याही पात्र व्यक्तीस, अर्ज फेटाळल्याचा आदेश मिळाल्याच्या किंवा नियत कालमर्यादा समाप्त झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या कालावधीच्या आत प्रथम अपील प्राधिकाऱ्याकडे अपील दाखल करता येईल : (हा कालावधी अपवादात्मक परिस्थितीत वाढवता येतो.)

  प्रथम अपील प्राधिकाऱ्यास, तो आपल्या आदेशात विनिर्दिष्ट करील अशा नियत कालमर्यादेपेक्षा अधिक नसलेल्या कालावधीच्या आत पात्र व्यक्तीला सेवा देण्यासाठी पदनिर्देशित अधिकाऱ्याला निदेश देता येईल किंवा त्यास अपील दाखल केल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या कालावधीच्या आत फेटाळण्याची कारणे लेखी नमूद करून अपील फेटाळता येईल :

  परंतु अपीलावर निर्णय देण्यापूर्वी, प्रथम अपील प्राधिकारी, अपीलकर्त्याला तसेच पदनिर्देशित अधिकाऱ्याला किंवा या प्रयोजनासाठी यथोचितरीत्या प्राधिकृत केलेल्या त्याच्या कोणत्याही दुय्यम अधिकाऱ्याला, आपले म्हणणे मांडण्याची संधी देईल.
- अपीलकर्त्यास, ज्या दिनांकास प्रथम अपील प्राधिकाऱ्याचा आदेश मिळाला असेल त्या दिनांकापासून ३० दिवसांच्या कालवधीच्या आत किंवा प्रथम अपील प्राधिकाऱ्याचा कोणताही आदेश मिळाला नसेल त्याबाबतीत, पहिले अपील दाखल केल्याच्या दिनांकापासून पंचेचाळीस दिवसानंतर द्वितीय अपील प्राधिकाऱ्याकडे, प्रथम अपील प्राधिकाऱ्याच्या आदेशाविरुद्ध दुसरे

अपील दाखल करता येईल : (हा कालावधी अपवादात्मक परिस्थितीत वाढवता येतो.)

द्वितीय अपील प्राधिकाऱ्यास, तो आपल्या आदेशात विनिर्दिष्ट करील अशा कालावधीच्या आत अपीलकर्त्याला सेवा देण्यासाठी पदनिर्देशित अधिकाऱ्याला निदेश देता येईल किंवा त्यास ते अपील दाखल केल्याच्या दिनांकापासून पंचेचाळीस दिवसांच्या कालावधीच्या आत अशा फेटाळयाची कारणे लेखी नमूद करून अपील फेटाळता येईल :

परंतु कोणताही आदेश काढण्यापूर्वी, द्वितीय अपील प्राधिकारी, अपीलकर्त्याला तसेच पदनिर्देशित अधिकाऱ्याला किंवा या प्रयोजनासाठी यथोचितरीत्या प्राधिकृत केलेल्या त्याच्या कोणत्याही दुय्यम अधिकाऱ्याला, आपले म्हणणे मांडण्याची संधी देईल.

या कलमान्वये अपीलावर निर्णय करताना, प्रथम अपील प्राधिकारी आणि द्वितीय अपील प्राधिकारी यांना पुढील बाबींच्या संबंधात, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ अन्वये एखाद्या दाव्याची न्यायचौकशी करताना दिवाणी न्यायालयाकडे जे अधिकार निहित असतात तेच अधिकारी असतील :

क) दस्तऐवज किंवा अभिलेख सादर करण्यास फर्मावणे व त्याची तपासणी करणे,

ख) सुनावणीसाठी समन्स पाठवणे, आणि

ग) विहित करण्यात येईल अशी इतर कोणतीही बाब.

- जर पदनिर्देशित अधिकाऱ्याने, पुरेशा व वाजवी कारणाशिवाय लोकसेवा देण्यात कसूर केली आहे, असे प्रथम अपील प्राधिकाऱ्याचे मत झाले असेल तर, तो त्या पदनिर्देशित अधिकाऱ्यावर, ५०० रुपयांपेक्षा कमी नसेल, परंतु ५ हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढी, किंवा राज्य शासन राजपत्रातील अधिसूचनेद्वारे वेळोवेळी सुधारणा करील अशा रकमेएवढी, शास्ती लादील. (कलम १०-१) (क))

प्रथम अपील प्राधिकाऱ्याने, कोणत्याही पुरेशा व वाजवी कारणाशिवाय विनिर्दिष्ट कालावधीत अपीलावर निर्णय देण्यात वारंवार कसून केली होती किंवा चूक करणाऱ्या पदनिर्देशित अधिकाऱ्याला वाचवण्याचा गैरवाजवी प्रयत्न केला होता, असे मुख्य आयुक्ताचे किंवा आयुक्ताचे मत झाले असेल तेव्हा, तो, प्रथम अपील प्राधिकाऱ्यावर, ५०० रुपयांपेक्षा कमी नसेल परंतु ५ हजार



रुपयांपर्यंत असू शकेल एवढी, किंवा राज्य शासन राजपत्रातील अधिसूचनेद्वारे वेळोवेळी सुधारणा करील अशा रकमेएवढी, शास्ती लादील :

परंतु प्रथम अपील प्राधिकाऱ्यावर कोणतीही शासती लादण्यापूर्वी, त्याला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देण्यात येईल. (कलम १०-(२))

## आयोगाचे अधिकार

या अधिनियमाच्या उचित अंमलबजावणीची सुनिश्चिती करणे व अधिक चांगल्या रीतीने लोकसेवा देण्याची सुनिश्चिती करण्याकरिता राज्य शासनाला सूचना करणे हे, आयोगाचे कर्तव्य असेल, या प्रयोजनार्थ, आयोगास, पुढील गोष्टी करता येतील :-

(क) या अधिनियमानुसार लोकसेवा देण्यात कसूर केल्याबाबतची, स्वाधिकारे दखल घेणे आणि त्यास योग्य वाटतील त्याप्रमाणे अशी प्रकरणे निकालात काढण्यासाठी निर्देशित करणे ;

(ख) लोकसेवा देणारी कार्यालये आणि प्रथम अपील प्राधिकारी व द्वितीय अपील प्राधिकारी यांच्या कार्यालयांची तपासणी पार पाडणे ;

(ग) कोणत्याही पदनिर्देशित अधिकाऱ्याने किंवा अपील प्राधिकाऱ्यांनी या अधिनियमाअन्वये त्यांच्याकडे सोपवलेली कार्ये योग्यपणे पार पाडण्यात कसूर केली असेल तर त्यांच्याविरुद्ध विभागीय चौकशीची शिफारस करणे ;

(घ) लोकसेवा देण्याच्या कार्यपद्धतीमध्ये, ज्यामुळे लोकसेवा देण्यात अधिकाधिक पारदर्शकता व सुलभता येईल, असे बदल करण्यासाठी शिफारस करणे :

(ङ) लोकसेवा कार्यक्षमपणे देण्यासाठी सार्वजनिक प्राधिकरणांनी करावयाच्या उपाययोजना करण्यासाठी शिफारस करणे;

(च) सार्वजनिक प्राधिकरणांनी लोकसेवा देण्याबाबत, संनियंत्रण करणे;

(छ) कलम १८ अन्वये त्याच्याकडे दाखल केलेल्या अपीलाची सुनावणी घेणे व त्यावर निर्णय देणे. (कलम १६-(१))

आयोगाला, या कलमान्वये कोणत्याही बाबीची चौकशी करताना पुढील बाबतीत, दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ अन्वये एखाद्या दाव्याची न्यायचौकशी करताना दिवाणी न्यायालयाकडे जे अधिकारी निहित करण्यात आलेले आहेत, तेच अधिकारी असतील:-

(क) व्यक्तींना समन्स पाठवणे व हजर राहण्यास भाग पाडणे आणि त्यांना शपथेवर तोंडी किंवा लेखी साक्षीपुरावा देण्यास व दस्तऐवज किंवा वस्तू सादर करण्यास भाग पाडणे;

(ख) दस्तऐवजांचा शोध घेण्यास आणि तपासणी करण्यास फर्मावणे;

(ग) शपथपत्रावर साक्षीपुरावा घेणे;

(घ) कोणत्याही न्यायालयाकडून किंवा कार्यालयाकडून कोणतेही शासकीय अभिलेख किंवा त्याच्या प्रती यांची मागणी करणे;

(ङ) साक्षीदारांची किंवा दस्तऐवजांची तपासणी करण्याकरिता समन्स काढणे; आणि

(च) विहित करण्यात येईल अशी अन्य कोणतीही बाब. (कलम १६-(२))

राज्य शासन, आयोगाने केलेल्या शिफारशींवर विचार करील आणि केलेल्या कार्यवाहीची माहिती, ३० दिवसांच्या आत किंवा आयोगाशी विचारविनिमय करून ठरवण्यात येईल अशा त्यानंतरच्या कालावधीत आयोगाकडे पाठवतील. (कलम १७)

तृतिय अपील : द्वितीय अपील प्राधिकाऱ्याच्या आदेशामुळे व्यथित झालेल्या पात्र व्यक्तीस किंवा पदनिर्देशित अधिकाऱ्यास, असा आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ६० दिवसांच्या कालावधीच्या आत आयोगाकडे अपील करता येईल. (कलम १८ - (१)) मुख्य आयुक्त किंवा, यथास्थिती, आयुक्त, सर्व पक्षकारांना आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर, अपील प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या कालावधीत असे अपील निकालात काढतील. आयोगाला, पदनिर्देशित अधिकाऱ्यांवर किंवा प्रथम अपील प्राधिकरणांवर शास्ती लादता येईल किंवा लादलेल्या शास्तीमध्ये बदल करता येईल ती रद्द करता येईल आणि अशी प्रदान केलेली शास्ती, कोणतीही असल्यास, परत करण्याचा आदेश देता येईल. (कलम १८-(२)) आयोगाचा निर्णय अंतिम असेल.

भारतातील वीसएक राज्यांनी नागरिकांना. कालबद्ध, पारदर्शक व कार्यक्षम पद्धतीने लोकसेवा पुरविण्यासाठी कायदा पारीत केला आहे. महाराष्ट्र, पंजाब, हरियाणा, उत्तराखंड व पश्चिम बंगाल या पाच राज्यांनी सेवाहक्क कायद्याची अधिक प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्याकरिता स्वतंत्र आयोग स्थापित केले आहेत. महाराष्ट्र राज्य देशात सेवेची हमी देऊन नागरिकांना पारदर्शकपणे आणि कालमर्यादित सेवा देणारे अग्रगण्य राज्य आहे. ज्या राज्यांनी माहिती व तंत्रज्ञानाचा वापर केला तेथे सेवा वितरित करण्यामध्ये लक्षणीय सुधार झाला आहे.

महाराष्ट्र राज्याने ३८ विभागांच्या ५०६ विविध प्रकारच्या सेवा अधिसूचित करून महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाच्या अंमलबजावणीत निश्चितपणे मोठी प्रगती केली आहे. यामध्ये महसूल व वन विभागाच्या ६६, गृह विभाग विभागाच्या ९०, उद्योग, उर्जा व कामगार विभाग विभागाच्या ८०, नगर विकास विभागाच्या ५२, कृषी व पदुम विभागाच्या ४५ सेवांचा समावेश आहे. तथापि या सेवांमध्ये लक्षणीय वाढ करणे गरजेचे आहे. शासनाच्या सर्वच सेवा या कायद्याखाली आणणे नागरिकांच्या हक्काच्यासाठी आवश्यक ठरते. काही अन्य राज्यांनी अधिक सेवा अधिसूचित केल्या आहेत. उदाहरणार्थ - कर्नाटक राज्याने १०३३ सेवा, तर पंजाब राज्याने ५६८ तर आसाम राज्याने ५०६ सेवा. राज्य शासनाच्या सर्व विभागामार्फत दिल्या जाणाऱ्या सर्व सेवांची एक संपूर्ण सूची तयार करण्याची व अधिनियमाच्या अंतर्गत सर्व सेवा अधिसूचित करण्यासाठी निश्चित वेळापत्रक तयार करण्याची शिफारस आयोगाने शासनाला या आधीच केली आहे. आयोगाची सदर शिफारस प्राधान्याने अमलात आणण्यासाठी शासन विविध उपाय योजत असून राज्याचे मुख्य सचिव व अपर मुख्य सचिव (र. व का.) नियमित पाठपुरावा करत आहेत. नागरिकांना थेट आयोगाच्या संकेतस्थळावरून अथवा राज्यभर उभारण्यात आलेल्या ३५,४८८ आपले सरकार सेवा केंद्राद्वारे सेवा मिळविता येतात.

आयोगाकडून करण्यात आलेल्या काही सूचना व शिफारशींवर राज्य शासनाने कार्यवाही केली आहे. त्यामध्ये शासन परिपत्रक १२ मार्च २०१८ अन्वये जिल्हाधिकाऱ्यांना सेवा अधिनियमाच्या अंमलबजावणीसाठी व 'आपले सरकार' सेवा केंद्रांच्या माध्यमातून सर्व अधिसूचित सेवा उपलब्ध करून देण्यासाठी नियंत्रक अधिकारी म्हणून नियुक्ती करण्याचा निर्णय समाविष्ट आहे. मात्र सर्वसामान्य जनतेत या अधिनियमाबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी अधिक परिश्रम करणे आवश्यक आहे. अधिनियम अधिक लोकप्रिय करण्यासाठी आयोगाने बोधचिन्ह व घोषवाक्य निर्धारित केले आहे. सर्व विभागांनी बोधचिन्ह व घोषवाक्य यांचा उपयोग करण्याची विनंती आयोगाने शासनाला केली. त्यानुसार शासन परिपत्रक १५ फेब्रुवारी २०२० अन्वये सर्व विभागांनी अधिसूचित सेवा देताना आयोगाचे घोषवाक्य व बोधचिन्ह वापरण्यात यावे, अशी सूचना केली आहे. ऑनलाईन दिल्या जाणाऱ्या दाखल्यावर आता आयोगाचे बोधचिन्ह व घोषवाक्य चिन्हांकित करण्यात येत आहे. 'आपली सेवा-आमचे कर्तव्य' हे आयोगाचे बोधवाक्य आहे. आयोगाचे संकेतस्थळ aaplesarkar.mahaonline.gov.in हे आहे. तसेच या सेवा आरटीएस मोबाईल ॲपवरही उपलब्ध आहे.

अधिसूचित सेवांची संख्या वाढत नसल्याबाबत तसेच आपले सरकार संकेतस्थळाशी सेवांचे एकत्रीकरण न झाल्याबाबत आयोगाने काळजी व्यक्त केली आहे. तसेच 'आपले सरकार' या एकमंच (Single Platform) धोरणाचे पालन करणे, अनेक सेवांना जनतेचा मिळणारा अल्प प्रतिसाद वाढवणे, अद्यापही आपले सरकार संकेतस्थळावर उपलब्ध नसलेल्या ९० वर सेवा सप्टेंबर २०२२ अखेरीपर्यंत पूर्णतः ऑनलाईन करणे, ऑफलाईन प्राप्त व निकाली काढलेल्या अर्जांची माहिती संकेतस्थळावर उपलब्ध करून देणे, प्रथम व द्वितीय अपीले प्रलंबित राहणार नाहीत, याबाबत उपाययोजना करणे यासाठी आयोगाने शासनाच्या सर्व विभागांना कालबद्ध कार्यक्रम आखून दिला आहे. नजीकच्या काळात यामध्ये निश्चितपणे सुधारणा होऊन राज्यातील नागरिकांना शासनाच्या सर्व सेवा पारदर्शकपणे, विहित कालावधीत व तत्परतेने प्राप्त होतील, हे निश्चित.

जुलै २०१५ मध्ये हा कायदा पारीत करताना तत्कालीन मुख्यमंत्री व सध्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात केलेल्या भाषणात या कायद्याबद्दल बोलताना व्यक्त केलेले विचार हा कायदा राज्यात लागू करण्यामागची भूमिका विषद करतात. 'सामान्य माणसाला शासनाच्या सेवाहक्क म्हणून मिळाव्यात, शासनाचे विभाग हे सेवा देणाऱ्या संस्था व्हाव्यात, सामान्य माणसाला न्याय देण्याचा, सकारात्मक असा हा क्रांतिकारी कायदा आहे. सगळ्या विभागाच्या सर्व सेवा टप्प्याटप्प्याने या कायद्याखाली आणण्यात येतील.' विधिमंडळाने एकमताने सर्वसामान्य जनतेसाठी पारित केलेला हा कायदा निश्चितपणे त्यामागील उद्दिष्टांची पूर्तता करेल, यात शंका नाही.

**(लेखक हे महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग येथे मुख्य आयुक्त, (अ.का.) म्हणून कार्यरत आहेत.)**

# प्रेरणादायी व दिशादर्शक

बिपीन माळी

प्रत्येक प्रकल्पाची सद्य:स्थिती व हे प्रकल्प पूर्ण करण्यासाठीचे नियोजन याबाबतचा कालबद्ध कार्यक्रम हाती घेतला आहे. या प्रकल्पांतर्गतचे लाभ थेट मागासवर्गीयांना होणार असून त्यांचे जीवनमान उंचावण्यास निश्चितच मदत होणार आहे. महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाच्या असणाऱ्या भागभांडवलाबाबत तसेच अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या आकृतिबंधाबाबत सचिव, सामाजिक न्याय व विशेष साहाय्य यांच्या स्तरावर कार्यवाही करण्यात आली आहे.

## हाती घेतलेले प्रकल्प

महाप्रितने सौरऊर्जा प्रकल्प, इलेक्ट्रिक वाहने व चार्जिंग स्टेशन प्रकल्प, सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी पार्क व डेटा सेंटर प्रकल्प, महादीप, कृषिमूल्य साखळी, वेस्ट टू एनर्जी प्रकल्पांतर्गत बायोगॅस व जैविक खते प्रकल्प, महाप्रित अल्टरनेटिव्ह इन्फ्रास्ट्रक्चर फंड (मैफ), नवयुग लाभार्थी नोंदणीकरण प्रक्रिया, अल्टरनेटिव्ह इनोव्हेटिव्ह जनरेशन ऑफ एम्प्लॉयमेंट प्रोग्रॅम (आयगॅप), कोकण आपत्ती सौम्यीकरण आदी प्रकल्पाचा समावेश आहे. महाप्रितकडून निधी उभारल्यावर अपारंपरिक व नविनीकरण ऊर्जा (सोलर पार्क), कृषी प्रक्रिया उद्योग, सॉफ्टवेअर पार्क, राखेपासून विविध वस्तूंची निर्मिती, रस्ते बांधकाम, गृहनिर्माण, इमर्जिंग टेक्नोलॉजीशी संबंधित म्हणजे रोबोट, ड्रोनसह नवीन तंत्रज्ञानाशी संबंधित उद्योग, पर्यावरणाशी संबंधित नवीन उद्योग उभारण्यासाठी मदत केली जाणार आहे.

## २५ हजार ३६१ कोटींचे करार

महात्मा फुले नविनीकरणीय ऊर्जा व पायाभूत प्रौद्योगिकी मर्यादितने मुंबईत आयोजित केलेल्या महाप्रित हरितनिधी गुंतवणूक बैठकीत विविध २२ प्रकल्पांसाठी तब्बल २५ हजार ३६१ कोटी रुपयांचे सामंजस्य करार करण्यात आले. पॉवर फायनान्स कॉर्पोरेशन, रूरल इलेक्ट्रिफिकेशन कॉर्पोरेशन, इरेडा, ग्रो बेटर ॲग्री ओव्हरसीज, इंडिया इन्फ्रास्ट्रक्चर कंपनी यांच्यासह अनेक नामवंत कंपन्यांनी आपला उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

## ग्रीन फंड इन्व्हेस्टर मिट-२०२२

महाप्रितने ग्रीन फंड इन्व्हेस्टर मिट-२०२२ आयोजित केली होती. यामध्ये विकासक व गुंतवणूक संस्था यांना एकाच व्यासपीठावर आणून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मितीची साखळी निर्माण करण्याचा संकल्प महाप्रितने केला. या प्रकल्पातून मिळणारे अतिरिक्त उत्पन्न महात्मा फुले विकास महामंडळाच्या अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांसाठी वापरण्यात येईल. जेणेकरून मागास, दुर्बल घटकांना उत्पन्नाची साधने उपलब्ध होऊन त्यांची सर्वांगीण प्रगती होईल.

## स्थानिक स्वराज्य संस्थेबरोबर करार

पुणे महानगरपालिकेबरोबर ऊर्जा बचत, कमांड कंट्रोल सिस्टिम, ५० मेगावॉट क्षमतेचा सौरऊर्जा प्रकल्प इत्यादी महत्त्वाकांक्षी प्रकल्प महाप्रितने हाती घेतले आहेत. त्याचे कामकाजही गतीने सुरू केले आहे. महाप्रित कंपनीने ७ एप्रिल २०२२ रोजी पुणे महानगरपालिकेसोबत ऊर्जेची व ऊर्जा खर्चांचे बचत धोरण यासाठी उपाययोजना करण्यासाठीच्या प्रकल्पांसाठी सामंजस्य करार केला आहे.

नागपूर महानगरपालिकेचे विविध प्रकल्प जसे सौरऊर्जा प्रकल्प, ऊर्जा बचतीचा प्रकल्प, विद्युत वाहन चार्जिंगची पायाभूत सुविधा, कमांड कंट्रोल सिस्टिमची उभारणी व कार्बन उत्सर्जन आणि डी-कार्बोनायझेशन कृतिआराखड्याची अंमलबजावणी करणे इत्यादी प्रकल्प महाप्रिततर्फे राबवण्यात येणार आहेत.

## सामंजस्य करारांसाठीची तयारी

'महाप्रित'ची स्थापना मागासवर्गाच्या कल्याणासाठी झाली. त्यानुसार कंपनीचा नफा हा विशेष वर्गाच्या कल्याणासाठी खर्च

**महात्मा फुले नविनीकरणीय ऊर्जा व पायाभूत प्रौद्योगिकी मर्यादित (महाप्रित) ही कंपनी इतर शासकीय महामंडळांसाठी प्रेरणादायी व दिशादर्शक ठरणारी आहे. महाप्रित ही महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाची सहयोगी कंपनी असून या कंपनी अंतर्गत अनेक प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत. एप्रिल २०२१ मध्ये महात्मा फुले नविनीकरणीय ऊर्जा व पायाभूत प्रौद्यौगिकी मर्यादित अर्थात महाप्रित ही वेगळी उपकंपनी स्थापन करण्यात आली आहे.**




केला जातो. परंतु आता कंपनीने सर्वांना सोबत घेऊन विकास साधण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. यामुळेच कोरोनाकाळात थांबलेल्या कामाचा उपयोग अशा प्रकारच्या सामंजस्य करारांच्या तयारीसाठी केला. त्यामुळे आज इतिहासात पहिल्यांदाच एवढे मोठे करार झाले आहेत. ऊर्जाक्षेत्र हे नूतनीय उर्जेद्वारे सातत्याने नवीन स्तरावर जात आहे. नवीन तंत्रज्ञान यामध्ये येत आहे. हे सर्व ध्यानात घेऊनच आधुनिकतेचा कास धरणारे हे सर्व करार आहेत.

## करारांमधून रोजगारनिर्मितीची अपेक्षा

सर्वाधिक करार हे नूतनीय ऊर्जा क्षेत्रातील आहेत. साधारण ५० मेगावॅटमागे ८० प्रत्यक्ष रोजगार निर्मित होते. महाप्रित हरितनिधी गुंतवणूक बैठकीत जवळपास तीन हजार मेगावॅट नविनीकरणीय ऊर्जेचे करार झाले आहेत. याखेरीज प्रत्यक्ष रोजगाराच्या तीनपट अधिक अप्रत्यक्ष रोजगार असतात. त्यानुसार हा आकडा फार मोठा असेल. सामंजस्य करारांत काही रस्ते कामांचादेखील समावेश आहे. यासाठीच्या रोजगाराचा आकडा हा नूतनीय ऊर्जेहून अधिक असतो.

## करारांचे निकाल

एकूण करारांत सर्वाधिक करार सौरऊर्जेचे आहेत. सौरऊर्जा निर्मिती प्रकल्प तुलनेने लवकर उभे राहतात. पॅनेल बसवून काही पायाभूत सुविधा उभ्या करून तत्काळ निर्मिती करता येते. एकट्या पॉवर फायनान्स कॉर्पोरेशनने ७ हजार कोटींच्या सौरऊर्जा प्रकल्पासाठी करार केला आहे. त्यानुसार राज्याच्या नूतनीय ऊर्जा क्षेत्रात सुमारे २० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होईल, ज्याचा सर्वाधिक फायदा राज्यातील मागासवर्गीय लोकांना मिळेल.

## पुढील नियोजन

'महाप्रित' ही नूतनीय ऊर्जेसाठी स्थापन झालेली कंपनी असली तरी पायाभूत सुविधा तंत्रज्ञानाचादेखील त्यात समावेश आहे. त्यानुसार पायाभूत सुविधांच्या उभारणीसाठी 'फ्लाय ॲश'चा अधिकाधिक वापर करण्यासाठी कंपनी काम करीत आहे. राष्ट्रीय महामार्ग उभारणीसाठी भूसंपादन करून दिले जाणार आहे. लवकरच डिजिटल विद्यापीठदेखील उभारले जाईल .

## महाप्रित स्टार्टअप ज्ञान केंद्र

मागासवर्गीय घटकांच्या सामाजिक उत्थानाला चालना देण्यासाठी तसेच या प्रवर्गातील व्यक्तींच्या सामाजिक विकासासाठी व्यावसायिक व रोजगारक्षम शिक्षण देण्याच्या उद्देशाने महात्मा फुले नविनीकरणीय ऊर्जा व पायाभूत प्रौद्योगिकी मर्यादित (महाप्रित)च्या अंतर्गत ज्ञान केंद्राची स्थापना करण्यात आली आहे. 'महाप्रित स्टार्टअप ज्ञान केंद्र' या नावाने संस्थेच्या स्वरूपात स्थापित केंद्रामुळे तरुणांना व्यावसायिक संधी देण्यासाठी सक्षम बनवले जाईल.

महाप्रितच्या संचालक मंडळाच्या बैठकीत राष्ट्रीय शिक्षा धोरणाचे (एनईपी) उद्देश पूर्ण करण्यासाठी डिजिटल विद्यापीठ स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. राष्ट्रीय शिक्षण धोरणाचे एक उद्दिष्ट वर्तमान एकूण नोंदणी प्रमाण २६ ते ५० पर्यंत वाढवणे हे असल्याने डिजिटल विद्यापीठ स्थापन करण्यात येणार आहे. मल्टिपॉइंट एंट्री/एक्झिट आणि अकॅडेमिक बँक ऑफ क्रेडिट्स, वैयक्तिक शिक्षण या यासारखी इतर उद्दिष्टे डिजिटल विद्यापीठाद्वारे पूर्ण केले जातील. अभ्यासासंबंधीचे सर्व कार्यक्रम विद्यार्थिकेंद्रित तर असतीलच पण, ते राष्ट्रीय कौशल्य पात्रता संरचना अनुरूप आणि उपलब्ध असलेल्या रोजगाराच्या संधी यांच्याशी जोडलेले असतील. पारंपरिक विद्यापीठाला डिजिटल ॲप्लिकेशन्स म्हणून चालवणाऱ्या सर्व ॲप्लिकेशनचा डिजिटल प्लॅटफॉर्ममध्ये समावेश करण्यात येणार आहे. ईआरपीएलएमएस, डिजिटल प्रलेख, मूल्यांकनाच्या आधारे रोजगार, इंटर्नशिप हे सर्व मल्टि टेनंट आर्किटेक्चर, मल्टि इन्स्टंस्ड आणि व्हाईट लेबलवरती एकाच प्लॅटफॉर्ममध्ये एकत्रित केले जाणार आहेत. या नव्याने उभारण्यात येणाऱ्या केंद्राच्या मदतीने तरुणांना आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडले जाईल.

## डिजिटल विद्यापीठाचे काम

डिजिटल विद्यापीठ हे महाराष्ट्र राज्यातील दुर्बल घटक आणि अनुसूचित जातिघटकांवर विशेष लक्ष केंद्रित करेल. जेणेकरून त्यांच्या अंतर्गत अर्थसाहाय्य (क्रॉस सबसिडी) एसपीव्ही बनवता येईल. त्याचप्रमाणे डिजिटल विद्यापीठाच्या गैरभौतिक मर्यादा मान्य करून त्याद्वारे महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ (एमपीबीसीडीसी) आणि महाप्रितच्या दुर्बल घटकांच्या लाभार्थ्यांसाठी संसाधने निर्माण करता येतील.

**अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाप्रित**

# ठाणे खाडीला 'रामसर' दर्जा



**नुकतेच रामसर स्थळ म्हणून घोषित झालेली ठाणे खाडी जरी महाराष्ट्रात तिसऱ्या क्रमांकावर असली, तरी भारतामधील पहिले असे रामसर स्थळ आहे जे तीन शहरांच्या (ठाणे, मुंबई, नवी मुंबई) मधोमध आहे. ठाणे खाडी फ्लेमिंगो अभयारण्य क्षेत्र व पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील भाग म्हणजे ६५२२ हेक्टर, असे एकत्रित क्षेत्र रामसर स्थळ म्हणून घोषित करण्यात आले आहे. रामसर स्थळ घोषित होण्यासाठी ९ निकषांपैकी ६ निकषांची पूर्तता ठाणे खाडीने केली आहे. ठाणे खाडीमध्ये अनेक वनस्पती, प्राणी, पक्षी यांचा अधिवास आहे.**

महाराष्ट्र राज्य हे जैवविविधता संपन्न व समृद्ध राज्य आहे आणि 'पश्चिम घाट' हा राज्याला लाभलेला मानाचा तुरा आहे. ह्याच पश्चिम घाटाला ७२० कि.मी. लांबीची किनारपट्टी लाभली आहे, ज्यामध्ये विविध प्रकारचे पाणथळ अधिवास तसेच ३२४ चौ. कि.मी. इतके कांदळवन क्षेत्र आहे. या किनारपट्टीवर मजबूत ढालीप्रमाणे कांदळवनांचे जंगल उभे आहे. या कांदळवनांच्या रक्षणाकरिता राज्य सरकारने वन विभागांतर्गत २०१२ मध्ये 'मँग्रोव्ह सेल' या स्वतंत्र कक्षाची निर्मिती केली. कांदळवन रक्षणासाठी स्वतंत्र कक्षाची निर्मिती करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. त्यानंतर २०१५ मध्ये कक्षांतर्गत 'मँग्रोव्ह फाऊंडेशन'ची स्थापना करून कांदळवनांवरील उपजिविका, संशोधन आणि संवर्धनावर भर देण्यात आला. 'मँग्रोव्ह सेल' आणि 'मँग्रोव्ह फाऊंडेशन'ने कांदळवनांच्या संवर्धनासाठी केलेल्या अनेक प्रयत्नांमुळे कांदळवनांची ढाल अधिक मजबूत झाली आहे. २०२१ साली प्रसिद्ध झालेला 'वन सर्वेक्षण अहवाल' हा त्याचा पुरावा आहे. या विविध सागरी आणि किनारी पाणथळ परिसंस्था जपण्यासाठी अथक प्रयत्न कांदळवन कक्ष व प्रतिष्ठान वेळोवेळी करत आहे.

## पाणथळ परिसंस्था महत्त्वपूर्ण

पाणथळ परिसंस्था मानवाच्या अस्तित्वासाठी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. या परिसंस्था पडिक आणि निरुपयोगी वाटत असल्या, तरी पूरपरिस्थिती नियंत्रणात आणून मुख्य जमिनीचे समुद्रापासून रक्षण करतात आणि याबरोबरच पाण्याचा साठा उपलब्ध करून देण्यासाठी पाणथळ जमिनी महत्त्वाची भूमिका बजावतात. पाणथळ म्हणजेच 'वेटलॅण्ड' जमिनी, भूजलाचा एक उत्तम स्रोत असतात. नदी, तळी, खाडी, धरणाचे जलाशय, खार जमीन, भातखाचरे, मिठागरे, दलदली प्रदेश अशा प्रकारच्या पाण्याची साठवणूक होणाऱ्या जागांना प्रामुख्याने 'पाणथळ' म्हटले जाते. पावसाळ्यात अतिवृष्टी झाल्यास अतिरिक्त पाणी शोषून घेण्यासाठी यामधील काही जागा स्पंजसारखे काम करतात. या जागांवर पक्षी, कीटक, सरपटणारे प्राणी आणि अगदी वाघांसारख्या मोठ्या

श्वापदांचादेखील अधिवास आहे. स्थलांतर करणाऱ्या जगभरातील ८०० पक्षी प्रजातींपैकी ५० टक्क्यांपेक्षा जास्त प्रजाती पाणथळ परिसंस्थांवर अवलंबून आहेत. त्यामुळे या पाणथळ जमिनीचे महत्त्व जाणून त्यांचे संरक्षण होणे ही काळाची गरज आहे.

### रामसर कॉन्व्हेन्शन हा आंतरराष्ट्रीय करार

जागतिक पातळीवर पाणथळ क्षेत्रांचे संवर्धन व्हावे, या हेतूने २ फेब्रुवारी १९७१ रोजी इराणमधील रामसर या ठिकाणी पाणथळ जागांच्या संदर्भात कॉन्व्हेन्शन ऑफ वेटलँड्स परिषद झाली होती. या परिषदेत सहभागी देशांनी पाणथळ जागांच्या संवर्धनासंदर्भातील करारावर सह्या केल्या होत्या. सध्या जवळपाससुमारे १७१ देश रामसर परिषदेमध्ये सहभागी आहेत. रामसर कॉन्व्हेन्शन हा आंतरराष्ट्रीय करार असून हा करार पाणथळ जागांचे संवर्धन आणि पाणथळ जागा व त्यांच्या स्रोतांच्या सुज्ञ वापरासाठी राष्ट्रीय स्तरावर तसेच आंतरराष्ट्रीय सहकार्य उपलब्ध करून देतो. रामसर कॉन्व्हेन्शननुसार पाणथळ जमीन म्हणजे दलदल, फेन, पीटलँण्ड किंवा पाणी, नैसर्गिक किंवा कृत्रिम, कायमचे किंवा तात्पुरते, स्थिर किंवा वाहणारे, ताजे, खारे, समुद्राच्या पाण्याचे क्षेत्र ज्याची खोली ओहोटीच्या वेळेस सहा मीटर पेक्षा अधिक नसावी. हिमालयातील उंच उंच प्रदेशातील पाणवठे, गंगा, ब्रह्मपुत्रासारख्या मोठ्या नद्यांची पूरक्षेत्रे, सागरी किनारे, किनारपट्टीवरील सरोवरे, खारफुटी, दलदलीचा आणि समुद्री भागातील खडकाळ प्रदेशांमध्ये विपुल प्रमाणात पाणथळ क्षेत्रे आहेत. भारताच्या भौगोलिक क्षेत्रापैकी जवळजवळ ४.७ टक्के क्षेत्र पाणथळ जमिनीखाली आहे. १९८२ मध्ये भारत रामसर अधिवेशनाचा भाग बनला. भारतीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालय हे पाणथळ जमिनीच्या संवर्धनासाठी १९८५ पासून राज्य सरकारांना एकात्मिक व्यवस्थापन योजनांची आखणी व अंमलबजावणी करण्यास मदत करत आहे. १९८२ ते २०१३ पर्यंत भारतात २६ रामसर स्थळे होती आणि ४ ऑगस्ट २०२२ पर्यंत हा आकडा ६४ पर्यंत गेला. १३ ऑगस्ट २०२२ रोजी यामध्ये ११ नवीन पाणथळ स्थळांचा समावेश झाला, ज्यामधील एक स्थळ हे महाराष्ट्रातील ठाणे खाडी आहे. स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी ७५ रामसार स्थळे भारताकडे आहेत. तसेच दक्षिण आशियातील सर्वाधिक 'रामसर साईटस', तब्बल ७५ रामसर ठिकाणे आता भारतात आहेत.

यापूर्वी पाणथळांसाठीच्या आंतरराष्ट्रीय रामसर अधिवेशनात नाशिक जिल्ह्यातील 'नंदूर मधमेश्वर' अभयारण्यास जून २०१९ मध्ये रामसर स्थळाचा दर्जा देण्यात आला होता. हे महाराष्ट्रातील पहिले रामसर स्थळ ठरले आहे. जुलै २०२० मध्ये घोषित झालेले बुलडाण्यातील 'लोणार' सरोवर हे महाराष्ट्रातील दुसरे रामसर स्थळ आहे, तर हल्लीच ठाणे खाडीला रामसर स्थळाचा दर्जा मिळाला असल्याने महाराष्ट्रातील हे तिसरे रामसर स्थळ ठरले आहे.



### रामसरसाठी नऊ निकष

रामसर दर्जा मिळण्यासाठी लागणारी मार्गदर्शक तत्त्वे रामसरच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. रामसर कॉन्व्हेन्शनतर्फे रामसर स्थळ घोषित करण्यासाठी नऊ निकष निश्चित केली आहेत. त्यातील एकही निकष जर एखादी पाणथळ जागा पूर्ण करीत असेल, तर त्या जागेला रामसर जागेचा दर्जा दिला जातो. निकष जसे की, दुर्मीळ पाणथळ जागा, नामशेष होणारे पक्षी, महत्त्वाच्या वनस्पती किंवा प्राणी व त्यांच्या जीवनचक्रातील महत्त्वाचे अधिवास; २०००० किंवा त्याहून अधिक पाणपक्षी नियमितपणे भेट देत असल्यास, पाणथळ पक्ष्यांच्या एका प्रजातीच्या किंवा उपप्रजातींच्या संख्येतील एक टक्के नियमितपणे त्या पाणथळ जागेवर भेट देत असतील तर ती पाणथळ जागा आंतरराष्ट्रीय स्तरावर महत्त्वाची मानली जाते. तसेच देशी माशांच्या प्रजाती व उपप्रजाती यांना उबवण्याची जागा उपलब्ध करून देणे या निकषांच्या आधारे ऑफलाईन फॉर्म भरून राज्य पाणथळ समितीच्या शिफारसीनंतर राज्य शासनातर्फे, केंद्रीय पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालयात पाठवण्यात आला होता. त्यानंतर केंद्र शासनाने प्रस्तावाची छाननी करून प्रस्ताव रामसर सेक्रेट्रेएटकडे पाठवले व रामसर सेक्रेट्रेएटने त्यास १३ ऑगस्ट २०२२ रोजी मान्यता प्रदान केली.

### ठाणे खाडी तिसरे रामसर स्थळ

नुकतेच रामसर स्थळ म्हणून घोषित झालेली ठाणे खाडी जरी महाराष्ट्रात तिसऱ्या क्रमांकावर असली, तरी



भारतामधील पहिले असे रामसर स्थळ आहे जे तीन शहरांच्या (ठाणे, मुंबई, नवी मुंबई) मधोमध आहे. या खाडीला सर्वात मोठा गोड्या पाण्याचा स्रोत उल्हास नदी आहे. वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२ नुसार, ठाणे खाडीचे १६९० हेक्टर क्षेत्र हे फ्लेमिंगो अभयारण्य म्हणून २०१५ मध्ये घोषित करण्यात आले होते. तसेच मागील वर्षी ऑक्टोबर २०२१ मध्ये त्याभोवतीचे ४८३२ हेक्टर क्षेत्र पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील क्षेत्र म्हणून अधिसूचित केलेले होते. ठाणे खाडी फ्लेमिंगो अभयारण्य क्षेत्र व पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील भाग म्हणजे ६५२२ हेक्टर, असे एकत्रित क्षेत्र रामसर स्थळ म्हणून घोषित करण्यात आले आहे. रामसर स्थळ घोषित होण्यासाठी ९ निकषांपैकी ६ निकषांची पूर्तता ठाणे खाडीने केली आहे. ठाणे खाडीमध्ये अनेक वनस्पती, प्राणी, पक्षी यांचा अधिवास आहे. ठाणे खाडीत एक लाखाहून अधिक संख्येने स्थलांतर करून येणाऱ्या लेसर फ्लेमिंगोसाठी अधिवास उपलब्ध होतो. तसेच या परिसंस्थेत २०० पेक्षा जास्त इतर प्रजातींचे पक्षी आढळतात. शिवाय ठाणे खाडी स्थलांतरित पक्षांसाठी मध्य आशियाई उड्डाण मार्गावरील महत्त्वाचा थांबा असल्यामुळे त्याला महत्त्वाचे पक्षी क्षेत्र म्हणून देखील ओळखले जाते. या भागात २० हजाराहून अधिक पाणपक्षी, दुर्मीळ आणि संकटग्रस्त पाणपक्ष्यांचाही रहिवास असतो. ठाणे खाडीचे मडफ्लॅट्स, हजारोंच्या संख्येने येणाऱ्या स्थलांतरित व रहिवाशी पक्ष्यांना खाद्य पुरवतात. तसेच खाडी अनेक माशांना उबवणी स्थळ प्राप्त करून देते. ठाणे खाडी १२ दुर्मीळ व नामशेष होण्याच्या मार्गावर असणाऱ्या पक्षांचे आश्रयस्थान आहे.

ठाणे खाडी रामसर स्थळ घोषित झाल्याने पाणथळ जागेचे नियम २०१७ लागू होतील. या नियमांनुसार पाणथळजमिनीवर कोणत्याही प्रकारचे बदल किंवा अतिक्रमण, कोणत्याही उद्योगाची स्थापना आणि विद्यमान उद्योगांचा विस्तार, बांधकाम आणि कचरा निर्मिती किंवा हाताळणी किंवा साठवण किंवा विल्हेवाट, कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण किंवा इतर कुठल्याही कामांसाठी जमिनीचे रूपांतरण, घातक कचरा, इलेक्ट्रॉनिक कचरा, घन कचरा, उद्योग, शहरे, गावे आणि इतर मानवी वस्त्यांमधून प्रक्रिया न केलेला कचरा आणि सांडपाणी सोडणे, या नियमांच्या प्रारंभाच्या तारखेपासून १० वर्षांत उच्च पूरपातळीपासून ५० मीटरच्या आत, बोट जेटी वगळता कायमस्वरूपी कोणतेही बांधकाम, शिकार करणे इत्यादी अशा बाबींवर निर्बंध आहेत. रामसर, राष्ट्रांवर आणि जमीनदारांवर कोणतीही बंधने लादत नाही आणि रामसर ही नियमन करणारी संस्था नाही.

## जनजागृती महत्त्वपूर्ण

वाढत्या नागरीकरणाचा आणि औद्योगिकीकरणाचा ताण तर ठाणे खाडीला आहेच, परंतु आजचा सगळ्यात मोठा धोका म्हणजे अतिक्रमण व भराव टाकणे. यामुळे या खाडीवरचा ताण अधिक वाढत आहे. या सर्व धोक्यांना आळा घालण्याचे काम कांदळवन कक्षामार्फत सुरू असून ते आता अधिक भक्कम होईल. रामसर दर्जा मिळाल्यामुळे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीयदृष्ट्या ठाणे खाडी ठळकपणे अधोरेखित झाली असून त्यामुळे संवर्धन होण्यास मदत होईल. ठाणे खाडीची अधिक चांगल्या प्रकारे काळजी घेतली जाईल. सुयोग्य व्यवस्थापनातून खारफुटी वर्गीय वनस्पतींचे जतन आणि संवर्धन होईल. रामसर दर्जा मिळाल्यामुळे पक्षी निरीक्षणासाठी देश-विदेशातून पर्यटक आकर्षित होतील. तसेच पर्यावरण व पर्यटन वाढीस चालना मिळून स्थानिकांना रोजगार उपलब्ध होईल. यासोबत पाणथळ जागेचे महत्त्व लोकांपर्यंत पोहोचून संरक्षणास आणि संवर्धनास अधिक गती मिळेल आणि जागतिक पर्यटन नकाशावरदेखील ठाणे खादीची नोंद होईल. तसेच या क्षेत्राचे संरक्षण करण्यासह जैवविविधता टिकवण्यासाठी राष्ट्रीय यंत्रणांची मदत होईल. मुंबई, ठाणे आणि नवी मुंबई महापालिका प्रशासनाचाही यात महत्त्वाचा हातभार लागेल. ठाणे खाडीला रामसर दर्जा मिळाल्यामुळे, ठाणे खाडीने जागतिक पातळीवर स्थान मिळवले आहे. यामुळे ठाणे खाडीचे संवर्धन व संरक्षण करण्यासाठी आणि जनजागृतीद्वारे लोकांपर्यंत पोहोचण्यास मदत होईल.

**– वीरेंद्र तिवारी**

(अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष आणि कार्यकारी संचालक, कांदळवन प्रतिष्ठान);
आणि

**– डॉ शीतल पाचपांडे**

(उपसंचालक – प्रकल्प, कांदळवन प्रतिष्ठान)

# माळरानाचा राजा ‘माळढोक’



**शासनाने सोलापूर जिल्ह्यातील करमाळा, माढा, मोहोळ व उत्तर सोलापूर तसेच अहमदनगर जिल्ह्यातील कर्जत व श्रीगोंदा या परिसरातील गवताळ परिसंस्था ही ‘माळरानाचा राजा माळढोक’ या एका पक्ष्यासाठी अभयारण्य म्हणून घोषित केले. माळढोक हे महाराष्ट्र राज्यातील आकारमानाने सर्वात मोठे अभयारण्य आहे. हे अभयारण्य मुख्यत्वे माळढोक या पक्ष्याच्या संरक्षण व संवर्धनासाठी निर्माण करण्यात आले आहे. कोणत्याही एका पक्ष्यासाठी एवढा मोठा भूभाग संरक्षित करण्याची ही दुर्मीळ घटना आहे.**

**सुनील सोनटक्के**

माळढोक पक्षाचे संरक्षण व संवर्धन होण्यासाठी शासनाच्या वतीने प्रयत्न करण्यात येत आहेत. या अभयारण्यात जुलै ते डिसेंबर या कालावधीत स्थलांतरित पक्षाचे दर्शन होत असते. जुलै २०२२ च्या दुसऱ्या आठवड्यात या अभयारण्यात माळढोक पक्षाचे (मादी) दर्शन येथील वन कर्मचाऱ्यांना झाले. त्यानंतर वन विभागाच्या कर्मचाऱ्यांकडून माळढोक पक्ष्यावर लक्ष ठेवून त्याच्या वेळोवेळी नोंदी घेतल्या जात आहेत. माळढोक पक्षी आल्याने या अभयारण्यात पर्यटकांचीही गर्दी वाढत आहे. पुढील काळात वन्यजीव विभागाच्या वतीने राजस्थान येथून काही नर व मादी माळढोक आणून या अभयारण्यात त्यांचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. या अभयारण्यात नियमितपणे माळढोक पक्षी दिसून आला, तर या भागात पर्यटनाला मोठ्या प्रमाणावर चालना मिळून नान्नज येथील माळढोक पक्षी अभयारण्य देशाच्या किंबहुना जगाच्या पर्यटनाच्या नकाशावर येण्यास मदत मिळेल.

माळढोक पक्षी अभयारण्य हे सोलापूर शहरापासून २२ किलोमीटर अंतरावर सोलापूर-बार्शी राज्य मार्गावर नान्नज येथे आहे. सोलापूर जिल्ह्यातील करमाळा, माढा, मोहोळ आणि उत्तर सोलापूर (अंशतः) तसेच अहमदनगर जिल्ह्यातील कर्जत व श्रीगोंदा या तालुक्यातील ३६६.७३ चौरस किलोमीटर क्षेत्र हे माळढोक पक्षी अभयारण्य म्हणून राज्य शासनाने ९ मार्च २०१६ नुसार घोषित केले आहे.

माळढोक हे महाराष्ट्र राज्यातील आकारमानाने सर्वात मोठे अभयारण्य आहे. हे अभयारण्य मुख्यत्वे माळढोक या पक्ष्याच्या संरक्षण व संवर्धनासाठी निर्माण करण्यात आले आहे. कोणत्याही एका पक्ष्यासाठी एवढा मोठा भूभाग संरक्षित करण्याची ही दुर्मीळ घटना आहे. देशातील अतिसंकटग्रस्त प्रजातीमधील माळढोकसाठी प्रसिद्ध असणाऱ्या नान्नज (ता. उत्तर सोलापूर) अभयारण्यात सध्या

एक माळढोक आढळून आलेला आहे.

महाराष्ट्रातील या अभयारण्याचा भाग हा पूर्णतः पर्जन्यछायेत येतो व राज्यातील सर्वात कमी पावसाच्या भागांमध्ये गणला जातो. त्यामुळे येथे झाडांनी व्यापलेला प्रदेश अतिशय नगण्य आहे. येथील जंगल हे मुख्यत्वे गवताळ आहे व काटेरी वनस्पतींनी व्यापलेले आहे. बाभूळ, आपटा, नीम, शीसव, मापटी, तारवाड, अमोणी, कांचारी यांसारख्या वनस्पती या जंगलात आहेत. येथील माळरानावरील गवताळ परिसंस्था ही सोलापूर जिल्ह्याच्या वैभवात भर घालते.

## वन्यप्राणी संपदा

माळढोक हा येथील मुख्य वन्य पक्षी असून अत्यंत दुर्मीळ प्रजाती आहे. एवढा मोठा भूभाग संरक्षित करूनही माळढोक पक्षी जुलै ते डिसेंबर दरम्यानच येतो. डौलदार काळवीट हा माळरान परिसरात आढळणारा मुख्य प्राणी आहे. याबरोबरच तरस, कोल्हा, लांडगा, रानससा, खोकड, मुंगूस असे अनेक सस्तन प्राणी येथे मुक्तपणे वावरताना दिसतात.

## पक्षी वैभव

माळढोक, गरुड, शिक्रा, कापशी घार, मधुवाज, माळ खरुची, श्रृंगी घुबड इत्यादी शिकारी पक्षी व टिटवी, धाविक, चंडोल, खाटिक, पखुरडी, हुदहुद, भारद्वाज, सातभाई, वेडाराघू, रातवा, कोतवाल, नीलपंख असे अनेक पक्षी येथे आढळतात.

## माळढोकचे अस्तित्व

आपल्या देशात शहामृग दिसत नाही. शहामृग पक्षी आफ्रिकेमध्ये दिसतो. आपल्याकडे शहामृगापेक्षाही छान व डौलदार माळढोक पक्षी दिसतो. माळढोक भारतामधील उडणारा सर्वाधिक वजनदार पक्षी आहे. माळढोक पक्षी पूर्वी मोठ्या संख्येने दिसत होते, पण आज फक्त बोटावर मोजण्याइतकेच माळढोक उरले आहेत. माळढोक पक्षी कायमचा नष्ट होण्याच्या मार्गाला लागला आहे. याची कारणे अनेक आहेत. त्यातील महत्त्वाचे म्हणजे याची मोठ्या प्रमाणामध्ये शिकार झाली. माळढोक माळरानावर राहतो पण माणसांची संख्या वाढली व माळढोकच्या घरात आपण घुसलो. माळढोक पिकांचे रक्षण करतो. त्यामुळेच घुबडासारखाच माळढोकही शेतकऱ्यांचा मित्रच आहे. तर अशा या शेतकऱ्यांच्या मित्राचे संवर्धन करणे गरजेचे आहे.

## आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर

माळढोक पक्षी व त्यांचे संवर्धन करणे ही आपल्या सर्वांचीच जबाबदारी आहे. महाराष्ट्रामध्ये वरोरा व नान्नज-मार्डी येथे अशाप्रकारे संवर्धनाचे प्रयत्न चालू आहेत. एप्रिल ते नोव्हेंबर हा पक्षी या भागात प्रजननासाठी येण्याचा काळ असतो. एप्रिल २०१५ मध्ये फेब्रुवारी महिन्यात नान्नज-मार्डी येथे आलेल्या बडू आणि छोटू या दोन माळढोक पक्ष्यांपैकी छोटुला सौर ऊर्जेवर चालणारा ट्रान्समीटर बसवण्यात आला. या ट्रान्समीटरमधून रोज सकाळी तसेच सायंकाळी या पक्ष्याचा ठावठिकाणा कळून येतो. आतापर्यंत हा छोटू ज्या ज्या भागात हिंडलेला आहे त्यात असे दिसून आले आहे की, मोकळी जागा, शेतीची जागा व गवताळ प्रदेशात हा जास्तीत जास्त वेळ वास्तव्यास व खाण्यासाठी (Foraging) असतो. विशेषतः सकाळी व संध्याकाळी हा पक्षी उघड्या व गवताळ जागेमध्ये जास्त प्रमाणात आढळतो. ह्या माहितीवरून

बदलती पीक पद्धती व उत्पादनात मोठ्या प्रमाणावर वाढ होण्यासाठी शेतकऱ्यांकडून पिकांवर होणाऱ्या कीटकनाशकांच्या अतिवापरामुळे माळढोक पक्षाचे खाद्य असलेल्या कीटकांचेही प्रमाण कमी होत चाललेले आहे. त्यामुळे या अभयारण्यातील माळढोकची संख्या कमी होत आहे. जुलै ते डिसेंबर दरम्यान माळढोक पक्ष्याचा नेहमी वावर असतो. यंदा सर्वत्र चांगला पाऊस झाल्याने अभयारण्यातील गवतही चांगल्या प्रकारे वाढलेले आहे. त्या गवतावरील किडे, नाकतोडे, उंदीर व अन्य कीटक खाण्यासाठी माळढोक पक्षी अभयारण्यात दरवर्षी येतो. माळढोकला पाहण्यासाठी पर्यटकांची संख्याही या कालावधीत वाढते. पर्यटकांना गाईडशिवाय अभयारण्यात फिरता येत नाही. तसेच माळढोकचे फोटोही विनापरवानगी काढता येत नाहीत.

**- दिलीप वाकचौरे, साहाय्यक वनसंरक्षक (वन्यजीव), पुणे.**



माळढोक पक्ष्यांसाठी निश्चित कोणत्या प्रकारचे क्षेत्र संरक्षित करणे गरजेचे आहे हे समजून आल्याने त्या पद्धतीने या अभयारण्यात विशेष क्षेत्र संरक्षित करण्यात आलेले असून त्याचे संवर्धनही योग्य पद्धतीने केले जात आहे.

### माळढोकचे प्रजनन

माळढोक हा उडू शकणाऱ्या पक्षांतील सर्वात वजनदार पक्षी आहे. नराची उंची १२२ सेंमी (४ फूट), तर मादीची उंची ९२ सेंमी (३ फूट) असते. नराचे वजन १५ किलो, तर मादीचे वजन ७ किलोपर्यंत असते. पावसाळ्यात खायला भरपूर खाद्य मिळत असल्यामुळे माळावरचे प्राणी, पक्षी प्रजनन करतात. अशा छान वातावरणामध्ये माळढोक पक्षीही प्रजनन करतो. मादीला आकर्षित करण्यासाठी नर माळढोक शेपटीचा छोटा पिसारा फुलवून मोरासारखा नाच करतो. नाच करतानाच माळढोक गळ्याची पिशवी फुगवून लांबपर्यंत ऐकू जाणारा हूमऽऽ हूमऽऽ असा आवाज करतो. या आवाजाकडे आकर्षित होऊन मादी नराकडे येते. दोघांचे मिलन झाल्यानंतर मादी घरटे न बांधताच जमिनीवरच एकच अंडे घालते. मादीचे लक्ष नाही असे कळताच कोल्हा, खोकड, लांडगा, घोरपडीसारखे प्राणी अंडे खायचा प्रयत्न करतात, पण मादी दिवसरात्र अंड्याचे रक्षण करते. एक महिना अंडे उबवल्यानंतर अंड्यातून पिल्लू बाहेर पडते. माळढोकचे पिल्लू एक वर्ष आईबरोबर राहते. या एका वर्षात आई शिकारी पक्ष्यांपासून पिल्लाचे रक्षण करते. एका वर्षात पिल्लू आईकडून बऱ्याच गोष्टी शिकते. पुढील पावसाळ्यात पिल्लू आईपासून वेगळे होते. मादी परत प्रजननासाठी मोकळी होते व नवीन अंडे घालते.

### अतिसंवेदनशील वन्यजीव अधिवास क्षेत्र

राज्यात ४९ अभयारण्ये व ६ राष्ट्रीय उद्याने अशी ५५ संरक्षित क्षेत्रे आहेत. ही सर्व संरक्षित क्षेत्रे धोकाग्रस्त, अतिसंवेदनशील वन्यजीव अधिवास क्षेत्र निर्मिती करण्याचे प्रस्तावित आहे. यामध्ये नान्नज माळढोक अभयारण्याचाही समावेश असल्याने हा परिसर धोकाग्रस्त अतिसंवेदनशील वन्यजीव अधिवास क्षेत्र असेल. म्हणजे पुढील काळात नान्नज अभयारण्यासाठी अधिक संरक्षण प्राप्त होणार आहे. माळढोक हा स्थलांतरित व लाजाळू पक्षी असल्याने तो सहजासहजी दिसत नाही. माळढोक पक्षाच्या दर्शनासाठी पक्षिप्रेमींना तासनतास वाट पाहावी लागते. हा पक्षी सहज दिसत नाही म्हणून अभयारण्यात नाही, असे म्हणणेही चुकीचे ठरेल.

> माळरानावरील गवताळ परिसंस्था हे सोलापूर जिल्ह्याचे वैभव असून या माळरानावरील ढोक म्हणजेच माळढोक हे त्याचे वैभव आहे. महाराष्ट्राबरोबरच राजस्थान, मध्यप्रदेश, कर्नाटक अशा राज्यात त्याचा अधिवास दिसून येतो. माळढोक पक्ष्याचे संवर्धन व संरक्षण करण्यासाठी वनविभाग प्रयत्नशील असून दरवर्षी पक्षी सप्ताहसारखे उपक्रम, पक्षी निरीक्षणे मारुती चितमपल्ली यांच्यासारख्या अरण्यऋषींचे मार्गदर्शन, व्याख्याने, लोकजागृतीपर उपक्रम हे स्थानिक स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने राबवले जातात.
>
> **- धैर्यशील पाटील, उपवनसंरक्षक, सोलापूर**

### अभयारण्यात माळढोक असल्याची नोंद

अभयारण्यात माळढोक पक्षी आढळल्यास त्याची नोंद वन विभागाकडे नियमितपणे होत असते. वन विभागाचे अधिकारी कर्मचारी माळढोकबाबत नेहमीच जागृत असतात. माळढोक पक्षी साधारणतः जुलै ते डिसेंबर या कालावधीत दिसून येतो. हा पक्षी दिसल्यानंतर नियमितपणे या पक्षावर वन विभागाकडून लक्ष ठेवून त्याची नोंद ठेवली जात असते.

जुलै २०२२ च्या दुसऱ्या आठवड्यापासून अभयारण्यातील संरक्षित क्षेत्रामध्ये माळढोक पक्षी वन्यजीव विभागाच्या कर्मचाऱ्यांना गस्त घालत असताना आढळून आला. स्थानिक कर्मचाऱ्यांनी माळढोक परत आल्याचा अंदाज व्यक्त केला. नंतर कर्मचाऱ्यांना माळढोक मादी गवतावरील किडे तसेच अन्य खाद्य खात असताना आढळून आली. त्या वेळी माळढोकचे चित्रीकरणही वन्यजीव कर्मचाऱ्यांनी केले.

माळढोक पक्षी अभयारण्यात मादी माळढोक सोबत दुसरा जोडीदार देण्याचा विचार सुरू असून लवकरच राजस्थान येथून तीन नर व दोन मादी आणण्याचे नियोजन आहे. या अभयारण्यात माळढोकची संख्या वाढवण्यासाठी वन विभागाच्या वतीने प्रयत्न केले जात आहेत. माळढोकची संख्या वाढली, तर पुढील काळात या अभयारण्यात पक्षिप्रेमी पर्यटकांची संख्या ही मोठ्या प्रमाणावर वाढण्यास मदत मिळेल, असे वाटते.

### वन विभागाच्या सोयीसुविधा

गवताळ माळरानाचा राजा अशी उपाधी असणारा व जगातील दुर्मीळ पक्ष्यांमध्ये समावेश असणारा माळढोक पक्षी पाहण्यासाठी दरवर्षी देशभरातून अभ्यासक व हौशी पर्यटक येतात. घनदाट झाडी, वाघ, सिंह, हत्तींचा वावर असलेले ठिकाण म्हणजेच जंगल ही प्रत्येकाची जंगलाबाबतची संकल्पना असते. वन विभागाचे विश्रामगृह येथे असून पर्यटकांच्या राहण्याची व जेवणाची व्यवस्था येथे शासकीय दराप्रमाणे होऊ शकते. अभयारण्यात पर्यटकांसाठी बांबू हाऊस, टेंट हाऊस, निरीक्षण मनोरेही वन विभागाच्या वतीने तयार करण्यात आले आहेत. त्यामुळे माळढोक पक्षी पाहणे व त्याचे निरीक्षण करणे तसेच अन्य वन्य पक्षाचे निरीक्षण करण्यासाठी पर्यटकांना वन विभागाकडून चांगल्या प्रकारे मार्गदर्शन होत असते. तसेच आवश्यक सोयीसुविधाही उपलब्ध करून दिल्या जात आहेत. नान्नजच्या या अभयारण्यात कायमस्वरूपी माळढोक पक्षाचा अधिवास वन विभागाच्या प्रयत्नाने झाल्यास या ठिकाणी कायमस्वरूपी पर्यटकांची वर्दळ राहील व हे अभयारण्य देशाच्या पर्यटनाच्या नकाशावर येईल याची खात्री वाटते.

जिल्हा माहिती अधिकारी, सोलापूर.



श्री. नरेंद्र मोदी
मा. पंतप्रधान

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन



महात्मा जोतिराव फुले

# महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत प्रोत्साहनपर लाभ

## उजळे प्रकाश प्रगतीचा
## ध्यास वचनपूर्तीचा




## योजनेचा शुभारंभ
### महाराष्ट्र शासनाची वचनपूर्ती

राज्यातील ७ लाख शेतकऱ्यांच्या बँक खात्यामध्ये
दि. २० ऑक्टोबर,२०२२ रोजीच्या कार्यक्रमात
मा. मुख्यमंत्री व मा. उपमुख्यमंत्री यांच्या हस्ते
रिमोट क्लीक वरुन रु. २५०० कोटी रक्कम थेट जमा.

## योजनेची वैशिष्ट्ये

- राज्यातील अल्पमुदतीच्या पीक कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना रु. ५० हजारपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्याचा ऐतिहासिक निर्णय.
- नियमित पीक कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर लाभ देणारे महाराष्ट्र हे देशांतील पहिले राज्य.
- प्रोत्साहनपर लाभ योजनेची संपूर्ण अंमलबजावणी ऑनलाईन पद्धतीद्वारे.
- २०१७-१८, २०१८-१९ व २०१९-२० या पैकी कोणत्याही दोन आर्थिक वर्षांत पीक कर्जाची उचल घेऊन नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर लाभ.
- राज्यात झालेल्या अतिवृष्टी व महापूरामुळे नुकसान झाल्याने नैसर्गिक आपत्ती अंतर्गत कर्जमाफीचा लाभ मिळालेले शेतकरी सुद्धा योजनेस पात्र.
- शेतकरी मयत झाल्यानंतर त्यांच्या वारसांनी कर्जाची परतफेड केली असल्यास वारस सुद्धा प्रोत्साहनपर योजनेच्या लाभास पात्र.
- राज्यातील अंदाजे १६ लाख पात्र शेतकऱ्यांना रु. ४७०० कोटी प्रोत्साहनपर लाभ देण्याचे प्रस्तावित.
- उर्वरित सर्व पात्र लाभार्थ्यांना नोव्हेंबर २०२२ अखेर लाभ देण्यास राज्यशासन कटिबद्ध

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
महाराष्ट्र शासन

श्री. अतुल सावे
मा. मंत्री (सहकार)

श्री. देवेंद्र फडणवीस
मा. उपमुख्यमंत्री

श्री. एकनाथ शिंदे
मा. मुख्यमंत्री

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2018-20
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 12th to 17th Every Month
Date of Publication : 10th of Every Month

सत्यमेव जयते | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# लोकराज्य

## अधिकृत-विश्वासार्ह-वस्तुनिष्ठ




### वाचकांच्या प्रतिक्रियांचे स्वागत!

राज्याच्या जडणघडणीचा बोलका साक्षीदार ठरलेल्या लोकराज्य मासिकाची गुणवत्ता आणि संदर्भमूल्य अधिक वाढविण्यासाठी वाचकांच्या प्रतिक्रिया अत्यंत मोलाच्या आहेत. वाचकांनी विधायक सूचना, लेखांवरील अभिप्राय lokrajya2011@gmail.com या ईमेलवर किंवा खालील पत्त्यावर पाठवावेत. निवडक प्रतिक्रियांना अंकात योग्य ती प्रसिद्धी देण्यात येईल.

**अंक ऑनलाइन मोफत उपलब्ध**

संकेतस्थळ : https://dgipr.maharashtra.gov.in
आणि https://mahasamvad.in

**पत्ता :** उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, नवीन प्रशासन भवन, १७ वा मजला, मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई ४०००३२.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

Visit: www.mahanews.gov.in | Follow Us: /MahaDGIPR | Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR

प्रति / TO

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

*If undelivered, please return to:*

प्रेषक / From

**अनिल आलूरकर**
उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
लोकराज्य शाखा, ठाकरसी हाऊस, २रा मजला, मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट हाऊसजवळ, शुरजी वल्लभभाई मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई - ४०० ००१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक अनिल आलूरकर, उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी मे. प्रिंट प्लस प्रा.लि., ई-१, जय जलाराम इंडस्ट्रियल कॉम्प्लेक्स, व्हिलेज पिंपळास, ता. भिवंडी, जि. ठाणे ४२१ ३११ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.

मुख्य संपादक : जयश्री भोज